# ऐतिहासिक निवेदने

लेखक -
स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

“आपल्याला आवडो न आवडो युद्ध आपल्या दाराशी आल्याने आपण आपल्या घरादाराचे, मत्तेचे नि जीविताचे रक्षण करण्यासाठी सैनिक झाले पाहिजे. आधी युद्धसाधनांचे उत्पादन वाढविले पाहिजे.”

“शत्रूच्या शस्त्रांनीच त्यांच्याशी लढून विजय संपादण्याची शक्ती उत्पन्न केली पाहिजे.”

“माझ्यासमवेत असणाऱ्या अस्पृश्य बांधवांनाही जेथे प्रवेश असेल त्याच ठिकाणी काय ती मी भाषणे देईन.”

“अल्पसंख्याकांना त्यांचे अधिकार देण्यास हिंदू केव्हाही सिद्ध आहेत. परंतु एका राष्ट्राच्या पोटात दुसरे राष्ट्र निर्माण करण्याचे प्रयत्न हिंदू केव्हाही चालू देणार नाहीत.”

“राजनीतीचे हिंदूकरण आणि हिंदूंचे सैनिकीकरण करा.”



# ऐतिहासिक निवेदने

लेखक: स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

**इंटरनेट अधिकार**

**स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक**

**स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, दादर पश्चिम, मुंबई ४०००२८**

प्रकल्प संचालक : रणजित विक्रम सावरकर

www.savarkarsmarak.com

# ऐतिहासिक निवेदने

## हिंदू मतदारांना आवाहन

जुलै १९३८ मध्ये फैजाबाद (संयुक्त प्रांत) येथील निवडणुकीत मतदारांनी हिंदूसभापुरस्कृत डॉ. सुरजपालसिंग यांनाच मते द्यावीत, असे आवाहन करणारे वीर सावरकरांचे हे पहिले पत्रक.

“फैजाबादमधील हिंदू मतदारांनो, हिंदूंच्या हिताचे संरक्षण करण्यास वचनबद्ध असलेल्या राष्ट्रहितदक्ष अशा हिंदू महासभा इच्छुकालाच आपण आपली मते देऊन आपले कर्तव्य पार पाडा. बहुसंख्य हिंदूंच्या हिताचे संरक्षण हे भारतीय राष्ट्रहिताच्या संरक्षणाशी सुसंगतच आहे. काँग्रेस दर्शिकेवर उभा नसलेल्याला मत देणे म्हणजे अराष्ट्रीय कृत्य करणे अशी जी एक समजूत आज रूढ होऊ पहात आहे ती मुळातच चूक आहे. एवढेच नव्हे तर त्यामुळे हिंदूंचा घात होत आहे. प्रत्येक पक्षाला त्याचे इच्छुक उभे करण्याचा नैतिक नि घटनात्मक अधिकार आहे. मुसलमानांना त्यांच्याच अधिकारांचे रक्षण करण्यासाठी स्वतंत्र मतदारसंघ आहेत. ख्रिश्चनांसाठी सुद्धा तशी सोय आहे. त्याचप्रमाणे हिंदूंच्या हितरक्षणासाठी जो मतदारसंघ आहे त्याला चुकीने ‘सर्वसाधारण मतदारसंघ’ असे नाव दिले आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत हिंदूंनाही हिंदू इच्छुक उभे करण्याचा अधिकार असून हिंदूंची एकमेव संघटित संस्था हिंदू महासभा हिंदुहितरक्षणाचे कर्तव्य करण्यासाठी ही निवडणूक लढवीत आहे.

आजवरच्या निवडणुकीत हिंदू मतदारांनी काँग्रेसलाच विजयी केल्यामुळे तिच्या प्रतिनिधींनी राष्ट्रीय दृष्टीने न्याय्य अशा हिंदू अधिकारांचे रक्षण केले नाही. काँग्रेसचे प्रतिनिधी उघडपणे आपण हिंदू आहोत हे सांगण्यासही लाजतात. एवढेच नव्हे तर स्वतःला हिंदू म्हणविणे अराष्ट्रीय समजतात. त्यांना प्रामाणिकपणे तसे वाटत असेल तर आमचे म्हणणे एवढेच आहे की त्यांनी निवडणुकीचे वेळीही हिंदु मतदारांकडे हिंदू म्हणून मत मागू नये. निवडणुकीच्या पूर्वी स्वतःला हिंदू म्हणविणाऱ्या नि निवडून आल्यावर आपण हिंदू नाही असे म्हणणाऱ्या इच्छुकाला मत न देता, हिंदूंनो, तुम्ही हिंदुहित रक्षणाची प्रतिज्ञा घेणाऱ्या हिंदू महासभेच्या इच्छुकालाच आपले मत द्या.

पण हिंदू मतदारांनी ही दक्षता घेतली नाही आणि मुसलमानांनी मात्र अराष्ट्रीय मुसलमानांनाही निवडून दिले. त्यांनी सबंध देशात मुसलमानांच्या हितरक्षणार्थ दंगे केले. त्याचा प्रतिकार करण्यास हिंदू म्हणून कोणीच पुढे आले नाही. अशा प्रकारे हिंदू प्रतिनिधी न निवडण्याची ही चूक हिंदूंना आत्मघातक झाली. उदाहरण म्हणून पंजाब नि बंगालच्या मुस्लिम मंत्र्यांची कृत्ये पहा. ते उघडपणे मुसलमानांची बाजू घेऊन हिंदूंना सतावण्याच्या धमक्या देत आहेत. तर उलट संयुक्त प्रांताचे (आजच्या उत्तर प्रदेशचे) काँग्रेसी हिंदू मंत्री हिंदूंची न्याय्य गाऱ्हाणीही अैकून घेत नाहीत. हिंदू सभा,

आर्यसमाज, हिंदू संघटन हे शब्दही त्यांना तिरस्कारार्ह वाटतात. ते म्हणतात की आर्यसमाजामुळेच मुसलमान चिडतात. ते शिवाजी, राणाप्रताप नि अन्य पराक्रमी हिंदू देशभक्तांना वाट चुकलेले समजतात आणि सांगतात की मुल्ला नि मौलवींनी मुसलमानी धर्माचा प्रचार बळाने केला नाही! हे काँग्रेसी नेते हिंदी भाषेत मुसलमानी शब्दाचा प्रभाव वाढवून हिंदुस्थानी ही राष्ट्रभाषा करण्यासाठी धडपडतात. मुसलमानांना आवडत नाही म्हणून नागरीलिपीला विरोध करतात. मुसलमानी भावनांचा आदर करण्यासाठी त्यांनी वंदेमातरम् हे राष्ट्रगीत कापले आणि हिंदुभावनांना पायदळी तुडविले. अशा प्रकारे हिंदू मतदारांनी निवडून दिलेले काँग्रेसी प्रतिनिधी हिंदू मतदारांच्या भावना पायदळी तुडवून जीना हक्क आणि मंडळींना आश्वासन देत आहेत की ते कधीही गोवध-बंदी करणार नाहीत.

काँग्रेसच्या त्या दुष्ट प्रवृत्तीपासून संरक्षण करण्याचा एक उपाय आहे; तो म्हणजे हिंदूंनी त्यांना आपले मत देऊ नये आणि त्यांना आपले प्रतिनिधी म्हणून निवडू नये, तर उलट जे उघडपणे एक संघटित पक्ष म्हणून, हिंदुहिताचे संरक्षण करण्याचे आश्वासन देतात, अशा हिंदूसभा अच्छुकांनाच आपली मते द्यावीत. काँग्रेसमध्येही चांगले लोक आहेत; काही काही, पण सध्या त्या लोकांचा भलेपणा लक्षात न घेता ते ज्या धोरणाला बांधलेले आहेत ते काँग्रेसचे हिंदुघातक धोरण आपण पहावे नि त्यापासून हिंदुहिताचे रक्षण करण्यासाठी हिंदू सभेला मत द्यावे.

हिंदू महासभा ही केवळ धनिकांची प्रतिनिधी आहे हा प्रचारही खोटा आहे. ह्या उलट वस्तुस्थिती अशी आहे की कोट्याधीश धनिकांनी नि गिरणवाल्यांनी दिलेल्या लक्षावधी रुपयांच्या साहाय्यामुळे काँग्रेसच फुगलेली आहे. भूस्वामी नि श्रमिक हे दोघेही हिंदू आहेत. त्यामुळे हिंदू-महासभा दोघांच्या हिताचे न्याय्य ते संरक्षण करील. तसेच हिंदू सभेचे प्रतिनिधी हिंदुहिताला बाध न आणणाऱ्या प्रश्नावर काँग्रेसच्या राष्ट्रीय भूमिकेला पाठिंबा देत राहतील.

शेवटी हिंदू सभा सदस्यांना एकच गोष्ट सांगतो. ह्या निवडणुकीत तुम्हाला यश मिळाले नाही तरी त्यांनी धैर्य न सोडता पुढील निवडणुका लढविण्याची सिद्धता करावी. म्हणजे पुढील एखाद्या निवडणुकीत ते हिंदू मंत्रिमंडळ बनवू शकतील, याविषयी मला मुळीच शंका नाही! हिंदू मतदारांनीच काँग्रेसला सत्ताधीश केले आहे परंतु काँग्रेसने हिंदूंचा विश्वासघात केल्याने ते हिंदूच तिला खाली ओढू शकतील आणि शक्तिशाली हिंदू मंत्रिमंडळ स्थापन करू शकतील."

## काँग्रेस हिंदूंची प्रतिनिधी नाही!

काँग्रेसचे अध्यक्ष श्री. सुभाषचंद्र बोस यांच्या पत्रकाला उद्देशून दिनांक २० नोव्हेंबर १९३८ रोजी काढलेले पत्रक असेः

“सध्याच्या परिस्थितीचा विचार करता लवकरच एखादी वर्तुळ परिषद भरविण्यात आली तर त्या परिषदेला हिंदुस्थानच्या वतीने एकट्या काँग्रेस पक्षालाच बोलवावे असे जे पत्रक सुभाषचंद्र बोस यांनी

काढले आहे ते योग्य नाही. याचे पहिले कारण असे की मुसलमानांचे वतीने बोलण्याचा अधिकार मुस्लिम लीगचे बॅ. जीना यांनी काँग्रेसला दिलेला नाही. त्यांच्या वाटा-घाटीवरून असे दिसते की ज्यावेळी बॅ. जीना हेच काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून निवडले जातील तेव्हाच काँग्रेस मुस्लिम लीगचे प्रतिनिधित्व करू शकेल! पण त्यांच्या ह्या संबंधाचा विचार न करता माझे म्हणणे असे की काँग्रेसला हिंदूंचे प्रतिनिधित्व करण्याचाही अधिकार नाही! काँग्रेस जरी हिंदुमतावर निवडून आली असली तरी तिने हिंदुहितरक्षणाची हमी कधीही दिलेली नाही, तर उलट मुसलमानांच्या अनेक अन्यायी मागण्या मान्य करणारी काँग्रेस हिंदूंची एकही न्याय्य मागणी मान्य करीत नाही म्हणून मी स्पष्टपणे सांगतो की, ब्रिटिश शासन नि मुस्लिम लीग, तसेच काँग्रेस आणि मुस्लिम लीग किवा या तिघांत जे काही करार होतील ते हिंदूंना बंधनकारक ठरणार नाहीत. अशा परिषदेत एक बरोबरीची संस्था म्हणून हिंदू महासभेला बोलावले जावे आणि ती मान्य करील तेच ठराव हिंदूंना बंधनकारक वाटतील."

## निजामीत हिंदुंवर होणारे अत्याचार

नोव्हेंबर १९३८ मध्ये सावरकरांनी निजाम राज्यातील हिंदू आंदोलनाची आवश्यकता सांगणारे पत्रक काढले त्याचा सारांश असा :

"गेले कित्येक दिवस निजाम राज्यातून हिंदूंचे समूळ उच्चाटन करून ते राज्य मुसलमानमय करण्याच्या कारवाया सतत चालल्या आहेत त्याविरुद्ध आर्यसमाज सतत लढा देत आहे. ह्या लढ्यात आर्यसमाजाचे बारा तरी कार्यकर्ते मुसलमान गुंडांकडून ठार मारले गेले आहेत. पाच वर्षांपूर्वी हिंदू महासभेनेही ह्या प्रश्नात लक्ष घालून आपले प्रतिनिधी तिकडे पाठवून प्रत्यक्ष पहाणी करून त्यासंबंधी ठरावही केले

आहेत. शिष्टमंडळेही पाठविली आहेत. पण त्यांना निजामच्या मंत्र्यांनी सांगितले की, आमच्या राज्यात हिंदूंवर अत्याचार होतच नाहीत! तशी प्रत्यक्ष गाऱ्हाणी कोणीही केलेली नाहीत!".

पण प्रत्यक्ष वस्तुस्थिती अशी आहे की तेथे मुसलमानांचे अत्याचार, हिंदूंच्या दुकानांची लुटालूट, हिंदू नेत्यांच्या हत्या, हिंदू स्त्रियांची विटंबना, त्यांचे बळाने धर्मांतर आणि ह्या अत्याचाराने त्रस्त झालेल्या हिंदूंच्या किंकाळयांनी तेथील वातावरण भरून गेले आहे. पण ॲबिसिनिया, झेक नि पॅलेस्टाईन मधील अरबांसाठी रडणाऱ्या काँग्रेसने ह्या हिंदूंवरील मुसलमानी अत्याचाराविरुद्ध निषेधाचा एक शब्दही उच्चारलेला नाही. म्हैसूर, त्रावणकोर, राजकोट आदी हिंदुस्थानातील प्रजेच्या छळामुळे आपणाला दुःख झाले आहे असे म्हणणाऱ्या काँग्रेस अध्यक्ष सुभाषचंद्र बोस यांनीसुद्धा भोपाळ नि निजाम या मुसलमानी राज्यात हिंदूंवर जे औरंगजेबी अत्याचार चालले आहेत, त्यासंबंधी एक शब्दही उच्चारला नाही. कारण तसा उच्चार त्यांच्या राष्ट्रीयतेशी द्रोह ठरतो!

गांधींनीं तर भोपाळमध्ये रामराज्य असल्याची ग्वाहीच हिंदूंना देऊन टाकली! हे गांधीछाप असत्य सत्याच्या नावाखाली सांगितले जात असल्याने ते अतिशयच लाजिरवाणे आहे. राष्ट्रीय सभेने असे धोरण ठेवले असले तरी हिंदू सभा नि आर्यसमाज तेथील हिंदूंवरील अत्याचाराचा प्रतिकार करीत आहे. हिंदुस्थानचे इस्लामीकरण करण्याच्या कार्यात औरंगजेबाला नि निजामच्या प्रपितामहांना मराठ्यांच्या सैन्याने पूर्वीच कशी धूळ चारली आहे हे लक्षात ठेवावे आणि तेथे हिंदूंना सर्वधार्मिक सुविधा देऊन दायित्वपूर्ण राज्यकारभार चालू करावा. त्यामध्ये हिंदूंना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व द्यावे हाच नित्याची एकी आणि शांतता निर्माण करण्याचा उपाय आहे."

## वंदे मातरम् आणि संकीर्ण पत्रके

१० डिसेंबर १९३८ रोजी उस्मानिया विद्यापीठाने 'वंदे मातरम्' म्हणण्यास बंदी केली. त्यावेळी विद्यार्थ्यांनी ती बंदी मोडून उग्र निदर्शने केली. त्या संबंधात वीर सावरकरांनी एक पत्रक काढले ते असे:

"वंदे मातरम् म्हणणे हा तुमचा अधिकार आहे. निजाम कोण लागून गेला? ब्रिटिशांनासुद्धा ह्या देशात वंदे मातरम् अैकावे लागले. तुम्ही ठिकठिकाणी वंदेमातरम्च्या घोषणांनी आसमंत दुमदुमून टाका."

----- -----

नेपाळसंबंधी उद्देशून काढलेल्या पत्रकांत सावरकरांनी लिहिले आहे की, "चीन-जपान युद्धापासून धडा घेऊन नेपाळने आपले भूदल नि वायुदल अद्ययावत करावे."

----- -----

युरोपमधून हाकलण्यात येत असलेल्या ज्यूंसंबंधी सहानुभूती व्यक्त करून सावरकरांनी लिहिले की, “त्यांना भारतात निवासासाठी न आणता पॅलेस्टाईनमध्ये त्यांची वस्ती करावी. कारण तीच त्यांची पितृभू नि पुण्यभू आहे.”

----- -----

दुसऱ्या एका पत्रात सावरकरांनी लिहिले आहे की, “भारतातील राजबंद्यांना तत्काळ सोडण्यात यावे. तसेच परदेशात जीवन जगणारे देशभक्त चट्टोपाध्याय, बॅ. राणा, रासबिहारी बोस, हरदयाळ, महेंद्रप्रताप आदींवरील बंदी उठवून त्यांना भारतात येण्याची अनुज्ञा द्यावी.”

## निजामीत घुसा

शेकडो निःशस्त्र प्रतिकारक उघडपणे नि भूमिगत कार्यकर्ते मराठ्यांच्या लढाऊ बाण्याने निजामीत घुसतच होते. त्यांना अधिक प्रोत्साहन देण्यासाठी नि हा लढा अधिक तीव्र करण्यासाठी वीर सावरकरांनी ३१ मार्च १९३९ रोजी एक स्फूर्तिदायक आव्हानात्मक पत्रक प्रसिद्ध केले:

“सोलापूर येथील आर्यसमाजाच्या नि नागपूर येथील हिंदू महासभेच्या अधिवेशनानंतर गेल्या तीन महिन्यांत निजाम निःशस्त्र प्रतिकाराच्या आंदोलनांचा अपेक्षेपेक्षाही प्रबळ उठाव चहूबाजूंनी चालला आहे ही समाधानाची गोष्ट आहे.”

महाराष्ट्राने पै-पैसा जमवून दहा सहस्र रुपयांचा निधी उभारला. पैकी दोन-अडीच सहस्र रुपयांचे साहाय्य निजाम संस्थानातील दंग्यात वा चळवळीत जे आपले हिंदू बंधू बंदिशाळेत पडले वा आहत झाले त्यांच्या खटल्यासाठी, त्यांच्या अनाथ कुटुंबाच्या साहाय्यासाठी त्यांच्या घरोघरी नेऊन पोचविले. निजाम निषेध दिन सिंधपासून बंगालपर्यंत नि लाहोरपासून नागपूरपर्यंत प्रांताप्रांताच्या राजधान्यातून नि नगरानगरांतून लक्षावधी हिंदू लोकांनी धुमधडाक्याने गाजविला. निजाम

संस्थानातील दोन सहस्र विद्यार्थ्यांनी ‘वंदे मातरम्’ प्रकरण संपकरून मुस्लिम धाकदपटीला भीक न घालता मुस्लिम शाळा-कॉलेजांना बहिष्कारले आणि बाणे-दारपणाने ते संस्थान सोडून विद्याजनार्थ ते इतर त्र चालते झाले. म्हणजेच निजाम संस्थानातील हिंदूंच्या नव्या पिढीत हिंदुत्वाच्या अभिमानाचे नि त्यासाठी प्रसंगी भोगाव्या लागणाऱ्या त्यागाचे नि क्लेशाचे बीज रोवले गेले. त्या सहस्रावधी विद्यार्थ्यांना नागपूर, मद्रास, येवले, नगर, सोलापूर इत्यादी ठिकठिकाणच्या शाळा-कॉलेजातून प्रवेश मिळाला आणि ठिकठिकाणच्या हिंदू जनतेने त्यांच्या बाणेदारपणाचा गौरव करून त्यांना ममत्वाने वागविले. जैन, शीख, लिंगायत, सनातनी, आर्यसमाजी इत्यादी सर्व पक्षोपपक्ष्यांची या प्रश्नी हिंदुत्वाच्या रक्षणार्थ अखिल हिंदू स्वरूपाची एकजूट दिसून आली, एक फळी उभी ठाकली. निजाम संस्थानातील हिंदूंच्या परित्राणार्थ उभ्या हिंदुस्थानातून निधी उभारले जाऊन एक लक्ष रुपयांची रास पडली. त्या संस्थानातील नि संस्थानाबाहेरील मिळून अडीच ते तीन सहस्त्र हिंदू सैनिक निःशस्त्र प्रतिकार करून आज निजामी बंदिशाळांतून असह्य कष्ट सोशीत आहेत. बंदिशाळेतही आपल्या धार्मिक, सांस्कृतिक नि राजकीय अधिकारांसाठी फटके, मारहाण आणि क्रूरता ह्यांना तोंड देऊन झुंज चालवीत आहेत. झोपू लागलेल्या आर्यसमाजात, नि किंकर्तव्यमूढ झालेल्या हिंदू महासभेत नवचैतन्य नि नवे अवसान संचरत आहे. महाराष्ट्रीय हिंदू साम्राज्य अस्तंगत झाल्यानंतरच्या गेल्या शंभर सव्वाशे वर्षांत निजामाला अरे तर कारे म्हणून हटकणारा हिंदू आज प्रथम भेटला आहे.

ह्या आंदोलनाचे हे जे प्रत्यक्ष नि अप्रत्यक्ष परिणाम अवघ्या तीन महिन्यांत होत आले ते हिंदुसंघटनाच्या व्यापक कार्यास वाढती बळकटी चढविणारेच झाले आहेत! आणि याचे मुख्य श्रेय आहे त्या शतावधी लहानमोठ्या स्वयंसैनिकांना की ज्यांनी मागे कोण येतो याची वाट न पहाता सर्वांआधी आघाडीत जाऊन झुंज घेतली ते आज निजामाच्याच राज्यात निःशस्त्र प्रतिकाराचा धुमाकूळ घालून बंदिशाळांमध्ये असह्य कष्ट सोशीत आहेत! निजामच्या प्रासाद सौधापासून तो बंदिशाळेच्या भुयारापर्यंत त्या संस्थानचे सारे आसमंत ‘हिंदू धर्म की जय!’ च्या ध्वनीने दणाणवीत आहेत, रक्ताळ फटके पाठीवर बसत असता त्यांना प्रत्येकी मोजीत आहेत, ‘वंदे मातरम्’ गर्जून गर्जून!!!

ह्या धर्मवीरांनी ही जी उठावणी घेतली आहे तिचा तसाच तेजस्वी पाठपुरावा करण्याचे दायित्व आता मुख्यतः आहे महाराष्ट्रावर! नागपूरला हडसून खडसून विचारले असता ज्या वीस सहस्र महाराष्ट्रीयांनी प्रतिज्ञापूर्वक मते दिली, आम्ही झुंजू, त्यांच्या त्यांच्यावर. त्या वीस सहस्रांपैकी अर्धेजण जरी त्या प्रतिज्ञेप्रमाणे आता लवलेशही मागेपुढे न पहाता तडक घराबाहेर पडून स्वयंसैनिकांच्या शिबिरांकडे जातील नि झुंजीत मिसळतील तरी बाजी संभाळली जाईल. निदान त्यांच्यापुरते त्यांचे कर्तव्य त्यांनी केले, त्यांचा शब्द त्यांनी तरी राखला असे होईल!

महाराष्ट्रभर साऱ्या जनतेला आपली वरील प्रतिज्ञा पुरी करणारे असे अवसान संचरविण्यासाठी सध्या अत्यंत निकडीची पहिली गोष्ट म्हणजे ही की ज्या हिंदुसंघटक कार्यकर्त्यांनी जिल्ह्याजिल्ह्यांतून आजवर जनतेत जागृती करण्यासाठी जीव तोडून प्रयत्न केले; त्यांच्यापैकी शक्य असेल त्या त्या ठळक पुढाऱ्यांनी शाब्दिक प्रचाराच्या नादी आता अधिक वेळ न लागता तत्काळ स्वतः स्वयंसैनिक होऊन झुंजीवर जावे. शाब्दिक प्रचारही आवश्यकच होता पण ती पायरी आता त्या कार्यकर्त्यांनी ओलांडली

आहे. आता कृती हाच प्रचार! त्यायोगेच या पुढचे कार्य अधिक नेटाला लागेल; जनतेत प्रबळ नि सक्रिय अवसान चढेल! तरी जिल्ह्याजिल्ह्यांतील त्या अनेक लहानमोठ्या पुढारी कार्यकर्त्यांनी निःशस्त्र प्रतिकारार्थ स्वतः स्वयंसैनिक होण्याची आपली सिद्धता प्रसिद्धपणे आधीच प्रकट केली आहे त्यांनी आणि इतर शक्य त्या त्या ठळक मंडळींनीही आता धडक्यासरशी आघाडीवर जावे!

दुसरी निकडीची गोष्ट म्हणजे हिंदुसंघटक युवकांची! आता विद्यालयाच्या परीक्षा संपतील. आता शेकडो तरुणांनी साऱ्या अडीअडचणी बाजूस सारून नि स्वयंसैनिक बनून शिबिराकडे निघावे. इतर येवो वा न येवो, आपल्या सांगाती कोणी लहानमोठा कार्यकर्ता असो वा नसो, आपला पुढारी आपणच! जो सैनिक झुंजतो तोच वीर, जो कार्य करतो तोच कार्यकर्ता असे जाणून स्वतःच कार्यकर्ते व्हावे! मागच्या पिढीतील राष्ट्रकार्ये मागच्या पिढीने यथाशक्ती करावयाची ती केली. आता नव्या पिढीतील लढे तरुण पिढीनेच झुंझवावे. नवे पराक्रम गाजवावे; ह्यातच तारुण्याची खरी शोभा नि सार्थक! तरच आपण करीत असलेल्या ह्या शिवाजीच्या जयंत्यांची, संभाजीच्या पुण्यतिथ्यांची, वसईच्या विजयोत्सवाची सार्थकता! स्वराष्ट्रात्सव नि स्वधर्मास्तिव संभाजीने प्राणांचे बलीदान केले. 'माझे शीर तरी किल्ल्यात पडू द्या!' अशा हटातटाने अप्पांनी वसईच्या किल्ल्यावर झेंडा चढविला. इत्यादी पूर्वज पराक्रमाचे पोवाडे फुसक्या ऐटीने गाणाऱ्यांनी नि जेठा मारून अैकणाऱ्यांनी त्याच स्वराष्ट्रास्तव नि स्वधर्मास्तिव आपल्या पिढीत प्राप्त तो पराक्रम करताना मात्र जर पाय गाळले तर पूर्वजांच्या ह्या जयंत्या, हे उत्सव, हे पोवाडे पूर्वजांची केवळ विडंबने झाल्यावाचून राहणार नाहीत! पूर्वजांच्या पराक्रमाचे खरे स्मारक म्हणजे आपल्या पिढीत प्राप्त ते नवे पराक्रम गाजविणे! कृतीवाचून जो जो करंटा, नुसती सांगे वडिलांची कीर्ती । तो एक मूर्ख! असे समर्थच सांगून गेले आहेत!

तशा करंट्यांमध्ये आपली गणना करून घ्यावयाची नसेल तर ह्या सर्व उत्सवात भाग घेणाऱ्यांपैकी शेकडा दहा जणांनी तरी ह्या निःशस्त्र प्रतिकारात स्वयंसैनिक होऊन आज उडी घ्यावयास नको काय?

त्याचप्रमाणे वारकऱ्यांनो, समर्थ भक्तांनो, आचार्यांनो ज्या निजाम संस्थानात एकनाथ-रामदासादी अनेक साधुसंतांची पुण्यस्थाने आहेत आणि जेथे हिंदू धर्माचा असह्य उपमर्द होत आहे त्या संस्थानावर चाल करून तो उपमर्द हाणून पाडण्यासाठी ज्या वेळी शतावधी सांसारिकांनी निजामाचा प्रतिकार करीत तिकडे बंदिवास, फटके, बायोनेटा, हाणामार, छळ यांना भीक न घालता हिंदू धर्माच्या जयजयकाराची नुसती धुमाळी उडवून दिली आहे त्यावेळी तुम्हा संतांनी, साधूंनी, आचार्यांनी मात्र पीठापीठापुढे पडणारे पेढे चघळीत स्वस्थ बसावे हे उचित आहे काय? वास्तविक पहाता तुम्हा पंथापंथांच्या महंतांनी आणि धर्मपीठाच्या आचार्यांनीच सर्व लोकांच्या आधी हिंदू धर्माच्या सन्मान रक्षणास्तव प्रतिकाराची चढाई स्वतः करावयास हवी होती! निदान आता तरी तुमच्या शतावधी वारकऱ्यांसह आणि संन्याश्यांसह ह्या झुंजीवर निघा आणि देव मस्तकी धरून निजाम संस्थानात स्वधर्मरक्षणार्थ अवघा हलकल्लोळ उडवून द्या!!

त्याचप्रमाणे महाराष्ट्रीय साहित्यिकांनो निजामाने मराठी भाषेच्या गळयास तात लावली आहे. महाराष्ट्र साहित्यिकांची जी पुण्यक्षेत्रे त्या ज्ञानदेव, एकनाथ, रामदासांच्या पैठणादी स्थानी मराठी भाषा शिकविण्याची बंदी केली आहे हे तुम्हास माहीत आहे ना? हिंदू महासभेने हा निःशस्त्र प्रतिकार

ज्या अन्यायाच्या उच्चाटनासाठी चालू केला त्यात हा मराठी भाषेचा होणारा लांछनास्पद अपमानही उच्चाटिला पाहिजे अशी एक स्पष्ट प्रतिज्ञा, एक मूलभूत मागणी केली आहे हे आपण जाणताच! मग येत्या मराठी नाट्य, काव्य, साहित्य संमेलनातून भाग घेणाऱ्या मराठी भाषेच्या सहस्त्रावधी अभिमान्यांपैकी निदान शेकडा दहा जणांनी तरी हे आपल्या मातृभाषेवरचे लांछन, मराठीची ही गळचेपी दूर करणे निजामाला भाग पाडण्यासाठी ह्या निःशस्त्र प्रतिकाराच्या आंदोलनाचे स्वयंसैनिक होऊन झुंजीवर जावयास नको काय?

मराठी शाळांवरील, वृत्तपत्रांवरील, साहित्यावरील बंदी उठविण्याच्या अनेक विनंत्या नि ठराव निजामने आजवर धुडकावून दिले. हिंदूंची भाषासुद्धा मारून मुस्लिम उर्दूच त्यांच्यावर बळाने लादीन म्हणून फुत्कारणाऱ्या निजामाची रग जिरविण्यासाठी 'अमृतातेही पैजा जिंके' अशा ज्ञानेशाच्या मराठी बोलीचे मानरक्षणासाठी मराठी साहित्यिकांचे हवे तर स्वतंत्रपणे केवळ मराठी भाषेवरील लांछन दूर करण्यापुरतेच, एक शंभर स्वयंसेवकांचे पथक यावर्षी निजामवर चढून जावयास हवे. तुमच्या भाराभार वार्षिक संमेलनांच्या व्ययात छाटाछाट करून निदान एक सहस्त्र रुपये तरी या चळवळीच्या निधीत धाडावयास हवेत. नाहीतर ह्या मराठी साहित्यविषयक संमेलनाची नि काव्यगायनांची दळूबाई दळू वर्षानुवर्षे चाललीच आहे. पण मराठीचा अपमान जर ती निर्दळू शकेल तरच ह्या दळूबाई दळूचा काहीतरी उपयोग झाला असे म्हणता येईल आणि शेवटी, निजाम संस्थानातील पददलित हिंदू बांधवहो, वरील सर्व वर्गांपेक्षाही ह्या झुंजीत लढण्याची खरी पराकाष्ठा करावयास हवी तुम्ही! शेकडा अैंशीवर आपणा हिंदूंची त्या संस्थानात बहुसंख्या असून गेली चारशे वर्षे तुम्ही छळ सोशीत आलात ते पुरे झाले नाही कां? अजून वाट कसली पाहता?

हिंदू म्हणूनच जे तुमचा छळ करीत आहेत, तुमच्या छळावरच ज्यांची पोळी पिकत आहे तेच तुम्हाला मिळून 'स्टेट' नावाची जेव्हा एक अजब जूट होईल तेव्हाच चळवळ करा असे सांगणाऱ्या सोम्यागोम्यांच्या थापांवर विश्वासू नका!

चोर नि साव मिळून एकजुटीने खटला भरता येईल तेव्हाच त्या चोरावर खटला भरा असे सांगण्यासारखाच हा मंत्रोपदेश निव्वळ बुवाबाजी आहे. तेव्हा पिढ्यान्पिढ्या असे छळ सोशीत राहण्यापेक्षा एकदाच मनाचा हिय्या करा. जो काय छळ असेल नसेल त्यास आपणहून आव्हान द्या आणि त्या छळाची नांगीच मोडून टाका. त्यातही जरी ती अगदीच मोडली नाही तरीही अशा बाणेदार प्रतिकाराच्या भयाने छळसुद्धा पुन्हा छळावयास सहसा धजत नाही. विंचवासारखा तो छळ दबून, वचकून राहू लागतो. यासाठी संस्थानातील हिंदू बंधूंनो, जोवर संस्थानाबाहेरून शतावधी हिंदू बांधव तुमच्यासाठी निजामावर चालून जात आहेत त्याचवेळी तुम्ही लक्षावधी हिंदूंनो निःशस्त्र प्रतिकाराची उठावणी आतूनही केली पाहिजे. जे उपद्रवी नि छळक त्या त्या अहिंदूंवर सामाजिक बहिष्कार घाला. हिंदूंना उपमर्दकारक ते ते अन्याय्य निर्बंध झुगारून, प्रतिनिधित्व नाही तर करही नाही, 'Taxation without representation is robbery' अशी घोषणा करून करबंदीची चळवळ चेतवा! तुमच्या मुक्ततेची चालून आलेली अशी संधी हातची घालवू नका! ती पुन्हा येणे दुर्घट आहे!

तरी कार्यकर्ते, अनुयायी, वारकरी, रामदासी, हिंदुसंघटक, साहित्यिक, प्रौढ, तरुण, संस्थानातील नि बाहेरील हिंदूंनो, विशेषतः सर्व महाराष्ट्रीयांनो आता उठा नि निजाम निःशस्त्र प्रतिकारार्थ स्वयंसैनिक बनून झुंजीत मिसळा. तुम्ही हिंदूमात्र "अैसे अवघेचि उठता। परदळांची कायशी चिंता।" आणि तरीही जे जे स्वयंसैनिक अशा रीतीने झुंजीत भाग घेतील त्या सर्वांनी हे मात्र विसरता कामा नये की सद्यःस्थितीत आजचा हा हिंदू महासभेने नि आर्यसमाजाने घेतलेला हा निःशस्त्र प्रतिकाराचा Civil Resistance चा लढा हिंदूंचा उपमर्द करणाऱ्या तेवढ्याच काय त्या निजामी निर्बंधाचा भंग करण्याचा लढा आहे मुसलमानी जातीचा जात म्हणूनच किवा निजाम सरकारचा निजाम सरकार म्हणूनच द्वेष करण्याचा या चळवळीचा लवलेश हेतू नसून तिचा मुख्य हेतू आणि प्रतिज्ञा आहे हिंदूंचा अन्याय्य अपमान किवा द्वेष कोणाही अहिंदूस करता येऊ नये! साधे माणुसकीचे जे जे मूलभूत नागरिक-अधिकार ते ते हिंदूंना प्राप्त झालेच पाहिजेत!!

## रुझवेल्टना तार

२३ एप्रिल १९३९ रोजी वीर सावरकरांनी अमेरिकेचे अध्यक्ष रुझवेल्ट यांना एक तार पाठविली ती तार अशी :

"आपण हिटलरला पाठविलेल्या पत्रांमागे सैनिकी आक्रमणापासून स्वातंत्र्य नि लोकशाही यांचे संरक्षण करण्याची खरी निरपेक्ष मानवतेच्या चिंतेची प्रेरणा असेल तर कृपया ब्रिटनलाही आपली हिंदुस्थानवरील सैनिकी सत्ता संपुष्टात आणण्यास सांगा आणि हिंदुस्थानला स्वयंनिर्णयाप्रमाणे घटना बनविण्याचे स्वातंत्र्य द्या. हिंदुस्थानसारख्या महान राष्ट्राला लहान राष्ट्राअतका तरी आंतरराष्ट्रीय न्याय मागण्याचा अधिकार तर निश्चितपणे असावा."

## किशनप्रसादना प्रत्युत्तर

स्वातंत्र्यवीर सावरकर हिंदुत्वाच्या लढ्याला नेट लावीत होते; तर निजाम राज्यातील एक वरिष्ठ हिंदू सरदार महाराज किशनप्रसाद यांनी हा लढा थांबवावा अशा आशयाचा एक लेख प्रसिद्ध केला. तेव्हा वीर सावरकरांनी त्याला ५ मे १९३९ रोजी सणसणीत उत्तर देणारे एक पत्रक काढले त्याचा सारांश असाः

“महाराजा किशनप्रसाद वयोवृद्ध नि उच्चाधिकारी असल्यामुळे त्यांच्याविषयी जरी प्रत्येक हिंदूला आदर वाटत असला तरी निजामाच्या असह्य हिंदू विरोधी राजवटीला विरोध करण्यासाठी हिंदू सभा नि आर्यसमाज यांनी चालविलेला लढा दाबून टाकण्यासाठी त्यांनी लिहिलेल्या असत्य, भेकड नि विश्वासघातकी विधानांनी भरलेल्या लेखाचा निषेध केल्यावाचून आम्हास राहवत नाही. हिंदू सभेच्या नेत्यांनी ही चळवळ हाती घेण्यापूर्वी निजाम राज्यातील अत्याचारांची पूर्ण माहिती गोळा केली आहे. महाराज म्हणतात की त्यांनी नि त्यांच्या पूर्वजांनी ह्या मुस्लिम राज्यात कैक पिढ्या सन्मानाने निवास केला आहे. त्यांचा नि अनेक हिंदूंचा तेथील निवास ही अैतिहासिक सत्यघटना आहे. पण हा निवास सुखाचा नि सन्मानाचा नाही हेही अतिहासच सांगतो. म्हणूनच मराठ्यांनी भोपाळ, उदगीर, खर्डा आदी लढायांतून निजामाला चोपून काढले आणि नगर ते नागपूर आणि ओरिसापर्यंतचे निजामी राज्य नष्ट करून तेथे हिंदू सत्ता स्थापन केली. तरीही ती सत्ता अजून चालू राहण्यास हिंदूंशी विश्वासघात करणारे, वंशपरंपरेने संतुष्ट राहणारे दासवृत्तीचे हिंदूच कारणीभूत आहेत आणि त्या दास परंपरेचाच अभिमान कृष्णप्रसाद सांगत आहेत. राणा प्रतापसिह हा राजपुतांचा पुढारी नसून आपणच राजपुतांचे पुढारी असल्याचे त्या काळी जसे तो कुप्रसिद्ध राजा मानसिंग सांगत असे तीच भूमिका आज सर महाराज किशनसिह वठवीत आहेत! महाराज अजूनही पश्चात्तापदग्ध होण्याची वेळ गेली नाही. अजूनही ते विश्वासघातकी, असत्य लिखाण मागे घेऊन एखाद्या सद्गृहस्थासारखे उन्नतमस्तक राहून खऱ्याखुऱ्या घटना जगापुढे ठेवून आपल्या पातकांचे क्षालन करावे!”

## मशिदीला कुलूप ठोकायला हवे होते

आर्यसमाज नि हिंदू सभा यांच्या वतीने अनेक प्रतिकारकांनी या निजामराज्यात हिंदूंचे धार्मिक नि नागरिक अधिकार रक्षणार्थ निर्बंधभंग केला होता. ह्या वाढत्या आंदोलनामुळे सोलापूर येथे मुसलमानांनी दंगा करून काँग्रेस मंत्रिमंडळाकडे आर्यसमाजाविरुद्ध गाऱ्हाणी केली. ती खरी मानून सोलापूरच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी तेथील आर्यसमाज केंद्रावर बंदी घातली. ह्या बंदिआज्ञेचा निषेध करण्यासाठी २६ मे १९३९ रोजी वीर सावरकरांनी एक पत्रक काढले ते असे:

“सोलापूर येथील दंगा थांबविण्यासाठी तेथील दंडाधिकाऱ्यांनी जे उपाय योजले त्यातील काही योग्य असले तरी त्यांनी आर्यसमाजाला नगरातून नि जिल्ह्यातून आपले तळ हलविण्याची जी आज्ञा दिली ती परिणामी घातक ठरणारी असल्याने तिचा निषेध करणे आवश्यक आहे. यामुळेच अखिल भारतात मुसलमान गुंडांना दंगे करण्यास चिथावणी मिळेल आणि ते हिंदू सभा नि आर्यसमाज यांच्याविरुद्ध केव्हाही विनाकारण दंगे करतील. सरकारी पत्रकातही हे मान्य केले गेले आहे की आर्यसमाजाची मिरवणूक शांततेने चालली असता मुसलमान गुंडांनीच मशिदीतून तिच्यावर हल्ला केला, या अपराध्यांना या दंडाधिकाऱ्यांनी कोणते शासन दिले? खरे म्हणजे त्यांनी या प्रकरणी मुसलमानी प्रचारकांची हकालपट्टी करून त्यांच्या गुंडगिरीचे केंद्र नि शस्त्रे साठविण्याचे आगर जी मशीद तिलाच कुलूप ठोकायला लावले पाहिजे होते, तर त्याने उलट आर्यसमाजी प्रचारकांनाच बाहेर घालविले. त्यामुळे मुसलमान असेच समजणार की हिंदू निःशस्त्र प्रतिकारकांची ठाणी उठविण्याचा अमोघ नि वैध मार्ग म्हणजे असे दंगे करणे हाच होय, अशी समजूत मुसलमानात पसरण्याला नि त्यांना अशा अत्याचारांना प्रवृत्त करण्याला दंडाधिकाऱ्यांचे हे चुकीचे धोरणच प्रोत्साहन देते. प्रांतिक सरकारांनी हे धोरण सोडले तर भारतात ठिकठिकाणी निजामाविरुद्ध चालू झालेली केंद्रे अधिक प्रभावशाली होतील. मुंबई शासनाने निःपक्षपातीपणाने वागावे. जे दंडेली करतील त्यांना त्यांनी पाहिजे ते शासन करावे. चोर सोडून संन्यासांना सुळी देऊ नये. हिंदूंनी चालविलेल्या वैध चळवली त्यांनी अशा दडपू नयेत हेच दूरदर्शीपणाचे होईल.”

## आतूनही उठाव करा!

खडकी (औरंगाबाद) येथील बंदिगृहातील निःशस्त्र प्रतिकारांवर निजामी पोलीस भयानक लाठीमार करीत होते. उमरखेड येथून ९ जून रोजी मुंबईत येताच सावरकरांनाही ही लाठीहल्ल्याची वार्ता समजली. निजामी पोलीस सत्याग्रहींना सरळ वागवतील असे सावरकरांना कधीच वाटत नव्हते. त्यामुळे तसा प्रसंग येताच भिऊन प्रतिकार मागे न घेता उलट निजामी राज्यातील हिंदूनाच उठावणी करण्याबद्दल आव्हानात्मक पत्रक त्यांनी १० जून १९३९ रोजी काढले. त्याचा आशय असाः

“शेकडो हिंदू निःशस्त्र प्रतिकारकांची उपासमार होत असल्याच्या हृदयद्रावक बातम्या गेल्या आठवड्यात आमच्या कानावर आल्या न आल्या तोच या आठवड्यात त्या मागोमाग निःशस्त्र प्रतिकारकांवर अमानुष लाठी हल्ले करण्यात आले असल्याच्या वार्ता आम्हाला ऐकाव्या लागत आहेत. महाशय कृष्ण यांच्याबरोबर ७०० प्रतिकारकांनी एका वेळी प्रतिकार केल्याने निजामच्या नादान संस्थानकडून त्या लोकांची कोणत्याही प्रकारे व्यवस्था होऊ शकली नाही आणि परिणामतः आर्य नि हिंदू प्रतिकारकांना दोन दिवस अन्न पाण्यावाचून काढण्याचा प्रसंग आला. या अवस्थेमुळे त्यांनी

गाऱ्हाणी केली पण त्यांना निजामच्या कारभाऱ्यांनी उत्तर कसले दिले? तर पाशवी लाठीमाराचे. सुमारे १०० हिंदू प्रतिकारकांना गंभीर स्वरूपाच्या जखमा झाल्या. श्री. धोंडूमामा साठे यांच्यासारख्या काही प्रसिद्ध प्रतिकारकांवर तर अतका अमानुष हल्ला झाला की, त्यामुळे ते जगतात की मरतात अशीच परिस्थिती निर्माण झाली. एवढेच नव्हे तर, लाठीहल्ल्यानंतर कित्येक प्रतिकारकांना कोठड्यांत एकएकटे कोंडून ते रक्तसिंचित होऊन भूमीवर कोलमडून पडेपर्यंत त्यांना मार देण्यात आला.

महाशय कृष्णजी यांच्या समवेत नि अतरांच्या समवेत संस्थानात मोठमोठे जथे शिरणार आहेत याची पूर्वसूचना निजामी शासनसंस्थेला आठवडेच्या आठवडे आधी मिळालेली नव्हती काय? मिळाली होती तर मग तुरुंगाच्या कोठीत पुरेशा अन्नपाण्याचा साठा का करण्यात आला नाही? का असा साठा करणे हे निजामी शासनसंस्थेच्या आवाक्याबाहेरचे होते? का प्रतिकारकांची उपासमार करून नि ठोकून काढून शरण आणण्याचा दुहेरी डाव या योजनेत होता?

संस्थानातील हिंदूविरोधी निर्बंधांचा भंग करण्यासाठी अतके लोक येणार असल्याची पूर्वसूचना जर १५ दिवस निजामी कारभाऱ्यांना होती नि आपले कारभारी त्यांची व्यवस्था ठेवू शकत नाहीत हे त्यांनी ओळखले होते, तर मग निजाम सरकारने या प्रतिकारकांना मुळी अटकच का केली? आपल्या तुरुंगातील गुन्हेगारांनाही पुरेसे अन्नवस्त्र देण्याचे नैतिक दायित्व दास नि मागासलेले संस्थानिकसुद्धा मानतात. सशस्त्र युद्धातसुद्धा परकी बंद्यांना अन्नपाण्याचा पुरवठा करण्याचे नैतिक बंधन मानले जाते. उलट अथे काय होते ते पहा. निःशस्त्र असे शेकडो हिंदू पूर्ण शांततामय वृत्तीने, निजामी सरकारला पूर्वसूचना देऊन, नागरिकत्वाचे अधिकार सिद्ध करण्यासाठी संस्थानात शिरले असताना निजाम सस्कार त्यांना औपचारिकरीत्या अटक करते नि कलकत्याच्या अंधारकोठडीची वास्तविक आठवण होईल अशा प्रकारे त्यांना तुरुंगात कोंबण्यात येते. दोन दिवस यांना अन्नपाणी पुरविण्यात येत नाही नि जणू काय अतके प्रतिकारक एकाएकी आल्याने गैरव्यवस्था करण्याचा आपला हक्कच आहे अशा समजुतीने निजामी कारभारी वागतात! उपासमार झालेले प्रतिकारक केवळ अन्नपाण्याची मागणी करायला एकसमयावच्छेदेकरून गेले असता त्यांच्या समुदायावर लाठीहल्ला करण्यात येतो नि नंतर एकएकट्याला कोठडीत घालून नि दिवे मालवून अंधारात निर्दयपणे बेदम मारण्यात येते नि त्यांचे प्राण प्रत्यक्ष धोक्यात पडतात!

निजामी सरकारचे सामर्थ्यही (अन्नपाणी पुरवठ्याचे) खरोखरच अतके कमी असेल किंवा त्यांची अपात्रता अतकी भयंकर असेल तरीही असला पाशवी लाठीमार करण्याचे त्यांना काहीच कारण नव्हते. तर या प्रतिकारकांना त्यांनी मोकाट सोडून द्यावयास पाहिजे होते. पण ह्या सगळ्या प्रकाराचा अर्थ असा दिसतो की सर्वात श्रीमंत असणारे हे मुसलमानी संस्थान कमालीचे हिंदूविरोधी असल्यामुळे हिंदू लोक आपला जन्मसिद्ध अधिकार बजावण्याची चळवळ करीत असताना त्यांना दहशत बसविण्यासाठी ते हा दुहेरी खेळ खेळत असावे.

निजाम सरकारच्या या आव्हानाला द्यावयाचे सक्रिय उत्तर म्हणजे त्या संस्थानात हिंदूंनी आपला जन्मसिद्ध अधिकार प्रस्थापित करण्याची चळवळ अधिक जोराने चालवावी. आवेदने नि विनंत्या या

अपमानास्पद आहेत आणि गाऱ्हाणी निष्फळ होत. आता हिंदुत्वात मोडणाऱ्या सनातनी, आर्यसमाजी, हिंदूसभावादी, शीख, जैन सर्वांनी एकमुखी उठाव करून निजाम संस्थानात सुरू केलेल्या या निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळीत यापुढे शेकड्यांनी नव्हे तर सहस्त्रोंनी भाग घ्यावा.

विशेषतः निजामशाहीत वस्ती करून राहणाऱ्या लक्षावधी हिंदू बांधवांना माझे असे म्हणणे आहे की, त्यांचे हे धर्मबांधव त्यांच्यासाठी प्रत्यक्ष आपल्या प्राणावर पाणी सोडून हालअपेष्टा सहन करीत असता त्या फक्त पाहणे म्हणजे विश्वासघात करणे नव्हे काय? हे व्हावयास नको असेल तर जागे व्हा नि हजारोंनी हिंदूंच्या ह्या धर्मयुद्धात भाग घेऊन आघाडीवर चला. प्रत्येक नगरात आणि खेड्यापाड्यांत हिंदुत्वविरोधी असणाऱ्या निर्बंधांचा भंग करा आणि आज्ञा मोडा. या अत्याचारांच्या निषेधार्थ ठिकठिकाणी हरताळ पाडून मुसलमान गुंडांवर सामाजिक बहिष्कार पुकारा. निजामशाहीतल्या हजारो हिंदूयुवकांनी संपकरून हिंदुत्वाचा अवमान करण्यासाठी चाललेल्या निजामशाहीतल्या शिक्षणसंस्था बंद पाडल्या पाहिजेत.

बाहेरून जर हजारो हिंदू येऊन निजामशाहीतील अन्यायाची दाद लावण्यासाठी अपरिमित हाल सोसून प्रसंगी प्राणदंडालाही सिद्ध होत आहेत तर प्रत्यक्ष निजामीत राहणाऱ्या लक्षावधी हिंदूंनी या धर्मसंग्रामात सहभागी होऊन तो तडीला जाईपर्यंत लढविला पाहिजे आणि आपला जन्मसिद्ध अधिकार प्रस्थापित केला पाहिजे.

## ग्वाल्हेर नरेशांचे अभिनंदन

ग्वाल्हेर नरेश श्री. जिवाजीराव शिंदे यांनी स्वतः होऊन प्रजेला राज्यकारभारात अधिक स्थान देण्याविषयी सुधारणा प्रसिद्ध करताच वीर सावरकरांनी त्यांना एक अभिनंदनपर पत्रक लिहिले. त्याचा आशय असाः

“ग्वाल्हेरचे नरेश नि त्यांचे सुधारणा सुचविणारे समादेशक यांचे अभिनंदन करून पुढे लिहिले आहे की आमची हिंदू संस्थाने प्रगतीपर असून सार्वजनिक हित साधण्याकडे त्यांचा कल असतो असा जो हिंदूसभेला विश्वास वाटतो तो किती योग्य आहे याचे हे एक लहानसे उदाहरण आहे. दरबार नि प्रजा यांनी या सुधारणा योग्य प्रकारे राबवून त्यांची भावी प्रगती जलद, व्यवहार्य नि राष्ट्रहिताची होवो हीच सदिच्छा!”

## निजाम थोडा नरमला

निःशस्त्र प्रतिकारकांच्या बाबतीत काही सुधारणा निजामाने महत प्रयासाने मान्य केल्या. त्या निजामी सुधारणांसंबंधी आपले मत व्यक्त करणारे २० जुलै १९३९ दिनी सावरकरांनी एक पत्रक काढले. ते असेः

“निजाम सरकारच्या हृदयपालटाचे चिन्ह म्हणून या सुधारणांचे मी स्वागत करतो. यात दहा टक्के मुसलमानांना नव्वद टक्के हिंदूंचा राजकीय दर्जा देण्यात आला आहे. हा डाग या सुधारणांना लागला आहे. हे काही खास अधिकार मुसलमानांना त्यांच्या गुणांमुळे किंवा योग्यतेमुळे मिळाले नसून केवळ मुसलमान म्हणूनच मिळाले आहेत.

आर्थिक नि व्यावसायिक पायावर मतदारसंघ निर्माण करून जातीयता टाळली ही फुशारकी या राखीव जागेमुळे लटकी ठरते. या सुधारणा अगदी हात राखून देण्यात आल्या असल्या तरी जुन्या राज्यपद्धतीपेक्षा त्या बऱ्याच प्रगतीपर आहेत असे म्हणावयास प्रत्यवाय दिसत नाही. त्यामुळे एक वैध मार्ग खुला झाला आहे. या सुधारणा राबविण्याच्या कामी जर निजामाकडून प्रामाणिक साहाय्य देण्यात आले तर त्यांची परिणती भावी काळात याहून अधिक स्वातंत्र्य मिळण्यात होण्यासारखी आहे.

आतापर्यंत सहस्रावधी निःशस्त्र प्रतिकारकांनी केलेल्या त्यागाने नि सोसलेल्या यातनांमुळे धार्मिक कडवेपणाच्या गडाला खिंडार पडले आहे, त्याच्या आत घुसून महत्त्वाच्या भागापर्यंत प्रवेश करून घेणे आता प्रगतिप्रिय लोकांना शक्य आहे.

सर्वांनी आपणाशी प्रतिसहकारिता दाखवावी नि परस्परांच्या सोयी पहाव्या अशी अच्छा निजामशहांनी व्यक्त केली आहे. शांतता नि सलोखा प्रस्थापित व्हावा म्हणून प्रतिसहकार करावयास हिंदू केव्हाही सिद्ध आहेत. मात्र तसे करताना केवळ हिंदू म्हणून त्यांच्या जन्मसिद्ध अधिकारांना बाध येता कामा नये नि जातीयदृष्ट्या त्यांचा तेजोभंग होता कामा नये. निजामी सुधारणांच्या घोषणेमुळे हिंदूमहासभेला आपल्या भावी धोरणाचा फेरविचार करावा लागेल. यासाठी हिंदू सभेचे कार्यकारी मंडळ नि भागानगर निःशस्त्र प्रतिकार मंडळाची बैठक पुणे येथे दिनांक ३० जुलैला मी बोलाविली आहे.

खेळीमेळीचे वातावरण निर्माण व्हावे म्हणून निजामसरकारने या बैठकीपूर्वी हिंदू सभा नि आर्यसमाज यांच्या सर्व प्रतिकारकांना सोडून द्यावे म्हणजे निजामच्या या सलोख्याचा धोरणाचा हिंदू सभेच्या कार्यकारी मंडळावर साहजिकच अनुकूल परिणाम होईल.

## निजामी सुधारणा

लोकशाही स्वराज्यपक्षाचे अध्यक्ष बॅ. जमनादास मेहता यांची निजामी सुधारणांसंबंधी 'केसरी'च्या प्रतिनिधीने भेट घेतली असता ते म्हणाले, "या सुधारणात निजामचे व्यक्तीगत अधिकार मुळीच कमी झाले नाहीत हे एक न्यून आहे. मुसलमानांना दिलेल्या अधिकारांचे फाजील प्रमाण हा तर शुद्ध अत्याचारच आहे. आर्थिक पायावर निर्माण केलेल्या मतदारसंघाचे सर्व निर्बंध त्यामुळे नष्ट होत आहेत. धार्मिक अधिकारासंबंधीच्या घोषणेमुळे या बाबतीत निजाम सरकार सहानुभूतीने विचार करावयास तयार आहे असे दिसते. मात्र या सुधारणांच्या बाबतीत अनुकूल वातावरण निर्माण होण्यासाठी सर्व सत्याग्रही या घोषणेबरोबरच सोडावयास हवे होते. या घोषणेमुळे भिन्न भिन्न हितसंबंधांच्या सर्व लोकांनी एकत्र बसून विचार विनिमय करणे जरूर झाले आहे."

## शिया मुसलमानांना उत्तर

लखनौ येथील शियापंथीय मुसलमानांनी राष्ट्रीय अैक्यासाठी हिंदूसभेचे सदस्य होण्याची अच्छा दशर्विली. शिया परिषदेने ठराव केला आहे की गोवध थांबविण्यात यावा; मशिदीसमोर वाद्ये वाजविण्याचा हिंदूंना अधिकार आहे. तशा आशयाचे एक पत्र त्यांनी वीर सावरकर यांना पाठविले. त्या पत्राला उत्तर म्हणून एक पत्रक सावरकरांनी काढले त्याचा आशय असाः

"आपल्या ह्या उपक्रमाविषयी नि सूचनेविषयी आपले अभिनंदन. शिया मुसलमानांच्या संबंधात हेतुतः प्रक्षोभ करण्यासारखे वर्तन हिंदूंकडून घडणार नाही. एवढेच नव्हे तर त्यांचे न्याय्य अधिकार नि मागण्या मान्य केल्या जातील. हिंदुस्थानला जे केवळ जन्मभूमी नव्हे तर धर्मभूमी, पुण्यभू नि पितृभू मानतात त्या सर्वांना आम्ही हिंदू समजतो. आपण जोवर हिंदुस्थानला पुण्यभूमी मानीत नाही, स्वतःला हिंदू म्हणवीत नाही तोवर काही व्यावहारिक कारणासाठी आपणाला हिंदू सभेचे सभासद करून घेणे हे हितावह नाही. परंतु राष्ट्रीय प्रश्नात आपण सहकार्याने कार्य करू शकू."

## गुंडगिरी घातक ठरेल

काही निजाम निःशस्त्र प्रतिकारक बंदिगृहातून सुटून सावरकरांच्या भेटीसाठी येऊ लागले. परंतु उरलेले ही सर्व बंदी सुटावे अशी मागणी करणारे नि ह्या लढ्याचे पार्श्वभूमी सांगणारे एक पत्रक सावरकरांनी १५ ऑगस्ट १९३९ रोजी काढले. ते असेः

'नागपूर येथे आर्यसमाज मंडळाने निःशस्त्र प्रतिकाराचा लढा थांबविण्याचा जो निर्णय केला त्यास मी अत्यंत मनःपूर्वक मान्यता देत आहे. तसेच ह्या लढ्यात महासभेने त्यांच्याशी केलेल्या सहकार्याविषयी त्यांनी मजकडे तारेने आभारपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली. तिचा मी हिंदू महासभेच्या वतीने सादर स्वीकार करीत आहे. अशा रीतीने या सर्व लढ्यात अखिल हिंदूंनी विजय संपादन केल्यामुळे विपरीत आक्षेपकरणाऱ्या या प्रतिपक्षांना फजित केले आहे. आर्यसमाजाने निःसंशय अत्यंत धैर्याने या आणीबाणीच्या प्रसंगाला तोंड दिले आणि त्यातून किंचितही पराभूत न होता द्विगुणित विजयाने नि उत्साहाने त्या प्रसंगातून आर्यसमाज पार पडला आहे. महर्षी दयानंद सरस्वती यांनी हिंदुसंघटनेचे महत्कार्य अत्यंत सत्पात्र लोकांच्याच हाती दिले ही गोष्ट पुरेपुर सिद्ध झाली आहे.

हिंदू महासभेच्या कार्यकारी मंडळाने पुणे येथे रीतसर निर्णय करून आपला लढा स्थगित केला. त्याच्याही पूर्वी काही आठवडे आर्यसमाजाच्या नियामक मंडळाने आपला लढा पूर्णपणे थांबवला आहे. तर हिंदू महासभेने प्रतियोगी सहकारितेच्या धोरणाने आपला लढा केवळ स्थगित केला आहे. यातील हेतू असा की, हिंदूंचे सर्व न्याय्य हितसंबंध राखले जातील आणि शांततेने घटनात्मक प्रगती प्रत्यक्षपणे निर्माण करता येईल. अशा रीतीने दिलेल्या सुधारणा राबवता येतात की काय हे पाहणे. निजामी सुधारणा प्रसिद्ध झाल्यानंतर हिंदू महासभेने प्रतियोगी सहकाराच्या नात्याने केवळ सापेक्ष सहकारितेचा निर्णय केल्यानंतर भाडोत्री काँग्रेसवाल्यांनी उसने अवसान आणून जे विडंबन चालविले होते त्याला हिंदू महासभा नि आर्यसमाज यांच्या अनुक्रमे पुणे नि नागपूर येथे झालेल्या ठरावांच्या वरील तुलनात्मक निदर्शनाने समर्पक उत्तर मिळत आहे. हिंदुमहासभेने जे प्रतियोगी सहकारितेचे धोरण स्वीकारले त्याचे अशा रीतीने फार चांगले समर्थन झाले आहे आणि त्यायोगे हितशत्रूंच्या आक्षेपाला तोंड राहिले नाही.

आर्यसमाजी बंधूंनी काही गोष्टींचे स्पष्टीकरण मागितले आणि हिंदू महासभेच्या कार्यकारी मंडळाने त्या न्याय्य मागणीला एका ठरावाने पाठिंबा दिला हे स्पष्टीकरण करून निजाम सरकारने योग्य ती गोष्ट केली याविषयी मलाही समाधान वाटत आहे. सुधारणांच्या प्रसिद्धिपत्रकात ज्या गोष्टी समाविष्ट होत्या - त्यापेक्षा विशेष नवीन असे काही या स्पष्टीकरणात नसले तरी आर्यसमाजीयांना प्रामाणिकपणे संशय वाटत होते, ते दूर करण्यासाठी निजाम सरकारने त्या गोष्टीचा पुनरुच्चार केला. यावरून निजाम सरकारची सलोख्याची वृत्ती दिसून येते. या वृत्तीमुळे सर्व दिशांनी सदिच्छा उत्पन्न होण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण केली आहे. झाले ते सर्व विसरून जावे आणि या त्रासदायक लढ्यावर पडदा पडावा यासाठी निदान दोन गोष्टींची आवश्यकता आहे. पहिली गोष्ट म्हणजे या निजामी राज्यात सर्व संघटित

मुस्लिम गुंडांनी हिंदू द्वेषमूलक रक्तपातमय गुंडगिरी आणि दंगल चालविली आहे आणि राजधानीतदेखील हत्याकांड माजविले आहे त्याला कडक रीतीने आळा घालून गुंडांची शस्त्रास्त्रे काढून घेऊन त्यांच्यावर नियंत्रण घातले पाहिजे. निदान जे दूरदर्शी पुढारी आहेत त्यांच्या ध्यानी येईल की, अशा प्रकारचे हत्याकांड आणि दंगल यांच्या योगाने हिंदूंपेक्षा मुसलमानांचे अधिक अहित होणार आहे आणि ज्या निजाम सरकारचे हित करण्यासाठी म्हणून ह्या गोष्टी घडत आहेत त्या सरकारलादेखील अतिशय घातक ठरणार आहेत.

दुसरी गोष्ट संस्थानातले नि बाहेरचे हिंदू सभावाले, आर्यसमाजी, शीख वर्णाश्रमी अशा सर्व प्रकारच्या प्रतिकारकांना निजाम सरकारने त्वरित बंधमुक्त करावे. निजाम सरकारने अशा तऱ्हेने बंदी सोडण्याचे सौजन्य दाखविल्यास ती आनंददायक वार्ता संस्थानात नि बाहेर अनेक घरातून जाईल आणि त्यायोगे सर्वांना अष्ट असलेल्या शांततेची, सलोख्याची नि सन्मान्य सहकारितेची सार्वजनिक भावना उत्पन्न होण्यास साहाय्य होईल.”

## बंगाली हिंदूंनो जागे व्हा!

बंगाल हिंदू महासभेचे कार्यवाह श्री. आशुतोष लाहिरी यांनी वीर सावरकर यांना बंगालमधील हिंदूंच्या एकजुटीसंबंधी एरवादे पत्रक काढण्याविषयी एक विनंतीपर पत्र लिहिले. त्यांच्या या विनंतीनुसार सावरकरांनी बंगालच्या हिंदूंना १५ ऑगस्ट १९३९ रोजी एका पत्रकाद्वारे संदेश पाठविला तो असाः

“आपण बंगाल हिंदू महासभेच्या नेतृत्वाखाली हिंदूंची जूट घडवून आणलीत याविषयी माझे धन्यवाद! आपले सांस्कृतिक अस्तित्व टिकविणे हे आपले पहिले कर्तव्य आहे. या गोष्टीची जाणीव बंगाली हिंदूंना होऊन आपल्या पितृभू नि पुण्यभूसाठी प्रबळ हिंदूराष्ट्राची संघटना करण्याची स्फूर्ती आपणास झाली ही भाग्याची गोष्ट आहे. विश्वासाने आणि निर्भयपणे आपण हे मार्गक्रमण केल्यास आपणास उज्ज्वल भवितव्य लाभेल याची निश्चिती असू द्या. योग्य अशाच मार्गावर आपले हे पाऊल पडलेले आहे.

यापुढे बंगालमधील हिंदूंनी आपल्या मार्गापासून विचलित होऊ नये. सामाजिक, धार्मिक किवा राजकीय सर्व प्रश्न हिंदुत्वाच्या कसोटीवरच घासून पाहण्याचा त्यांनी निर्धार ठेवावा. प्रादेशिक राष्ट्रीयत्वाच्या लटक्या कल्पनेला आता मूठमाती मिळू द्या. वर्धा येथील वर्किंग कमिटीच्या सभेत काँग्रेसमध्ये असणाऱ्या लोकांना हिंदूमहासभेतून अंग काढून घेण्याची आज्ञा देण्यात आली. यावरून पुन्हा एकदा ही गोष्ट स्पष्ट झाली आहे की, जगातील इतर राष्ट्रांप्रमाणे हिंदूंचेही एक महत्व पूर्ण राष्ट्र निर्माण करण्याच्या तत्त्वज्ञानाला काँग्रेसचा ध्येयवाद हा पूर्णपणे अपुरा आहे, एवढेच नव्हे तर विरोधीही आहे. आता काँग्रेसला रामराम! भूत काळात काँग्रेसने आपले काम नीट बजावले असले तरी आता भविष्यकाळात ती निरुपयोगी आहे. तिचा आताचा मार्ग त्या मार्गाशी मिळताही नाही आणि समांतरही नाही, हे स्पष्ट दिसते.

अशा आणीबाणीच्या आणि महत्त्वाच्या वेळी बंगालमधील हिंदूंनी आपल्या आत्म्याच्या हाकेला ओ देऊन खऱ्या राष्ट्रीयत्वाची ग्वाही पटवून घेतली आणि हिंदू एकजुटीची प्रस्थापना केली, ही खरोखर फार अभिनंदनीय गोष्ट आहे. आपण शुभारंभ केलेला आहे. आता आपण हिंदू महासभेच्या ध्येयवादाला हृदयाशी बाळगून हिंदू मतदारांच्या हाती जे अल्पस्वल्प अधिकार आलेले आहेत त्यांचे संघटन करून सर्व निवडणुकी हिंदू महासभेच्या ध्वजाखाली लढवाल नि यश मिळवाल अशी मला आशा आहे. हिंदू मतदारांचे सर्व सामर्थ्य हिंदुसंघटनवाद्यांच्या हाती एकवटले पाहिजे. एवढी गोष्ट जर त्यांनी केली तर बंगालमधील हिंदू समर्थ होऊन हिंदू राष्ट्राच्या संघटनेत एक महत्त्वाचे स्थान मिळविल्यावाचून राहणार नाहीत.”

## महायुद्ध आणि हिंदू महासभा

१० सप्टेंबर १९३९ रोजी मुंबई येथे झालेल्या हिंदू महासभेच्या कार्यकारी मंडळाच्या सभेत महायुद्ध नि हिंदू सभेची भूमिका याविषयी पुष्कळच चर्चा झाली. ३-४ तासांच्या या प्रदीर्घ चर्चेत विविध विचारांच्या वीस-एक प्रतिनिधींनी त्यांचे विचार मांडल्यानंतर जो प्रस्ताव संमत करण्यात आला त्याचा आशय असाः

“ह्या महायुद्धात केवळ लोकशाही रक्षणाच्या परोपकार बुद्धीने आपण भाग घेत आहो अशी जी घोषणा साम्राज्यवादी देश करीत आहेत त्यावर हिंदू सभेचा मुळीच विश्वास नाही. हिंदुस्थानला पारतंत्र्यात ठेवणाऱ्या ब्रिटनची परोपकाराची नि लोकशाहीची तळमळ खरी असेल तर ब्रिटनने हिंदुस्थानच्या संबंधात प्रथम तशी कृती करावी या दृष्टीने हिंदू सभेचे असे म्हणणे की हिंदुस्थानचे परचक्रापासून संरक्षण करणे हे हिंदुस्थान नि इंग्लंड ह्या दोघांचेही दायित्व आहे. सध्या परतंत्र असलेला हिंदुस्थान इंग्लंड च्या साहाय्यावाचून फार काही करू शकणार नाही म्हणून इंग्लंड ने खालील गोष्टी प्रथम कराव्यातः

(१) केंद्रात दायित्वपूर्ण राज्यपद्धत चालू करावी. (२) जातीय निर्णयामुळे मध्यवर्ती नि प्रांतिक सरकारात जे अन्याय झाले आहेत ते दूर करावेत. विशेषतः त्या निर्बंधातील पंजाब नि बंगालमध्ये हिंदूंना नित्याचे अल्पसंख्य बनविणारे छेदक रद्द करावेत. (३) हिंदी सेना ही ब्रिटिशांची सेना नसून ती येथील लोकांची सेना आहे ही भावना निर्माण करावी. (४) येथील सेनेचे हिंदीकरण शक्य तितक्या लवकर करण्यासाठी लढाऊ नि बिनलढाऊ जाती हे कृत्रिम भेद शक्य तितक्या लवकर नष्ट करावेत. (५) संरक्षणाच्या सर्वच शाखात हिंदी लोकांना प्रवेश नि शिक्षण द्यावे. तसेच त्यांना ब्रिटिशांच्या समकक्ष वागणूक मिळावी. तसे शिक्षण द्यावे. (६) शस्त्रास्त्र बंदीचा निर्बंध रद्द करून येथील लोकांना पूर्णपणे स्वसंरक्षणक्षम करून आपण स्वातंत्र्याच्या नि लोकशाहीच्या रक्षणार्थ ह्या युद्धात उतरलो आहो ही घोषणा ब्रिटनने खरी करून दाखवावी. (७) संरक्षणक्षम अशी सेना सिद्ध करण्याच्या दृष्टीने प्रादेशिक सेना, राष्ट्रीय छात्रसेना यांच्यात वाढ करून ज्या भागात सैनिकी शिक्षण संस्था नाहीत तेथे त्या स्थापन कराव्यात. तसेच भारतीय सैनिकी प्रबोधिकेत अधिक हिंदू विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन त्यांना युद्धकलेचे सर्व प्रकारचे शिक्षण देण्यात यावे. (८) हिंदी सैन्याला उपयुक्त अशा यंत्रसामुग्रीसाठी परदेशावर अवलंबून रहावे लागू नये यासाठी हिंदुस्थान सरकारने हिंदी कारखानदारांना विमाने, मोटारी नि युद्धाची अद्ययावत शस्त्रास्त्रे बनविण्यासाठी उत्तेजन देण्यासाठी उपाय योजावेत. १८ ते ४० वयाच्या हिंदू तरुणांनी आपआपल्या प्रांतात हिंदू राष्ट्रीय सैनिक दलात भरती व्हावे.

## व्हॉइसरॉयला केलेल्या सूचना

९ ऑक्टोबर १९३९ रोजी एक तास, सावरकर नि व्हॉइसरॉय यांची भेट झाली. ह्या भेटीतील चर्चा गुप्त ठेवायची असा संकेत होता. परंतु ह्या भेटीसंबंधी निरनिराळया वृत्तपत्रांनी खरीखोटी विविध वृत्ते प्रसिद्ध केल्यामुळे आणि आपण व्हॉइसरॉयशी काय बोललो हे लोकांपुढे ठेवावे यासाठी सावरकरांनी एक पत्रक काढले त्याचा आशय असाः

(१) पोलंड नि विशेषतः रशियासुद्धा युरोपातील निरनिराळी युद्धमान राष्ट्रे केवळ त्यांच्या त्यांच्या राष्ट्रीय स्वार्थासाठी लढत आहेत. लोकशाही किवा स्वातंत्र्याची तुडवलेली तत्त्वे, नैतिक नि मानवी अधिकार अथवा राजकीय न्याय नि समता या ध्येयाने ती प्रेरित झालेली आहेत किवा होती यावर हिंदू

महासभेचा मुळीच विश्वास नाही. विशेषतः ब्रिटिशांच्या राजकीय दास्यात हिंदुस्थान देश असता जगातील लोकशाहीच्या रक्षणासाठी आपण लढाईस उद्युक्त झालो आहोत ह्या ब्रिटिशांच्या म्हणण्यास केवळ राजकीय हूल यापेक्षा अधिक महत्त्व नाही. (२) यासाठी चालू युद्धामुळे हिंदूराष्ट्राचे हित नि सुरक्षितता यांना धोका पोहचण्याचा संभव असल्यामुळे हिंदू महासभेला या परिस्थितीचा विचार करणे आवश्यक झाले आहे. (३) याचसाठी अंतिम ध्येयाचा एक तात्कालिक टप्पा म्हणून हिंदुस्थानला स्वतंत्र वसाहतीची श्रेणी देण्यात आल्याची ब्रिटिश सरकारने निःसंदिग्ध भाषेत घोषणा करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीही ब्रिटन लढत आहे याची हिंदूंना खात्री पटावी म्हणून मध्यवर्ती कारभारात दायित्वपूर्ण नि भारतीयांचे बहुमत असलेले सरकार प्रस्थापित केल्याचे प्रकट करावे. (४) अशा प्रकारची घटना ताबडतोब सुरू व्हावी यासाठी जात, धर्म, वर्ग वा पक्ष लक्षात न घेता एका मनुष्याला एक मत या लोकशाही तत्त्वाच्या पद्धतीवर प्रतिनिधींची नियुक्ती करावी; पण ही पद्धत सोईची न वाटल्यास दुसरा उत्तम उपाय म्हणजे मुसलमान नि हिंदू यांचे मतदारसंघ निराळे असावेत आणि लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना प्रतिनिधित्व मिळावे.

हल्लीच्या दुष्ट जातीय निवाड्यासारखा कोणत्याही मतदानरूपी 'जिझिया कर' देण्याच्या प्रक्षोभक अन्यायास हिंदू महासभा विरोध करील. हिंदूंना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळालेच पाहिजे. ते उणे सहन करणार नाहीत आणि ते अधिक मागत नाहीत. विशिष्ट कालापर्यंत अस्पृश्य समाजाला मात्र अधिक प्रतिनिधित्व किवा असेच काहीतरी विशेष संरक्षण मिळावे (५) अल्पसंख्य नि बहुसंख्य समाजातील सर्वच नागरिक दुसऱ्यांच्या अधिकाराच्या आड येणार नाहीत आणि सार्वजनिक नीती अन् शांततेला पोषक असेल असे भाषा, संस्कृती नि धर्म यांचे पूर्णपणे स्वातंत्र्य असल्याची निश्चिती देण्यात यावी. (६) अशा प्रकारे ताबडतोब सुधारणा प्रकट केल्यास चालू युरोपियन युद्धात हिंदुस्थानच्या संरक्षणापुरती स्वतःच्या हिताकरता हिंदूंना ब्रिटिश सरकारशी सहकारिता करण्याची अच्छा होईल. (७) सैनिकी आक्रमणापासून हिंदुस्थानचे संरक्षण करणे ब्रिटिश सरकारला नि आम्हाला सारखेच आवश्यक आहे. शासकीय साहाय्याविना हे संरक्षण करणे आम्हाला दुर्दैवाने शक्य नसल्यामुळे हिंदुस्थान नि इंग्लंड यात प्रतियोगी सहकारिता करावयास भरपूर जागा आहे हे एक, दुसरे असे की चालू युद्धात इंग्लंड विरुद्ध रशिया लढण्याचा बराच संभव दिसत असल्यामुळे अफगाणिस्थानमधून रशिया स्वारी करील नि त्यामुळे हिंदुस्थानला बराच धोका पोहचण्याची धास्ती वाटते. हिंदुस्थानातील मुसलमानांच्या बऱ्याच मोठ्या समाजाकडून पहिल्या महायुद्धामध्ये खिलापतीच्या चळवळीत झालेले विश्वासघातकी वर्तन कधीही विसरता येणार नाही असा आपणास धडा मिळाला आहे आणि वायव्य सीमेवरून परकीय सत्तेने आक्रमण केल्यास तोच अनुभव पुन्हा येण्याचा संभव आहे. सिध, पंजाब आदी प्रांतातील मुसलमान सेना नि टोळ्यातील लोक हिंदूंचा विश्वासघात करण्याचा बराच संभव आहे आणि पाकिस्तानच्या आराखड्याप्रमाणे बलुचिस्थान ते काश्मीर ते दिल्ली या भागात स्वतंत्र मुसलमानी राज्य अथवा फेडरेशन स्थापन करण्याचा जोराचा प्रयत्न करतील ही मुसलमानांच्या अनेक मोठ्या संस्थांनी आपल्या प्रकट परिषदांमधून संमत केलेल्या ठरावामधून उघड झालेली विश्वासघातकी देशबाह्य महत्त्वाकांक्षा लक्षात घेता, काळजी वाटण्यासारख्या या चिंताजनक धोक्याकडे दुलर्क्ष करणे हिंदूंच्या दृष्टीने आत्मघातक नि आंधळेपणाचे ठरेल अशा परिस्थितीत राष्ट्रावरील हे संकट टाळण्याकरता हिंदूंना ब्रिटिश सेनेशी मित्रत्वाने वागावे

लागेल. तेव्हा हिंदूंना ब्रिटिश सरकारशी परिणामकारक सहकार्य करणे शक्य होण्याकरता सरकारने पुढील उपाय ताबडतोब योजावेतः

(अ) वायव्य सरसीमेचे रक्षण करण्यासाठी मुसलमान सैनिक न ठेवता हिंदूंचे प्रचंड सैन्य ठेवावे. (आ) हिंदूंना छळण्यासाठी अथवा हिंदू राष्ट्राच्या स्थैर्याला धोका आणण्यासाठी छापे घालण्याचे, बंड करण्याचे अथवा उठाव करण्याचे पुन्हा धाडस होणार नाही नि शरण यावयास भाग पाडील अशा प्रकारची शिक्षा मुसलमान टोळ्यांना देण्यात यावी. (अ) हिंदुस्थानचे संरक्षण करण्याअतके सामर्थ्य येण्यासाठी हिंदू राष्ट्रीय सैन्य उभारण्यास प्रोत्साहन द्यावे आणि शस्त्रे, दारुगोळा नि तज्ज्ञ यांचे साहाय्य करावे. (ई) इंग्लंड नि जर्मनी यामधील अद्ययावत युद्धशिक्षणाप्रमाणे हिंदुस्थानातील सर्व दुय्यम शाळा नि महाविद्यालयातून सक्तीचे सैनिकी शिक्षण सुरू करावे. (उ) महाराष्ट्र नि वऱ्हाड यामध्ये अगोदरच चालू असलेली 'रायफल क्लब' स्थापन करण्याची चळवळ सर्व हिंदुस्थानात सुरू व्हावयास प्रोत्साहन द्यावे. (ऊ) इंग्लंड मध्ये सुरू असलेल्या हत्याराच्या निर्बंधानुसार हिंदुस्थानातील शस्त्रनिर्बंध सुधारावा. (ए) प्रादेशिक सेना नि छात्रसेना यांची मोठ्या प्रमाणात वाढ करावी. लढाऊ नि अनलढाऊ हा अन्याय्य नि अपमानास्पद भेद नाहीसा करून सर्व जातीच्या लोकांना सैन्यात प्रवेश खुला असावा. (ओ) हिंदुस्थानचे नौदल, वायुदल अद्ययावत असण्यासाठी सर्व प्रकारची दक्षता घेण्यात यावी. (औ) हिंदू सैन्य हे हिंदुस्थानातील जनतेसाठीच असून ब्रिटिश सत्ताधाऱ्यांचा त्याच्याशी काही संबंध नाही असा हिंदुस्थानातील जनतेमध्ये आत्मविश्वास उत्पन्न करावा नि प्रत्यक्ष हिंदुस्थानच्या संरक्षणावाचून दुसऱ्या हिंदुस्थानबाहेरील कोणत्याही रणांगणावर हिंदुस्थानचे सैन्य पाठविण्यात येऊ नये. राष्ट्रीय सभा ही हिंदूंची प्रातिनिधिक सभा नाही नि असणे शक्य नाही. म्हणून हिंदू महासभेस न विचारता सरकार, काँग्रेस अथवा मुस्लिम लीग यामध्ये राजकीय अथवा राज्यकारभारविषयक जे काही ठरेल ते हिंदूंना बंधनकार होणार नाही."

## बेलिराम धवन यांना श्रद्धांजली

जानेवारी १९४० मध्ये डेरा इस्माइल खानचे हिंदू नेते रावबहादूर बेलिराम धवन यांचा खून झाला. ती वार्ता अैकून झालेले दुःख व्यक्त करणारे एक पत्रक सावरकरांनी काढले ते असेः

“ज्या प्रवृत्तीने स्वामी श्रद्धानंदांचा खून झाला तीच इस्लामी प्रवृत्ती त्या खुनामागेही आहे असे आजपर्यंतच्या वार्तावरून दिसते. परंतु असल्या अत्याचारांच्या भीतीने हिंदुसंघटनेचे आंदोलन दबणार नाही.

पूर्वी लाहोरमध्ये असेच अत्याचार झाले नि अनेक शीखांचे खूनही पारितोषिक लावून केले गेले तरीही शीख दबले नाहीत तर उलट महाराज रणजितसिंगच्या नेतृत्वाखाली शीखांनी त्या प्रत्येक खुनाचा सूड घेऊन पंजाबात आपले राज्य स्थापन केले आणि ते थेट काबूलपर्यंत चालून गेले. तेथपर्यंत शीखांचे साम्राज्य पसरले. स्वामी श्रद्धानंदांचा खून मुसलमानांनी केला पण शुद्धीचे काम थांबले नाही. ते वाढतच गेले आणि आता तर हिंदुत्वनिष्ठ संस्थांचे ते एक दैनंदिन विधायक कार्यच झाले आहे. कलकत्ता येथे झालेल्या हिंदू महासभा अधिवेशनात सहस्त्रावधी लोकांनी ह्या शुद्धी नि संघटनेच्या कार्याला पाठिंबा दिला. त्यात रावबहादूर बेलिराम धवन हेही एक होते. तेथून परत जात असताना घरी पोचण्यापूर्वीच त्यांना आपल्या प्रतिज्ञेप्रमाणे आपला देह राष्ट्रकार्यार्थ अर्पण करावा लागला !! काही वर्षांपूर्वी त्यांचे बंधूही हिंदू कार्यकर्ते म्हणूनच मारले गेले. पण त्या खुनाने न डगमगता बेलिरामजी हिंदु संघटन करीत राहिले नि तेही धारातीर्थी पडले!

प्रत्येक हिंदुसंघटकाने हिंदुसंघटनेचे व्रत घेताना हा धोका लक्षात ठेवून ह्या ईश्वरी कार्यात एक सैनिक म्हणून यावे. असे शेकडो सैनिक सिद्ध झाले की हा हौतात्म्याचा कालखंड संपून विजयाचा कालखंड चालू होईल! ह्या हौतात्म्याचे सुपुत्रच विजयी सेना उभारतील. तोवर हिंदुसंघटक कार्यकर्त्यांनी आत्मविश्वासाने आत्मसंरक्षणाचे न्याय्य उपाय योजीत आपला मार्ग आक्रमावा!”

## एकमताचा आग्रह फसवा!

दि. १० जानेवारी १९४० रोजी भारताचे व्हॉइसरॉय लिनलिथगो यांनी मुंबईत एक भाषण केले. ह्या भाषणासंबंधी आपले मत व्यक्त करणाऱ्या पत्रकात सावरकर म्हणतातः

"व्हॉइसरॉयनी ह्या भाषणात शक्य तितक्या लवकर वसाहतीचे स्वराज्य देण्याचे दिलेले आश्वासन स्पष्ट आहे. अनेक राजकीय नेत्यांना घेऊन केंद्रीय कार्यकारी मंडळ वाढविण्याची त्यांची सूचना सर्वसाधारणपणे आक्षेपार्ह नाही. साध्यानुकूल सहकार्य ह्या सूत्राप्रमाणे घटनात्मक मार्गाने मिळणारे प्रत्येक अधिकारपद घेऊन त्याचा उपयोग पुढील प्रगतीसाठी करावा. यासाठी कार्यकारी मंडळाची वाढ करताना हिंदू महासभेचे अधिकृत प्रतिनिधी त्यात समाविष्ट करावेत आणि त्यांच्या विचाराप्रमाणे वागण्याचे शासनाने आश्वासन द्यावे.

पण ही घोषणा करताना व्हॉइसरॉयनी सर्व पक्षांच्या एकमताची जी अट घातली ती पुरी होणे जवळ जवळ अशक्यच आहे. कारण हे पक्षोपपक्षातील मतभेद सरकारच भेदनीतीने वाढवीत असते. खरे म्हणजे ह्या लोकशाही पद्धतीत कोणतेही घटनात्मक पाऊल एकमतासाठी अडत नाही. ब्रिटिश शासनाने वसाहतीच्या स्वराज्याची घटना सिद्ध करावी आणि ती सर्व पक्षांपुढे मांडून त्यातील अधिकाधिक संमत भाग स्वीकारावा; राष्ट्रसंघाच्या तत्त्वानुसार अल्प संख्यांकांचा प्रश्न सोडवावा. पण ह्यासाठी एकमताची अट घालण्याचे काही कारण नाही. ज्या संघराज्याच्या घटनेविषयी व्हॉइसरॉय परवा इतक्या अभिमानाने बोलले ती घटना काय लोकांचे मत घेऊन मान्य केली आहे? तसेच आणीबाणीच्या निर्बंधानुसार जी एकमुखी सत्ता व्हॉइसरॉयनी हाती घेतली ती काय लोकमत विचारून? जर ब्रिटिश शासन परकीय एकमुखी सत्तेचा शाप भारताला देऊ शकते तर तेच शासन काय विश्वमान्य राष्ट्रीय लोकशाहीच्या तत्त्वानुसार भारताला वसाहतीच्या घटनेचे वरदान देऊ शकत नाही? ह्या भाषणात व्हॉइसरॉयनी एक महत्वाची घोषणा केली आहे. ती म्हणजे ह्या युद्धकालात सैन्यातील आणीबाणीची अधिकारपदे सर्व भारतीयांना कोणताही जातिभेद न मानता दिली जातील. मी शासनाला आवाहन करतो की ह्याच विचाराने त्याने भूदल, नौदल नि वायुदलातील सर्व शाखांची द्वारे सर्वांना अशीच उघडी करावीत आणि जातिभेद न करता गुणानुसार भरती करावी!"

## हिंदू सभा समर्थ करा

१ एप्रिल १९४० रोजी वीर सावकरांनी महाराष्ट्रात हिंदू सभेची संघटना सबल नि कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने सर्व शाखांना मार्गदर्शन करणारे एक पत्रक काढले. त्याचा आशय असाः

"हिंदू महासभेची कार्यशक्ती वाढवून हिंदू राष्ट्राचे रक्षण करण्याचे सामर्थ्य तिच्यात आणण्यासाठी पहिली मुख्य गोष्ट जी सध्या अत्यंत आवश्यक आहे, ती म्हणजे आज जी काय राज्यसत्ता लोकांच्या हाती पडली आहे ती हिंदुसंघटक पक्षाने येत्या निवडणुकीत हस्तगत करून घ्यावी. हिंदूंचे न्याय्य अधिकार रक्षण करण्याचे ब्रीद उघड उघड धारण करून निवडणुकीत उभे राहिलेल्या हिंदुसंघटक पक्षास जर प्रत्येक हिंदू स्त्री-पुरुष मतदार आपले मत देईल, तर हिंदुस्थानातील निदान सात-आठ प्रांतात तरी हिंदुसंघटक पक्षांच्या हाती प्रांतिक राज्यसत्ता येईल आणि आज धार्मिक, सामाजिक, आर्थिक नि राजकीय अशा ज्या अनेक अन्याय्य-अत्याचारांनी आणि दंग्याधोप्यांनी अहिंदूंकडून हिंदू जनता उत्पीडित होत आहे. त्यातील शेकडा नव्वद प्रकरणी तरी हिंदूंची मुक्त ता लगोलग करता येईल. हिंदू राष्ट्रात नवे जीवन आणि प्रबळ आत्मविश्वास संचरेल. हिंदूंचा वाढता दरारा सर्व हिंदुस्थानभर बसल्यावाचून राहणार नाही.

मुसलमान मतदार ज्याप्रमाणे आणि जोवर कट्टर मुसलमानालाच मत देतो. त्याप्रमाणे हिंदू मतदारानेही कट्टर हिंदुसंघटक पक्षालाच मत दिले पाहिजे. त्याविना हिंदूंचे प्रबळ अभ्युत्थान होणे शक्य नाही. हे सूत्र हिंदू मतदारसंघास त्वरेने पटत चालले आहे ही सुदैवाची गोष्ट आहे. हिंदुस्थानच्या आजच्या नि कालच्या दोन्ही राजधान्यात, दिल्ली नि कलकत्ता येथील कॉर्पोरेशनच्या निवडणुकीत हिंदू महासभेच्या प्रतिनिधींना जे अनपेक्षित यश गेल्या महिन्यात मिळाले नि काँग्रेसचा पाडाव झाला ते ह्या हिंदू जागृतीचेच प्रत्यंतर होय. त्यावाचून कान्हदेश, बेळगाव, त्र्यंबक, वऱ्हाड, बिहार प्रभृती विभागात गेल्या महिन्यात ज्या लहानमोठ्या निवडणुका झाल्या त्यातही हिंदुसंघटक पक्षाची निवडणुकीत सरशीच झाली. हिंदुसभाई, सनातनी, आर्यसमाजी, जैन, लिंगायत प्रभृती सर्व हिंदुसंघटक पक्षांनी असेच बळ बांधून एकमुखी प्रतिकार केला आणि डॉ. आंबेडकरांचा स्वतंत्र श्रमिक पक्ष, उदारमतवादी (Liberal) पक्ष इत्यादी पक्षांशी जमेल ते सहकार्य करून निवडणुकी लढविल्या तर हिंदुहितघातक काँग्रेसचा पाडाव करणे शक्य आहे ही गोष्ट आता प्रत्यक्ष प्रमाणानेच सिद्ध झाली आहे. काँग्रेसची टोपी घातल्यावाचून निवडणूक जिंकणे अशक्य ह्या आजवर बळावलेल्या घातुक लोकभ्रमाचा बुडबुडा फुटला, तो एक बागुलबुवा बारगळला.

पण हा झाला नुसता आरंभ. आता लगोलग हवी आहे हिंदूसभांची बळकट संघटना नि अखंड परिश्रम!

ह्या दोन वर्षांत हिंदुस्थानभर विस्कळीतपणे पसरलेल्या हिंदू महासभेच्या प्रांतिक नि स्थानिक शाखांची आता बळकट संघटना केली पाहिजे आणि प्रत्येक शाखेने आपापल्या कक्षेत हिंदुसंघटनेची नित्य नि नैमित्तिक कार्ये सारखी दिवसानुदिवस चालवीत राहिली पाहिजेत. एखादी अखिल भारतीय विशिष्ट चळवळ मधेच हाती घ्यावी लागली, तर तिच्या यशासाठीसुद्धा ही दैनंदिन चालणारी कामे नि ही बळकट संघटनाच आवश्यक आहे. पुढील निवडणुकी तर ह्या दोन वर्षांत आपण जी हिंदू महासभेची पद्धतशीर संघटना करू आणि अनुदिन कार्य करत करत हिंदुत्वाचा प्रचार नि बळ वाढवू, त्यांच्याच आधारावर लढवाव्या लागतील. हिंदू महासभेची अशी संघटना नि कार्यशक्ती हिंदुस्थानभर पसरलेल्या शाखातून संचरविण्याचे काम त्या त्या प्रांतातून काय होईल ते करूच, पण निदान महाराष्ट्र, नागपूर आणि वऱ्हाड या तीन प्रांतांनी तरी येत्या दोन वर्षांत हे कार्य इतक्या उत्कृष्टपणे करून दाखवावे की इतर प्रांतातील हिंदू जनतेत ते पाहून प्रबळ आत्मविश्वास उत्पन्न व्हावा. हिंदुसंघटना असावी अशी, असे उदाहरण दाखविता यावे. आजही सर्व प्रांत हिंदुत्वाच्या अभिमानाने केंद्र, हिंदुसंघटनेचा बालेकिल्ला म्हणून बृहन्महाराष्ट्राकडेच बोट दाखवितात. तो लौकिक वाढवून येत्या निवडणुकीत अगदी निर्भेळ बहुमत नसले, तरी न्युनतः बहुमताला धाकात ठेवणारे प्रबळ अल्पमत तरी महाराष्ट्राने पटकाविले पाहिजे.

राजसत्ता हिंदूंनी हस्तगत करण्याचा पहिला यशस्वी प्रयोग बृहन्महाराष्ट्रातील हिंदुसंघटक पक्षानेच करून दाखविला पाहिजे, तरच महाराष्ट्राचा 'हिंदुत्वनिष्ठे'चा बाणा आपण राखला असे होईल आणि हिंदुसंघटनेच्या कार्याला हिंदुस्थानभर मोठा उठाव मिळेल!

येत्या दोन वर्षांत बृहन्महाराष्ट्रातील हिंदू सभांची अशी बळकट संघटना करण्यासाठी या परिपत्रकात मी काही सूचना देत आहे. त्यात सुचविलेला हा कार्यक्रम प्राथमिक आहे आणि तो हिंदू सभांचे सध्याचे नित्यकर्म म्हणून तात्काळ आरंभावयाचा आहे. या सूचनातील प्रत्येक लहानमोठी गोष्ट अगदी दृढ निश्चयाने स्थानिक सभांपासून तो प्रांतिक सभांपर्यंत प्रत्येक घटकाने अखंडपणे आचरली पाहिजे. यातील किरकोळ दिसणारी सूचनाही महत्त्वाचीच समजावी. ह्या सूचना दिग्दर्शनार्थ म्हणून केलेल्या आहेत. त्यांच्या अनुरोधाने इतर ही आवश्यक ती नित्यकर्मे यथाशक्ती हाती घेतली जावीत.

बृहन्महाराष्ट्रातील प्रत्येक हिंदू सभेचा नित्यक्रम प्रत्येक प्रांतातील जिल्हा हिंदू सभा हा मुख्य घटक मानून त्याविषयी प्रस्तुत नित्यक्रम मी रेखाटीत आहे. त्याप्रमाणेच प्रत्येक लहानमोठ्या स्थानिक सभांनी आपला क्रम आखावा.

१) प्रत्येक जिल्ह्याला एक हिंदू सभा असलीच पाहिजे. त्या हिंदू सभेचे एक स्वतंत्र कार्यालय असावे. त्यावर जिल्हा हिंदू सभेची पाटी लावलेली पाहिजे. कामाचे प्रत्यहीचे ठरावीक तास त्या पाटीवर लिहिलेले असावे आणि त्यावेळी कार्यालय अगदी नियमितपणे उघडे असलेच पाहिजे. कार्यालयात जिल्ह्यातील सर्व शाखांची आणि त्यांच्या सभासदांची स्वच्छपणे लिहिलेली नामावली हवी. गणन पुस्तक (हिशेबाची वही) हे तर अगदी पद्धतशीरपणे ठेवलेले असावे. जिल्हा कार्यालयात एक वेतनी कार्यदर्शी कार्यालयाच्या ठरलेल्या वेळी नेहमीच उपस्थित असला पाहिजे. त्याने सर्व लिखाण ठेवावे, सभासद नोंदावे, माहिती द्यावी, पत्रव्यवहार करावा. कार्यालयातील पत्रव्यवहार

जेवढा अधिक व्यवस्थित, व्यापक नि वेळच्या वेळी होणारा असतो तितक्या पटीने प्रचार अधिक वाढतो. जिल्हासभेचा हा पत्रव्यवहार म्हणजे महासभेच्या वरच्या केंद्राचा संबंध ग्रामसभापर्यंत अखंड नि जिवंत राखणारा दुवाच होय. कार्यालयातील नित्याचे काम करणारा हा कार्यदर्शी वेतनीच असावा. अर्थात सर्वतोपरी त्या कार्यास वाहून घेणारा स्वार्थत्यागी मनुष्य मिळाला तर उत्तमच; पण काम चोख असावे. काही स्वयंसेवकांच्या गबाळ नि लहरी कामापेक्षा ह्या कार्यालयीन कामाचे प्रश्नी वेतनी मनुष्याचे आज्ञांकित नि बांधीव काम बरे.

२) जिल्हा हिंदू सभेने आणखी एक वेतनी प्रचारक ठेवला पाहिजे. त्याचे काम जिल्हाभर सतत प्रचार करण्याचे नि पाहणी करण्याचे असावे. त्याने प्रत्येक तालुका सभेस भेट देऊन तेथील कार्यालय वर दिलेल्या जिल्हा कार्यालयाच्या पद्धतीप्रमाणे व्यवस्थित आहे किवा नाही ते पहावे. तालुक्यातील शाखांची नि त्यांच्या सभासद-संख्येची, कार्यकारी मंडळाची इत्यादी नोंद तालुका कार्यालयात ठेवलेली असावी. तेथील गणन-पुस्तकही पहावे. निरनिराळ्या शाखांना भेट द्यावी. शाखा नसतील तेथे उघडण्याची व्यवस्था करावी. विशेष कामासाठी, व्याख्याने देण्यासाठी विशेष स्थळी जावे लागल्यास जावे. या नित्य जिल्हा प्रचारकाचा प्रवासव्यय ज्या स्थळी तो जाईल त्यांनी त्यांनी आपल्यापुरता वाटून घ्यावा. प्रत्येक तालुक्याने आपल्या कक्षेतील गावातून शक्य तितक्या शाखा उघडाव्या आणि ज्यांना जमेल त्या तालुका सभांनी आपल्या तालुक्यापुरताच असा एक सतत फिरतीवर राहणारा प्रचारक आपल्या तालुक्यात नेमावा.

३) जिल्ह्याच्या नगरात राहणाऱ्या कार्यकर्त्या मंडळींनी आठवड्यातून निदान एकदा तरी जिल्हा कार्यालयात जमावे. झालेल्या कामाची छाननी, जिल्ह्यातील आलेल्या गाऱ्हाण्यांची नि उद्भवलेल्या प्रश्नांची चर्चा, प्रांतिक केंद्राने सांगितलेल्या कामांचा निकाल इत्यादी विषयांचा विचार व्हावा नि कार्यक्रम ठरवून पार पाडावा.

४) जिल्हा-नगरे नि तालुक्यांची गावे यातून तरी स्वयंसेवक नि पुढारी ह्यांनी गावाचे भाग वाटून घेऊन हिंदू सभेचे सभासद वाढविण्यासाठी घर नि घर टिपून हिडावे. स्त्रियांनीही स्त्रियांमध्ये सभासद नोंदावे. गावातील प्रत्येक मनुष्यापुढे तो प्रश्न टाकला गेला पाहिजे. तो सभासद होवो न होवो. त्यांच्यापुढे तो प्रश्न सतत उभा ठाकलेला पाहिजे आणि हे सभासद वाढविण्याचे नि टिकविण्याचे काम अखंड चालू राहिले पाहिजे.

५) जिल्हा-नगरातील प्रमुख पुढाऱ्यांनी सवडीप्रमाणे आळीपाळीने सणसुटी यात्रा पाहून जिल्ह्यातील गावोगावी प्रचारास जावे. ही वाटणी अशी असावी की महिन्याकाठी एकदा तरी जिल्हा-नगरातील कोणातरी पुढाऱ्यांचा दौरा जिल्ह्याच्या गावातून चाललेला असावा.

६) हिंदुसंघटन निधी-पुण्यात श्री. केतकरांनी जो हिंदुसंघटन निधी काढलेला आहे त्यास गौरी-गणपती, लग्नकार्ये, व्रतवैकल्ये, श्राद्धपक्ष आदी प्रत्येक प्रसंगी जे काय लहान मोठे दान देता येईल ते प्रत्येक हिंदूने अवश्य द्यावे. गौरी-गणपतीत घरामागे चार-दोन आणे जरी त्या निधीस धाडले तरी चार-पाचशे रुपयांची भर एकेका उत्सवाच्या आठवड्यात त्या निधीमध्ये पडेल. तो निधी

हिंदूसंघटनेचा झाला तर एक अखंड गंगाजळी होऊनच बसावी असा संकल्प सर्वांनी आपल्या मनाशी करावा. महाराष्ट्रापुरता हिंदु-संघटनाचा सारा विशिष्ट प्रचार त्या निधीवरच अवलंबून आहे नि अकस्मात एखादी मोठी चळवळ हाती घ्यावी लागली तर तोच निधी आरंभी हाताशी पटकन उपयोगी पडेल. खडकातून पाणी आपण होऊन झिरपते नि नदी वाहू लागते, तसा विशेष ताण कोणावरच न पडता किवा त्यासाठी मोठमोठ्या रकमा उकळण्याची चळवळ न करता हा निधी सहजी जमेल. जर गौरी-गणपती, लग्नकार्य इत्यादी प्रसंगी ह्या निधीस काही तरी देण्याची महाराष्ट्रास सवयच लागेल. तर तीन वर्षांच्या आत एक लक्ष रुपयांचा हा केवळ महाराष्ट्रीय निधी जमेल. हिंदुसंघटनाचा महाराष्ट्रभर अखंड प्रचार चालू ठेवण्यास साहाय्य होईल.

७) जिल्हा सभांकडे प्रांतिक सभांकडून जी जी कामे दिली जातील वा प्रश्न विचारले जातील त्यांची कार्यवाही तत्काळ करणे नि उत्तरे लगोलग धाडणे हे जिल्हा हिंदू सभेचे एक महत्त्वाचे कर्तव्य आहे. तसे झाले तरच महासभेचा व्याप संघटितपणे नि तत्परतेने चालू शकेल; वाढू शकेल, ती कार्यक्षम होऊ शकेल. जिल्हा सभा ह्याच महासभेचे हात-पाय होत. ते लुळे असतील तर तीही अपंगच राहणार. ते कार्यक्षम हात पाय होत. ते कार्यक्षम तर ती कार्यक्षम. पण सध्या जिल्हा सभा महाराष्ट्रातसुद्धा प्रांतिक सभांच्या मताप्रमाणे उत्तरे तात्काळ देण्यात वा कामे पार पाडण्यात फार ढिलाई करतात. ती ढिलाई लगलग नाहीशी झाली पाहिजे.

८) सर्व हिंदू सभांनी हे परिपत्रक हाती पडताच आपापल्या जिल्ह्यात आज मितीस एकंदर शाखा किती आणि सभासद संख्या किती, तो पट मे महिन्याच्या १७व्या दिनांकापर्यंत तरी आपल्या प्रांतिक सभांकडे अगदी अवश्य धाडावा. हा पट थोडा अपुरा असला तरी चालेल पण आज करता येईल तितका पूर्ण करून प्रांतिक केंद्रांकडे तत्काळ धाडावा. मे महिन्याच्या शेवटी बृहन्महाराष्ट्राच्या तीनही प्रांतात मिळून हिंदू महासभेच्या पटावर एकंदर शाखा किती नि सभासद संख्या किती ते नक्की कळलेच पाहिजे.

९) जिल्ह्यातील निदान प्रत्येक तालुका नगरी तरी एक एक हिंदुसभा स्थापलेली असलीच पाहिजे आणि तिचे नि जिल्हा सभेचे कार्यालय वर दिलेल्या सूचनांप्रमाणे कार्यक्षम झालेच पाहिजे. हा नित्यक्रम म्हणून ह्या परिपत्रकातच सुचविला आहे. असे अखंड कार्य जर दोन-तीन वर्षे महाराष्ट्रात अगदी एखाद्या किल्ली दिलेल्या घड्याळयाप्रमाणे चालू राहील तर महाराष्ट्रात तरी हिंदुमहासभेची संघटना नि शक्ती अजिक्य ठरल्यावाचून राहणार नाही. हे परिपत्रक केवळ कार्यालयाच्या नित्यक्रमांनाच निर्देशण्यासाठी मुख्यतः काढले आहे. सध्याची विशिष्ट कार्ये कोणती त्याची सांगोपांग टिपणी ह्यात गोविली नाही; तथापि नित्यक्रम म्हणूनच प्रत्यक्ष कार्याविषयी एक सर्वसाधारण सूत्र म्हणून अतके सांगणे पुरे आहे की, प्रत्येक जिल्हा सभा ही त्या जिल्ह्याच्या हिंदुसंघटनेचा एक ‘कलेक्टर’ आहे असे समजून त्या जिल्ह्यातील हिंदूंच्या अधिकारांचे सर्व प्रकारच्या अहिंदू आक्रमणापासून रक्षण करणे हे तिचे मुख्य नि नित्य कर्तव्य समजले जावे. प्रत्येक स्थानिक सभेने त्या त्या स्थानाचे, तालुका सभेने त्या त्या तालुक्यांतील नि जिल्हा सभेने त्या त्या जिल्ह्यातील हिंदूंचे अहिंदू आक्रमणापासून रक्षण करण्यास डोळयांत तेल घालून झटत राहिले पाहिजे. प्रत्येक लहानसहान

स्थानिक प्रश्नी प्रांतिक सभेकडे नुसती कागाळी करण्याची वा पत्रे धाडण्याची खोड सोडून द्यावी. स्थानिक वा जिल्ह्यातील प्रश्नांचा निपटारा त्या त्या स्थानिक वा जिल्हा सभेने आणि हिंदू समाजानेच शक्यतो केला पाहिजे.

आपल्या गावाच्या वा जिल्ह्याच्या कक्षेत हिंदूंचे अधिकार आपणच आपल्या बळावर संरक्षिले पाहिजेत. हे आपले मुख्य दायित्व अशी प्रत्येक स्थानिक हिंदू समाजाची दृढ भावना झाली पाहिजे. हे ब्रीद त्याने धारण केले पाहिजे. म्हणजे प्रांतिक सभा नि महासभा अखिल भारतीय प्रश्न झुंजविण्यास मोकळी राहील.

हिंदूंच्या अधिकारांना अहिंदू आक्रमणापासून संरक्षिणे हे नित्यकर्मच होय. त्या त्या जिल्ह्यात ह्या प्रकरणी जे करणे ते ते त्या जिल्हा सभेने सतत करीत रहावे, स्थानिक सभांकडून करवून घ्यावे.

येत्या दोन-तीन वर्षांत अस्पृश्यता नामशेष करून टाका! त्यातही अस्पृश्यता निवारण हे तर या दोन वर्षांतील मुख्य कार्य ज्याने त्याने मनात आणताच होणारे सर्वात सोपे पण दूरवरचे हितकारक परिणाम करणारे असे हे कार्य! या दोन-तीन वर्षांमध्ये आपल्या जिल्ह्यातून सार्वजनिक अस्पृश्यता अशी नामशेष करावयाचीच असा प्रत्येक जिल्हा सभेने, तालुका सभेने आणि स्थानिक सभेने निश्चय केला पाहिजे. प्रतिज्ञा करून ती पार पाडली पाहिजे! व्यक्तीशः वा घरगुती अस्पृश्यता कोणी पाळो वा न पाळो, त्या प्रकरणी आपल्या सनातनी बंधूंना लवलेशही उपद्रव न देता सार्वजनिक प्रकरणी म्हणजे शाळा, मार्ग, सरकारी संस्था, वाहने, जनिक (Public) सभा, पटगृहे, नाट्यगृहे, प्रवासगृहे आणि विशेषतः सार्वजनिक पाणवठे नि बोर्डाच्या विहिरी इत्यादी स्थळी पूर्वास्पृश्यांना समसमान अधिकार मिळालेच पाहिजेत. या प्रकरणी कोठेही अन्याय झाला तर तेथील हिंदू सभांनी लगोलग तो निवारावा. शक्यतो मतपरिवर्तन पण निरुपाय तर नागरिक अधिकारांपुरते न्यायालयातही खटले भरून हा प्रश्न मिटविला पाहिजे.

जर हिंदुसंघटन पक्ष या दोन वर्षांत आपापल्या गावापुरती नि जिल्ह्यापुरती तरी अस्पृश्यतेस अक्षरशः नामशेष करू शकेल तर हिंदू समाजाचे बळ शंभर पट वाढविल्याचे श्रेय, दोन वर्षांत दोनशे वर्षांचे काम उरकून टाकल्याचे श्रेय पदरी पाडून घेईल. पण जर आपण पुढे होऊन अस्पृश्यता नामशेष केली तरच ते फळ पदरी पडेल. अस्पृश्य हिंदूंनाही त्यांच्या-त्यांच्यातील अस्पृश्यता उखडून टाकण्याचा तसाच निकराचा प्रयत्न करावा. कारण महार, चांभार, भंगी हेही आपसात अस्पृश्यता पाळण्याचा अपराध करीतच आहेत. दोष सर्वांचा सर्वांनी सुधारावा!

जिल्हा सभांच्या नित्यक्रमाविषयी इतक्या सूचना दिग्दर्शनार्थ सध्या पुरेत. यातील अक्षर नि अक्षर आचरले जावे अशी माझी महाराष्ट्रातील जिल्हा सभांना, मानली तर सक्तीची आज्ञा म्हणून नाही तर कळकळीची विनंती म्हणून, पण निक्षून सांगी आहे! ह्यासाठी लागेल तो त्याग तुम्ही केलाच पाहिजे नि कष्ट सोसलेच पाहिजेत ते फलाच्या मानाने अल्प आहेत!”

## आझाद मुस्लिम परिषदेचा धोका

मे १९४० मध्ये दिल्ली येथे आझाद मुस्लिम परिषद भरली होती. ही परिषद मुस्लिम लीगशी संपूर्णपणे सहमत नव्हती. तिने मुस्लिम लीग विरुद्ध काही ठरावही केले. त्यामुळे काँग्रेसी निधर्मी हिंदू ह्या परिषदेला पाठिबा देत असत. ह्या परिषदेचे खरे स्वरूप सांगणारे एक पत्रक वीर सावरकरांनी काढले ते असेः

"ह्या परिषदेने राजकीय दृष्टीने हिंदुस्थान हा एक नि अविभाज्य घटक असला पाहिजे, अशी स्पष्ट घोषणा केली म्हणून या परिषदेचे अभिनंदन करणे आवश्यक आहे. परंतु याच परिषदेने तिच्या शेवटच्या ठरावात मुसलमानांना किती नि कोणत्या प्रकारची संरक्षणे पाहिजेत हे ठरविण्याचा निर्णायक अधिकार मुसलमानांच्या हाती असावा अशी जी मागणी केली आहे, त्याचा अर्थच हा की बहुसंख्य हिंदूंनी अल्पसंख्याकांच्या मतापुढे मान वाकवावी. या मागणीला पहिली चालना काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मौलाना अबुल कलम आझाद यांनी त्यांच्या रामगड येथे झालेल्या काँग्रेसच्या अध्यक्षीय भाषणातच दिली आहे. त्यावेळी एकाही काँग्रेसवाल्याने या मागणीविरुद्ध ब्र सुद्धा काढला नाही. आताही या मागणीला काँग्रेस विरोध करणार नाही म्हणूनच काँग्रेसशी संगनमत करणाऱ्या ठरावाची या परिषदेने प्रशंसा केली. अशा प्रकारे काँग्रेसची पाठ थोपटून तिच्याकडून आपले अधिकार मान्य करून घेण्याचा ह्या परिषदेचा डाव आहे. पण आझाद मुस्लिम परिषदेने हे लक्षात ठेवावे की ही

मागणी मान्य करून घेण्यासाठी शेवटी तिला हिंदू महाभेची संमतीही आवश्यक ठरेल आणि अशा अल्पसंख्याकांना अधिक अधिकार देणाऱ्या कोणत्याही योजनेला हिंदू महासभा कधीही मान्यता देणार नाही. यावर काही जण विचारतात की असे केल्याने हे राष्ट्रीय मुसलमानही राष्ट्रीय लढ्यात भाग न घेता लीगला मिळाले तर काय करायचे? याला पहिले उत्तर असे की देशप्रेमी लोक आपल्या मायभूमीच्या प्रेमासाठी लढतात. पुढे मिळणाऱ्या लोण्याच्या गोळ्यासाठी भाडोत्री आशेने नव्हे. यापासून हिंदूंनी एक धडा घेतला पाहिजे, तो असा की हिंदूंच्या वतीने बोलण्याचा अधिकार काँग्रेसला न मिळता तो हिंदू महासभेला मिळावा यासाठी हिंदूंनी हिंदू सभेलाच यशस्वी करावे आणि ती हिंदू जनता जोवर हिंदूंच्या वतीने बोलण्याचा काँग्रेसचा अधिकार काढून घेत नाही तोवर जातीय निर्णयापेक्षाही हिंदूंचा अधिक घात करणारी अतकेच नव्हे तर शुद्ध राष्ट्रीय हितसंबंधांचाही घात करणारी अशी एखादी नवी समेट योजना काँग्रेस हिंदूंच्या गळयात अडकविल्याविना राहणार नाही!"

## बडोदा मुसलमानांना चपराक

३ जून १९४० रोजी सावरकरांनी बडोदे संस्थानच्या मुस्लिम परिषदेने केलेल्या अन्याय्य मागण्यांना वेळीच विरोध करावा असे आवाहन करणारे एक पत्रक काढले त्याचा आशय असाः

"ह्या मागणीचे समर्थन बडोद्याचे मुसलमान कसे करणार ? मुस्लिम लीग म्हणते की येथे मुसलमानांनी राज्य केले असल्याने त्यांचा तो अनुवंशिक अधिकार आहे म्हणून त्यांना अधिक प्रतिनिधित्व हवे. ह्या तत्त्वानुसार बडोद्यातील मुसलमानांनी ३३ टक्केच काय पण ६० टक्के प्रतिनिधित्व मागावयास हवे होते! पण त्यांना बडोद्यात राज्य करण्याचा अनुवंशिक अधिकार काही सांगता येणार नाही. कारण बडोद्याच्या राजांनी नि तेथील हिंदूंनी त्यांच्या पराक्रमाने तो प्रांत मिळविला असून त्यांनी तलवारीच्या तीक्ष्ण धारेने साऱ्या गुजरातमधून २०० वर्षांपूर्वीच मुसलमानांचे राज्य नष्ट केले होते! बडोद्यात ३३ टक्के प्रतिनिधित्व मागण्यापूर्वी तेथील मुसलमानांनी हैद्राबादच्या निजामाला सांगावे की त्याने ९० टक्के हिंदूंना केवळ ५० टक्के प्रतिनिधित्व न देता त्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व द्यावे पण हा प्रश्न आता तर्कशास्त्राचा उरला नसून पाकिस्तानची मागणी मान्य करून घेण्यासाठी हिंदु संस्थानातही कारस्थाने करण्याचा मुस्लिम लीगच्या चळवळीचा हा एक भाग आहे. अशा परिस्थितीत जातीय तेढ वाढेल अशा भ्रामक कल्पनेने मुस्लिम आक्रमणाला पायबंद न घालण्याचे पडेल धोरण हिंदू संस्थानिकांनी आता तत्काळ सोडून द्यावे. जातीय तेढ मिटविण्याचा प्रभावी उपाय म्हणजे अपराधी जमातीला कडक शासन करणे हाच होय."

## शीख सेना उभी करा !

५ जून १९४० रोजी सावरकरांनी खालसा यंगमेन्स युनियनच्या कार्यवाहांना एक उत्तेजक पत्रक पाठविले. त्याचा सारांश असाः

तुम्ही शीख परिषदेसाठी मला बोलावलेत याविषयी आभार. पण मी सध्या ते निमंत्रण स्वीकारू शकत नाही. पण आपल्या विनंतीप्रमाणे मी शीखबंधूंसाठी एक संदेश धाडीत आहे. त्यातील मुख्य विधेयके अशीः

१) शीख बांधवांनी काँग्रेसच्या खोट्या राष्ट्रवादापासून मानसिक दृष्टीने मुक्त व्हावे. या देशात अनेक मुसलमानी राज्ये निर्मिण्याचा मुसलमानांचा निर्धार आहे. त्यामुळे हिंदी राष्ट्रीयत्व ही केवळ एक कल्पनाच उरली आहे. तिच्या पुनरुज्जीवनाच्या काँग्रेस प्रयत्नांच्या परिणामी केवळ हिंदू तेवढेच निःशस्त्र, असंघटित नि दुर्बल बनून स्वसंरक्षणाकडे दुलर्क्ष करीत आहेत. मुसलमानांना त्यांचे स्वतंत्र राष्ट्र निर्माण करावयाचे आहे हे जाणून हिंदूंनीही प्रयत्नपूर्वक सर्व भारतात आपले वर्चस्व कसे राहील ते पाहिले पाहिजे. यामुळेच हिंदू-मुसलमान अैक्याचा प्रश्न 'याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्यावाचून नि विरोधाल तर तुमचा प्रतिकार करून आम्ही या देशाचे भवितव्य घडवू' या सूत्रानुसारच सोडविला पाहिजे. २) याच स्पष्ट धोरणाने तुम्ही पंजाबमध्ये काँग्रेसचा संबंध सोडून एक स्वतंत्र शीख पक्ष संघटित करा. सध्याच्या परिस्थितीत तुमच्या स्वतंत्र मतदारसंघाच्या या मागणीलाही माझा पाठिबा आहे. तुम्ही काँग्रेस दर्शिकेवर उभे राहणाऱ्या एकाही शीखाला निवडून देऊ नका. कारण काँग्रेसच्या भ्रांतराष्ट्रवादाने सीमा प्रांत, सिंध, पंजाब नि काश्मीरमधील हिंदूंची सत्ता, मत्ता नि हितसंबंध यांचा विश्वासघात केला जात असून बंगाल नि अन्य भागातील हिंदूंनाही तोच धोका आहे. तरी पंजाब विधानसभेत जर युवा शीख गट निर्माण झाला तरच तुम्ही मुस्लिम गटाचा यशस्वी प्रतिकार करू शकाल. ३ ) सैन्यांतही शीखांना योग्य स्थान मिळेल अशी दक्षता घ्या. कारण त्या क्षेत्रातही काँग्रेसच्या अहिंसक विचाराने हिंदू मागे पडले आहेत. ४) पाकिस्तानच्या

प्रश्नीसुद्धा काँग्रेसवर अवलंबून राहू नका. कारण तिचे नेते मुसलमानांना विरोध करणार नाहीत. त्यांच्या उद्गारांवरुन हे स्पष्ट दिसते. ५) आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट ही की, तुम्ही तत्काळ शीख सेना संघटित करण्यास प्रारंभ करा. ही सेना खाकसार नि खुदाई खिदमतगारांच्यापेक्षाही प्रबळ असली पाहिजे. ह्या सेनेवर लक्ष केंद्रित करून ती अशा पद्धतीने संघटित नि शिक्षित करा की पुढील तीन-चार वर्षांत प्रत्यक्ष पाकिस्तानची निर्मिती होत आहे असे दिसू लागताच ह्या सेनेचे खड्या सैन्यात रूपांतर करता यावे. कोणत्याही कार्यक्रमाला अशा सबल सेनेचा पाठिंबा नसेल तर ती सर्व व्यर्थ वटवट ठरेल!

गुरु गोविंदसिंगाचे चैतन्य आपणाला पुन्हा स्फूर्तिदायक नि मार्गदर्शक ठरेल तरच सर्व काही ठीक होईल. तशा परिस्थितीत मुसलमानांनी पाकिस्ताननिर्मितीचा प्रयत्नच केला तर त्यांना अटकेपासून दिल्लीपर्यंत एक समर्थ शीख राज्यच प्रस्थापित झालेले दिसेल. अतिहासाची हीच अपेक्षा असणार. आमच्यामधूनच निर्माण झालेल्या आमच्याच रक्ताचेअसलेल्या शीखांचे सामर्थ्य हे पंजाबमधील सर्व हिंदूंचेच सामर्थ्य ठरेल! वाह गुरुजी की फत्ते, वाह गुरुजी की खालसा !”

www.savarkarsmarak.com

## हिंदूंचे खरे प्रतिनिधी घ्या!

१० जुलै १९४० रोजी व्हॉइसरॉय यांच्या भेटीसंबंधी वीर सावरकरांनी काढलेल्या पत्रकाचा सारांश असाः

“वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या विपर्यस्त वार्तांच्या निराकरणार्थ मी प्रसिद्ध करतो की आमची भेट उघड्या मनाने विवेकपूर्ण नि सहानुभूतीची झाली. परंतु काही विषयाचे नीट स्पष्टीकरण न मिळाल्याने हा प्रश्न पुन्हा हिंदू महासभेच्या कार्यकारी मंडळापुढे विचारार्थ ठेवला जाईल. तोवर हिंदू सभा आहे याच धोरणाने चालेल.

काँग्रेस कार्यकारिणीच्या ठरावात ब्रिटिश शासनाने हिंदुस्थानचे हे स्वातंत्र्य मान्य करावे असा आग्रह करण्यात आला असला तरी अशा केवळ घोषणेने तिचे समाधान होणार आहे. त्यापूर्वी राष्ट्रीय सरकार स्थापण्याने काँग्रेसचे समाधान होणार आहे. पण हे राष्ट्रीय सरकार ब्रिटिश राज्यकर्त्यांनी सध्याच्या निर्वाचित प्रतिनिधीमधून स्थापन करायचे म्हणजे ते काही स्वातंत्र्याचे सरकार नव्हे तर ही मध्यंतरीची पायरी आहे. सारांश ज्वलज्जहाल भाषा बोलणाऱ्या भिकाऱ्याला आपली नरोटी लपविता येत नाही. काँग्रेस व्यवहारात आडपडद्याने ही पायरी मान्य करते तर हिंदू सभा उघड उघड सांगते की असे वसाहतीचे स्वराज्य ही संपूर्ण स्वराज्याच्या मार्गातील एक पायरी आहे. पण काँग्रेसप्रमाणे सध्याच्या लोकप्रतिनिधीमधून राष्ट्रीय सरकार स्थापणे हिंदू सभेला मान्य नाही. कारण सध्याचे काँग्रेसमधील हिंदुप्रतिनिधी हिंदूंच्या वित्तमत्तेचे संरक्षण करण्यास बांधलेले नसून ते हिंदूंचा विश्वासघात करणारे आहेत. म्हणून येथे राष्ट्रीय सरकार यायचे तर त्यात हिंदूंच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांचे प्रतिनिधी असलेच पाहिजेत. त्यांनी हिंदुहितसंबंध रक्षण्याचे मान्य केले पाहिजे. तसेच त्यांनी सर्व हिंदू राष्ट्राचा विश्वास संपादन केला पाहिजे.”

## व्हॉइसरॉयला पत्र

सावरकरांची प्रकृती ठीक नसल्यामुळे त्यांनी आपल्या वतीने हिंदू महासभेचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. मुंजे यांना भेटण्याबद्दल व्हॉइसरॉय यांना एक तार केली. त्या संदर्भात २२ सप्टेंबर १९४० रोजी व्हॉइसरॉयना पाठविलेल्या पत्रकात सावरकर लिहितातः

"मुस्लिम लीगने मुंबईत संमत केलेल्या ठरावावरून असे दिसते की शासनाने मुसलमानांच्या हिंदू विरोधी मागण्या मान्य केल्या आहेत, हे वृत्त वाचून हिंदू शासनावर चिडले आहेत. लीगवाले शासनाकडे स्पष्टीकरण मागत आहेत. हेच काय ते आशेचे स्थान आहे. मला येथे स्पष्टपणे लिहिले पाहिजे की शासनाला हिंदूंच्या मानाने मुसलमान काहीही साहाय्य देऊ शकणार नाहीत. हिंदूंची संस्थाने, विशेषतः नेपाळ जे साहाय्य करील ते महत्त्वाचे आहे. आता हिंदूही संघटित होत असल्याने शासनाने लक्षात ठेवावे की केवळ मुसलमानांच्या साहाय्याने आता ब्रिटन भारतावर फार काळ राज्य करू शकणार नाहीत. अशा हिंदूंना, मुसलमानांना सवलती देऊन दुखविणे शासनाला परवडणार नाही."

## गोव्यांत मराठीला वाचवा!

सावरकरांनी गोव्यात मराठी भाषेवर होणारा अन्याय परतवून लावण्यासाठी १४ ऑक्टोबर १९४० रोजी एक पत्रक काढून महाराष्ट्रातील हिंदूंना प्रकट आवाहन केले. त्या पत्रकात त्यांनी लिहिलेः

“येत्या शिरगणतीच्या वेळी गोव्यात जे साचे भरून मागितलेले आहेत; त्यात मराठी भाषा किवा नागरी लिपी लिहिली जाऊ नये, अशी शासनाची आज्ञा आहे. पोर्तुगीज भाषेवाचून अन्य भाषा लिहायचीच तर ती कोकणी असे रोमन लिपीतच लिहावे, देवनागरीत लिहू नये, अशा आज्ञेला विरोध केला पाहिजे. ह्या आज्ञेतील कोकणीचा कैवार कोकणीच्या प्रेमाने नसून मराठीला मारण्यासाठी पूतनेने घेतलेला कैवार आहे. भाषा मराठी की कोकणी हा प्रश्न एकवेळ दुय्यम समजता येईल. कोकणी भाषा आपल्या संस्कृतनिष्ठ भाषाभगिनीच्या वर्गातच मोडते. ती आपलीच आहे पण ती रोमनमध्ये न लिहिता देवनागरीत लिहिली पाहिजे. गोमंतकातील कोकणी किवा मराठी भाषा आणि देवनागरी लिपी यावरील हा अन्याय दूर करण्यासाठी हा प्रश्न श्रमविभागाच्या तत्त्वाने मराठी साहित्य परिषदेने नि साहित्य संमेलनाने हाती घेतला पाहिजे.”

## निजामापेक्षा नेपाळ अधिक योग्य

गांधीजींनी १३ ऑक्टोबर १९४०च्या 'हरिजन' मध्ये लिहिले की येथून अंग्रजांचे राज्य गेल्यावर हैद्राबादचा निजाम हा भारताचा बादशहा होईल! हा लेख सावरकरांनी वाचताच त्यांनी सणसणीत टोला दिला की, अंग्रज गेल्यानंतर हिंदुस्थानात राजेशाहीच देण्याची कल्पना करायची असेल तर हैद्राबादच्या निजामापेक्षा नेपाळचे महाराज हेच हिंदुस्थानचे महाराज होण्यास अधिक योग्य आहेत! त्याचा सारांश असाः

"गांधींचा हा लेख विशेष महत्त्वाचा नसला तरी तो पाकिस्तानच्या मागणीला प्रोत्साहन देणारा आहे. म्हणून त्याचा समाचार घेतला पाहिजे. पहिल्या महायुद्धाच्या वेळी अफगाणिस्तानच्या अमिराला भारतावर स्वारी करण्यास प्रोत्साहन देणारा जो कट मुसलमान नेत्यांनी रचला होता त्याला गांधींचा पाठिंबा होता हे अलिकडेच अ. ज. करंदीकरांनी 'केसरी', 'मराठा' यामध्ये लिहिलेल्या लेखात साधार सांगितले आहे. अलीकडेच 'पाकिस्तानला कोण विरोध करील' असे म्हणून आणि पठाणांच्या अत्याचारांवर पांघरूण घालून गांधीगण त्यांच्याशी मैत्री करण्याचा जो प्रयत्न करीत आहेत तोही अंग्रजांच्या दडपणाखाली अथवा अंग्रज भारत सोडून गेला तरीही येथे पठाणांचे राज्य आणावे या मुसलमानी स्वप्नाला साहाय्य करणारा आहे. पण गांधींनी हे लक्षात ठेवावे की अशी राज्ये शेगावच्या निर्णयाने निर्माण होत नाहीत तर ती बंदुकीच्या गोळयांनी निर्माण होतात. गांधींचे भारतीय अतिहासाचे ज्ञान यथातथाच असले तरी त्यांनी हे लक्षात घ्यावे की निजामाने त्याचा प्रदेश अंग्रजांना दिला, तो सुखाने दिला नाही तर मराठ्यांनी खड्याच्र्या लढाईत निजामाचा पराभव केल्यावर मराठ्यांपासून अंग्रजांनी निजामाचे संरक्षण करावे यासाठी दिला आहे. पण अशा बंदुकीच्या बळावर गांधींचा विश्वास नसेल आणि ते नैतिक बलच मानीत असतील तर त्यांनी निजामाला त्याचे सर्वच राज्य सोडण्यास सांगावे. कारण त्याच्या पूर्वजांनी ते विश्वासघाताने मिळविले आहे. पण त्यापूर्वी ते राज्य विजयनगरचे होते म्हणून नैतिक नि अैतिहासिक न्यायाने विजयनगरचे राजेच त्याचे खरेखुरे धनी ठरतील!"

## नेहरूंना झालेल्या शिक्षेचा निषेध

नोव्हेंबर १९४० मध्ये कॉंग्रेसचे वैयक्ति क सत्याग्रहातील नेते पंडित नेहरू यांस ब्रिटिश शासनाने चार वर्षे कारावासाची शिक्षा ठोठावली. ह्या शिक्षेचा निषेध करण्यासाठी काढलेल्या पत्रकात सावरकर लिहितात.

“नेहरूंना दिल्या गेलेल्या शिक्षेचे वृत्त अैकून प्रत्येक देशभक्ताला दुःखाचा धक्काच बसला असावा. आमच्या ध्येय धोरणात मतभेद असल्यामुळे आम्हाला दोन वेगळया पक्षात कार्य करावे लागत असले तरी देशभक्तीच्या नि मानवी हिताच्या तळमळीने आयुष्यभर कार्य करणाऱ्या नि त्यासाठी कष्ट भोगणाऱ्या नेहरूंविषयी मला वाटणारी सहानुभूती प्रकट करणे हिंदू सभा अध्यक्ष म्हणून माझे एक कर्तव्यच आहे. गांधी आणि नेहरू यांच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेसने युद्ध चालू झाल्यापासून भारत संरक्षण निर्बंधाखाली पकडल्या गेलेल्या बाबू सुभाषचंद्र बोस, सेनापती बापट यांच्यासारख्यांसंबंधीही सहानुभूती प्रकट केली नसली तरी हिंदू सभेने मात्र त्या त्या वेळी त्या त्या दडपशाहीचा निषेधच केला आहे. मे १९४० मध्ये हिंदू सभेने केलेल्या ठरावात विश्वासाने विश्वास निर्माण होतो आणि घटनात्मक प्रगतीने राष्ट्रीय सहकार्य मिळते, अशी चेतावणी देण्यात आली आहे. पण हे दुसरे महायुद्ध पुकारले गेले तेव्हा जे नेहरू एका पायावर उभे राहून लोकशाहीच्या रक्षणासाठी ब्रिटिश शासनाशी बिनाअट संपूर्ण सहकार्य करण्यासाठी सिद्ध होते तेच आता सर्वत्र असहकार करण्याची घोषणा का देत आहेत आणि त्यामुळे सरकारही सूड बुद्धीने त्यांना एवढी दीर्घकालीन सजा का ठोठावीत आहे याचा विचार झाला पाहिजे.

हे युद्ध चालू झाले तेव्हाच हिंदू सभेने अति उत्साहाने संपूर्ण सहकाराची किवा असहकाराची भाषा न बोलता साध्यानुकूल सहकाराची सिद्धता दर्शविली. ब्रिटिश शासनाला या युद्धात येथील जनतेचे खरे सहकार्य हवे असेल तर त्याने दडपशाहीच्या शिक्षा न देता लोकांना सध्या तरी फक्त वसाहतीच्या स्वराज्याचे आश्वासन देऊन त्यांची सहानुभूती मिळवावी हेच अष्ट आहे अशी मागणी केली होती.”

## शिरगणतींत हिंदू म्हणूनच नोंदवा

वीर सावरकरांनी एका पत्राद्वारे सर्व हिंदू सभांना आवाहन केले की त्यांनी येत्या शिरगणतीच्या वेळी जागे राहून, सर्व हिंदूंना जागे करून सर्वांची हिंदू म्हणूनच नोंद करून घ्यावी ते पत्रक असेः

“आगामी शिरगणती लौकरच होणार असल्याने सर्व प्रांतिक नि स्थानिक हिंदू सभांच्या शाखोपशाखांनी या विषयाकडे तातडीने लक्ष पुरविण्याची वेळ आली आहे. भागानगर निःशस्त्र

प्रतिकाराचा लढा जितका महत्त्वाचा होता तितकाच किंवा त्याच्याहूनही अधिक तीव्रतर महत्त्वाचा असा हा प्रश्न आहे. कारण शिरगणतीमध्ये जी माहिती, जे आकडे पुढे येतील त्यावरच आपल्या राजकीय सुधारणांची दिशा निदान येती दहा वर्षे तरी अवलंबून राहणार आहे.

गेल्या शिरगणतीवर काँग्रेसने बहिष्कार घातल्यामुळे हिंदूंची अतोनात हानी झाली. ज्या अनेक घातक गोष्टी काँग्रेसने केल्या त्यात ही गोष्टही घातक म्हणूनच नोंदली जाईल. यावेळीही कोणी सांगावे, आतील आवाजाचा साक्षात्कार महात्माजींना झाला तर चालू शिरगणतीवरही बहिष्कार पडण्याचा संभव आहे! आतापर्यंत जे सत्याग्रह झाले त्याचा उघड अर्थ असा झाला आहे की हिंदूंची हानी आणि जे अराष्ट्रीय आहेत त्यांचा अनुनय म्हणून या वेळी प्रारंभापासूनच हिंदू महासभेने जागरूक असणे आवश्यक नि अगत्याचे आहे. म्हणूनच तिने अगोदर राजकीय आखाड्यात उतरून आपण स्वतःच त्या गोष्टीस चालना देऊन हिंदुजगताची लोकांना माहिती करून द्यावी. या शिरगणतीत बरोबर माहिती नि ती बिनचूक रीतीने लिहिली गेली नाही तर हिंदुमात्राची हानी कशी होईल याची पूर्ण जाणीव प्रत्येक हिंदुमात्रास करून देणे अगत्याचे आहे आणि ही गोष्ट हिंदू महासभेने पुढाकार घेऊनच केली पाहिजे. प्रांतिक, जिल्हावार तसेच स्थानिक सभांच्या शाखांनी देशव्यापी चळवळ ताबडतोब सुरू करून हिंदुमात्राची शिरगणती नोंदवून मुसलमानांची कारवाई हाणून पाडावी. मुसलमान आपली संख्या या शिरगणतीत फुलवून दाखविण्याचा संभव असल्याने ही त्यांची कारवाई वरील संस्थांनी हाणून पाडणे फलदायी ठरेल. केवळ आपली शिरगणती अगदी बरोबर झाली एवढ्यानेच भागणार नाही, तर हिंदुमात्राचे हित सर्वस्वी सुरक्षित राहावे असे वाटत असेल तर त्यांच्यासंबंधी सर्व प्रकारची माहिती बिनचूक नोंदली जाणे अत्यावश्यक आहे. मग ही माहिती राजकीय किंवा सामाजिक वा धार्मिक वा आर्थिक वा अैतिहासिक असो.

वरील काम अत्यंत व्यवस्थित नि पद्धतशीर होण्यासाठी प्रांतिक, जिल्हावारीने स्थानिक संस्थांना मार्गदर्शन करण्यासाठी पुढीलप्रमाणे एक योजना आखण्यात आली आहे. ती सर्व संस्थांनी शक्य तितक्या तातडीने अमलात आणावी.

१) प्रांतिक हिंदू सभेने प्रथम दर्शनी ठिकठिकाणच्या प्रांतिक शिरगणतीच्या अधिक्षकांशी पत्रव्यवहार चालू करावा. हीच गोष्ट जिल्हा सभा नि स्थानिक सभांनी कार्यवाहित आणावी. या कामी ठिकठिकाणच्या हिंदू सभांच्या शाखांनी नि हिंदू महासभेच्या सदस्यांनी शिरगणती अधिकाऱ्यांना सर्वतोपरी सहकार्य मिळेल असे आश्वासन द्यावे. स्थानिक शाखांनी प्रत्येक शिरगणती अधिकाऱ्यासमवेत एकेक सदस्य पाठवून हिंदूंची शिरगणती बरोबर होते की नाही हे पहावे.

२) हिंदू महासभेने ठिकठिकाणच्या हिंदुत्वनिष्ठांशी आणि तत्सम संस्थांशी सहकार्य करून हे काम साधावे. आर्यसमाज, सनातन धर्मसभा, जैन संस्था आदी संस्थांशी सहकार्य करून अगर शक्य असेल तर या सर्वांची मिळून एकच समिती स्थापून तिच्याकरवी हे काम करावे.

३) जो मनुष्य आपल्यास हिंदू म्हणून समजतो त्या प्रत्येकाने आपण हिंदू आहोत अशी नोंद करावी. प्रांतिक नि जिल्हासभेच्या अधिकाऱ्यांनी जो मनुष्य स्वतःस हिंदू म्हणून म्हणवितो त्याची तशी नोंद झाली आहे की नाही, याची शहानिशा शिरगणतीच्या अधिकाऱ्याशी बोलून करावी जी जात हिंदू-

इतर आहे पण जिने हिंदू धर्माचा स्वीकार केला आहे त्या जातीतील घटकाने आपल्यास हिंदू म्हणवून घेतले तर त्याची तशी सरकारच्या लेखी नोंद व्हावी अशा आशयाचा निर्णय मद्रास उच्च न्यायालयाने १९३१साली दिलेला आहे ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. एखाद्या स्थानिक शिरगणती अधिकाऱ्याने तसे करण्यास नकार दिला तर त्यासंबंधी ताबडतोब प्रांतिक शिरगणती अधिक्षकांकडे गाऱ्हाणे नोंदवावे. जो समाज आज आपल्यास हिंदू म्हणवितो, तो मागील शिरगणतीत तसा नोंदला गेला नसला तरी आज त्याच्या इच्छेनुरूप हिंदू म्हणून नोंदवावा. ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. या संबंधात अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करून ही गोष्ट आधीच निश्चित करून घ्यावी.

४) आपल्याकडील कड्याकपारीत राहणारे संथल, गोंड, भिल्ल आदी लोक आहेत. ते खरोखर हिंदू असूनही त्यांचा अंतर्भाव 'ॲनिमिस्ट' आणि 'ट्रायबल'मध्ये होत आहे. या लोकांच्या अज्ञानामुळे नि काही लोकांच्या कारवाईमुळे गेल्या शिरगणतीत त्यांची नोंद हिंदू म्हणून झाली नाही! म्हणून ह्यावेळी तरी हिंदू महासभा कार्यकर्त्यांनी अत्यंत दक्ष राहून वरील लोकांची नोंद हिंदू म्हणूनच करवून घेण्यास चुकू नये. छोटा नागपूर नि बिहार या भागात ज्या वन्य टोळया आहेत त्या आपल्यास हिंदुधर्मीय असे म्हणवितात. परंतु तिकडील भागातील मिशनऱ्यांनी काही लटपट करून या लोकांच्या नावापुढे धर्माचा स्तंभ कोरा ठेवावा अशी अधिकाऱ्यांस गळ घातली नि ती फलद्रूपही झाली आहे! तरी ही चूक सुधारण्याची दक्षता घ्यावी.

रांची नि इतर भागातील हिंदू महासभावाल्यांच्या लक्षात ही गोष्ट आल्यापासून ते जागृत झाले आहेत, ही अत्यंत समाधानाची गोष्ट होय. या संबंधात त्यांनी शिष्टमंडळे नेमून वरिष्ठांशी गाठभेट घेऊन या अनिष्ट गोष्टीविषयी निषेधही प्रकट केला. या संबंधात रानटी टोळयांच्या जमातीनेही सभा भरवून मिशनऱ्यांच्या कारवाईवर प्रकाश पाडून त्यांचा प्रकट निषेध केला. बैतूल येथील हिंदू विधायक श्री. गोठी यांनी गोंड ठाकराची हिंदू म्हणून नोंद करण्याचा नि करविण्याचा निर्भय रीतीने प्रचार चालविला आहे. यासाठी ते स्तुतीस पात्र आहेत.

वरील गोष्टीपासून धडा घेऊन ठिक-ठिकाणच्या संस्थांनी आपापल्या क्षेत्रात अशा टोळयांची वास्तपुस्त करून त्यांची माहिती ताबडतोब गोळा करण्याची खटपट करावी आणि यापैकी कोणती जमात गेल्या शिरगणतीत हिंदू म्हणून नोंदली गेली नाही याचीही माहिती एकत्र करावी. खरी माहिती मिळताच हिंदू सभांच्या सदस्यांची अधिकाऱ्यांची ताबडतोब गाठभेट घेऊन त्यांच्या निदर्शनास झालेला अन्याय आणावा. हिंदू सभेच्या चालकांनी अशा टोळयांतून जागृती करण्यासाठी कथेकरी, पुराणिक पाठवून त्यांच्यामधील धार्मिक वृत्ती जागृत करून आपण सर्व हिंदूच आहोत यासाठी त्यांची मने वळविण्याचा शक्यतो लवकर प्रयत्न करावा जर एखाद्या अधिकाऱ्याने जाणून बुजून त्यांच्या धर्माची वास्तपुस्त करण्याचे टाळले तर त्या जमातीने आपण हिंदू असल्याची नोंद करण्याचा आग्रहही करावा अशीही त्यांना शिकवणूक द्यावी. या अज्ञ लोकांना न्याय मिळतो की नाही हे पाहण्यासाठी शिरगणतीच्या दिवशी अधिकाऱ्यासमवेत पुढारी नि तज्ज्ञ स्वयंसेवकांनी जावे. वर निर्दिष्ट केलेल्या जमातीची योग्य रीतीने समजूत घालून त्यांचे मन वळवून योग्य ती नोंद सरकारी प्रलेखात होईल याची काळजी घेतली जावी. अशा लोकांची संख्या साधारणतः एक कोटी आहे. पण

आतापर्यंत झालेल्या नि दाखविण्यात आलेल्या निष्काळजीपणामुळे आपली हानी अतिशय झाली आहे. परंतु यावेळी आपण जागरूक राहून त्याची नोंद करविली तर हिंदू समाजाच्या दृष्टीने आपल्यास या गोष्टीचे फार महत्त्व आहे, हे सांगण्याची काही आवश्यकता नाही.

५) जैन, आर्यसमाजी नि अतरांनी यासंबंधी विचार करताना पुढील व्याख्या ध्यानात ठेवून वागावे.

**।। असिधुसिधुपर्यंता यस्य भारतभूमिका ।।**
**।। पितृभूः पुण्यभूश्चैव सवै हिंदुरिती स्मृतः ।।**

वर दिलेल्या श्लोकात जी व्याख्या दिली आहे, तिचे मर्म लक्षात घेऊन जैन, आर्यसमाजी, देवसमाजी, शीख आदी समाजांची नोंद हिंदू म्हणूनच करण्यास काही अडथळा येणार नाही. देशातील निकट सान्निध्याने, सहवासाने, साहचर्याने, संस्कृतीने नि बंधुभावनेने पाहिल्यास हे समाज याच पितृभूत नि पुण्यभूत राहत असल्याने सर्वांची नोंद हिंदू म्हणून झाल्यास त्यात वावगे ते काय आहे? आमचा धर्म जरी एक असला तरी निरनिराळ्या पंथाचे लोक आपल्यात आहेत. तथापि वैदिक, अवैदिक असा भेदभाव न ठेवता एकराष्ट्रीयत्वाच्या प्रेममय भावनेने आपण अहिंदूंच्या कारवायांना तोंड देण्यास सुसज्ज राहिले पाहिजे. देशातील जे अहिंदू आहेत, त्यांचा धर्म निराळा, जात निराळी नि जे हिंदूंशी समानतेने वागण्यास जे उदासीन आहेत अशा लोकांशी सामना देताना आपण सर्वांनी एकत्र आले पाहिजे, यातच हित आहे.

जैन, आर्यसमाज, शीख नि अन्य तत्सम बंधू यांना आपला धर्म सनातन हिंदू धर्माहून वेगळा आहे असे म्हणता येणार नाही आणि त्याची नोंद करताना अडचण येण्याचा थोडासा संभव आहे. परंतु ही अडचण दूर होण्यासारखी आहे. आर्यसमाजाने धर्माच्या स्तंभात वैदिक धर्मानुयायी असे नमूद करावे. शीखांनीही शीख मतानुयायी असे लिहिण्यास प्रत्यवाय नाही. परंतु जातीवंश या स्तंभात वर लिहिलेल्या श्लोकाद्वारे प्रत्येक हिंदू संस्कृतीच्या चाहत्यांनी आपल्यास हिंदू म्हणूनच नोंदविण्यास विसरू नये. जैनांनी, आर्यांनी, शीखांनी नि लिंगायतांनी आपल्यापुढे कंसात 'हिंदू' अशी नोंद करण्यास विसरू नये. या व्यवस्थेप्रमाणे नोंद झाल्यास प्रत्येकास आपली धर्ममते वेगळी दाखविता येऊनही सनातन हिंदू धर्माच्या व्यापक क्षेत्राखाली समाविष्ट होण्याचा मान घेता येईल आणि असे झाल्यास आपली लोकसंख्या इतर अहिंदूंच्या मानाने किती मोठी आहे, याचा तुलनात्मकदृष्ट्या अभ्यास करण्यास सोपे जाईल.

हिंदुसभांनी आपापल्या क्षेत्रात ज्यांच्यावर शिरगणतीचे काम सोपविले असेल, त्यांनी या प्रश्नांचा सर्व बाजूंनी विचार केला पाहिजे. 'हिंदुत्व' पुस्तक वाचल्यानंतर या प्रश्नांची यथार्थ कल्पना येईल. ते पुस्तक अंग्रजी मराठी नि हिंदी भाषांत प्रसिद्ध झाले आहे. त्यावरून जैन, देवसमाजी, आर्यसमाजी, इतर सनातनी नसलेले अथवा अवैदिक हिंदुबंधू यांचे यथार्थरीत्या समाधान करून देता येईल. त्यांचे हिंदू म्हणून नावे नोंदवून घेण्यास मन वळविता येईल. वैदिक पंथापेक्षा 'हिंदुजगत' फार मोठे आहे.

त्यामध्ये ऐतिहासिक, भाषिक, सांस्कृतिक इत्यादी सर्वांचा समावेश होतो नि त्यांचे ते राष्ट्र होय. जसे जर्मन, जपानी, अंग्लीश इत्यादी.

६) ज्या भागात मुस्लिम स्त्रिया गोषा पाळतात त्या विभागात हिंदी, ख्रिस्ती अगर युरोपियन स्त्रिया यांना गणना करण्यास अथवा देखरेख करण्यास पाठविणे कसे अष्ट नि आवश्यक आहे ही गोष्ट तेथील अधिकाऱ्यांना पटवून द्यावी. मुसलमानी गोषातील स्त्रियांची संख्या बरोबर रीतीने नमूद केली जात नाही. ती वाढवून सांगितली जाते अशा अनेक तक्रारी गेल्या शिरगणतीत झाल्या असल्याने ही सावधगिरी घेणे अत्यावश्यक आहे. प्रांतिक सभांनी प्रांतिक अधिकाऱ्यांना भेटून त्यांना ही अडचण सांगून हिंदी, ख्रिस्ती अथवा युरोपियन स्त्रियांना गणना करण्याच्या नि देखरेख करण्याच्या कामी नेमू असे आश्वासन घ्यावे नि त्याची कसोशीने बजावणी होते की नाही ते जरूर पाहावे.

७) ज्यांचा जातिभेदावर विश्वास नसेल अशांनी आपली जात नोंदवावी, अशी सरकारची सक्ती नाही. केवळ 'हिंदू' म्हणून नोंद केल्यास चालते. कोणीतरी शिरगणतीच्या प्रमुख अधिकाऱ्यांपर्यंत यासंबंधी आगाऊच दाद लावून घेणे अगत्याचे आहे.

८) हिंदू सभांनी स्थानिक शिरगणतीच्या अधिकाऱ्यांकडून नमुन्याची पत्रके मिळवून त्याप्रमाणे नमुने कसे भरावे, याची माहिती द्यावी. प्रचारकांनी खेड्यातून विशेषतः अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या भागातल्या लोकांना हिंदू म्हणून कशी नि कोठे नोंद करावी, याची माहिती करून द्यावी.

९) या सूचना वाचताच हिंदू सभांनी शिरगणतीसंबंधी प्रचारास प्रारंभ करावा. नगरग्रामातून प्रकट सभा भरवाव्या. स्थानिक पत्रातून लेख प्रसिद्धावे. लोकांच्या नि सरकारच्यापुढे आपली गाऱ्हाणी मांडून नोंदणीसंबंधी होत असलेला अन्याय दूर होईल असे प्रयत्न करावेत.

प्रांतिक नि जिल्हासभांनी या सूचनांच्या सहस्रावधी प्रती आणि इतर माहिती नि सूचनापत्रे छापवून वाटावीत. मुख्य कार्यालयातून शिरगणतीसंबंधी वाङ्मय पुरविणे कठीण असल्याने ही सूचना केली आहे.

१०) जिल्हा सभांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की आपल्या सर्व अडचणी प्रांतिक शाखेकडे अथवा मुख्य कार्यालयाकडे कळविल्याने त्यांचा कार्यभाग संपत नाही. कामाचा मुख्य भार नि स्थानिक तक्रारी निवारण करण्याचे दायित्व जिल्हा सभांवर आहे. जिल्हा सभांनी कर्तव्यदक्ष राहून आपआपल्या जिल्ह्यात उद्भवणाऱ्या सर्व तक्रारी आपल्या प्रयत्नाने दूर केल्या आणि हिंदूंची शिरगणती बरोबर नोंदविण्याची दक्षता घेतली तर येत्या शिरगणतीसंबंधी जे प्रचंड कार्य उभे आहे ते यशस्वीपणे पार पडेल. जिल्हा सभा कार्यकारी नसल्या तर प्रांतिक सभा अथवा केंद्र महासभा अवयव नसलेल्या धडाप्रमाणे होतील. एवढ्यासाठी प्रत्येक हिंदू सभेने आपल्या क्षेत्रापुरते तरी लहानसहान गोष्टींसाठी अतरांवर अवलंबून न राहता स्वतः पुढे होऊन परिणामकारकपणे काम केले पाहिजे.

राष्ट्रासाठी बंदीगृहात जाण्यापासून झुंजण्यापर्यंत पडेल ते काम करण्याचा प्रसंग असेल तेव्हा वाजत गाजत त्या कार्यात पडले पाहिजे. परंतु कंटाळवाणे एकाकी राष्ट्राच्या हिताचे विधायक काम करणे हे काही कमी शौर्याचे नाही. यासाठी हिंदुध्वजाखाली अखिल भारतातून शेवटी स्वयंसेवक एकत्र होऊन, त्यांनी घरोघर हिडून त्यांच्यात हिंदुत्वाची जागृती केली पाहिजे. भिल्ल, संथाळ, गोंड, उराव, इतर डोंगरी लोक हे सर्व हिंदू आहेत, अशी भावना त्यांच्यामध्ये उत्पन्न करून देऊन नेटाने हे कार्य केले पाहिजे. हिंदूंचे संख्याबल नि इतर माहिती येत्या शिरगणतीत खरीखुरी नोंदली गेली पाहिजे.

वरील पद्धतीने काम केल्याने अखिल हिंदू समाजाची संघटना करण्याचे जे भव्य नि व्यापक काम आपणास करावयाचे आहे; त्याला या कार्यांचा अत्यंत उपयोग आहे, ही गोष्ट ध्यानी धरली पाहिजे."

## डॉ. जयकर यांस पत्र

नोव्हेंबर, १९४० मध्ये सावरकर-जयकर भेट झाली. त्याला अनुसरून दिनांक ७ डिसेंबर रोजी सावरकरांनी डॉ. जयकर यांना एक पत्र पाठविले ते पत्र असेः

“मी अत्यंत घाईने आपल्या सहज संदर्भासाठी हिंदू सभेच्या वतीने सांगावयाची महत्त्वाची विधाने येथे लिहीत आहे. (१) कोणत्याही वाटाघाटीच्या किवा संधीच्या वेळी जेव्हा मुस्लिम लीगला मुसलमानांची प्रतिनिधी म्हणून निमंत्रले जाईल तेव्हा हिंदू महासभेला हिंदूंची प्रतिनिधी म्हणून निमंत्रिले पाहिजे. (२) काँग्रेस आणि मुस्लिम लीगमधील संधी हा त्या दोन संस्थांमधील संधी मानला जावा. जोवर त्या संधीला हिंदू सभेची संमती घेतली जात नाही तोवर तो हिंदू-मुसलमानातील संधी समजला जाऊ नये. (३) काँग्रेस ही एक तर संपूर्ण देशाचे प्रतिनिधित्व करते किवा करीत नाही. जर ती सबंध देशाची प्रतिनिधी असेल तर ती मुस्लिम लीगला मुसलमानांची प्रतिनिधी म्हणून मान्यता देऊ शकणार नाही आणि तिच्यासमवेत समान पातळीवर संधीही करू शकणार नाही आणि जर काँग्रेस सर्व देशाची प्रतिनिधी नसेल आणि मुस्लिम लीगला मुसलमानांचे प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार ती मान्य करीत असेल तर काँग्रेसने मान्य करावे की ती हिंदू म्हणून हिंदूंचे प्रतिनिधित्व करू शकत नाही. तिने हिंदूंचे प्रतिनिधी म्हणून हिंदू सभेलासुद्धा मान्यता द्यावी. (४) वस्तुस्थिती अशी आहे की सध्या देशात तीन संस्था आहेत. हिंदूंचे हित पाहणारी हिंदू महासभा, मुसलमानांचे हित जपणारी मुस्लिम लीग आणि केवळ काँग्रेसवाल्यांचे हितसंबंध जपणारी काँग्रेस. सध्या काँग्रेस हा केवळ एक मोठा पक्ष आहे. ती काही लोकसभा नव्हे. (५) यामुळे लीग आणि काँग्रेस यामधील संधी हा हिंदूंवर हिंदू म्हणून बंधनकारक होऊ शकत नाही. जेव्हा काँग्रेस मुसलमानांचे प्रतिनिधी म्हणून मुस्लिम लीगला मान्यता देते तेव्हाच ती हिंदूंच्या वतीने बोलण्याचा अधिकार गमविते. हे लक्षात घेऊन आपण शासकांच्या मनावर ठसवावे की जर वाटाघाटी चालू करण्यात आल्या तर त्या केवळ काँग्रेस नि लीगपुरत्या मर्यादित न राहता त्यामध्ये समपातळीवर हिंदू महासभेचाही समावेश केला जावा. कार्यकारी मंडळ किंवा युद्धसमित्या यावर तिघांनाही - हिंदू महासभा, मुस्लिम लीग आणि काँग्रेस - प्रतिनिधित्व मिळावे. (६) जर राष्ट्रीय कार्यकारी मंडळात काँग्रेस सहभागी होणार नसेल तर जे पक्ष सहकार्यासाठी सिद्ध असतील त्यांना घेऊन राष्ट्रीय कार्यकारी मंडळ बनवावे. ज्या मंत्रिमंडळात किंवा परिषदेत काँग्रेस नाही ती सभा राष्ट्रीय होत नाही ही समजूत भ्रामक आहे. ही भ्रामक समजूत आपण दूर केली पाहिजे आणि काँग्रेसवाचून आपण वाटाघाटी करू शकतो तसेच हिंदू महासभाही हिंदूंचे प्रतिनिधित्व करणारी संस्था आहे हे शासनाच्या मनावर ठसविले पाहिजे. आपण सतत सांगितले पाहिजे की राष्ट्रीय वाटाघाटीच्या वेळी काँग्रेस, मुस्लिम लीग नि हिंदू महासभा या तिन्ही संस्थांनाही बोलाविले पाहिजे. केवळ हिंदू नि मुसलमान यांच्यामधील संधीचा विचार करताना केवळ दोनच पक्ष असले पाहिजेत; ते म्हणजे हिंदू महासभा आणि मुस्लिम लीग अथवा दुसरा एखादा मुसलमान पक्ष. हिंदू-मुसलमान तडजोडीत काँग्रेस, काँग्रेस म्हणून भाग घेऊच शकत नाही. कारण ती कोणाचेही जातीय हित संभाळू शकत नाही.”

## मदुरा ठरावांचे स्पष्टीकरण

काही कॉंग्रेसनिष्ठ मराठी साप्ताहिकांनी सावरकरांवर अनेक आक्षेप घेतले. त्या आक्षेपांना उत्तर देणारे आणि मदुरेच्या ठरावाचे, त्याच्या दोन्ही बाजूंचे स्पष्टीकरण करणारे एक पत्रक ५ जानेवारी १९४१ रोजी सावरकरांनी प्रसिद्ध केले. ते असेः

“मदुरा येथे भरलेल्या हिंदू सभेच्या अधिवेशनात ‘युद्ध-परिस्थिती’ आणि ‘ताबडतोबीचा कार्यक्रम’ याविषयी जे दोन मुख्य ठराव संमत झाले, त्यासंबंधी कदाचित अपसमज उत्पन्न होण्याचा संभव आहे,

तो न व्हावा म्हणून लोकांनी नि विशेषतः हिंदू संघटनवाल्यांनी पुढील गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे.

१) पहिल्या 'युद्ध-परिस्थिती'च्या ठरावात हिंदू महासभेच्या प्रमुख मागण्या नमूद केल्या असून त्यात म्हटले आहे की जर सरकारने लोकांचे समाधान होईल अशा रीतीने या मागण्या ३१ मार्च १९४१ पर्यंत मान्य केल्या नाहीत तर त्या मान्य करावयास लावण्याकरिता हिंदू महासभेला प्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ सुरू करावी लागेल. वरील अवधी संपल्यावरच अर्थात ही प्रतिकाराची चळवळ कोणत्या रीतीने करावयाची हे निश्चित ठरविले जाईल. परंतु माझ्या अध्यक्षीय भाषणात स्पष्टपणे सुचविलेल्या 'ताबडतोबीच्या कार्यक्रमाशी' त्याचा विरोध येणार नाही. या कार्यक्रमासंबंधीचा दुसरा ठराव मदुरेच्या अधिवेशनात एकमताने संमत झाला आहे हेही लक्षात ठेवले पाहिजे. त्या ठरावात सध्याच्या युद्धपरिस्थितीचा पूर्ण लाभ घेऊन हिंदुस्थानची सैनिकी प्रगती नि औद्योगिक उन्नती घडवून आणावी असे स्पष्ट म्हटले आहे. भविष्यकाळात नवीन परिस्थिती उत्पन्न होऊन सध्याच्या कार्यक्रमापेक्षा दुसऱ्या कार्यक्रमाने हिंदूंचा लाभ अधिक होईल असे वाटेल तरच सध्याचे धोरण पालटले जाईल. पण हा काळ केव्हा येईल हे आज सांगणे शक्य नाही.

२) म्हणून पुढेमागे हिंदू सभेला प्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ चालू करावी लागली तरी अखिल भारतातील हिंदूंनी पुढील प्रयत्न चालूच ठेवावे. (अ) भूदल, नौदल नि वायुदल यांत प्रवेश करणे. (ब) युद्धसाहित्याच्या निर्मितीसंबंधाने आणि त्या संबंधीच्या यंत्रविद्येची माहिती घेण्यासंबंधाने जी जी संधी येईल तिचा उपयोग करणे. (क) शाळा नि महाशाळा यांच्यामधून सैनिकी शिक्षण सक्तीचे करण्याचा प्रयत्न करणे. (ड) नागरिक संरक्षण दल नि वायुरक्षण दल यात शिरणे. अट एकच की, या सर्व संघटनेचा कोणत्याही स्वदेशप्रेमी राजकीय पक्षाविरूद्ध अथवा हिंदूंच्या हिताविरूद्ध उपयोग केला जाऊ देता कामा नये.

३) नवीन उद्योगधंदे काढणे अथवा परदेशी मालावर बहिष्कार घालणे. यासंबंधी एवढेच म्हणावयाचे की, देशाच्या औद्योगिकीकरणाच्या दृष्टीने त्यांची आवश्यकता असल्याने ती चळवळ चालविली पाहिजे.

४) हिंदू महासभेने जे दोन ठराव संमत केले त्यासंबंधी हिंदू महासभेचे धोरण कोणते आहे हे वरील स्पष्टीकरणाने सरकारलासुद्धा नीट कळेल अशी अपेक्षा आहे."

## लिंगायत समाजाला आवाहन

येत्या शिरगणातील आपली जात नि समाज लिंगायत (हिंदू) अशी नोंदवावी असे देशातील लिगायत समाजाला आव्हानात्मक चिरंतर महत्त्वाचे पत्रक सावरकरांनी जानेवारी १९४१ मध्ये काढले. ते असेः

"(१) जे लिंगायत बंधू शिरगणतीत धर्म आणि जाती या दोन्ही विभागांत लिंगायत एवढीच नोंद करू अच्छितात आणि हिंदू म्हणून नोंद मुळीच करू अच्छित नाहीत त्यांचे मुख्य हेतू दोन असतात, एक तात्त्विक नि दुसरा व्यावहारिक.

पैकी तात्त्विक हेतू असा की लिंगायत धर्म हा सनातन हिंदू धर्माहून एक अगदी स्वतंत्र धर्म आहे हा त्यांचा सिद्धान्त नोंदला जावा. यास्तव 'धर्म' ह्या नावाच्या शिरगणतीतील स्तंभामध्ये लिंगायत धर्म अतकेच नोंदवावे. या मताच्या लिंगायत बंधूंनी 'धर्म' ह्या स्तंभात तशीच नोंद करण्यास माझा कोणताही विरोध नाही. त्यायोगे त्यांची तात्त्विक अडचणही नाहीशी होईल.

दुसरा व्यावहारिक हेतू - तो असा की जात किंवा समाज (Community) या विभागांतही लिंगायत असेच नोंदवून दिल्याने लिंगायत समाजाची पृथक संख्या किती ते निश्चितपणे मोजता यावे आणि लिंगायतांचे हिंदू समाजाहून पृथक असे जे काही सामाजिक वा राजकीय हितसंबंध असतील त्यांचे रक्षणासाठी काही राखीव जागा विधिमंडळात मागता याव्या. मी हे दोन्ही अंतस्थ हेतू स्पष्टपणे मांडत आहे. कारण लिंगायत समाजाच्या एखाद्या पक्षाने हे हेतू मनात धरले तरी माझा त्यास फारसा विरोध होणार नाही. पण हे दोन्ही व्यावहारिक हेतूसुद्धा जात किंवा समाज ह्या स्तंभाखालीदेखील लिंगायत असे लिहून जर कंसात (हिंदू) हा शब्द घातला तरीसुद्धा सर्वतोपरी साध्य होणार आहेत.

कंसात हा हिंदू शब्द जो घालावयाचा तो सुद्धा हिंदू शब्दाची महासभेने मान्य केलेली जी व्यापक व्याख्या तिच्यात दिलेल्या हिंदू ह्या शब्दाच्या अर्थाप्रमाणेच काय तो घालावयाचा, म्हणज त्यात कोणत्याही उच्चनीचपणाची आडकाठी संभवणार नाही; संभवणे शक्यच नाही. ज्याची ज्याची पितृभू आणि पुण्यभू आसिंधुसिंधु भारतभू आहे तो हिंदू. लिंगायतांची पितृभू भारतवर्ष आहेच आहे आणि त्यांचे धर्मगुरू श्रीबसवेश्वर महाराजांपर्यत परंपरेने याच भारतभूमीत निवसले असल्याने आणि म्हणूनच त्यांची तीर्थे, क्षेत्रे, धर्मग्रंथ, धर्मभाषा सर्वतोपरी भारतीयच असल्याने त्यांची पुण्यभू (Holy Land) ही भारतवर्षच आहे. तेव्हा माझी विनंती या पक्षाच्या लिंगायत बंधूंना अशी आहे की त्यांनी खालीलप्रमाणे नोंद करावी. धर्म - लिंगायत, जात नि समाज - लिंगायत (हिंदू).

म्हणजे अशी नोंद केली असता लिंगायतांतील ज्या बंधूंचा लिंगायत धर्म हा स्वतंत्र आहे असा सिद्धान्त आहे त्यांचा तो तात्त्विक हेतूही पूर्ण होईल. दुसरे त्यांचा जो व्यावहारिक हेतू की लिंगायत समाज संख्येच्या दृष्टीने स्वतंत्र दाखविला जावा तोही पूर्ण होईल आणि हे दोन्ही हेतू साधूनही आपण सर्वजण हिंदुत्वाच्या विशाल व्याख्येप्रमाणे अठ्ठावीस कोटीच्या महान राष्ट्र-संस्थेत एकजीव झालेलो आहोत, हेही कंसामध्ये हिंदू हा एक शब्द घातल्याने सिद्ध होईल.

आपण हे ध्यानात ठेवले पाहिजे की आपले शत्रू 'फोडा नि झोडा' ह्या नीतीचा अवलंब करून आपल्या हिंदू राष्ट्राचे बळ उणे करतात असा आपणच नेहमी आक्षेप घेत असतो. पण त्यांना तसे करण्याची संधी आपणच स्वतःच्या परंपरागत अैक्य फोडून तुकडे करीत जर देत गेलो तर त्यांनी तरी तसे का न करावे? मागे झाले ते झाले. परंतु आता यापुढे तरी आपले इतर योग्य ते मतभेद सांभाळूनही हिंदुत्वाच्या वरील समावेशक व्याख्येच्या अर्थी 'हिंदू' ह्या एकाच शब्दाच्या सुविशाल ध्वजाखाली आपले अठ्ठावीस कोटींचे एकजीव राष्ट्र उभारूया. प्रचंड समष्टीची हानी तर होतेच होते पण फुटलेल्या व्यष्टीचे बळ त्याहूनही अत्यंत तुच्छ होते हे काही सांगावयास नको. शिरगणतीतील हे शेवटचे विधेय विशेषतः विवेचून लिंगायत बंधूंनी कंसामध्ये तरी 'हिंदू' हा शब्द अवश्य नोंदावा. यातच लिंगायतांचे नि लिंगायतेतर हिंदूंचे कल्याण आहे.

(२) वरील विनंती लिंगायत बंधूंतील ज्या पक्षाला लिंगायत धर्म सर्वतोपरी स्वतंत्र आहे असे वाटते त्यांना केली. परंतु लिंगायतांमध्ये दुसरा जो पक्ष आहे तो लिंगायत धर्मास वीरशैव धर्म, शैवागम या योग्य दृष्टीने वैदिकच मानतो. निदान हिंदू धर्माहून स्वतंत्र मानीतच नाही. जैनबंधूमध्ये नि आर्यसमाजामध्येही स्वतःस हिंदुत्वाच्या माझ्या व्याख्येप्रमाणे सर्वतोपरी हिंदू मानणारा फार मोठा वर्ग आहेच आणि ते शिरगणतीतील

समाज ह्या विभागात स्वतःस हिंदू म्हणूनच नोंदविणार आहेत. लिंगायत बंधूं पैकी ह्या दुसऱ्या पक्षाविषयी काही लिहिणेच नको. हिंदू राष्ट्राचे ते अविभाज्य घटक आहेतच आहेत आणि ते त्यांची नोंद लिंगायत - हिंदू अशीच करतील.

## तारा करत न बसता प्रत्यक्ष लढा !

जबलपूर येथील मुस्लिम - दंगा पीडित हिंदूंच्या सहाय्यार्थ याचना करणाऱ्या तारेला सावरकरांनी १२ फेब्रुवारी १९४१ रोजी एक क्रांतिकारक उत्तर पाठविले. त्या पत्रकात ते लिहितातः

"जबलपूरमध्ये सहस्रावधी हिंदू राहतात. त्या माझ्या हिंदुबांधवांना मला असे निक्षून सांगावयाचे आहे की त्यांनी आपले स्वतःचे रक्षण नागरिक निर्बंधानुसार मिळणाऱ्या सर्व अधिकारांचा पुरेपुर लाभ घेऊन केले पाहिजे. या दंग्याच्या रोगावर तोच एकमेव रामबाण उपाय आहे. चौकशी समिती आणि प्रश्नोत्तरे यातून काय निर्माण होणार ? अत्याचारांनी पीडित झालेल्या तुम्हास सत्य काय आहे हे माहितीच आहे. सरकार आणि हल्ला करणारे अत्याचारी या दोघांनाही सत्य काय ते माहीत आहे. अशा प्रसंगी नंतरच्या चौकशीवर विश्वासून बसणे भ्याडपणाचे आहे.

या आठवड्यात सुमारे २० ठिकाणांहून दंग्याच्या हकिकती माझ्याकडे आल्या आहेत. केवळ वत्त व्य प्रकाशित करून किंवा सरकारकडे तारा पाठवून या गोष्टी थांबणाऱ्या नाहीत. वरीलप्रमाणे लिहिलेले पाहून कोणास आश्चर्य वाटेल, परंतु सत्य गोष्ट अशीच आहे.

सुमारे शंभर शूर हिंदू तरुण आपल्या बांधवांच्या रक्षणार्थ आपले सर्वस्व समर्पिण्यास सिदध होतील तर आक्रमकाच्या हल्ल्यांच्या लाखो चौकशा नि सरकारकडे पाठविण्यात येणाऱ्या शेकडो तारा यांच्यापेक्षा त्याचा अधिक उपयोग होऊ शकेल!

सर्वात आश्चर्याची गोष्ट ही की आम्ही वेळेवर आक्रमकाचा प्रतिकार करीत नाही. विरोध प्रदर्शक सभा किंवा प्रस्ताव याकडे उगीच फाजील लक्ष पुरवित. आता यापुढे तरी स्थानिक आक्रमणाचा प्रतिकार ताबडतोब आपल्या शक्तीच्या जोरावर केला पाहिजे. बाहेरील साहाय्याची अपेक्षा करणे व्यर्थ होय. प्रत्येक ठिकाणी हिंदूंनी संघटित झाले पाहिजे. एकमेकांनी एकमेकांना साहाय्य करण्यास शिकले पाहिजे. त्याचप्रमाणे अशा धोक्याच्या वेळी सर्वांनी एके ठिकाणी जमले पाहिजे. या दंग्यांसंबंधी असे म्हटले जाते की, मुसलमानांनी पूर्वसंकल्पाप्रमाणे दंगा केला. मला असे विचारावयाचे आहे की

हिंदूंनीही आत्मरक्षणाचा उपाय आधीच का योजला नाही? हिंदू आक्रमणाच्या प्रतिकारार्थ सज्ज का राहिले नाहीत? मोहरम आणि अशा प्रकारचे हल्ले प्रतिवर्षी होत नाहीत का? गेल्या हजार वर्षांचा अतिहास हिंदूंना माहीत नाही काय? मग अशा ठिकाणी आम्ही सिद्धतेवाचून का जातो आणि संकटात का पडतो हेच मला कळत नाही! या चुका आम्ही जोपर्यंत सुधारीत नाही तोपर्यंत असले दंगेही थांबणार नाहीत. वरील गोष्टी जर जबलपूरच्या हिंदूंनी ध्यानी आणल्या तर हा दंगा जबलपुरातील शेवटचाच दंगा समजला जाईल."

## बॅ. जमनादास मेहता यांना मते द्या

१० मार्च १९४१ रोजी होणाऱ्या निवडणुकीत बॅ. जमनादास मेहता यांना आपली दोन्ही मते द्यावीत, असे मुंबई प्रांताच्या मध्यभागातील मध्यवर्ती विधानसभेच्या मतदारांना आवाहन करणारे एक पत्रक सावरकर यांनी काढले. त्याचा महत्त्वाचा भाग असाः

"हिंदूंचे न्याय्य अधिकार संरक्षिण्याच्या कामी काँग्रेस तिकिटावर उभ्या असलेल्या कोणत्याही इच्छुकाकडून यत्न होणे शक्य नाही. सिंधची विभागणी, जनगणना आदी अनेक प्रश्नी हा अनुभव आला आहे. तरी आता हिंदुत्वाचे आणि हिंदू हिताचे रक्षण करण्याचा अचूक मार्ग म्हणजे जे इच्छुक आम्ही हिंदूंचेच प्रतिनिधी आहो, त्यांच्या हितासाठी आम्ही विधीमंडळात प्रकटपणे झुंजत राहू अशी स्पष्ट प्रतिज्ञा करतील त्यासच हिंदू मतदारांनी निवडून द्यावे हा होय. विद्वत्ता, वक्तृ त्व, अर्थशास्त्र पारंगतता, निर्भयता आणि निस्पृहता इत्यादी लोकप्रतिनिधीला आवश्यक असलेल्या गुणात बॅ. मेहता यांच्या तोलाचा मनुष्य काँग्रेसने उभ्या केलेल्या इच्छुकातच काय पण प्रत्यक्ष विधिसमितीतही शंभरात एखाद-दुसराच आढळेल. यास्तव ठिक - ठिकाणच्या हिंदू सभांनी आपआपल्या गावी, तालुक्यातून अगदी आजपासूनच कामाला लागावे."

## शिरगणती आणि काँग्रेसची विसंगती

मध्यवर्ती विधानसभेची निवडणूक लढवीत असताना सावरकरांनी चिरंतन महत्त्वाच्या शिरगणतीवरही आपले लक्ष ठेवलेच होते. त्यासंबंधात सर्व हिंदू सभांनी जागृत रहावे यासाठी २७ फेब्रुवारी १९४१ रोजी वीर सावरकरांनी एक परिपत्रक काढले. त्याचा सारांश असाः

“हिंदू महासभेने घोषित केल्याप्रमाणे फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात अखिल हिंदुस्थानात शिरगणती सप्ताह उत्साहाने पाळण्यात आला नि गाड्या भरभरून पत्रके प्रसृत करण्यात आली. या कामी हिंदू महासभेबरोबर सनातन सभा, आर्यसमाज नि अन्य हिंदुसंघटन पुरस्कर्त्या संस्थांनी सहकार्य केले. गेल्या शिरगणतीच्या वेळी हिंदुस्थानातील हिंदूंची गणती बरोबर न झाल्यामुळे हिंदुसमाजाची बरीच हानी झाली.

शिरगणतीचा प्रश्न हा जातीय आहे आणि म्हणून काँग्रेस त्याविषयी उदासीन आहे, असे विधान काँग्रेसचे महामंत्री श्री. कृपलानी यांनी केले आहे.

यावरून काँग्रेस हिंदुहितघातक वृत्तीने कशी वागते हे दिसते. हिंदू समाजाच्या शिरगणतीकडे जातीयतेने पाहणारी काँग्रेस बिगर मुसलमान मतदारसंघाचे जातीय (!) स्वरूप घोषित करूनही त्याच मतदारसंघापुढे निवडणुकीसाठी मते मागण्याचा कोडगेपणा भोंदू वैराग्याच्या वृत्तीन दाखवीत आहे! बंगालमध्ये हक साहेबांनी शिरगणतीसंबंधी हिंदुहितविरोधी धोरण स्वीकारले आहे. तथापि शिरगणती हा विषय मध्यवर्ती सरकारच्या अधिकारांतील आहे, हे जाणून बंगालच्या गव्हर्नरने स्वतःच्या देखरेखीखाली बंगाल्यांतील शिरगणतीची व्यवस्था केली पाहिजे.

हिंदुस्थानातील वन्य जाती आदींची नोंद हिंदू म्हणूनच व्हावयास पाहिजे. प्रत्येक हिंदुसंघटकाने पुढील आठवड्यात आपली सारी कार्यशक्ती अखिल हिंदूंची नोंद होण्यासाठी खर्च करणे अगत्याचे आहे.”

## ब्रिटनचा अप्रामाणिकपणा

**२७ फेब्रुवारी १९४१ रोजी सावरकरांनी भारतमंत्र्यांच्या एका घोषणेला उत्तर देणारे पत्रक काढले, त्याचा मथितार्थ असाः**

"भारतमंत्र्यांनी नभोवाणीवरून केलेल्या ताज्या वत्त व्यात त्यांनी ब्रिटिश साम्राज्यातील हिंदुस्थानची समान श्रेणी मान्य केली आहे. परंतु 'युद्ध संपताच त्वरित' किवा 'युद्ध संपल्यानंतर इतक्या अवधीत' असे जे शब्दप्रयोग ते आतापर्यंत करीत असत त्यांना यावेळी पण फाटा दिला आहे.

युद्धारंभी किवा फ्रान्स जर्मनीच्या पायदळी पडला त्यावेळी दिलेली आश्वासने विसरण्याचा उघड उघड प्रयत्न या धोरणावरून दिसतो.

हे भाषण पूर्णपणे प्रतिगामी आहे. आफ्रिकेत मिळालेल्या अर्धवट विजयांचा हा परिणाम असेल काय? असे जर असेल तर त्यापासून घ्यावयाचा बोध भारतीय लोक घेतीलच. अर्धवट विजयाने भारतमंत्र्यांना अतकी विस्मृती आली असेल तर अतिहासाची पुनरावृत्ती होऊन युद्धात संपूर्ण विजय मिळाला तर आतापर्यंतची सगळी वचने कशावरून विसरली जाणार नाहीत? सैनिकीदृष्ट्या हिंदुस्थानचे स्थानमहात्म्य भारतमंत्र्यांनी सांगितले आहे. मदुरेच्या भाषणात मी ते स्पष्ट केलेच असून खुद्ध हिंदुस्थानात कोट्यावधी सैन्य नि सर्व प्रकारचा दारुगोळा सिद्ध होऊ लागल्यावाचून हिंदुस्थानचे रक्षण होणार नाही. हिंदुस्थानच्या एकीच्या अभावावर राजकीय पेचप्रसंगाचे खापर भारतमंत्री फोडतात. पण 'पाकिस्तानची योजना फेटाळा' या मागणीला मान्यता न देण्यात ग्रेटब्रिटन कोणत्याही प्रकारे तर्कशुद्धता दाखवीत नाही किवा एकीच्या आवश्यकतेचाही बकवा करीत नाही. या नकाराच्या मागे शुद्ध अप्रामाणिकपणाच आहे."

## काँग्रेस म्हणजे मुका वकील

१ मार्च १९४१ रोजी सावरकरांनी जम्नादास मेहता यांना निवडून देणे का आवश्यक आहे हे सांगणारे एक पत्रक काढले. त्यातील आशय असा.

“यावेळी हिंदू महासभेच्या वतीने उभ्या असलेल्या मेहतांना दोन्ही मते देणे प्रत्येक हिंदुसंघटकाचे अत्यंत निकडीचे कर्तव्य आहे. ते अशासाठी की जोपर्यंत हिंदू मतदारसंघ काँग्रेस तिकिटावर उभ्या राहिलेल्या अच्छुकांनाच मते देत राहील तोवर हिंदूंच्या वतीने बोलण्याचा अधिकार काँग्रेसलाच आहे असे सरकार मानीत राहणार आणि त्यात सरकारकडे कोणताही दोष न जाता त्या दोषांचे खापर हिंदूंच्याच डोक्यावर फोडले जाईल. परंतु जर सर्व हिंदुत्वनिष्ठांनी एक होऊन हिंदुसंघटन पक्षाचाच इच्छुक यशस्वी केला तर यापुढे काँग्रेसही हिंदुहिताची पायमल्ली करू शकणार नाही. यास्तव या निवडणुकीत ज्या मुख्य प्रश्नांसाठी हिंदुसंघटक पक्ष झुंजत आहे आणि त्याने झुंजले पाहिजे तो प्रश्न दुसरा कोणताही नसून मुख्यत्वे करून काँग्रेस हिंदूंची प्रतिनिधी नाही हे सरकारला नि जनतेला सिद्ध करूनच दाखवायचे.

या निवडणुकीत काँग्रेस ज्या इतर गोष्टी पुढे आणीत आहे त्या फसव्या आहेत. उदाहरणार्थ जनतेस स्वातंत्र्य हवे का पारतंत्र्य हा प्रश्न हे काँग्रेसवाले पुढे ठेवतात. हा प्रश्न मतभेदाचा नाहीच. दोघांनाही पूर्ण स्वातंत्र्य हवे आहे एवढेच नव्हे तर १९२८ साली मद्रासला भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात जेव्हा गांधीजी, राजेंद्रबाबू, पटेल प्रभृतींनी पूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयास ‘पोस्कट’ म्हणून विरोध केला तेव्हा जमनादास मेहतांनीच तो ठराव उचलून धरला होता. काँग्रेसचे दुसरे म्हणणे सध्या एक टप्पा म्हणूनच बॅ. जमनादासांचा पक्ष वसाहतीचे स्वराज्य स्वीकारण्यास सिद्ध आहे. परंतु आपण पहा की काँग्रेस तरी ही जी निवडणूक लढवीत आहे ती ब्रिटिश नियंत्रित विधिमंडळातीलच आहे. निवडून आलेल्या काँग्रेसच्या सदस्यांनासुद्धा ‘मी अंग्रजी बादशहाशी नि त्याच्या पुत्रपौत्रांशी सदासर्वदा त्यांचा अंकित राजनिष्ठ राहीन;’ अशीच शपथ घ्यावी लागते! आणि तशी शपथ घेण्यासाठी गांधीजीही अतके हपापलेले आहेत की त्यांनी निवडणुकीपुढे सत्याग्रह हाही दुय्यम प्रश्न ठरवून महाराष्ट्रभर तो तात्पुरता बंद केला. असला हा सत्याग्रह आणि व्हॉइसरॉयनी त्यांच्या अधिकाराखाली आंशिक सत्ता म्हणून नॅशनल गव्हर्नमेंट दिले तर आम्ही युद्धात अंग्रजांशी सहकार्य करू असा चक्क ठराव करणारी काँग्रेस आणि हे गांधीजी प्रतियोगी सहकार म्हणून वसाहतीचे स्वराज्य तात्पुरते मान्य करणाऱ्यांना कोणत्या तोंडाने नावे ठेवणार?

काँग्रेसचे तिसरे म्हणणे असे की सरकारने काँग्रेसला आव्हान दिलेले आहे, ते सर्वांनी स्वीकारून काँग्रेसला विजयी करावे. पण हेही त्यांचे म्हणणे खरे नाही तर उलट या निवडणुकीत सरकारने हिंदुसंघटन पक्षालासुद्धा आव्हान दिले आहे की काँग्रेस ही हिंदूंची प्रतिनिधी नाही असे म्हणता तर ते सिद्ध करून दाखवा. या निवडणुकीत काँग्रेसची पत राखण्याचाही प्रश्न नाही तर उलट हिंदुहितावर सतत निखारे ठेवणाऱ्या काँग्रेसची पत साफ बुडवून हिंदुसंघटक पक्षाची पत राखणे हाच ह्या निवडणुकीतील मुख्य प्रश्न आहे, मुख्य हेतू आहे.

याच आठवड्यात सिध प्रांतातील आणि बंगालमधील नगरपालिका निवडणुकीत हिंदू महासभेने काँग्रेसचा शंभर टक्के पराभव केल्याचे वृत्त आले आहे. तसेच काँग्रेसच्या राजकारणाच्या आभासास

कंटाळलेल्या महाराष्ट्रातील सर्व राष्ट्रनिष्ठ प्रक्षुब्ध पक्षांनी बॅ. मेहतांना निवडून दिले तर हे सरकारलाही मानणे भाग पडेल की काँग्रेस ही राष्ट्राची प्रतिनिधी राहिलेली नाही; हिंदूंची तर नाहीच नाही.

आमच्या पारशी, ख्रिश्चन, ज्यू प्रभृती देशबांधवांनाही आमची एक विनंती आहे की, काँग्रेसचे प्रतिनिधी विधिमंडळातून निवडून दिले तरी ते तेथून बाहेर पडतात आणि लोकहितासाठी झगडायच्या वेळीच चूप बसून वा घरी बसून सरकारला नाना प्रकारचे लोकविरोधक निर्बंध संमत करून घेणे सोपे करुन देतात. युद्धकाळी धोरण काय तर म्हणे देशावर कोणीही आततायांनी स्वारी केली तर चरखा फिरवीत बसावे आणि मारले जावे. पण ह्या आततायांचा कोणताही प्रतिकार करू नये. अशा ह्या आजच्या काँग्रेसच्या प्रतिनिधींना निवडून देणे म्हणजे मुका वकील नि आंधळा वाटाड्या निवडण्याअतके मूर्खपणाचे आहे.

शेतकरी कामकरी पक्षांच्या दृष्टीनेही राजमल लखीचंदसारख्या दोन बंदुकांची अनुज्ञा मागणाऱ्या अहिसक सावकाराला निवडून देण्यापेक्षा शेतकरी नि कामकरी यांच्या हितासाठी आजन्म खपत असलेल्या आणि प्रधानपदाचा अनुभव असलेल्या बॅ. महेतांना निवडून देणे जास्त हिताचे आहे.”

## विजयी हिंदुसभेचे अभिनंदन

बॅ. जन्मादास मेहता यांच्या अटीतटीच्या निवडणुकीतील विजयानंतर त्यांचे अभिनंदन करताना एका पत्रकात सावरकर लिहितातः

“गेल्या काही दिवसात झालेल्या निवडणुकीत हिंदू महासभेने जे विजय मिळविले त्यात या विजयाने महत्त्वाची भर पडली आहे. निवडणुका ही जनतेच्या मतपरीक्षेची नाडी आहे. या विजयाने आता हे सिद्ध झाले आहे की काँग्रेस हीच काही या देशातील हिंदूंची एकमेव प्रातिनिधिक संस्था नाही. या निवडणुकीला महत्त्व नाही असे वर वर सांगणाऱ्या गांधींनीही ही निवडणुक जिंकण्यास कार्यकर्त्यांना वेळ मिळावा म्हणून सत्याग्रह स्थगित केला होता. काँग्रेसने तिचे सर्व बळ ह्या निवडणूकीत लावले होते आणि तरीही हा विजय हिंदू सभेने मिळविला आहे. पूर्वीचे अयोध्येचे राजेही काँग्रेसचा पराभव करून हिंदुसंघटन पक्षाच्या पाठिब्याने मध्यवर्ती विधिमंडळात गेल्याच आठवड्यात निवडून आले. यावरून धडा घेऊन आता तरी हिंदूंनी यापुढे काँग्रेसला एकही मत न देता सतत हिंदुसंघटनी पक्षाला

निवडून द्यावे. अशा प्रकारे सात प्रांतात जरी हिंदुत्वनिष्ठ मंत्रिमंडळे स्थापन झाली. तर हिंदूंची अर्धी अधिक दुःखे दूर होतील आणि नंतर होणाऱ्या परिषदांतून वा घटनासमितीत सरकारलाही हिंदुत्वनिष्ठ गटाला बोलावणे भाग पडेल."

## पाकिस्तानला प्रतिटोला
## हिंदू-बुद्ध संघटना दूर नाही

खिलाफत चळवळीच्या वेळी हिजरातचा कडू अनुभव आला असताही तुम्ही कदाचित असे मानीत असाल की तुम्हा हिंदुस्थानातील मुसलमान लोकांच्या साहाय्याला बाहेरच्या स्वतंत्र मुसलमान राष्ट्रातील मुसलमान धावत येतील. पण ज्या राष्ट्राला स्वतंत्र आणि सैनिकीदृष्ट्या सामर्थ्यसंपन्न राष्ट्र म्हणता येईल असे एक तरी मुसलमान राष्ट्र उभ्या जगतात दाखविता येईल काय?

आणि घटकाभर वादविवादासाठी अशी मुस्लिम राष्ट्राची फळी या हिंदुत्वावर घाला घालण्यासाठी उभी करता आली असे मानले तरी याच फळीचा प्रतिकार करण्यासाठी हिंदूंची नि बुद्धाची एकजूट निर्माण होण्याचाही बराचसा संभव आहे. तशी एखादी संधी घडवून आणता येईल अशीही शक्यता निर्माण झालेली आहे. मुसलमानांना जर भर दिवसा इस्लाम राष्ट्रसंघाच्या फळीची स्वप्ने पाहता येत असतील तर उलट जम्मूपासून तो जपानपर्यंत त्यांच्याविरुद्ध हिंदूबुद्ध एकजुटीची स्वप्नेही आपणाला पाहता येणार नाहीत काय? मुसलमान जर आपली स्वप्ने सत्यसृष्टीत आणण्याची अशी अपेक्षा करीत असतील तर हिंदूबुद्धयुती घडवून आणण्याचा विचार करण्यास आम्हास तरी प्रत्यवाय काय? पहिली योजना जर अस्तित्वात येणार असेल तर दुसरी घटना घडून येणेही अशक्य नाही नि दुसरी संघटना ही पहिल्या संघटनेला चिरडून टाकण्यास समर्थ होईल.

अशा प्रकारे स्वप्नसृष्टीत वावरण्याचे सोडून देऊन मुसलमान जर वस्तुस्थितीचा विचार करतील तर पाकिस्तान योजनेनुसार हिंदुस्थानमध्ये वेगवेगळी लहान मुसलमान राष्ट्रे प्रस्थापित करणे हे अहिताचे आहे हे त्यांच्याही लक्षात येईल. मुसलमानांच्या विश्वासघाताची प्रतीके म्हणून राहणाऱ्या या लहान राष्ट्राच्या भोवती असणाऱ्या प्रबळ हिंदू राष्ट्राचे सामर्थ्य एकाच दिशेने संघटित होत राहून त्यांच्या या दडपणापुढे या राष्ट्रांना किती काळ नि कशा प्रकारे तग धरता येईल? घटकाभर तुमचे पाकिस्तान आले तरी त्याचे चित्र कसे राहील पहा.

तिकडे पंजाबात शीखांचे कृपाण सदैव तुमच्या छातीवर रोखलेले राहील, बंगालमध्ये चोहोबाजूंनी आसामपासून बिहारपर्यंत कोट्यावधी हिंदूंकडून तुम्ही घेरले जाल, भोपाळच्याभोवती प्रबळ हिंदुसंस्थानिकांचे कडे राहील आणि दक्षिणेत सदैव लढवय्ये, मराठे, आंध्र, आणि तामिळ हे निजामावर झेप झालण्याचा क्षण येण्याची वाटच पाहत राहतील.

अशा स्थितीतील अवस्था हिंदूंपेक्षा मुसलमानांच्या संरक्षणाच्या दृष्टीनेच अधिक तापदायक ठरणार नाही काय? नकळतपणे बॅ. जीना यांनी आपल्या मद्रासच्या अध्यक्षीय भाषणातच हे चित्र रेखाटलेले दिसते.

पाकिस्तानची ही घटक राष्ट्रे जणू काय लौकरच अस्तित्वात येणार आहेत, असे भासवून आपल्या श्रोत्यांना चढविण्यासाठी बॅ. जीनांनी, जर्मनांनी निर्माण केलेल्या क्रोट राष्ट्राचा दाखला दिला. एवढेच नव्हे तर पुढे जीनांनी ब्रिटिशांनाही अशारा दिला की, ते जर पाकिस्तान राष्ट्राची प्रस्थापना करणार नाहीत तर दुसरे कोणीतरी येऊन ते कार्य करतील.

जीनांनी आपल्या पाकिस्तानला क्रोट राज्यांचा दाखला देऊन आपलीच बाजू लंगडी करून घेतली. आपल्या विशाल राष्ट्रीयत्वाला विसरून या सवत्यासुभ्याची स्वप्ने उराशी बाळगल्यानेच शेजारच्या प्रबळ राष्ट्रांच्या सामर्थ्याखाली त्यांना सदैवच चिरडावे लागले हेच नेमके जीनाशहा विसरले.

अशा प्रत्येक लहान जमातीने क्रोट लोकांच्या जमातीपासूनच हा धडा घ्यावयास हवा की, जोपर्यंत ही लहान लहान राष्ट्रे आपल्या शेजारच्या प्रबळ राष्ट्रांशी तादाम्य पावत नाहीत, तोपर्यंत त्यांच्या दैवी सदैव वनवास आणि पारतंत्र्यच ठेवलेले आहे! जर्मनीची पाठ फिरताच दुसऱ्या प्रबळ साम्राज्याने जोपर्यंत धाड घातली नाही तोपर्यंतच आजचे हे जर्मनदत्त स्वातंत्र्य क्रोट लोकांना उपभोगता येईल. हिंदुस्थानात येणाऱ्या पाकिस्तानच्या योजनेच्या कपाळी क्रोट जमातीचेच भवितव्य येईल ही गोष्ट बॅ. जीना यांनी नकळतच सांगून टाकलेली आहे.

असल्या पाकिस्तानाच्या पावसाळी छत्रीप्रमाणे असणारे जन्म हे काही हिंदू राष्ट्राला नवे नाहीत. गेली १०,००० वर्षांच्या हिंदू राष्ट्राने आपले संघटन आणि संवर्धन करताना अशा अनेक शकस्थानांना नि हूणस्थानांना आपल्या बळकट मगरमिठीत कवटाळून नामशेष केलेले आहे. तुमचे अगदी जवळचे असे मोंगली साम्राज्यसुद्धा मराठ्यांनी हा हा म्हणता स्थानभ्रष्ट केले. काय घडते आहे हे लक्षात येण्यास पुरेशी उसंतसुद्धा त्या साम्राज्याला मराठ्यांनी दिली नाही. तुमची पाकिस्तान कल्पना यदाकदाचित प्रत्यक्षात आली तरी अल्पकालीन जीवनानंतर तिचीसुद्धा वरीलप्रमाणेच गती झाल्यावाचून राहणार नाही. जिवंत अतिहास हीच गोष्ट उद्घोषित करीत आहे की, अशी छप्पन पाकिस्ताने येतील आणि जातील; पण हिंदुस्थान हे अमर आहे, नि अमर राहीलसुद्धा.

म्हणून हिंदुस्थानातील मुसलमानांना आपली जाती टिकवून शांतता नि सुबत्ता उपभोगण्याचा, अखंड हिंदुराष्ट्रात समाविष्ट होऊन नांदण्याचा, हा एकच मार्ग आहे आणि त्यालासुद्धा पुढील शर्ती आहेत.

हिंदुस्थानचे स्वातंत्र्य त्यांना मान्य असले पाहिजे. भरतखंडाचे आणि हिंदू राष्ट्राचे अविभाज्यत्व त्यांनी मान्य केले पाहिजे. लोकसंख्येच्या प्रमाणातच प्रतिनिधित्व स्वीकारण्यास त्यांनी सिद्ध असले पाहिजे. सरकारी चाकऱ्या या केवळ गुणनिष्ठच राहव्यात हे त्यांनी मान्य केले पाहिजे. पूजा स्वातंत्र्य, भाषा नि लिपी स्वातंत्र्य हे सर्व नागरिकांना सारखेच उपभोगण्यास मिळावयाचे मूलभूत अधिकार आहेत. याला त्यांची मान्यता मिळाली पाहिजे.

हिंदुस्थानची भावी घटना याच मूलभूत तत्त्वाचा आधार घेऊनच मग रचली गेली पाहिजे. भावी भारतीय शासनसंस्थेची ही मूलभूत तत्त्वे होत. ती सर्वांना सारखीच न्याय देणारीही आहेत. केवळ या

आणि याच अटीवर मुसलमान येत असतील तर त्यांच्यासह, ते येत नसतील तरीही त्यांच्यावाचून आणि ते आडवे येतील तर त्यांचा प्रतिकार करून हिंदुस्थानच्या एकसंध अशा स्वातंत्र्यासाठी झगडण्याचा निर्धार हिंदूंनी केला आहे !!!"

## दंग्यांची मीमांसा १

मुसलमानांनी त्यांच्या पूर्वनियोजित सूत्राप्रमाणे सिंध आणि पूर्व बंगालनंतर कर्णावती, मुंबई आदी नगरांतही भयंकर दंगे चालू केले. या दंग्यांची मीमांसा करणारे एक पत्रक ६ मे १९४१ रोजी सावरकरांनी काढले. त्याचा सारांश असाः

"हे दंगे इतक्या पद्धतशीरपणे होत आहेत की त्यामागे काही राजकीय हेतू असावा हे स्पष्ट दिसते. या दंग्यांत करण्यात आलेल्या घोषणा त्यांचा हेतू स्पष्ट करीत आहेत. पूर्वबंगालमध्ये सहस्त्रावधी मुसलमान दंगेखोर टोळयाटोळयांनी खेडोखेडी धुमाकूळ घालीत, पाकिस्तान प्रस्थापित झाल्याची घोषणा देत हिंदू बायका-मुलांना सक्तीने बाटवीत होते. प्रत्येक खेड्यात जाळपोळ, मंदिरे भ्रष्ट करणे, लूटमार नि हिंदूंचे नावही उरू न देणे असा त्यांचा कार्यक्रम होता."

## दंग्यांची मीमांसा २

मुसलमानांच्या दंग्यांसंबंधी पुन्हा काढलेल्या पत्रकात सावरकर म्हणतात :

"हे दंगे म्हणजे हिंसक गुंडांचे नि मवाल्यांचे चाळे आहेत! ही काँग्रेसछाप विचारसरणी जितक्या लवकर हिंदू आपल्या डोक्यातून काढून टाकतील तितके त्यांच्या हिताचे आहे. ही केवळ गुंडगिरी असती तर त्यांनी केवळ हिंदू धनिकांना न लुटता मुसलमान धनिकांनाही लुटले असते. देवळाप्रमाणे मशिदीही उद्‌ध्वस्त केल्या असत्या. पण असे काही सिंध, बंगाल किंवा कर्णावतीमध्ये घडले आहे का? मोपल्यांचे बंड झाल्यापासून तो आज या क्षणापर्यंत जेथे तेथे मुसलमानांचे असे दंगे झाले त्यात एखाद्या तरी ठिकाणी असे घडले आहे का? त्या वेडेपणातही पद्धत आहे. प्रस्तुतच्या हिंदूविरोधी मुसलमानी आक्रमणाचा हा अर्थ जितक्या लवकर हिंदू लोक ओळखतील तितके चांगले. "

## डॉ. राजेंद्रप्रसाद यांना उत्तर

बिहारमधील काँग्रेसचे नेते बाबू राजेंद्रप्रसाद यांनी बिहारमधील हिंदू-मुसलमानांच्या दंगलीबाबत हिंदूंना तळमळून उपदेश करणारे एक पत्रक काढले. त्याचे तर्कशुद्ध, सुस्पष्ट नि बुद्धिवादी विवेचन करणारे एक पत्रक २२ मे १९४१ रोजी सावरकरांनी काढले. त्याचा आशय असाः

"डॉ. राजेंद्रप्रसाद यानी पाटण्याला नुकत्याच केलेल्या एका भाषणात आपल्या 'हिंदू दोषदर्शना'चे समर्थन करण्याचा प्रयत्न केला आहे. बिहारमधील बिहार शरीफच्या आसमंतात घडलेल्या प्रकाराचा न्यायासनापुढे रीतसर निवाडा होण्याच्या आधीच तेथील हिंदूंनी 'दुर्वर्तन केल्याविषयी त्यांची कानउघडणी' करणाऱ्या राजेंद्रांना पाटण्याच्या त्या सभेत असे आव्हानपूर्वक विचारण्यात आले की डाक्का, सिंध, सीमाप्रांत इत्यादी ठिकाणी घडलेल्या प्रकारासंबंधी तुम्ही मुसलमानांचेही कान का उपटले नाहीत? त्यावर बाबुजी सांगते झाले, "दुसऱ्यावर दोष लादणे चांगले नव्हे, आपणच आपल्या लोकांना दोष देऊन त्यांना सुधारण्याचा प्रयत्न करावयास हवा. मी हिंदू असल्यामुळे (किवा हिंदू म्हणून) केवळ हिंदूंनाच कानपिचक्या देऊ शकतो. मुसलमानांना उपदेश करण्याचा अधिकार केवळ मुसलमान पुढाऱ्यांनाच आहे."

खिलापतीच्या चळवळीपासून गांधींच्या गोतावळ्यातील म्होरक्यांनी नि स्वतः गांधींनी चालविलेल्या ह्या हिंदुहितघातकी ढोंगबाजीवरील फसवा पडदा फाडून काढून या काँग्रेसवाल्यांचे खरे स्वरूप जनतेपुढे एकदा उघड केलेच पाहिजे आणि हे त्यांचे अंतरंग दिसल्यावर या ढोंग्यांना हिंदूंचे प्रतिनिधित्व तर मिरविता येणार नाहीच परंतु हिंदूंना उपदेश करण्याचा किवा त्यांचे कान उपटण्याचा काहीही अधिकार त्यांना पोहोचत नाही हे समजून येईल. यासाठी ही ढोंगबाजी नष्ट केली पाहिजे.

'आपले लोक' म्हणून मोठ्या आपुलकीचा आव आणून हे राजेंद्रबाबू ज्या हिंदूंची कानउघाडणी करण्याचा प्रयत्न करतात, त्यांना काही प्रश्न विचारायचे आहेत. तुम्ही हिंदूंना स्वतःचे म्हणविता? मग तुम्ही काँग्रेसशी संबंध तोडला काय? कारण काँग्रेसच्या तत्त्वाप्रमाणे एकटे हिंदू तुमचे होऊ शकत नाहीत. बरे, हिंदू नि मुसलमान या दोघांनाही हिंदी या दृष्टीने तुम्ही आपले म्डणता काय? तसे असेल तर त्या दोहोंनाही तुम्ही सारखेच उपदेश दिले पाहिजे. बरे तुम्ही स्वतः हिंदू म्हणून आपल्या हिंदूंना दोष देता का? तसे असेल तर ब्रिटिश अधिकाऱ्यांनी केलेल्या जालियनवाला बाग हत्याकांडाबद्दल त्यांना ते आपले नसताना दोष का देता? तसेच जर 'दुसऱ्यांना' दोष देणे समर्थनीय नसेल तर आपण

आजवर ब्रिटिश लोक नि सरकार यांच्याविरुद्ध दर्शविलेला असंतोष निषेधार्ह नाही का? बरे, साऱ्यांनाच 'आपले लोक' म्हणून जपानी, नाझी, फॅसिस्ट, ब्रिटिश यांच्या आक्रमक प्रवृत्तीचा निषेध करावयाचा असेल तर त्या दृष्टीने मुसलमान आपल्याला अधिक जवळचे आहेत, नव्हे का? मग परस्थ जपानी, नाझी यांच्या आक्रमणाविरुद्ध कोरडा हलकल्लोळ माजविणाऱ्यांनी हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या हिंदूवर होणाऱ्या आततायी, अमानुष हत्यारक अत्याचारांचा निषेध का करू नये ? त्या संबंधी त्यांचे कान का उपटू नयेत ? त्याविरुद्ध त्यांनी का लढू नये?

**सोयिस्कर, स्वार्थसाधू आपुलकी**

आता या प्रश्नांची उत्तरे मनाशीच दिली तरी कळून येईल की, काँग्रेसवाल्यांनी, गांधीगटाने ही एक पद्धतशीर बुवाबाजी चालविली आहे. हे काँग्रसवाले हिंदू अलीकडे एका चमत्कारिक वटवाघळी पेशीत वाढताहेत. हिंदू मतदारांच्या दाराशी जाऊन मताची भीक मागतांना, हिंदूंच्यावतीने कोऱ्या हुंड्या (चेक) देताना हे 'हिंदूंचे' हिंदू असतात. इतर वेळी हिंदूंविरुद्ध ढोंगी समतेचा आव आणताना मात्र नेमकी जातीय निर्णयाला विरोध करण्याच्या प्रसंगी त्यांची तोंडे बंद होतात.

मते आणि कान उपटायला, दोष लादायला हिंदूंच्या अधिकाराचा विश्वासघाताने बळी द्यायला यांना हिंदू 'आपले' वाटतात, हवे असतात. पण जेव्हा केव्हा हिंदूंचे विशेष हितसंबंध संरक्षावयाचे असतील, त्यांच्या जीवितवित्ताचे, घरादाराचे रक्षण करावयाचे असेल, मग ते मलबार, सिंध, कोहर, डाक्का कोठेही असोत, वर्तुळ-परिषदेत असोत अथवा विधिमंडळात असोत मग तो प्रश्न हिंदूंची भाषा, धर्म, संस्कृती यांपैकी कशाचाही असो, ही काँग्रेसी हिंदूंची जात 'आपल्या' हिंदूंना झिडकारते. नि तीही कशी? संतापाने, जणू आम्ही राष्ट्रीयांचे राष्ट्रीय असा दिमाख मिरवीत!

या 'राष्ट्रीय' काँग्रेसवाल्यांना स्पष्टपणे, खडखडीतपणे उद्घोषून सांगा की ही वटवाघुळी वृत्ती, ही लुडबूड, हा दुटप्पीपणा, ढोंगीपणा बस्स करा. हिंदुत्वाची चाड असलेला, त्यांच्यासाठी वाटेल त्या परिस्थितीत वाटेल त्या आक्रमणाला तोंड देण्यास सज्ज असलेला तोच आमचा पुढारी, तेच आमचे प्रतिनिधी, त्यांनीच आम्हाला उपदेश करावा आणि हे हिंदुत्वाचे प्रतिनिधीत्व महासभेने केव्हाच स्वीकारलेले आहे."



www.savarkarsmarak.com

सावरकरांच्या पुण्याच्या वास्तव्यात श्री. अण्णाराव ढमढेरे यांच्या वाड्यामध्ये हिंदुत्वनिष्ठ नेत्यांची एक सभा झाली. त्या सभेत हिंदुसंघटक प्रचारासंबंधी चर्चा होऊन असे ठरले की १ ऑगस्टपर्यंत, म्हणजे टिळक पुण्यतिथीपर्यंत, दोन लक्ष रुपयांचा हिंदु राष्ट्रीय निधी गोळा करावयाचा. या निधीसंबंधीच्या पत्रकातील काही भाग असाः

"हिंदू महासभा आणि लोकशाही स्वराज्यपक्ष या दोहोंचेही कार्य दिवसेंदिवस वाढत आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. स्वा. वीर सावरकर बंधमुक्त झाल्यापासून हिंदू महासभेच्या कार्याला अधिक चैतन्य प्राप्त झाले. या निधीला 'हिंदू राष्ट्रीय निधी' हे नाव देण्याचे कारण त्याचा व्यय कोणत्या कार्याकडे होईल हे लोकांच्या ध्यानात यावे. या निधीतून आमच्या पक्षाचे नित्य नि नैमित्तिक असे उभयविध कार्य चालवायचे आहे. मतप्रचाराचे नि संघटनेचे कार्य अखंड चालावयाचे म्हणून ते नित्य आणि आपद्ग्रस्त साहाय्य, निवडणुका आदी कार्ये नैमित्तिक पण ही दोन्ही कार्ये परस्परावलंबी आणि सारखीच महत्त्वाची आहेत; अशी ही कार्ये ह्या निधीच्या केवळ व्याजातून न चालता मूळ निधीतूनही चालविली जातील. या निधीचे विश्वस्त म्हणून सर्वश्री न. चिं. केळकर, वि. दा. सावरकर, ल. ब. भोपटकर, गुलाबचंद हिराचंद, जमनादास मेहता, ग. का. गोडबोले यांची निवड होऊन त्यांना आणखी तीन विश्वस्त निवडून घेण्याचा अधिकार देण्यात आला."

## एकोणसाठाव्या वाढदिवसाचा संदेश

२८ मे हा सावरकरांचा वाढदिवस. १९४१ सालच्या वाढदिवसानिमित्ताने सावरकरांनी दिलेला संदेश महत्त्वाचा आहे. तो असाः

“महाराष्ट्रातून अनेक हिंदुसंघटन संस्थांनी आणि व्यक्तींनी आग्रहाची मागणी केली आहे की माझ्या एकोणसाठाव्या वाढदिवसानिमित्त मी काही तरी संदेश धाडावा. त्या सगळयांना निरनिराळे संदेश धाडण्यापेक्षा सर्वांना मिळून एकच सार्वजनिक संदेश धाडावा हेच वेळ नि श्रम वाचविण्याच्या दृष्टीने अधिक सोयिस्कर होईल असे समजून मी महाराष्ट्रीयांना या वाढदिवसापुरता हा प्रकट संदेश धाडीत आहे की ‘राजनीतीचे हिंदूकरण आणि हिंदूंचे सैनिकीकरण करा. ’

आंतरराष्ट्रीय वा राष्ट्रीय अशी जी जी राजनीती हिंदू राष्ट्रहितास उपयुक्त असेल तीच काय ती आता अनुसरली पाहिजे. जे जे हिंदुहितास हानीकारक ते ते त्याज्य, पापमय उच्छेदिलेच पाहिजे. समतेच्या तत्त्वाप्रमाणे कोणाच्याही न्याय्य अधिकारावर आक्रमण करावयाचे नाही; परंतु आपल्या हिंदू राष्ट्राच्या तितक्याच न्याय्य असणाऱ्या अधिकारांवरही कोणास आक्रमण करू द्यावयाचे नाही, हेच हिंदू राजनीतीचे सूत्र असल्यामुळे हिंदू जातीचे जे हित ते राष्ट्रीय हिताच्याच नव्हे तर मानवजातीच्या हिताच्याही विरुद्ध जाणे शक्य नाही. या हिंदू राजनीतीच्या सूत्रानुरूप आजचे पाऊल जे पुढे टाकावयाचे ते हे की, हिंदूंनी कोणत्याही निवडणुकीत जो हिंदुत्वनिष्ठ दर्शिकेवर उभा राहिलेला नाही अशा काँग्रेस प्रभृती पक्षाच्या इच्छुकाला आपले मत टाकावयाचे नाही.

त्याचप्रमाणे ज्याला ज्याला प्रवेश मिळविता येईल त्या त्या महाराष्ट्रीय हिंदूने सैन्यात शिरावे! भूदल, नौदल, विमानदल यांमध्ये सहस्रावधी मराठ्यांनी शिरले पाहिजे. युद्ध सामुग्रीचे जे जे मोठे कारखाने निघत आहेत त्यातूनही घुसता येईल तितक्या महाराष्ट्रीय हिंदूंनी शिरले पाहिजे; आपल्या महाराष्ट्रीय हिंदूंची लोपलेली वीरवृत्ती पुन्हा फोफावण्यासाठीच सैन्यात मुख्यतः शिरावयाचे हे तर खरेच; पण आज अशी दुहेरी संधी आली आहे की, सैन्यात अशा प्रकारे शिरल्यामुळे सहस्रावधी लोकांची बेकारीपासूनही सुटका होईल; तरी ब्राह्मण, मराठा, भंडारी, वाणी, महार, कोळी इत्यादी सर्व जातींच्या हिंदूंनी शक्य तितक्या मोठ्या संख्येने सैन्यात प्रवेशावे!

त्यातही महाराष्ट्रातील शिक्षित वर्गात मोडणाऱ्या हिंदू तरुणांना तर माझे विशेष आग्रहाचे सांगणे आहे की, तुम्ही सगळयांच्या आधी सैन्यात शिरा ! जितक्यांना प्रवेश मिळू शकेल तितके तरी शस्त्र उचला. इतर साधारण लोकांची तर सैन्यात भरती झालीच पाहिजे; पण जे शिक्षित तरुण आहेत. ज्यांना हिंदुसंघटना नि शस्त्रशक्तीच मुख्यतः का हवी याचे मर्म कळते त्या तत्त्वज्ञ तरुणांची सैन्यात भरती होईल तितकी हिंदुहितास अत्यंत उपकारक होणारी आहे.

राष्ट्राच्या संसाराला साहित्य, कला, नाट्य, चित्रपट, पुस्तकी विद्या इत्यादी श्रेष्ठ-कनिष्ठ अशा सर्व प्रकारच्या वस्तूंच्या भरताडाची आवश्यकता असतेच, मुख्य प्रश्न हा नाही की लेखणी श्रेष्ठ की तलवार श्रेष्ठ? तो तर निव्वळ काथ्याकूट आहे. माझा मुख्य प्रश्न हा आहे की, आजच्या परिस्थितीत हिंदू

राष्ट्राला कशाची अधिक उणीव आहे आणि पहिले अधिक निकडीचे कर्तव्य काय आहे? साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षीय भाषणातून मी हे अगदी स्पष्ट केलेले आहे की, आज राष्ट्राला तारावयाचे तर शस्त्रशक्ती हवी, आज ती उणीव आहे म्हणूनच आजचे निकडीचे पहिले कर्तव्य म्हणजे आपल्या हिंदूंचे सैनिकीकरण! पण शिक्षित हिंदू तरुणाच्या स्वप्नातसुद्धा तो विचार येत नव्हता. शिक्षित तरुण जो तो बहुधा कारकुनी, पुस्तकी पदव्या, नाटके, चित्रपट, वाद, व्याख्याने, कला, कविता, कादंबऱ्या यांच्या ढिगाऱ्याखाली गाडला जाई. तो तरुणांचा दोष नव्हता. कपटी परकीयांनी शस्त्र उचलणे हा अपराध ठरविला. स्वकीयांनी शस्त्र उचलण्याची अच्छाच मुळी पापी ठरविली! फलतः शिक्षित तरूणांना साहित्यावाचून, बोरूवाचून दुसरा धंदाच उरला नाही. छंद उरला नाही. आदर्श उरला नाही. साहित्य श्रेष्ठ की कनिष्ठ ह्या काथ्याकुटीचा प्रश्नच नाही. प्रश्न आहे हिंदू राष्ट्र जगविण्यासाठी तात्काळ काय केले पाहिजे, कर्तव्य कोणते?

आई अंथरूणावर सर्पदंशाने विव्हळत पडली आहे. मांत्रिक, डॉक्टर, वैद्य कोणाला तरी धावत जाऊन आणून उपचार करावयाचा आहे. अशा वेळी जर तिचा मुलगा म्हणू लागला, "थांबा, सर्पदंशाने आई व्याकूळ झाली असता ज्या दुःखाचा कड मला आला आहे त्यावर प्रथम एक करुण काव्य मला लिहू द्या. काव्यशक्ती ही एक श्रेष्ठ शक्ती आहे. तर त्यास तुम्ही काय म्हणाल? हेच की चुलीत घाल ती तुझी कविता आणि तिच्या श्रेष्ठ-कनिष्ठतेचा काथ्याकूट! पहिल्याने ऊठ नि औषध आण!"

त्याच अर्थी शिक्षित तरुणांना सांगणे आहे की आज हिंदू राष्ट्राला जगवायचे, तगवायचे तर प्रथमतः हवी आहे शस्त्रशक्ती! सैनिकीकरण!! आजवर ती ंसंधी नव्हती, ती आज अपूर्व संधी आली आहे, अनपेक्षित असे राजकीय योगायोग जुळून येत आहेत. यास्तव आज प्रथमतः सैन्यात घुसा, बोरू मोडा नि बंदुका उचला!

महाराष्ट्रीय हिंदू तरुणांच्या रक्तातील वीरवृत्ती मेलेली नाही, लोपली आहे अतकेच! ही माझी निश्चिती आहे. नाही तर निजाम निःशस्त्र प्रतिकाराचे शिंग फुंकले जाताच चार हजार हिंदू प्रतिकारक पुढे येतेच ना! आता तर रोखठोक सशस्त्र सैनिकीकरणाची संधी आलेली आहे. आता चार सोडून चाळीस हजार हिंदू शिक्षित तरुण एकट्या महाराष्ट्रातून सैन्यात घुसतील, निदान घुसले पाहिजेत. माझा आजच्यापुरता हाच संदेश आहे की, 'राजनीतीचे हिंदूकरण आणि हिंदूंचे सैनिकीकरण करा."

www.savarkarsmarak.com

## प्रत्यक्ष प्रतिकाराचा अर्थ

मदुरेच्या ठरावाचे स्पष्टीकरण करण्यासाठी सावरकरांनी २४ ला प्रत्यक्ष प्रतिकाराचा खरा अर्थ सांगणारे एक पत्रक काढले. मूळ ठरावापेक्षासुद्धा हे स्पष्टीकरणच अधिक समजण्यासारखे आहे. त्यात सावरकर सांगतातः

“हिंदू महासभेच्या अखिल भारतीय समितीच्या कार्यकारी मंडळाने प्रत्यक्ष प्रतिकारासंबंधी जो ठराव केला त्यातून टीकाकार आपल्या मनात विशिष्ट हेतू धरून निरनिराळे अर्थ काढीत आहेत म्हणून त्यातील धोरण सुस्पष्ट करणे आवश्यक झाले आहे. हे स्पष्टीकरण लक्षात घेऊन कार्यकर्त्यांनी हिंदुसंघटनाचे कार्य वाढवावे हे युक्त होय.

(१) अ) कलकत्ता येथे संमत केलेल्या ठरावाने मदुरा येथील ठराव नष्ट झालेला नाही किंवा त्या ठरावाने पुढे टाकलेले पाऊल मागे घेतले अथवा त्यातील मुख्य हेतू बाजूस ठेवला गेला असे नाही. ब) हिंदुस्थान सरकारच्या घटनेत जे पालट करावे अशी मागणी होती तेवढ्यापुरतीच प्रत्यक्ष प्रतिकाराची

चळवळ पुढे ढकलावी एवढेच त्या ठरावात आहे. क) अखिल भारतीय राजकारणाच्या प्रश्नावर अखिल भारतीय स्वरूपाचा प्रत्यक्ष प्रतिकार व्हावयाचा तो सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन पुढे ढकलला आहे. ड) हिंदुहिताच्या संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक तर स्थानिक जातीय किंवा अखिल भारतीय स्वरूपाचा प्रतिकार योग्य वाटेल तेव्हा नि त्या ठिकाणी केला जावा असा आदेश या ठरावात आहे. हे लक्षात घेतले तर प्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ थांबविली असा अर्थ त्या ठरावातून निघू शकत नाही हे दिसेल.

(२) वरील ठराव सर्वच्या सर्व वाचला म्हणजे ठरावाचा हेतू, अर्थ नि उद्दिष्ट वर दिल्याप्रमाणेच आहे हे पटेल. सध्याच्या परिस्थितीत हिंदूंच्या हितसंरक्षणाच्या दृष्टीने वरील ठराव अत्यंत उचित असाच होता हे समजण्यासाठी प्रथम प्रत्यक्ष प्रतिकार म्हणजे अखिल भारतीय समिती काय समजते याचा उलगडा पुढीलप्रमाणे करणे आवश्यक आहे.

**प्रत्यक्ष प्रतिकाराची व्याख्या**

मदुरा येथे संमत झालेल्या ठरावातील प्रत्यक्ष प्रतिकाराच्या अर्थाची व्याप्ती सशस्त्र बंडापासून ते निःशस्त्र, निष्क्रिय असहकारापर्यंत आहे.

सशस्त्र बंडाच्या प्रत्यक्ष प्रतिकाराची चर्चा या ठिकाणी करणे शक्य नाही, हे कारणे न देताच समजण्यासारखे आहे. कोणीही तसा अर्थ केलाही नसेल, म्हणून या स्पष्टीकरणात याचा उल्लेख करण्याची आवश्यकता नाही.

पुष्कळांनी नि विशेषतः काँग्रेसवाल्यांनी प्रत्यक्ष प्रतिकाराचा अर्थ तर तुरुंगभरती असा केला आहे. स्वतःच्या हालकष्टांनी प्रतिपक्षीयांच्या अंतःकरणाला पाझर फोडणे मग ती अंतःकरणे पत्थरांचीही असोत- हेच एक अत्युत्तम नि परिणामकारक राजकीय शस्त्र आहे, अशी ज्यांची विचित्र श्रद्धा आहे त्यांनी वरील अर्थ केला आहे. अनत्याचारी प्रतिकारशून्य असहकार या नावाने ओळखली जाणारी वरील श्रद्धा म्हणजे शुद्ध वेडेपणा आहे असेच समजून हिंदू सभावाल्यांनी तिचा धिक्कारच केलेला आढळेल!

हिंदू महासभावाल्यांची अशी निश्चिती आहे की अतिक्रमण नि अत्याचार यांचा प्रतिकार शक्य त्या सर्व व्यवहार्य मार्गांनी करणे न्याय्यच नव्हे तर अत्यंत आवश्यक आहे. निरपवाद अहिसेने अथवा निरपवाद प्रतिकारशून्यतेने उपकारबुदधी नि स्वाभिमान या दोनही प्रवृत्तीचा नाश होतो असे हर्बर्ट स्पेन्सरने म्हटले आहे. मानवाचे हित जेवढ्या प्रमाणात होत असेल तेवढ्या प्रमाणात निरपवाद अहिसा हा सद्गुण ठरेल परंतु अत्याचार नि अतिक्रमण यांच्या विरुद्धही आत्यंतिक अहिंसा आणि आत्यंतिक अप्रतिकार करावा असे म्हणणे हे अनैतिक आहे. तसे केले तर दुष्टांचेच साम्राज्य होईल नि सुष्टांचा नाश होईल. साप, वाघ, लांडगे यांच्यासंबंधी जर निरपवाद अहिसेचे तत्त्व आचरणात आणले गेले तर मनुष्यजातच नष्ट होईल. हिंदू महासभेचा असल्या विक्षिप्त तत्त्वांवर विश्वास नव्हता. म्हणून या तत्त्वानुसार तुरुंगभरती असा प्रत्यक्ष प्रतिकाराचा अर्थ त्यांना मान्य नाही आणि तसा त्यांनी केलाही नव्हता. म्हणून प्रत्यक्ष प्रतिकाराचा अर्थ तुरुंगभरती एवढेच समजणाऱ्या काँग्रेसवाल्यांनी जेव्हा हिंदू

सभावाले अपेक्षेप्रमाणे विचार न करता तुरुंगभरती करीत नाहीत असे पाहिले तेव्हा मदुरेच्या ठरावात पुढे टाकलेले पाऊल हिंदू सभेने मागे घेतले अशी कोल्हेकुई त्यांनी सुरू केली. त्यात अनपेक्षित असे काहीच नाही. खोट्या आशा त्यांनी बाळगल्या म्हणून त्यांना चीड येत असली तर त्याचे दायित्व त्यांच्यावरच पडते.

(३) प्रत्यक्ष प्रतिकाराचा हिंदू सभेच्या दृष्टीने हा अर्थ आहे की आपल्यावर अतिक्रमण करणाऱ्याचा प्रतिकार अशा रीतीने करावयाचा की अतिक्रमण करणाऱ्याचे नुकसान प्रतिकारापेक्षा अधिकात अधिक झाले पाहिजे. नेहमी पुढे जाणे म्हणजेच शौर्य नि मागे जाणे म्हणजे भ्याडपणा अशी जी सर्वसाधारण खोटी समजूत आहे तिचा पुरस्कार महासभा करीत नाही. भयानक पर्वताच्या कड्यावरून पुढे पाऊल टाकून सर्वनाश करून घेणे हे शौर्य नसून हा मूर्खपणा आहे. समोरून येणाऱ्या हल्ल्याला तोंड देताना मागील बाजूने हल्ला होतो आहे हे आढळून आल्यावर तोंड फिरवून मागून येणाऱ्या हल्ल्याचे निवारण करण्यातच खरे शौर्य नाही काय? काही लबाड नि मूर्ख लोक असे तोंड फिरविले म्हणजे आपल्यास भित्रा म्हणतील या भीतीने मागे न फिरणे यात निश्चितच शौर्य नाही. युद्धात नि राजकारणात पहिले तत्त्व म्हणून सुसंबद्धता उद्देशाच्या दृष्टीने ठेवली पाहिजे. डावपेचाच्या दृष्टीने ती पाळलीच पाहिजे असे म्हणण्यात अर्थ नाही. ही त्रिकालाबाधित सत्ये असून गांधीवादामुळे लोकांची अतकी दिशाभूल झाली आहे की ती पुनःपुनः सांगावी लागतात!

स्वपक्षाची शक्यतो अल्प हानी नि प्रतिपक्षाची अधिकात अधिक हानी असा प्रत्यक्ष प्रतिकाराचा अर्थ हिंदू सभेचे पुरस्कर्ते करीत असले तरी सध्याच्या बिकट राजकीय लढ्यात आपल्याला अत्यंत कष्ट सोसावे लागतील नि त्याग करावा लागेल हे ते विसरलेले नाहीत. या लढ्यात त्यांच्यापैकी शेकडो लोक तुरुंगातच नव्हे तर फासावरही गेले आहेत. पण हालकष्ट हे पुण्यप्रद म्हणून नव्हे तर ते अटळ आहेत म्हणून त्यांनी ते सोसले, प्रतिपक्षांची हानी करण्याचाच त्यांचा त्यात हेतू होता. स्वपक्षाचे बलाबल, प्रतिपक्षाच्या दडपशाहीचे सामर्थ्य, चढाईची योग्य वेळ, उत्साहाची भरती येईल असे प्रसंग आणि परिस्थितीप्रमाणे हाती असलेल्या साधनांचा उपयोग केला गेला तर विजयाची खात्री या सगळया गोष्टींचा नीट विचार केल्यानंतर मगच हा मार्ग स्वीकारावयाचा असतो.

(४) या योग्य दृष्टीने पाहिल्यास सध्याच्या परिस्थितीत हिंदुस्थानच्या राज्यकारभाराच्या घटनेत पालट घडवून आणण्याकरिता प्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ हाती घेणे अयुक्त ठरते. युद्धानंतर एका वर्षात ब्रिटिश साम्राज्यात बरोबरीचे अधिकार द्या, या मागणीचीच गष्ट घेऊ. सरकारने वचन दिले की असे बरोबरीचे स्थान देऊ पण कालमर्यादेत बांधून घेण्यात ते सिद्ध नाहीत, तेव्हा अशा परिस्थितीत पुन्हा बरोबरीचा दर्जा ठरवून घेण्याकरताच हजारो हिंदुसंघटनवाल्यांनी तुरुंगात जाणे नि लाखो रुपये दंड भरणे अष्ट झाले असते काय? बरे अतकेही करून युद्धानंतर एका वर्षात बरोबरीचा अधिकार देऊ असे त्यांनी म्हटले तरी त्याला वचनापेक्षा अधिक ते काय मूल्य आहे? राजकारणात असल्या शाब्दिक वचनांना काय मूल्य असते हे आंतरराष्ट्रीय राजकारणातील अनेक गोष्टींनी सिद्ध झाले नाही काय? युद्ध केव्हा संपते याची तरी काय खात्री द्यावी? ते तीन वर्षांपासून तीस वर्षे चालेल असे म्हणतात. मग

अतकी वर्षे हजारो कार्यकर्ते तुरुंगात पाठवीत राहवयाचे काय? एवढा मोठा त्याग करून मिळवायचे काय की ब्रिटिश साम्राज्यांतर्गत अतरांबरोबरीची श्रेणी. धोरण या दृष्टीने हा मूर्खपणा आणि पाचपेचाच्या दृष्टीने हा एक आत्मघात होय! आज रणभूमी सर्वच निकाल करण्याकरिता बसली आहे नि म्हणून दैव शेवटी कोणाच्या बाजूने फासा टाकते याची वाट पाहणे हे अधिक अष्ट. कारण आपण नि इतर कोण कोठे आहो हे नंतर निश्चित कळेल.

(५) अखिल भारतीय समितीने वरीलप्रमाणे सर्व परिस्थितीचा विचार करून हिंदुहिताच्या संरक्षणाच्या दृष्टीने आणि युद्ध पूर्वेकडून आणि पश्चिमेकडून हिंदुस्थानच्या दाराशी आलेले आहे हे ध्यानी घेऊन नि विशेषतः सर्व देशभर हिंदुविरोधी दंगेधोपे मुसलमानांनी सुरू केलेले आहेत ही जाणीव ठेऊन, युद्ध संपेपर्यत राजकीय मागणीची प्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ लांबणीवर टाकली आहे. महायुद्ध संपल्यानंतर जगाचे मानचित्र कसे काय रंगले जाते हे पाहून आणि इंग्लंड चाही विजय केवढा होतो हे लक्षात घेऊन मगच युद्धोत्तर समानतेची श्रेणी देण्याच्या त्यांनी दिलेल्या वचनात सत्य किती हे पाहण्याची वेळ येणार आहे. त्यावेळीच प्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ करून सरकारावर दडपण आणणे युक्त ठरेल.

**हा प्रत्यक्ष प्रतिकारच**

(६) इतर हिंदुहितविरोधी प्रश्नांसंबंधी कलकत्त्याच्या ठरावाने असा स्पष्ट आदेश दिला आहे की, आवश्यक त्या ठिकाणी प्रतिकार केला पाहिजे आणि मागील अतिहास पाहिला, तर तसा प्रतिकार आज चालूही आहे. निजाम राज्यातील प्रतिकाराची गोष्ट बाजूस ठेवली, तरी सिंधमध्ये हिंदूंवर हल्ले सुरू झाले त्यावेळी तेथील हिंदुसंघटनवाल्यांनी नि हिंदू सभावाल्यांनीच हिंदूंचे संरक्षण केले नाही काय? सिधमधील आमच्या हिंदू पक्षाच्याच लोकांना सीमापारी, तुरुंगवास सोसावा लागला अतकेच नव्हे तर, त्यांना प्राणही पणाला लावावे लागले! शिरगणतीच्या चळवळीत हिंदुस्थानभर हिंदू सभावाल्यांनीच खटपट केली, काँग्रेसने केली नाही! बंगाल नि बिहार प्रांतात या संबंधात हिंदू सभावाल्यांवरच खटले भरले गेले. गेल्या बारा महिन्यांत डाक्का येथे पूर्व बंगाल्यात कर्णावतीस किंवा मदुरा, बिहार शरीफ नि मुंबई येथे हिंदूंवर प्राणघातक हल्ले करण्यात आले, जाळपोळ केली गेली, बाटविण्याचे नि लुटीचे प्रकार तर मोठ्या प्रमाणात करण्यात आले. त्यावेळी हिंदू सभेच्याच लोकांनी स्वसंरक्षणाचा अधिकार बजावून हिंदूंचे संरक्षण केले याच कारणाकरिता हिंदू सभावाल्यांना सुऱ्यांना बळी पडावे लागले नि तुरूंगात जावे लागले! त्यांनी हजारो हिंदूंना सोडविले, निराश्रितांना साहाय्य केले आणि न्यायालयात त्यांना आसरा दिला. मशिदीपुढील वाद्यांच्या प्रश्नापासून ते पाकिस्तानच्या चळवळीपर्यंत हिंदूंचे म्हणणे हिंदू सभावाल्यावाचून कोण मांडत आहे? हे काँग्रेसने केले नाही! पाकिस्तानचा निषेध ठराव करूनसुद्धा काँग्रेसने केला नाही. हिंदुहिताविरुद्ध चाललेल्या चळवळींना अखिल हिंदुस्थानात हिंदूंनीच तोंड दिले आहे. भारताच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत हिंदुत्वाचा अभिमान जागृत करण्याचे, स्वावलंबन नि राष्ट्रीयवृत्ती उत्पन्न करण्याचे कार्य

हिंदू सभाच करीत आहे. हिंदुहितविरोधी सर्व चळवळींना पायबंद घालण्याचा हा उद्योग म्हणजे प्रत्यक्ष प्रतिकार नव्हे काय?

(७) आणि शेवटी एक गोष्ट सांगितली पाहिजे ती ही की, जर हिंदू सभेने यापेक्षाही मोठ्या प्रश्नासंबंधी झगडा सुरू केला नाही, तर त्याचे दायित्व प्रामुख्याने कोणावर पडते?

हिंदू झेंड्याखाली उभे राहून आज जे लोक त्याग करीत आहेत; अनेक आपत्ती सोशीत आहेत केवळ त्यांच्यावर हे दायित्व पडत नाही. आज जे लाखो हिंदू काहंीच न करता दोन्ही दरडीवर हात ठेऊन बसले आहेत आणि हजारो हिंदू - जे हिंदूंच्या हिताविरुद्ध वागून हिंदूंचाच घात करीत आहेत आणि त्याला काँग्रेसछापाचे सद्‍गुण म्हणून मिरवीत आहेत, त्यांच्यावरच हे दायित्व पडते!!"

## आसामच्या हिंदूंना चेतावणी

आसाममधील हिंदूंही इतर प्रांतातील हिंदूंप्रमाणे हिंदू-मुस्लिम एकीच्या धुंदीत बेसावध राहते तर आसामचेही पाकिस्थान होणे अपरिहार्य होते. ते होऊ नये यासाठी जुलै १९४१ मध्ये सावरकरांनी आसामच्या हिंदूंना चेतावणी देणारे एक पत्रक काढले. ते पुढीलप्रमाणे आहेः

"हिंदुस्थानातील सर्व हिंदू समाज आणि विशेषतः आसाममधील हिंदू जनता यांचे एका भयानक अरिष्टाकडे मी लक्ष वेधू इच्छितो आसाम प्रांताला मुसलमान बहुसंख्यांक प्रांताचे रूप देऊन तेथे हिंदूंचे जिणे अशक्य करून सोडण्याची कारवाई चालू आहे. गेल्या अनेक वर्षांपासून बंगाल आणि इतर प्रांत यांमधील मुसलमान आसामात आणून त्यांची तेथे वस्ती करून आसामातील मुसलमानांची संख्या वाढविण्याचा पद्धतशीर प्रयत्न चालू असून त्याला बरेच यशही आले आहे. त्यासाठी आसाम विधिमंडळाने भूविकास निर्बंध संमत केला आहे. बाहेरच्या प्रांतांतून आसामात घुसणारी मुसलमानांची टोळधाड थांबविण्यासाठी हिंदू महासभेने सतत प्रयत्न चालविलेला असतानाही त्यावेळी अधिकारावर असलेल्या काँग्रेस मंत्रिमंडळाने हे आसामचे मुसलमानीकरण थांबविण्यास नकार दिला. हिंदू मतदारांनी निवडून दिलेल्या या हिंदू मंत्र्यांनी नवागत मुसलमानांच्या बरोबरीने हिंदूंना अधिकार देण्याचेही नाकारले ही गोष्ट विशेष लक्षात ठेवण्यासारखी आहे. अनेक ठिकाणी मुसलमानांकडून नव्याने आलेल्या हिंदूंवर संघटितपणे आक्रमण होत होते, तथापिकाँग्रेस मंत्रमंडळाने इस्लामी अनर्थात सापडलेल्या हिंदूंच्या जीविताला आणि वित्तालाही संरक्षण देण्याची काळजी बाळगली नाही, याहीपुढे जाऊन पुरोगामी गटाच्या काँग्रेसवाल्यांनी एक नामधारी 'मिश्र मंत्रिमंडळ' स्थापून त्या मंडळात आसाममधील मुस्लिम लीगचा पुढारी प्रधानमंत्र्याच्या अधिकारावर स्थापन केला. आसाममध्ये पाकिस्तानी मुस्लिम राज्य स्थापन करण्याचे लीगचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी याच मंत्रिमंडळाने हातभार लावलेला आहे.

सिंधपासून काश्मीरपर्यंत हिंदुस्थानची पश्चिम नि वायव्य सीमा यापूर्वीच मुस्लिम बहुसंख्यांक बनवून टाकण्यात आली आहे आणि तेच संकट पूर्वबंगाल नि आसाम यावर कोसळू पाहत आहे. ते अरिष्ट आपण टाळू शकलो नाही, तर हिंदुविश्वाच्या स्वातंत्र्याला, स्थैर्याला नि अधिसत्तेला तो एक नित्याचा धोका होऊन बसेल हे निश्चित!

तथापि आसाममधील हिंदूंची आजची लोकसंख्या आजच हिंदुस्थानातील अखिल हिंदू समाजाच्या पाठिंब्याने एकत्रित झाली आणि तिने भूविकास योजनेला कसून नि दृढनिश्चयाने विरोध करण्याचे ठरविले तर अजूनही हे संकट टाळता येईल, अद्यापि वेळ गेलेली नाही.

आसाममधील पराक्रमी, राष्ट्रभक्त आणि धर्मनिष्ठ पूर्वजांचे आजचे वंशज जर मनात आणतील तर ही हिंदुभक्षक लाट ते हा हा म्हणता परतवू शकतील. भूविकास योजनेची हिंदूविरोधक कार्यवाही आणि प्रत्यक्ष त्या योजनेचा निर्बंध याविरुद्ध सारे रान आसामी हिंदूंनी उठवून दिले पाहिजे.

आपण आपल्या तेजस्वी अतिहासाचा साक्षी असलेला हा हिंदूंचा आसाम मुसलमान होऊ देणार काय? नाही! नाही!! असे कदापि घडू देता कामा नये. त्यासाठी खालील तीन गोष्टी मात्र तत्काळ घडविल्या पाहिजेत.

(१) प्रथमतः आसामी हिंदूंनी परधार्जिण्या काँग्रेसच्या मानसिक दास्यत्वातून तत्काळ मुक्त ता करून घेतली पाहिजे. आसाममधील मुसलमान वसाहतवाल्यांकडून होणाऱ्या आक्रमणापासून हिंदूंचे रक्षण करण्याच्या कार्यात काँग्रेसचे काही पुढारी नि पुरोगामी गट दोन्हीही निरुपयोगीच ठरलेले आहेत. परंतु त्यांनी अवश्य लक्षात ठेवावे की मुसलमानमय झालेल्या आसामाचा भस्मासूर केव्हा तरी त्यांच्याही डोक्यावर हात ठेवण्याचा प्रयत्न केल्यावाचून राहणार नाही. यास्तव आसाममधील हिंदूंवर त्यांच्या भावी अल्प-संख्यांकत्वामुळे उद्या निश्चितपणे कोसळू पाहणाऱ्या आपत्तीपासून त्याचे जर रक्षण व्हावयाचे असेल, तर त्रयस्थ हिंदूंनी आताच याक्षणी काँग्रेसच्या ध्येयधोरणातील तथाकथित राष्ट्रीयत्वाच्या शापातून आपली मुक्त ता करून घ्यावी.

(२) दुसरे म्हणजे आसामांतील हिंदूंनी महासभेच्या ध्वजाखाली एकत्रित होणे अत्यावश्यक आहे. कारण आता हे साऱ्यांनाच माहीत आहे की, अखिल हिंदुस्थानातील इतर सर्व संस्थांपैकी हिंदू महासभा ही एकच अशी संस्था आहे की जिने या समीपच्या भविष्यात आसामाचा घास करुन पाहणाऱ्या घोर संकटाची पावले ओळखली आणि त्याला विरोध आरंभिला. हेही तितकेच सत्य आहे की, आसाममधील हिंदूंची गाऱ्हाणी वेशीवर टांगून त्यांच्या हितरक्षणार्थ अवघ्या भारतातील हिंदुजगताचा सक्रिय आधार याच महासभेने त्यांना मिळवून दिला.

आणि तसे पाहिले तर आसाममध्ये आजही हिंदूंचीच बहुसंख्या आहे. त्यांनी आता विधिमंडळाच्या कोणत्याही निवडणुकीत काँग्रेसवाल्या इच्छुकाला कधीही एकही मत टाकणार नाही, तर उलट ते मत सुस्पष्ट पणे हिंदुसंघटनेच्या दर्शिकेवर उभ्या राहिलेल्या केवळ हिंदुहितदर्शी इच्छुक असेल त्यालाच देईन अशी दृढ प्रतिज्ञा करावयास पाहिजे. अशाने आसाममधील हिंदू, आसाममध्ये अप्रत्यक्षतः हिंदू संघटनवाल्या मंत्र्यांचे मंत्रिमंडळ बनवून असे सरकार उत्पन्न करतील की जे उघडपणे नि निश्चितपणे आसामी हिंदूंच्या हिताची दक्षता घेऊ लागेल. ते हिंदू प्रधानमंडळ, मग या तिरस्करणीय योजनेचे तुकडे तुकडे उडवून हिंदू वसाहतवाल्यांना वैध रक्षण देईल नि त्यांच्या सुखसोयी पाहील. तसेच आसामच्या आसमंतातील डोंगरी हिंदू टोळयांना, आज वस्ती नसलेल्या प्रदेशात वसाहती स्थापून तो प्रदेश व्यापून टाकण्यासाठी साहाय्य करील आणि वस्तुतः अशा 'ॲबॉरिजिनल' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या (पण वस्तुतः खऱ्या) हिंदूंच्याचकरिता या पडीत जागा राखून ठेवल्या गेल्या पाहिजेत.

(३) आणि तिसरी महत्त्वाची गष्ट ही की, आसाम प्रांतिक हिंदू सभेची संघटना शक्य तितक्या त्वरेने एकदा घडविल्यानंतर सभेच्या हिंदू पुढाऱ्यांनी अशी एक योजना आखून ती व्यवहारावी की, जेणेकरून आसाममधील नि आसपासच्या हिंदू डोंगरी टोळया आणि बुद्धिमान नि उद्योगी हिंदू शेतकऱ्यांना ते एक विलोभन वाटावे. आसाममधील जे काही भूप्रदेश वसाहतीसाठी मोकळे करण्यात आले आहेत त्यात

घुसून तेथेच स्थायिक होण्याचा मोह वरील दोघांना जेणेकरून अनावर होईल अशीच ती योजना नि तिची कार्यवाही असावयास पाहिजे.

अर्थात चालू परिस्थितीत असे कोणीही म्हणत नाही की, अहिंदूंवर असमर्थनीय अशा प्रकारची बंदी घालून त्यांना अजिबात वगळावेच. आपण आता जर काही मागू शकत असू तर ते एवढेच की, अतरांच्या बरोबरीने हिंदूंनाही समान संरक्षण, समान संधी नि समान सोयी दिल्या गेल्या पाहिजेत. तथापि अतके झाले, तरी त्यापुढचे खरे काम म्हणजे दुसरा कोणी प्रतिस्पर्धी येऊन त्याने तेथे आपले बस्तान बसविण्याआधी हिंदूंनी तेथे प्रवेश करून आपले ठाण मांडले पाहिजे आणि ते कार्य यशस्वी करण्याचे दायित्व सर्वस्वी आसामी हिंदूंच्या तातडीच्या नि संघटित सिद्धतेवरच पडते. हिंदूंनी इतर अनेक दुर्घटनांवरून आता एवढा तरी धडा घ्यावा की, रडून कुंथून कधी कोठे संकटनिवारण होत नसते. आगामी आपत्तींशी यशस्वी रीतीने टक्कर द्यावयाची असेल तर एकच मार्ग. प्रतिपक्षाच्या कारस्थानी तसेच प्रभावी कारस्थान उभे करणे, तशी आपली समर्थ संघटना आसामी हिंदूंनी घडविली पाहिजे. शत्रूच्या शस्त्रांनीच त्यांच्याशी लढून विजय संपादण्याची शक्ती उत्पन्न केली पाहिजे. ‘धटासी पाहिजे धट, उद्धटासी पाहिजे उद्धट । खटनटासी खटनट । अगत्य करी ।’ लक्षात ठेवा की, याविना तरणोपाय नाही ।

आसाममधील हिंदूंनी वर सांगितलेले हे धोरण साऱ्या हिंदुस्थानातील हिंदुसंघटकांच्या पाठिब्याने प्रत्यक्षात आणण्यासाठी कंबर कसली तर यश दूर नाही. वरील कार्यक्रम आचरणात आणण्यास जसा अवघड नाही तशीच त्याच्या यशस्वीतेचीही खात्री देता येते आणि एकदा आमचे आसामी हिंदू असे दृढपणाने संघटित होऊन संग्रामार्थ उभे ठाकले म्हणजे आसाम, इस्लाम होण्याच्या संकटातून वाचेल. अतकेच नव्हे, तर तेथील हिंदू बहुसंख्य वेगाने शक्ति वान नि वर्धमान होत गेलेला दिसेल.”

www.savarkarsmarak.com

## संरक्षण मंडळाचे स्वागत

भारताला काहीतरी अधिकार देऊन चांगल्याच पेटलेल्या महायुद्धासाठी त्याचे सहकार्य मिळविणे ब्रिटनला आवश्यक वाटत होते. त्यानुसार २१ जुलैला व्हॉइसरॉयने आपल्या कार्यकारी मंडळाची वाढ केली आणि राष्ट्रीय संरक्षण मंडळांची घोषणा केली. ह्यासंबंधी काढलेल्या एका पत्रकात वीर सावरकर म्हणाले,

“हे योग्य दिशेने टाकलेले पाऊल आहे. पण ते इतक्या उशिरा नि कचरत टाकलेले आहे की त्यामुळे भारताचे समाधान होणे शक्य नाही. भारताला समान श्रेणी देण्याची सुबुद्धी या युद्धानेही ब्रिटनला दिली नाही. असे असले तरी भावी प्रगतीचा मार्ग चोखाळण्यासाठी, ब्रिटनच्या सेवकशाहीला पडलेल्या ह्या भगदाडाचा आपण भरपूर उपयोग करून घेतला पाहिजे. आजवर राज्यकर्ते सांगत होते की काँग्रेस नि मुस्लिम लीग यांचे ऐक्य झाल्यावाचून पुढचे पाऊल उचलता येणार नाही. त्यांचे हे म्हणणे किती असत्य होते याची शासनाला आता एकाएकी झालेली जाणीव लक्षणीय आहे! सरकारने अशाच प्रकारे पुढे येऊन भारतात एकमत नाही हे खोटे कारण न सांगता हिंदू महासभेने आणि पक्षातीत पुढाऱ्यांनी केलेल्या मागण्या मान्य कराव्यात.

ह्या मंडळात सर्वश्री जमनादास मेहता, काळीकर, डॉ. राघवेंद्रराव, मा. श्री. अणे, ज्वालाप्रसाद श्रीवास्तव, रामराव देशमुख, एन. सी. राजा, लाला रामशरणदास यांच्यासारख्या हिंदू जनतेचा नि हिंदू महासभेचा विश्वास असलेले नेते समाविष्ट केले गेले याचे मला समाधान वाटते."

## बहुसंख्य पक्ष एकच

१२ ऑगस्ट १९४१ रोजी सावरकरांनी एक विस्तृत पत्रक काढून भारतात दोन बहुसंख्यांक पक्ष आहेत, दोन बहुसंख्य जमाती आहेत अशी जी ब्रिटिश राजनीतीज्ञांची समजूत आहे ती कशी चुकीची आहे ते विशद केले आहे. या पत्रकात ते म्हणतातः

"भारतात दोन मोठे राजकीय पक्ष आहेत, दोन मोठ्या संघटना आहेत असे जे शब्दप्रयोग हेतुतः वापरले जात आहेत ते अतिशय फसवे आहेत. अनेकदा व्यवहारात जशी खोटी नाणी खऱ्या नाण्यांना मागे टाकतात, त्याचप्रमाणे दोन मोठे पक्ष, दोन मोठ्या जमाती हे फसवे शब्द सध्या भारतीय राजकारणात बरेच प्रभावी ठरत आहेत. पण ही शब्दावली अगदी फसवी आहे. एकाच वेळी एकाच देशात दोन अल्पसंख्य गट असू शकतील पण दोन बहुसंख्य किंवा दोन महान गट कसे असू शकणार? पण एखाद्या शाळकरी मुलालाही समजणारी ही चुकीची शब्दयोजना सर्वात शहाणे समजले जाणार राजकीय लेखक नि विचारवंत अहोरात्र बेधडकपणे वापरीत आहेत. भारतातील आणि इंग्लंड मधील वृत्तपत्रे नि सभास्थाने पोपटाप्रमाणे सांगत आहेत की भारतात हिंदू नि मुसलमान ह्या दोन बहुसंख्य जमाती आहेत. काँग्रेस नि मुस्लिम लीग हे दोन बहुमतवाले पक्ष आहेत. यावरून भारतात केवळ राजकारणच नव्हे तर अंकगणितही आडवे पडत असून गणितशास्त्र गाढव झाले आहे!!

ह्या परिस्थितीत राजकीय विचाराला योग्य वळण देण्यासाठी स्पष्टपणे सांगितले पाहिजे की येथे केवळ हिंदू हेच बहुसंख्य असून मुसलमान ही एक अल्पसंख्य जमात आहे. ही खरी स्थिती असताना आपला जुना माल अधिक भावाने विकण्यासाठी मुसलमानांनी दोन बहुसंख्य जमाती हा एक

शब्दप्रयोग प्रचारिला आणि तो सर्वांच्या गळी उतरवून त्यांना या देशातील विधानमंडळातून पन्नास टक्के प्रतिनिधित्व मिळवायचे आहे. पण अशा शब्दप्रयोगांनी गणिताचे सिद्धान्त पालटत नाहीत.

ब्रिटिश राजकारणी वृत्तपत्रांनीही दोन बहुसंख्य पक्ष ही शब्दावली रूढ केली आहे. पण या देशात काँग्रेस हा पक्ष मुस्लिम लीगपेक्षा संख्येने कितीतरी मोठा आहे. विधानसभांतून तर मुस्लिम लीग हा पक्ष काँग्रेसच्या पासंगालाही पुरणार नाही. भविष्यकाळात काँग्रेसने तिचे हिंदुघातकी धोरण असेच चालू ठेवले तर तीही अल्पसंख्य पक्ष होऊन हिंदुसंघटनवादी पक्ष हाच बहुसंख्य पक्ष होईल.

पण अगदी आजचे संख्याबळ घेतले तरीही हिंदू सभा ही मुस्लिम लीगपेक्षा मोठी संख्या असून मुस्लिम लीग हा तिसऱ्या श्रेणीचा पक्ष आहे."

## भाषणासाठी दोन अटी

सावरकरांना ठिकठिकाणाहून भाषणासाठी निमंत्रणे येत होती. ह्या भाषणांच्या निमंत्रणाला सावरकरांनी एक प्रकट उत्तर देणारे पत्रक १६ ऑगस्ट १९४१ रोजी काढले. त्यात ते लिहितातः

"भाषणाची सर्वच निमंत्रणे स्वीकारणे मला शक्य होणार नाही. दुसरे असे की काहीतरी अल्पस्वल्पका होईना परंतु विधायक कार्य घडत नसताही नुसती व्याख्यानेच देत राहण्याचा मला खरोखरीच वीट आला आहे. यासाठी मुंबईतील जे गणेशोत्सव मंडळ हिंदू राष्ट्रीय निधीला किंवा सामान्यतः हिंदुसंघटना कार्यास साहाय्य म्हणून निदान शंभर रुपये तरी देईल आणि माझे व्याख्यान हा सार्वजनिक कार्यक्रम असल्याने त्या व्याख्यानाच्या स्थानी सर्व हिंदूंना स्पृश्य-अस्पृश्य हा भेद न मानता प्रवेश मिळतो की नाही हे अजमावण्यासाठी माझ्यासमवेत असणाऱ्या अस्पृश्य बांधवांनाही जेथे प्रवेश असेल त्याच ठिकाणी काय ती मी भाषणे देईन."

## रूझवेल्ट नि शरदबाबूंना तार

२० ऑगस्ट १९४१ रोजी सावरकरांनी अमेरिकेचे अध्यक्ष श्री. रूझवेल्ट यांना एक तार पाठविली. ती अशीः

"अखिल भारतीय हिंदू महासभेचा अध्यक्ष या नात्याने माझी आपणास आग्रहाची सूचना अशी की, युद्धहेतूसंबंधी अग्लंड, अमेरिकेने जी संयुक्त घोषणा केली आहे तिच्या कक्षेत हिंदुस्थानचाही अंतर्भाव होतो नि म्हणून युद्ध संपताच एक वर्षाच्या आत हिंदुस्थानला संपूर्ण स्वातंत्र्य देण्यात येईल अशी घोषणा आपण करावी. ही घोषणा जर अमेरिकेने केली नाही तर त्याचा स्पष्ट अर्थ असा होईल की गेल्या महायुद्धातील घोषणेप्रमाणेच हेही एक नवे ढोंग आहे! आणि जे लोक साम्राज्य मिळविण्यासाठी धडपडत आहेत त्यांच्याशी साम्राज्य असणाऱ्या आणि ते टिकवू पाहणाऱ्या लोकांनी चालविलेल्या लढाईचे स्वरूप लपविण्यासाठी हा एक पडदा निर्माण करण्यात आला आहे."

वरील तार वाचून काँग्रेसी वृत्तपत्रांनी सावरकर अमेरिकेची व्यर्थ याचना करीत आहेत अशी टीका त्यावर केली. तेव्हा सावरकरांना आपल्या ह्या विद्युत् संदेशाचा अर्थ स्पष्ट करावा लागला. त्याचे स्पष्टीकरण असेः

'माझ्या ह्या विद्युत् संदेशातील, गेल्या युद्धातील घोषणेसारखीच ही एक धुळफेक ठरेल. ' आदी भाग जर शरदबाबूंना कोणी समजावून सांगेल तर ते त्या गंभीर धक्क्यातून सावध होतील आणि त्यांच्या हे लक्षात येईल की एखाद्या राजकीय घोषणेचे स्पष्टीकरण त्या घोषणेतील राजकीय ढोंग बाहेर फोडण्याच्या हेतूने मागणे आणि त्या घोषणेच्या पूर्ततेसाठी सहाय्याची अपेक्षा करणे या दोन गोष्टींत अंतर आहे."

## एकटे हिंदूच लढतील

२७ ऑगस्ट १९४१ रोजी सावरकरांनी शरदचंद्र बोस यांच्या वक्त व्याला उद्देशून एक प्रकट पत्रक काढले. त्यात सावरकर लिहितातः

"मुस्लिम लीग ही हिंदूंची उघड शत्रू आहे तर काँग्रेस हीही हिंदूंची विरोधी संस्था बनली आहे. हिंदुत्वनिष्ठ नेत्यांनी ही गोष्ट नीट ध्यानात ठेवावी आणि काँग्रेसच्या मोहजालात फसू नये. काँग्रेस पुन्हा अधिकारपदे घेणार असेल तर ती आम्ही तिच्यासाठी सोडू असली भोंगळ भाषा वापरू नये. कारण काँग्रेस अधिकाररूढ झाली की तीही हिंदूंचा घात केल्यावाचून राहणार नाही. ब्रिटिश शासनानेही लक्षात ठेवाव की या देशाच्या अखंडत्वासाठी नि संरक्षणासाठी मुसलमान मनापासून लढणार नसून एकटे हिंदूंच काय ते त्यासाठी प्राणपणाने लढतील."

## चर्चिल-रुझवेल्टना प्रश्न

ब्रिटनचे पंतप्रधान श्री. चर्चिल यांनी असे एक विधान केले होते की इंग्लंड -अमेरिकेच्या युद्धघोषणेतील स्वातंत्र्यदानासंबंधीचे आश्वासन केवळ जर्मन आक्रमणामुळे परतंत्र झालेल्या देशांनाच काय ते दिलेले आहे. पण हे स्वातंत्र्याचे आश्वासन ब्रिटिश सत्तेखाली असलेल्या भारताला किंवा आशिया-आफ्रिकेतील देशांना लागू होणार नाही!! चर्चिलच्या ह्या विधानाला सावरकर यांनी १९ सप्टेंबरला एका पत्रकाद्वारे जे उत्तर दिले त्यातील महत्त्वाचा भाग असा आहेः

"चर्चिलचे हे म्हणणे हिंदू महासभेला मुळीच आश्चर्यकारक वाटत नाही. कारण ब्रिटनचे हे धोरण आम्हाला पूर्णपणे माहीत आहे. आता चर्चिलने लावलेला हा अर्थ अध्यक्ष रुझवेल्ट यांना मान्य आहे की नाही तेवढेच पहावयाचे आहे. ह्या परिस्थितीत अमेरिकेसारख्या महान लोकशाहीचे अध्यक्ष जर स्वस्थ बसले तर तेही चर्चिलच्या तालावर नाचतात असेच समजले जाईल. तरी त्यांनी काय ते स्पष्टपणे सांगावे."

## नेल्लोरच्या हिंदूंना पाठिंबा

हिंदूंच्या अधिकारांच्या संबंधात मद्रासच्या हिंदूंना आवाहन करणारे एक पत्रक सावरकरांनी काढले. त्याचा आशय असाः

“हिंदूंच्या न्याय्य अधिकार रक्षणासाठी नेल्लोरच्या हिंदूंनी जो हा संग्राम चालविला आहे त्यात त्यांना न्याय मिळावा म्हणून मद्रास प्रांतातील सर्व हिंदूंनी मद्रास शासनावर दडपण आणावे. तसेच ठिकठिकाणच्या हिंदूंनी नेल्लोरमध्ये जाऊन तेथील हिंदूंना साहाय्य करावे. ख्रिश्चनांनीही या न्याय्य मागण्यांना पाठिबा द्यावा.”

## भागलपूर लढा प्रारंभ

५ डिसेंबर १९४१ रोजी सावरकरांनी एक विस्तृत पत्रक काढून त्यात राज्यपालांशी झालेल्या आपल्या पत्रव्यवहारांतील महत्त्वाची विधेये सांगून सर्व हिंदू सभा शाखांना सूचना दिली. ती अशीः

“हिंदू सभा शाखांनी १४ डिसेंबरला भागलपूर दिन पाळावा. त्या दिवशी सभा घेऊन हिंदू महासभा अधिवेशनावरील बंदी उठविण्यासाठी महाराज्यपालांनी मध्यस्थी करावी असा आग्रह करणारा प्रस्ताव करावा नि तो त्यांच्याकडे पाठवावा. या प्रस्तावात स्पष्ट करावे की, सरकारला आव्हान देण्याचा आमचा उद्देश नसून संघटनेचा नि आमचा जो न्याय्य नि मूलभूत अधिकार आहे, तो मान्य व्हावा हाच आमचा हेतू आहे.”

## जपानही स्वतःसाठी लढत आहे

जपानने महायुद्धात पदार्पण करून आपले सैन्य पुढे घुसविण्यास वेगाने प्रारंभ केला. पण त्याबद्दल सुखदुःखाची कोणतीही भावना प्रकट न करता सावरकरांनी जपानच्या युद्धप्रवेशासंबंधी १२ डिसेंबर १९४१ रोजी काढलेल्या पत्रकात म्हटले आहेः

"जपानने ब्रिटन नि अमेरिकेविरुद्ध केलेल्या चढाईमुळे हिंदू महासभेच्या चालू धोरणात काहीही पालट करण्याचे कारण नाही. कारण ब्रिटन, जर्मनी, अटली नि अमेरिकाच नव्हे तर रशियासुद्धा आपआपल्या राष्ट्रीय स्वार्थासाठी जसे लढत आहेत तसाच जपानही आता लढू लागला आहे. त्याचप्रमाणे हिंदुस्थाननेही आपल्या वर्तमान नि भविष्यकाळाच्या स्वार्थासाठीच युद्ध प्रयत्नात भाग घ्यावयाचा आहे. आता तर आपल्याला आवडो न आवडो युद्ध आपल्या दाराशी आल्याने आपण आपल्या घरादाराचे, मत्तेचे नि जीविताचे रक्षण करण्यासाठी सैनिक झाले पाहिजे. आधी युद्धसाधनांचे उत्पादन वाढविले पाहिजे."

## भागलपूरसंबंधी सूचना

भागलपूर अधिवेशनासंबंधीच्या गुप्त पत्रकात सावरकरांनी दिलेल्या सूचना महत्त्वाच्या आहेत. त्यांचा सारांश असाः

“(१) आपण शासनाला युद्धाचे आव्हान देऊन भागलपूरला जात नसल्याने ज्यांच्यावर बंदीआज्ञा बजावण्यात येईल, त्यांनी शारीरिक प्रतिकाराचे प्रदर्शन न करता आपल्या अधिकारांचे समर्थन करीत अटकही पत्करावी. (२) केंद्रीय कार्यालयाच्या सूचनांची वाट न पाहता स्वतःच पुढाकार घऊन निधी गोळा करून आठ दिवसांची खाण्यापिण्याची सोय करून आपआपले निःशस्त्र प्रतिकारक प्रतिनिधी पुरेशा उबदार कपड्यांसह भागलपूरला निरनिराळया तुकड्यांनी पाठवावेत. (३) १४ला भागलपूर दिन पाळून त्यामध्ये बंदीआज्ञेचा निषेध करून ती उठविण्याची मागणी करणारे ठराव करून ते तारेने व्हॉइसरॉयकडे पाठवावेत. (४) प्रत्येक भागाने दहा स्वयंसेवकांची तुकडी करून त्यात एकाला प्रमुख नेमून, गाजावाजा न करता जमेल त्या मार्गाने भागलपूरकडे जावे. (५) १४ ला उरलेल्या नेत्यांनी अनेक प्रतिनिधींसह प्रकटपणे भागलपूरकडे निघावे. तीनचतुर्थांश प्रतिनिधींनी गुप्तपणे पुढे जावे आणि एक चतुर्थांश प्रतिनिधींनी प्रकटपणे जावे. १४ रोजी सकाळी १० वाजता निःशस्त्र प्रतिकाराला प्रांरभ करावा. (६) भागलपुरात वा त्या जिल्ह्यात जेथे जेथे प्रतिनिधी पोचले असतील तेथे तेथे त्यांनी प्रभातफेऱ्या काढून, सभा घेऊन १४ ला सकाळी १० वाजता अधिवेशन कार्याला प्रारंभ करावा. (७) बंदी उठविली गेली नाही तर सर्वांनी एकाच ठिकाणी पकडले न जाता तो सारा भाग ंहदू धर्म की जय च्या घषणांनी निनादून सोडावा (८) ज्यांना अटक होईल त्यांच्या बातम्या सगळया वृत्तसंस्थांना नि वृत्तपत्रांना पाठविल्या जाव्यात. (९) चार दिवस ठरल्याप्रमाणे अधिवेशनाचा संदेश सांगून झाला की त्या दिवशीच्या सर्वाधिकाऱ्याने दिनांक १७ ला अधिवेशन संपल्याची घोषणा करावी आणि जे प्रतिनिधी नि स्वयंसेवक पकडले गेले नसतील त्यांनी आपआपल्या गावी परत जावे. (१०) अशा प्रकारे निश्चयाने आपण वागलो तर हिंदू महासभेचे हे तेविसावे अधिवेशन निश्चितपणे सर्वात यशस्वी अधिवेशन ठरेल.”

## ब्रिटिश हितरक्षक गांधी

काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीसंबंधी २० जानेवारी १९४२ रोजी सावरकरांनी काढलेल्या पत्रकाचा सारांश असाः

‘अ. भा. काँग्रेस महासमितीच्या बैठकीत झालेली भाषणे विचारविनिमय आणि मुख्य प्रस्ताव यावर नैराश्य नि फुटीरपणा यांची छाया पडलेली दिसावी याविषयी कीव वाटते. गांधीजींसारख्या केवळ सरकारनिष्ठच नव्हे तर आयुष्यभर खऱ्याखुऱ्या ब्रिटिशनिष्ठ असलेल्या नेत्याच्या नेतृत्वाखालील काँग्रेसला शासनाने का भ्यावे याचेच मला आश्चर्य वाटते. या अहिसावादी नि ब्रिटिशहितदक्ष नेत्याची

री सर्व काँग्रेसवाले आतापर्यंत ओढीतच आले आहेत आणि त्यांनी आपल्या वर्तनाने ब्रिटिश साम्राज्याला अनेकपरींनी लाभ करून दिलेला आहे. अशा या काँग्रेसचा तथाकथित राष्ट्रीय सरकारचा हट्ट सरकार का पुरवीत नाही ते कळत नाही. असहकार, अहिंसा किंवा स्वातंत्र्य या सर्व शब्दांचा काँग्रेसच्या चालू धोरणाच्या नि तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने होणारा अर्थ ब्रिटिश सरकारला सारखाच उपकारक आहे. तेव्हा एकदा आता काँग्रेसने वाटाघाटींचा दरवाजा उघडला असल्यामुळे सरकारने आपण होऊन तिची फारा दिवसांची अच्छा पुरी करण्याच्या प्रयत्नांना चालना द्यावी. ब्रिटनच्या साम्राज्यशाहीमध्ये नि नाझींच्या अधिकारशाहीत हिंदुस्थानच्या दृष्टीने फारच थोडे अंतर आहे हे सत्य काँग्रेसच्या नेत्यांना कळून आले याविषयी मला अत्यानंद होत आहे!'

## सिंगापूर पडले !

सिंगापूर पडल्याचे वृत्त कळल्यावर १७ फेब्रुवारी १९४२ रोजी सावरकरांनी एक प्रकट पत्रक काढले. ते असेः

"हिंदुस्थानच्या संरक्षणाच्या प्रश्नावर सिंगापूर पाडावाचा फार मोठा परिणाम होणार आहे. अशा काळात भारतीय जनतेत लढण्याचा एक निर्धार निर्माण व्हावा असे ब्रिटनला वाटत असेल तर हिंदुस्थानला भारत-ब्रिटन राष्ट्रसमूहात इतर वसाहतींप्रमाणे समानतेचे अधिकार नि श्रेणी देण्याची घोषणा ब्रिटिश नेत्यांनी करावी आणि त्याप्रमाणे हिंदुस्थानात राष्ट्रीय सरकार तत्काळ स्थापन करावे. हे पाऊल ब्रिटनने जपानच्या आधी उचलणे हेच ब्रिटनच्या हिताचे आहे. हिंदुस्थानच्या सीमेवर जपानी सेना येताच तिने 'हा हिंदुस्थान स्वतंत्र करण्यासाठी आम्ही येत आहो' अशी घोषणा केली तरच येथील लोकांत ब्रिटनला नको त्या भावना निर्माण होऊन परिस्थिती गुंतागुंतीची होईल. तसे होऊ नये यासाठी ब्रिटिश नेत्यांनी शक्य तितक्या लवकर भारतीय स्वातंत्र्याची घोषणा करून हिंदी लोकांत या युद्धासंबंधी आत्मीयतेची भावना निर्माण करावी हेच सर्वांच्या हिताचे ठरेल."

## राजाजीला ठणठणीत प्रत्युत्तर

७ मार्च १९४२ रोजी सावरकरांनी राजाजींच्या 'मुस्लिम लीगची मागणी कोणी नाकारणार नाही' ह्या विधानाला उत्तर देणारे एक पत्रक काढले त्यात सावरकर लिहितातः

"हिंदुस्थानची अनेक पाकिस्तानात फाळणी करावी ही मागणी राजाजींना न्याय्य वाटते काय? मध्यवर्ती शासनात मुस्लिम लीगशी पन्नास टक्क्यांची मागणी राजाजींना रास्त नि न्याय्य वाटते काय? आणि हे ज्यांना न्याय्य वाटत नाही ते राजनीतीज्ञ नसून एकटे राजाजीच काय ते राजनीती जाणतात अशी त्यांची समजूत आहे काय? वास्तविक राजाजींच्या वैयक्ति क मतासंबंधी मला अतके लिहिण्याची आवश्यकता वाटली नसती पण अलीकडे असे मानले जात आहे की लीग नि काँग्रेस यांचे मत म्हणजे सर्व देशाचे मत. त्यापैकी लीग ही मुसलमानांची प्रतिनिधी आहे आणि मग काँग्रेस ही

झाली हिंदूंची प्रतिनिधी असा आभास अलीकडे काही काँग्रेस नेतेही हेतुतः निर्माण करीत आहेत. यासाठी मला स्पष्टपणे निक्षून सांगावे लागत आहे की काँग्रेस ही हिंदू हिताचे रक्षण करणारी प्रातिनिधिक संस्था नसून हिंदू महासभेच्या संमतीवाचून करण्यात आलेली तडजोड हिंदूंवर बंधनकारक राहणार नाही. हिंदू महासभेची संमती घेतल्यावाचून मध्यवर्ती सरकारात मुसलमानांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षाही अधिक जागा देण्यात आल्या तर तो हिंदूंवर अन्याय झाला असे समजून तो करणारे हिंदुत्वाचे शत्रू समजले जातील."

## क्रिप्स योजना का फेटाळली

क्रिप्सच्या फाळणीच्या योजनेसंबंधीचे सावरकरांचे मत त्यांनी ७ एप्रिल १९४२ रोजी न्यूयॉर्क टाअम्सला पाठविलेल्या तारेत व्यक्त केले आहे ती तार पुढीलप्रमाणेः

"हिंदू महासभेने क्रिप्स योजना फेटाळून तडजोडीच्या वृत्तीचा अभाव दर्शविला आहे हा आपला समज चुकीचा आहे. ही योजना हिंदू महासभेने फक्त अंशतः मान्य केली आहे. ब्रिटनने भारताला समश्रेणी मानण्याचे जे वचन त्या योजनेत दिले आहे ते हिंदू सभेला मान्य आहे. पण त्यात प्रांतांना फुटून निघण्याच्या दिलेल्या अधिकारामुळे हिंदुस्थानचे अनेक तुकडे होतील. आम्हा हिंदूंना आमची पुण्यभूमी आणि पितृभूमी असलेल्या हिंदुस्थानचे अखंडत्व नि अविभाज्यत्व पवित्र वाटते. ती एक स्वयंसिद्ध वस्तुस्थिती असल्याचे सध्याचे भारतीय शासनही मान्य करते. असे असूनही फुटिरतेच्या कुटिल अटीसह ती योजना संपूर्ण स्वीकारा किंवा संपूर्ण धिक्कारा असा आग्रह सर क्रिप्स यांनी धरल्यामुळे ती पूर्णपणे धिक्कारणेच आम्ही पसंत केले. आमच्या ह्या विचारांना अखंडत्वासाठी गृहयुद्ध करणाऱ्या अमेरिकन जनतेने पाठिबा दिला पाहिजे. अल्पसंख्याकांना त्यांचे अधिकार देण्यास हिंदू केव्हाही सिद्ध

आहेत. परंतु एका राष्ट्राच्या पोटात दुसरे राष्ट्र निर्माण करण्याचे प्रयत्न हिंदू केव्हाही चालू देणार नाहीत.”

## पुढे युद्ध-शिक्षणच उपयोगी पडेल

९ एप्रिल १९४२ रोजी सावरकरांनी क्रिप्स योजनेसंबंधीचे आपले मत पुन्हा एका पत्रकात स्पष्ट केले आहे. ते असेः

“आता युद्ध देशाच्या दाराशी धडका देत आहे. तरी हिंदू तरुणांनी लाखांच्या संख्येने भूदल, वायुदल, नौदल, वायुसंरक्षक दल, नागरी संरक्षक दल यात प्रवेश करून तेथे दिले जाणारे शिक्षण घेऊन शस्त्रसज्ज व्हावे. या उपायानेच आपणाला युद्ध काळात होणाऱ्या सैनिकी अत्याचारापासून आणि अहिंदूंच्या गुंडगिरीपासून आपले रक्षण करता येईल. तसेच आज मिळालेले हे शास्त्रशिक्षण, लढाऊवृत्ती नि कार्यक्षमता युद्धोत्तर राष्ट्रीय शक्तीलाही उपयोगी ठरेल.”

## डॉ. आंबेडकरांचे अभिष्टचिंतन

१५ एप्रिल १९४२ रोजी सावरकरांनी डॉ. आंबेडकरांच्या सुवर्ण महोत्सवाच्या वेळी त्यांना दीर्घायुरारोग्य चिंतिले. या संबंधीच्या पत्रकात त्यांनी लिहिले आहेः

“आंबेडकरांना अस्पृश्यता निवारणासंबंधी धन्यवाद देताना त्यांचे हिंदुविरोधी विचार आणि वृत्ती हीही माझ्या लक्षात आहे. तीही हिंदुसंघटनाला साहाय्यक होईल अशी आशा धरून मी त्यांना दीर्घायुरारोग्य लाभावे अशी सदिच्छा व्यक्त करतो.”

## कोंकणी तरुणांनो नौदलात जा

२३ एप्रिल १९४२ रोजी सावरकरांनी कोकणातील युयुत्सुवृत्तीच्या होतकरू तरुणांना नौदलात भरती होण्याचे आवाहन करणारे एक पत्रक काढले. ते असेः

“भारतीय सेनादलातील हिंदूंचे संख्याबळ अद्यापही फारच अल्प आहे. अद्यापही हिंदू भीतीने वा मूर्खपणाने सैन्यात न शिरतील, तर त्यांचा भविष्यकाळ अंधःकारमय होईल.”

## चिनी-मुस्लिम शिष्टमंडळ

मे १९४२ च्या दरम्यान चिनी मुसलमानांचे एक शिष्टमंडळ भारतामध्ये आले होते. त्या शिष्टमंडळाच्या कारवायांवर प्रकाशझोत टाकणारे एक पत्रक सावरकरांनी काढले. त्यात ते लिहितातः

“आपल्या शेजारचे मित्रराष्ट्र जे चीन, त्यांच्यावतीने श्री. वू यांच्या नेतृत्वाखाली चिनी मुसलमानांचे एक शिष्टमंडळ हिंदुस्थानात आलेले आहे. त्यांच्या मनात पाकिस्तानचे विष भरवून देण्याचा उपद्व्याप हिंदी मुसलमानांनी चालविला आहे, तो आताच उघड करून सांगण्याचा आमचा उद्देश नव्हता; पण हे शिष्टमंडळ आपल्या कार्यक्षेत्राच्या मर्यादा उल्लंघीत आहे. चीन नि हिंदुस्थान यांजमधील स्नेहसंवर्धनाचे राष्ट्रीय कार्य त्यांनी करावयाचे आहे. त्याच्या पलीकडे ते जात आहे. नेल्लोरच्या मुसलमानांना या शिष्टमंडळाचे पुढारी श्री. वू यांनी जो संदेश दिला त्यात हिंदूविरोधी भावना व्यक्त केलेली आहे. म्हणूनच राष्टाचे सन्माननीय म्हणून त्यांचा मानसन्मान हिंदूंनी करावयाचा पण त्याविषयीचा आपला अधिकार या शिष्टमंडळाने गमविला आहे. याला जर वेळीच पायबंद घातला नाही तर त्याचे काय घोर परिणाम होतील हे हिंदूंना वेळीच सांगण्यात मी योग्य तेच करीत आहे, यासंबंधी माझ्या मनामध्ये थोडासुद्धा संदेह नाही.

ब्रह्मदेशात संमिश्र मुसलमानांची वस्ती झपाट्याने वाढत असून हिंदुस्थानप्रमाणेच ब्रह्मदेशाच्या एकसंधीपणालाही धोका उत्पन्न होईल अशी पूर्वसूचना दोनएक वर्षापूर्वी मी ब्रह्मी जनतेला दिली होती. निदान गेले एक शतकभर तरी ब्रह्मदेशातील मुसलमान ब्रह्मी मुलींशी लग्ने करीत होते. या

लग्नापासून झालेली संतती मुसलमान म्हणून वाढविण्याविषयी ते फार दक्ष असत. मुसलमान मात्र आपल्या मुली ब्रह्मी लोकांना देत नसत. असा जवळ जवळ त्यांचा नियमच ठरून गेला होता. भोळयाभाबड्या ब्रह्मी लोकांना तर लग्नासारख्या या सामाजिक गोष्टीत काही राजकीय धोका असेल असा संशयही आला नाही! लवकरच ब्रह्मी-मुस्लीम दंगे सुरू झाले. या दंग्यांना हिंदी-ब्रह्मी दंगे असे चुकीचे संबोधण्यात येत होते! मुसलमानांना आपल्या गुंडगिरीचे प्रायश्चित्त चांगलेच मिळाले. पण इतक्यात जपानी आक्रमण सुरू झाले आणि हे प्रश्न तसेच राहिले.

त्यानंतर आता चीनमधील परिस्थिती पाहू. चीनमध्ये मुसलमानांची संख्या कोटींनी मोजण्यासारखी आहे. एके काळी चीनमध्ये तार्तारांचे राज्य होते. तार्तारांनी मुसलमान धर्माचा स्वीकार केल्यावर चीनलाच ते आपले घर मानू लागले. त्याचप्रमाणे ते स्वतःला राज्यकर्ते म्हणून समजू लागले, पण तार्तारांच्या डोक्यावरच पाय ठेवून बुद्धाचे महान साम्राज्य उदयास आले. त्यात तार्तारांचे योग्य स्थान दाखविले गेले; त्यांना दाती तृण धरावयास लावले. पुढे चीन साम्राज्य अस्तास गेले. जपानने आक्रमण करून चीनचे मोठ-मोठे प्रदेश गिळंकृत केले नि त्याचबरोबर गेल्या महायुद्धाच्या वेळी 'अखिल इस्लाम' चळवळीचा उदय होऊन ती फैलावली. या चळवळीचा चीनमधील मुसलमानांवरही परिणाम झाला. आपण स्वतंत्र राष्ट्र आहोत, कुराणांवर ज्याचा विश्वास नाही ते विशेषतः हिंदू (बुद्ध धरून) हे आपले शत्रू आहेत ही भावना त्यांच्या मनात जागृत झाली. बौद्धांसंबंधी मुसलमानांना मनातून कसा द्वेष वाटतो, हिंदुस्थानकडे येणाऱ्या बुद्धांची मुसलमानांनी हत्या कशी केली, 'बुद्ध प्रस्ती' या शब्दाचा खरा अर्थ बुद्धाची पूजा असा आहे. पण मनुष्य जेवढे म्हणून करू शकेल तेवढे महापाप (अर्थात मुसलमानांच्या दृष्टीने) असा त्याचा अर्थ रूढ झाला, अतिहास सर्वांना विदीतच आहे. चिनी-मुस्लीम संघ स्थापन होऊन चिनी मुसलमानांनी चिनी राष्ट्रात सामील होण्याचे नाकारले नि आपण स्वतंत्र राष्ट्र असल्याचा आग्रह धराला हेही लक्षात घेण्यासारखे आहे.

कणखर योद्धा नि दूरदर्शी राजनीतिज्ञ या नात्याने मार्शल चिआंग कै शेक यांजविषयी आम्हाला अत्यंत आदर आहे. चीनमध्ये आम्ही सर्वच चिनी आहोत नि राजकारणात बुद्ध-चिनी असा वादच नाही अशी जी दंतकथा त्यांनी आपल्याला सांगितली ती ते राजनीतिज्ञ होते म्हणूनच! पण वस्तुस्थिती पाहता त्या महान सेनापतीचे हे विधान सत्यपूर्ण वाटत नाही. अखिल इस्लामचे गूढ समजावून घेण्याकरिता अगदी दोन-तीन वर्षापूर्वीच चिनी-मुसलमान तरुणांची एक तुकडी तुर्कस्थान नि अजिप्तमध्ये पाठवली गेली नव्हती काय? हे तरुण मुंबईत आले असता त्यांनी मि. जीना नि मुस्लिम लीगचे अन्य नेते यांच्या भेटी घेतल्या होत्या. आपला राष्ट्रीय वेश त्यांनी फेकून दिला नि नवीन राजवटीचे चिन्ह जसे एखाद्याने मिरवावे तशा नवीनच घेतलेल्या फेज टोप्या त्यांनी मिरविल्या. मि. वू यांच्या नेतृत्वाखाली आलेले चिनी मुसलमानांचे हे शिष्टमंडळ म्हणजे चिनी-मुसलमानांनी टाकलेले अत्यंत सूचक असे पाऊल आहे. अखिल इस्लाम चळवळीशी निकटचे संबंध जोडण्याचा त्यांचा मुख्य उद्देश आहे. हिंदी-मुसलमानांनीही कदाचित त्यांना या कार्यास्तव बोलाविले असेल. निजामापासून पाकिस्तान चळवळीच्या अनेक नेत्यांच्या त्यांनी भेटी घेतल्या असून युद्ध संपल्यानंतर हिंदी-मुसलमानांना साहाय्य करण्यास आपण

www.savarkarsmarak.com

चुकणार नाही अशी भुक्कड भाषा बोलण्याअतके ते धीट बनले आहेत. या युद्धाच्या शेवटी दुसऱ्याला साहाय्य देण्याच्या परिस्थितीत आपण राहू की स्वतः असहाय होऊ, याविषयी ते नक्की काही सांगू शकतील काय? गरुडाच्या भराऱ्या जोपर्यंत चालू आहेत तोपर्यंत चिमण्या-कावळयांनी त्याविरुद्ध करार करण्यात काय अर्थ आहे? चिनी-मुसलमान हिंदी-मुसलमानांना युद्धोत्तर जे साहाय्य देणार आहेत, ते हिंदूविरुद्ध नि पाकिस्तानकरिताच ना?

अशा परिस्थितीत सर महंमद झाफरुल्लाखान यांची चीनमधील हिंदुस्थानचे प्रतिनिधी म्हणून नेमणूक व्हावी हे दुश्चिन्हच होय. प्रत्येक कर्तव्य तत्पर मुसलमानाप्रमाणे तेही तेथे अखिल इस्लामी किवा पाकिस्तानी तत्त्वाचे घोडे पुढे दामटण्याचा संभव आहे. दिल्लीपासून सरसीमेवरील टोळयांच्या विभागापर्यंत पश्चिम पाकिस्तान करण्याचा मनोदय असलेल्या मुसलमानांनी या कामी आपण अफगाणिस्थानपासून तुर्कस्थानपर्यंतच्या हिंदुस्थानबाहेरील धर्मबांधवांचे साहाय्य घेऊ असे घोषित केले आहे. आसाम-बंगालमधील पूर्व पाकिस्तानसंबंधी त्यांना असे मनाचे मनोरे उभारता येत नाहीत. म्हणून ते चिनी-ब्रह्मी मुसलमानांशी लगट करण्याचा प्रयत्न करीत आहेत. असे जर असेल, तर हिंदूंच्या हातीही काही रामबाण आहेत याची मी त्यांना आठवण करून देतो. चिनी-मुसलमानांशी राजकीय, सांस्कृतिक गट्टी करणे हिंदी-मुसलमानांना शक्य असेल, तर जम्मूपासून जपानपर्यंत हिंदू-बुद्ध संयुक्त आघाडी स्थापन करणे हिंदूंनाही शक्य होईल. बेडूक फुगला म्हणून काही तो बैल होऊ शकत नाही! सर्व चिनी-मुसलमानांसह मि. वू यांनी हिंदी-मुसलमानांशी प्रणयाराधन केले, तरीही हिंदी अल्पसंख्य मुसलमान हे कधी बहुसंख्य होऊ शकणार नाहीत आणि पाकिस्तानही शक्य होणार नाही; मग ते आपले डोके चीनमध्ये वर काढोत की हिंदुस्थानात काढोत!!”

## साठावा वाढदिवस

२८ मे हा सावरकरांचा वाढदिवस १९४२ साली सावरकरांना ५९ वर्षे पूर्ण होऊन साठावे वर्ष लागत होते. हा वाढदिवस साजरा करणाऱ्यांचे आभार मानणाऱ्या पत्रकात सावरकर लिहितातः

"देशभरच्या लोकांनी या वाढदिवसानिमित्त माझे जे अभिष्टचिंतन केले त्याविषयी मी जर कृतज्ञता व्यक्त केली नाही तर मी आपल्या कर्तव्यामध्ये चुकलो असे होईल. या दिवशी अखिल हिंदुस्थानात सहस्रावधी सभा झाल्या. दीपोत्सव झाले. देवळातून प्रार्थना झाल्या. प्रभातफेऱ्या, मिरवणुकाही निघाल्या आणि अनेकांकडून पत्र नि तारा आल्या. जेव्हा एखाद्या व्यक्तीची जयंती त्याच्या जीवनकालात राष्ट्रव्यापी रीतीने साजरी होते तेव्हा त्याचाच अर्थ असा की ती व्यक्ती मानव्याच्या ज्या तत्त्वाकरिता झगडते त्या तत्त्वाविषयीच जनता आपला अनुकूल अभिप्राय व्यक्त करते. वैयत्ति क कृतज्ञतेपेक्षाही या जयंत्युत्सवाचा हा भागच मला अधिक मोलाचा वाटतो. मला दिलेले धन्यवाद हे हिंदुसंघटन कार्याला दिलेले धन्यवाद होत. संघटनी चळवळीने कोट्यवधी हिंदूंच्या मनाची पकड घेतल्याचेच हे प्रत्यंतर आहे. भारताचे स्वातंत्र्य, अखंडत्व नि राष्ट्रीय अैक्य याकरिता आज झुंजणारे नि काल रणांगणावर पडलेले माझे देशबांधव यात सहभागी आहेत!!"

## मद्रासमध्ये राजाजीला विरोध करा !

३ जून १९४२रोजी सावरकरांनी राजाजींच्या पाकिस्तानप्रचाराला पायबंद घालण्यासाठी मद्रासमध्येच पाकविरोधी चळवळ उभारण्याचे आवाहन करणारे एक पत्रक काढले. त्यात ते लिहितातः

"राजाजी केवळ एकटेच पाकिस्तानचे पाठीराखे नसून रायगडच्या काँग्रेसपासून गांधीजी नि आझादांसारखे काँग्रेस नेते जे मनातून बोलताहेत तेच राजाजी मोठ्याने सांगत आहेत असे स्वतः राजाजीच जे म्हणतात ते खरे आहे. डॉ. खरेही सांगतात की या काँग्रेस चौकडीने फुटून निघण्याची अच्छा असणाऱ्या प्रांतांना विरोध न करण्याचा निर्णय घेतलेला आहे. तरी मद्रासमधील हिंदू सभांनी ठिकठिकाणी सभा घेऊन राजाजींच्या नि काँग्रेसच्या ह्या पाकिस्तानी पाठपुराव्याचा प्रतिकार करावा."

## रेवा महाराजांची पदच्युती

७ जून १९४२रोजी सावरकरांनी रेवा महाराजांच्या संबंधी एक पत्रक प्रसिद्ध केले. त्यात त्यांनी लिहिलेः

"रेवाच्या महाराजांना काढून टाकण्याची जी आज्ञा व्हॉइसरॉयनी काढली आहे त्यासंबंधी हिंदू सभांनी विचारपूर्वक बोलावे. आता त्यासंबंधीची चौकशी करण्यासाठी व्हॉइसरॉयनी एक आयोग नेमला आहे हे चांगलेच झाले. तेथील लोकांनी महाराजांना पदच्युत करू नये अशी जी मागणी केली आहे तीही लक्षात घेतली जावी."

## सर मिर्झा इस्माइलला काढा !

१ जुलै १९४२ रोजी सावरकरांनी पाकिस्तानला विरोध करावा अशी सूचना देणारे एक पत्रक काढले. ते असेः

"मुसलमानांचे वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने कारवाया करणे हेच पवित्र कर्तव्य समजणाऱ्या सर मिर्झा इस्माइल यांची जयपूरसारख्या हिंदू संस्थानच्या दिवाणपदी नेमणूक व्हावी ही घटना खेदजनक आहे. ते जरी उघडपणे कट्टर पाकिस्तानवादी दिसत नसले तरी म्हैसूरचे दिवाण असताना त्यांनी मुसलमानांचे हित कसे पाहिले हे मी माझ्या मद्रास दौऱ्यात प्रकटपणे सांगितले आहे. तेथून मिर्झा इस्माइल निघाल्याने तेथील हिंदू प्रजेची सुटका झाली ही आनंदाची गोष्ट आहे. पण जयपूरमध्ये जर मिर्झांनी म्हैसूरसारखेच हिंदूविरोधी धोरण अवलंबिले तर तेथील हिंदू सभा, हिंदुसेनादल, आर्यसमाज यांनी त्यांचा तत्काळ प्रतिकार केला पाहिजे. तसे झाल्यास जयपूरच्या महाराजांनीही त्यांना तत्काळ कामावरून कमी करण्यास मागेपुढे पाहू नये."

## भारताला अधिक द्या !

जुलै १९४२ मध्ये व्हॉइसरॉयने आपल्या कार्यकारी मंडळात वाढ करून त्यामध्ये सावरकरांनी सुचविलेल्या काही व्यक्तींचा समावेश केला. ह्या संबंधीच्या एका अभिनंदनपर पत्रकात सावरकर लिहितातः

"काही महान दोष असले तरीही घटनात्मक प्रगतीचे पुढचे पाऊल या दृष्टीने व्हॉइसरॉयनी केलेल्या कार्यकारी मंडळाच्या विस्ताराचे मी स्वागत करतो. यावेळी व्हॉइसरॉयने निवडलेले नेते अनुभवी,

कार्यकुशल आणि समाजाचे प्रतिनिधी आहेत. मग पाकिस्तानवादी नेते काहीही म्हणोत. पण शासनाने हे लक्षात ठेवावे की अशा छोट्या सुधारणांनी सध्या तरी जनता मनापासून युद्ध साहाय्याला अनुकूल होणार नाही. त्यासाठी भारताला संपूर्ण स्वातंत्र्याचे नि भारत-ब्रिटन राष्ट्रसमूहात समानतेचे अधिकार दिले पाहिजेत. थोडक्यात म्हणजे ब्रिटनचे शत्रू भारताला जे देऊ शकतील नि त्यांच्याकडे वळवू शकतील त्याहीपेक्षा अधिक ब्रिटनने भारताला दिले पाहिजे."

## जैन यात्रीकर घेऊ नका

५ जुलै १९४२रोजी सावरकरांनी सिरोहीच्या महाराजांना प्रकट विनंती केली की त्यांनी अबूमधील जैन मंदिराकडे जाणाऱ्यांवर कर लादू नये. कररूपाने जे पैसे मिळतील त्यापेक्षा हिंदू जनतेची सहानुभूती अधिक मोलाची आहे हे ओळखून कोणतीही चळवळ होण्यापूर्वीच महाराजांनी निर्बंधादी अडचणी न सांगता हा कर रद्द करावा.

## काश्मिरी मुसलमानांना उत्तर

जुलै १९४२ मध्ये काश्मीरच्या दौऱ्याच्या प्रारंभीच तेथील मुसलमानांनी सावरकरांना एक प्रकटपत्र सादर करून न्याय मागितला होता. त्याच पत्राला उत्तर देण्यासाठी सावरकरांनी एक पत्रक काढले. त्या पत्रकाचा मथितार्थ असा :

"या प्रश्नाचा विचार करताना काश्मीर हा भारताचा एक भाग समजून त्याचा विचार करावा लागतो. जे लोक अखंड हिंदुस्थानला मान्यता देतील, त्यांच्याशी पूर्ण निष्ठेने वागतील, त्यांच्या संबंधात हा न्याय्य विचार केला जाईल. परंतु जे लोक ह्या देशाचे तुकडे करण्याची मागणी करतात, शत्रुपक्षाचे हेर नि हस्तक म्हणून येथे वावरतात त्यांना राष्ट्रीय न्याय मागण्याचा अधिकार नसतो. ते जर पाकिस्तानचा हट्ट सोडतील आणि या देशाचे नागरिक म्हणून सर्व कर्तव्ये पार पाडण्यास सिद्ध असतील

तर त्यांना एक मनुष्य एक मत, लोकसंख्येच्या प्रमाणात स्थाने हे तत्त्व हिंदू सभा मान्य करील. गुणानुसार सेवा नि चाकऱ्या असे हिंदू सभेचे मत आहे. हा नियम सर्व कारभारात भारताला लागू होईल तेव्हाच तो काश्मीरला लावावा असे हिंदू सभेचे म्हणणे आहे."

## गांधी प्रभृतींना अटक

युद्धात गुंतलेल्या ब्रिटिश राज्यकर्त्यांनी वाटाघाटीत वेळ वाया न घालविण्याचा निर्णय घेऊन गांधी प्रभृती काँग्रेस नेत्यांना ९ ऑगस्ट १९४२ रोजी अचानक अटक केली; काँग्रेस अवैध ठरवून दडपशाही चालू केली. या संबंधात सावरकरांनी काढलेल्या पत्रकाचा सारांश असाः

"अपरिहार्य होते ते घडले. गांधीजींसह काँग्रेसचे आघाडीचे देशभक्त नेते पकडून बंदिगृहात डांबले गेले. त्यांच्या देशभक्तीच्या कार्यासंबंधी हिंदूसभा सदस्यांना सहानुभूती वाटत आहे. ब्रिटिश सरकारलाही आमचे सांगणे आहे की भारताची सहानुभूती मिळविण्यासाठी त्यांनी भारताला समानतेची श्रेणी द्यावी. तसेच हिंदुत्वनिष्ठांनीही हे लक्षात ठेवावे की आम्ही पुणे येथील भाषणात सुचविलेल्या तीन मागण्यांना काँग्रेसच्या प्रस्तावाने मान्यता दिलेली नाही. त्यामुळे काँग्रेसच्या संपूर्ण प्रस्तावाला हिंदूंनी पूर्ण मान्यता देऊ नये. तसेच हिंदू महासभेच्या कार्यकारी मंडळाची सभा होईपर्यंत यासंबंधी कोणताही महत्त्वाचा निर्णय घेऊ नये."

## ब्रिटिश वृत्तपत्रांना सूचना

१८ ऑगस्ट १९४२रोजी ब्रिटिश वृत्तपत्रांना पाठविलेल्या पत्रकात सावरकरांनी लिहिले.

"भारतातील राष्ट्रीय असंतष केवळ दडपशाहीच्या उपायांनी शमणार नाही. आता वाटाघाटीत वेळ न दवडता युद्धात भारताचे सहकार्य मिळविण्यासाठी ब्रिटनने खालील गोष्टी तत्काळ कराव्यात. (१) हिंदुस्थानला समान श्रेणी दिल्याची घोषणा ब्रिटिश लोकसभेने करावी. (२) व्हॉइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे संपूर्ण राष्ट्रीयकरण करावे. (३) शक्य तो लवकर सैन्याचे भारतीयकरण करावे. (४) केंद्राप्रमाणे प्रांतांतूनही कार्यकारी मंडळे नेमावीत. (५) युद्धोत्तर घटना समिती नेमावी. यापैकी बहुतेक सूचना क्रिप्स योजनेत होत्या. त्या योजनेतील घातक भाग तेवढा मी वगळला आहे. दुसरी गोष्ट अशी की महासभेची संमती घेतल्यावाचून केवळ काँग्रेस आणि लीगच्या संमतीने ब्रिटनने कोणतीही गोष्ट करू नये. कारण काँग्रेसने स्वतःच ती हिंदूंची प्रतिनिधी नाही असे सांगितले आहे. तरी हिंदू महासभेची संमती न घेता केलेला कोणताही करार हिंदूंवर बंधनकारक असणार नाही, हे ब्रिटिश लोकमताने लक्षात ठेवावे."

## त्यागपत्रे देऊ नका

हिंदू महासभेच्या कार्यकारी मंडळाच्या सभेत एकमताने वीर सावरकरांना अध्यक्षपदाचे त्यागपत्र मागे घेण्याची विनंती केली. त्यानंतर ३ सप्टेंबर १९४२रोजी एक प्रकट पत्रक काढून सावरकरांनी सर्वांना आदेश दिलाः

“हिंदू महासभेच्या प्रस्तावासंबंधी काही लोकांनी जाणूनबुजून चुकीचा अर्थ लावून हिंदुत्वनिष्ठांना त्यांच्या शासकीय स्थानांची किवा सैन्यदल, नौदल, वायुदलातील चाकऱ्यांची त्यागपत्रे देण्यास सांगत आहेत. पण कोणीही हिंदुत्वनिष्ठाने तसे न करता त्यांनी आपआपले कर्तव्य करीत हिंदुहिताचे रक्षण करावे. तसेच त्यांनी हेही लक्षात ठेवावे की त्यांची शासनातील स्थाने त्यांनी सोडली तर ती देशद्रोही परकीय बळकावतील आणि हिंदूंना शासकीय सत्तेने सतावतील. हा धोका टाळणे हीही एक देशसेवाच आहे. ’

## एकमुखी मागणी तरी करा !

९ सप्टेंबर १९४२ रोजी सावरकरांनी प्रख्यात पुढाऱ्यांना नि देशभक्त दलांना कळकळीचे आवाहन करणारे एक पत्रक काढले. ते असेः

“डॉ. श्यामप्रसाद मुकर्जी नि महासभेच्या उपसमितीच्या सभासदांनी भारताची एकमुखी मागणी शासनापुढे ठेवण्याच्या प्रयत्नात साहाय्य करावे. साध्यानुकूल सहकार्य या सूत्राप्रमाणे जमेल त्या सर्व पक्षांशी नि पुढाऱ्यांशी सहकार्य करीत राहणे हे हिंदू महासभेचे धोरण आहे. अशी विविध पक्षांची एकमुखी मागणीही सरकार स्वीकारणार नाही हे सत्य असले तरी अशी मागणी केलेलीच नव्हती हे कारण तरी सरकारला सांगता येणार नाही आणि अशा मागणीचा पुढे एकत्र येण्यास उपयोग होईल यासाठी सर्वांनी हिंदू महासभेच्या समितीशी सहकार्य करावे.

## भारताचे भवितव्य युध्द देवतेच्या हाती

इंग्लंड च्या लोकसभेत पंतप्रधान चर्चिल यांनी सांगितले की भारताला स्वातंत्र्य देण्याचा सध्या प्रश्नच उरला नसून तेथे भरपूर सैन्य ठेवून शांतता प्रस्थापित केलेली आहे! चर्चिलच्या ह्या उद्गारांना उत्तर देणाऱ्या, १४ सप्टेंबर १९४२ रोजी काढलेल्या पत्रकात सावरकर म्हणतात.

"चर्चिलचे हे भाषण ब्रिटिश शासनाची मनोवृत्ती जाणणाऱ्या कोणालाही काही आठवडे अगोदर लिहून देता आले असते! भारतात सर्वत्रच शांतता असण्याची ग्वाही देऊन आत्मसंतुष्ट राहणारे नेते धन्य होत!! चर्चिलच्या ह्या भाषणाने ब्रिटन कशासाठी लढत आहे हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले. हिंदू सभा प्रथमपासून हेच सांगत होती. चर्चिल यांच्या या भाषणाने राजकारणात नैतिक बलापेक्षा सैनिकी सामर्थ्याचाच उपयोग अधिक असतो; हे पुन्हा सिद्ध झाले आहे. पण आपण लक्षात ठेवावे की भारताचे भवितव्य चर्चिलच्या हाती नसून युद्ध देवतेच्या हाती आहे!"

## परदेशांत प्रचारक पाठवा

राजा महेश्वर दयाळ यांची मुंबईत भेट झाल्यावर, ऑगस्ट १९४२ मध्ये काढलेल्या पत्रकात सावरकर म्हणतातः

"भारताची एकमुखी मागणी नाही असा जो प्रचार परदेशात चालू होता त्याला हिंदू महासभेच्या ह्या उपसमितीने एकमुखी मागणी सादर करून चांगले उत्तर दिले आहे. पण सर्व भारतीयांनी एकमुखी मागणी केली तरी केवळ या मागणीने ब्रिटन भारताला स्वातंत्र्य देणार नाही. काँग्रेस नि लीगने एकमुखी मागणी केली की स्वातंत्र्य मिळेलच या भ्रामक समजुतीनेच लीगचा भाव विनाकारण वाढला आहे. कारण अशी एकमुखी मागणी घेऊन तुम्ही सारे इंग्लंड ला गेलात तर हे ब्रिटिश राजकारणी सांगतील, 'बाळांनो "तुम्ही एकी केलीत फार चांगले झाले. पण तुम्ही निराधार, निःशस्त्र नि असमर्थ असल्याने आक्रमकांपासून तुमचे रक्षण करण्यासाठी तुमच्यावर राज्य करण्याचे दायित्व आम्ही सोडू शकत नाही." ब्रिटनच्या तोंडून हे उघड सत्य वदवून घेण्याअतका महासभेच्या ह्या उपसमितीच्या प्रयत्नांचा उपयोग झाला आहे. या मागणीला शीख समाज, मोमीन परिषद, तसेच अन्य मुस्लिम समाज, ख्रिश्चन समाज, लिबरल फेडरेशन, बंगाल नि सिंधचे प्रधानमंत्री यांचा पाठिंबा मिळाला. आता भारतात एकवाक्यता नाही असा जो प्रचार ब्रिटनने परदेशात चालविला आहे तो कसा फसवा आहे हे परदेशांना दाखविण्यासाठी हिंदू महासभेने आपले प्रचारक तिकडेही पाठविले पाहिजेत."

## विजयादशमीचा संदेश

१७ ऑक्टोबर १९४२रोजी सावरकरांनी एक पत्रक काढून हिंदू जनतेला विजयादशमीचा संदेश दिला. बॅ. जीनाने ईदच्या दिवशी सर्व मुसलमानांना पाकिस्तानसाठी अल्लाची प्रार्थना करण्यास सांगितले होते. त्याला या संदेशात सणसणीत उत्तर देताना सावरकरांनी संदेशाच्या प्रारंभी हिंदूंचा ५००० वर्षांचा विजयी अतिहास सांगितला आहे. आपण ग्रीक, शक, हूण, या आक्रमकांना कसे पचविले त्याची आठवण करून देऊन सावरकर पुढे लिहितातः

“जीनांनी मुसलमानांना त्यांनी येथे संपादिलेल्या बलिष्ठ राज्याची तेवढीच आठवण दिली. पण त्यांना पुढची आठवण देऊन सांगतो की सन १६०० मध्ये भारतात संपूर्ण पाकिस्तान स्थापन झाले असता पुढे सन १७०० ते १७९८ मध्ये हिंदूंचा सर्वत्र विजय होत होता असे दिसून येते. या काळात शिखांनी पंजाबला मुसलमानी सत्तेखालून सोडवले होते. आणि तिबेटच्या सीमेपासून काबूलपर्यंत त्यांचे राज्य होते. नेपाळमध्ये गुरखे राज्य करीत होते तर दिल्लीपासून रामेश्वरापर्यंत मराठ्यांची सत्ता होती. अशा प्रकारे मुसलमानांनी प्रस्थापिलेले पाकिस्तान गाडण्यात आले होते. यावरून तरी बोध घ्यावा आणि पाकिस्तानची मनोराज्ये करताना आपल्या दैवी काय येईल याचाही विचार करावा.”

याच संदेशात सावरकरांनी पुढे सांगितले, “मुसलमानांचा बीमोड हिंदू करीत होते तोच अंग्रज येथे आले. अैतिहासिक कालमानाने पाहिले तर ही केवळ आजची घटना आहे आणि कोणी सांगावे कदाचित ‘उद्याचा दिवस’ उजाडण्यापूर्वीच ब्रिटिशांचीही इतर आक्रमकांसारखीच गत होण्याचा अधिक संभव आहे. अर्थात हिंदूंनो! तुम्ही आत्मवंचना न केली तरच हे घडू शकेल!!”

याच पत्रकात सावरकरांनी पुढे सांगितले की, "जागतिक रणक्षेत्रावर दैवाचे फासे फेकले गेले आहेत. कल्पनातीत नि अनपेक्षित शक्ती तर मोकाट सुटल्या आहेत. त्यायोगेच हिंदुत्व पुन्हा एकदा विजयी होणार आहे. त्यासाठी हिंदूंनो! आपण स्वाभिमान जागृत ठेवून आत्मवंचना करू नये. देवाने हिंदुसंघटन रूपाने अवतार घेतला आहे. त्याच्या संदेशानुरूप राजनीतीचे हिंदूकरण नि हिंदूंचे सैनिकीकरण करून आपल्या विजयाचे नवे पान लिहा!"

## देश अखंडच ठेवा !

२५ डिसेंबर १९४२रोजी सावरकरांनी काढलेल्या पत्रकात हिंदुस्थानच्या भौगोलिक ऐक्यावर भर देणारे भाषण व्हॉइसरॉयनी केले, ह्याविषयी त्यांना धन्यवाद दिले असून पुढे म्हटले आहे की हिंदुस्थानातील ख्रिश्चन, ज्यू, पारशी, मोमीन आदी बहुतेक अल्पसंख्याकांचा हिंदू महासभेच्या मागणीला पाठिंबा असताना देशाची फाळणी करणे घातक ठरेल."

## सिधचा पाकिस्तानचा प्रस्ताव

सिधमधील विधानसभेने मुसलमानी बहुमताच्या बळावर पाकिस्तानचा प्रस्ताव संमत केला. त्यासंबंधी १० मार्च १९४३रोजी काढलेल्या पत्रकात सावरकर म्हणतातः

"हा प्रस्ताव पुढील प्रस्तावांचा प्रारंभ आहे. हा प्रस्ताव अशा स्पष्ट भाषेत मांडण्यात आला आहे त्यावरून हिंदूंनी बोध घ्यावा, की आपण ह्या मुसलमानांना कितीही अधिक दिले तरी त्यांचे समाधान होणार नाही. आता पाकिस्तान ही केवळ भ्रांत कल्पना आहे, तो साप नसून ती केवळ दोरी आहे. असे आता आंधळेच काय ते म्हणतील! दुसरी लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे या प्रस्तावाला सर्व हिंदू सदस्यांनी आणि हिंदू मंत्र्यांनी विरोध केला आहे. हेच मंत्री जर काँग्रेस दर्शिकेवर निवडून गेलेले असते तर स्वयंनिर्णयाला मान्यता, पाकिस्तान मुसलमानांना हवे असल्यास त्याला विरोध कोण करील या शब्दभ्रमाखाली त्यांनी या ठरावाला विरोध केला नसता. तरी हिंदू मतदारांनी हा धोका लक्षात घेऊन हिंदूत्वनिष्ठ अच्छुकांनाच निवडून द्यावे, तरच पाकिस्तानचा प्रस्ताव फेटाळला जाईल."

## हूरांची बंडाळी मोडा

२१ मार्च १९४३रोजी सावरकरांनी एक पत्रक काढून सिंधमधील हुरांचे बंड मोडण्यासाठी सिंधच्या राज्यपालांनी योजलेल्या कडक उपायांना प्रकट पाठिंबा दिला. त्या पत्रकाचा मुख्य भाग असाः

"सिंधमधील हुरांची बंडाळी मोडण्यासाठी जो सैनिकी निर्बंध पुकारलेला आहे तो रद्द करावा यासाठी मध्यवर्ती विधिमंडळात सिंध सरकारवर दडपण आणण्याचा हिंदू घातकी प्रयत्न मुस्लिम लीगवाले करीत आहेत. हूर लोक हिंदू विरोधी असल्याने त्यांना कडक शासन व्हावे यासाठी हिंदूंनी राज्यकर्त्यांना पाठिंबा देणे आवश्यक आहे. त्यांनी आजवर हिंदूंवर अनेक भयंकर अत्याचार केले आहेत. या अमानुष अत्याचारी लोकांविषयी सहानुभूती बाळगणे म्हणजे त्यांच्या अत्याचारांना बळी पडलेल्या सहस्त्रावधी निरपराध हिंदू आबालवृद्ध स्त्रीपुरुषांविषयी निष्ठुरता व्यक्त करणे होय. अशा संघटित, धर्मवेड्या, सशस्त्र लोकांना यावेळी दया दाखविणे म्हणजे अशी कृत्ये पुन्हा करण्याची त्यांना संधी देणेच होय. अशा क्रूर लोकांना दया दाखवावी ही मागणी अयोग्य आहे तरी तशा मागणीला कोणीही हिंदूने पाठिंबा देऊ नये.

## जीनांना उत्तर

'व्हॉइसरॉयऐवजी गांधींनी मलाच सरळ का पत्र लिहिले नाही? माझे पत्र अडविण्याची कुणाची छाती आहे? माझ्या पत्रव्यवहारामध्ये व्हॉइसरॉयनी ढवळाढवळ केली तर त्याचे परिणाम भयंकर होतील. ' जीनांच्या ह्या उद्गारांचा एका पत्रकात उल्लेख करून सावरकर त्यांना हिणविताना लिहितात :

"मराठ्यांनी दिल्लीच्या मोंगल बादशहाची जी अवस्था करुन टाकली होती तशी स्थिती जर जीनांनी व्हॉइसरॉयची केली असेल तर हे जीना व्हॉइसरॉयना बंदिवान करून, त्यांच्याच निवासस्थानात स्वतः बसून पाकिस्तान स्थापन झाल्याची घोषणा का करीत नाहीत ? जीनांची ही दर्पोक्त ी अैकून व्हॉइसरॉय मात्र हसत असतील.

त्याच भाषणात जीनांनी पुढे म्हटले आहे की एकदा का गांधींनी असे पत्र पाठविले की ब्रिटिशांना हिंदुस्थान सोडणे भाग पडेल. अर्थात ब्रिटिशांनी हिंदुस्थान सोडताना जपान्यांपासून पाकचे रक्षण करण्यासाठी ब्रिटिशांचे सैन्य येथे ठेवावे अशी सूचना जीनांनीही त्या भाषणात केली आहे. मात्र ह्या भाषणात जीनांनी हिंदू महासभेचे नावही न घेण्याचा सूज्ञपणा दाखविला आहे. कारण त्यांना पक्के ठाऊक आहे की हिंदू महासभेच्या पत्रशीर्षकावर अखंड हिंदुस्थानची मुद्रा पक्की ठोकलेली असून केवळ गांधीनिष्ठ काँग्रेसच पाकिस्तानला मान्यता देऊ शकेल. म्हणून जीनांनी हिंदू महासभेचे नाव न घेता केवळ काँग्रेसकडून अशा पत्रांची अपेक्षा केली आहे. काँग्रेसला हिंदुसंस्था म्हटले की आपण हिंदुसंस्था नाही हे सिद्ध करण्यासाठी काँग्रेस आपण काय मागू ते देईल अशी बॅ. जीना यांची जुन्या अनुभवाने निश्चिती झालेली आहे. म्हणूनच ते काँग्रेसला हिंदू संस्था म्हणून चिडवीत आहेत आणि हिंदू सभा ही स्वतःला अभिमानाने हिंदू संस्था म्हणत असल्यामुळे जीना तिचे नावही घेत नाहीत. तरी आता कट्टर राष्ट्रनिष्ठ काँग्रेसवाल्यांनी बॅ. जीनांचा हा कुटिल डाव ओळखून, खिलापत-स्वराज्य चळवळींतून केवळ आफतच आली हे लक्षात ठेऊन या पाकिस्तान-स्वराज्य चळवळीतून पाकिस्तानचे भूत निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

याच संबंधात हिंदुत्वनिष्ठांनीही लक्षात ठेवावे की काँग्रेसवाले बंदिवासात असोत वा बाहेर असोत ते हिंदू-मुस्लिम अैक्याच्या मृगजळामागे लागून पाकिस्तानला निश्चितपणे मान्यता देतील. मातृभूमीचे तुकडे करण्यास ते कचरणार नाहीत. तरी त्यावेळी हिंदूत्वनिष्ठांनाच त्या अपवित्र युतीचा प्रतिकार करावा लागेल आणि हिंदुस्थानचे स्वातंत्र्य नि अखंडत्व यांना विरोध असणाऱ्या सर्व शक्तींचा पाडाव करावा लागेल."

## मंत्रिमंडळासंबंधी सूचना

२८ मे हा सावरकरांचा वाढदिवस. १९४२ रोजी त्यांचा वाढदिवस साजरा होत होता तेव्हा देशातील अनेक प्रांतांतून राज्यपालांची राजवट चालू होती. काँग्रेस नेते बंदिवासात होते. पण जे बाहेर होते त्यातील काही आणि अन्य पक्षीय नेते संयुक्त मंत्रिमंडळे स्थापण्याचा प्रयत्न करीत होते. त्यासंबंधी आपले विचार व्यक्त करताना १० जून १९४३ रोजी सावरकरांनी लिहिले.

“देशभक्तीने नि शुद्ध हेतूने प्रेरित होऊन जर संयुक्त मंत्रिमंडळे बनविण्यात आली तर संघशक्तीने काम करण्याचे शिक्षण आपल्याला मिळून परकेपणाची भावना नष्ट होईल. या संबंधात हिंदू सभावाद्यांनी खालील सूचना लक्षात ठेवाव्यात. त्याची मुख्य तत्त्वे अशी: ज्या प्रांतात हिंदू अल्पसंख्य असून मुस्लिम मंत्रिमंडळे होणे अपरिहार्य असेल तेथे हिंदूंनी प्रवेश करून शक्य तितकी अधिकाधिक मंत्रिपदे मिळवावीत. मग त्या विधिमंडळातून स्वयंनिर्णयासारखे हिंदूघातक जे प्रस्ताव येतील त्याला ह्या मंत्र्यांनी नि अन्य हिंदुसदस्यांनी निर्धाराने विरोध करावा. युद्धानंतर भविष्यकाळात जी कोणती घटना बनविण्यात येईल ती बनविताना लीग नि काँग्रेस यांच्या बरोबरीने हिंदू सभेचाही विचार घेतला पाहिजे. महासभेचा हा अधिकार सिद्ध करण्याकरिता हिंदू सभावाद्यांनी मिळतील ती मंत्रिपदे अवश्य घ्यावीत. अशा मंत्रिमंडळांना संयुक्त मंत्रिमंडळे म्हणावे. जेथे हिंदू बहुसंख्य आहेत त्या प्रांतातही हिंदुसंघटकांनी मंत्रिमंडळे बनविण्याचा प्रयत्न करावा. हिंदूंच्या नि अतरांच्याही न्याय्य अधिकारांचे संरक्षण करण्याचे वचन देणाऱ्यालाच हिंदू बहुसंख्य प्रांतात मुख्यमंत्री निवडावे. प्रत्येक प्रांताने तेथील परिस्थितीनुसार ही मंत्रिमंडळे हिंदुहिताला बाध न आणता बनविण्याचा प्रयत्न करावा.”

आपल्या वाढदिसानिमित्त सत्कार करणारे, देणगी देणारे, शुभचिंतन करणारे आदी सर्वांचे प्रकट आभार मानणारे सावरकरांचे एक पत्रक २८ जून १९४३रोजी प्रसिद्ध झाले. त्या पत्रकात सावरकर लिहितातः

“मी केलेल्या या ना त्या देशसेवेचा गौरव करण्याकरिता माझ्या हीरकोत्सवात माझ्या ज्या हजारो देशबंधूंनी नि धर्मबंधूंनी भाग घेतला, त्यांचे मी अत्यंत मनःपूर्वक नि नम्रभावाने आभार मानतो. माझ्या या जीवितकार्याचा विविध मार्गांनी राष्ट्राने गौरव केला असून या दयाळुत्वाच्या नि औदार्याच्या ओझ्याखाली मी दडपून गेलो आहे.

तथापि हा सगळा सन्मान मी काही माझ्या व्यक्तीचा समजत नाही. माझ्या सन्मानाचे जे प्रचंड समारंभ झाले, त्याचे मूळ कुठल्याही राष्ट्रीय कार्याविषयी नि त्यागाविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याची जी भावना आपल्या लोकात आहे त्यात आहे. मी केवळ प्रसंगभूत ठरलो आणि त्या क्षणी त्या भावनेला मूर्तस्वरूप देणारा झालो अतकेच; याची जाणीव तर माझ्या अंतःकरणात आहे.

ज्या लक्षावधी लोकांनी माझा हा सन्मान केला, त्यात बहुअंशी माझ्या हिंदुसंघटनी बंधूंचाच भरणा अधिक होता. तेव्हा हा राष्ट्रव्यापी हीरकोत्सव हिंदुसंघटन चळवळीची वाढती लोकप्रियता नि सामर्थ्य यांचे प्रचंड निदर्शकच ठरला. हिंदुकार्याच्या प्रचारालाही त्याने चांगलाच उठाव मिळाला. धोक्याची सूचनाही या प्रसंगी देऊन ठेवणे आवश्यक आहे. या महोत्सवाने माझ्या जीवनेतिहासात आणखी एका रोमांचकारी पानाची भर पडली हे खरे. बंदिगृहात असताना माझ्या हातापायांत असलेल्या लोहशृंखलांची आज कोमल पुष्पे झाली आहेत! मृत्यूच्या मुखात ढकलण्याकरिता ‘मोरिया’ बोट मला घेऊन चालली होती, पण मृत्यूच्या दाढेतून सुखरूप सुटल्यासंबंधीचा राष्ट्रीय आनंद व्यक्त करण्याकरिता मला जे मानपत्र देण्यात आले ते त्याच ‘मोरिया’ बोटीच्या सोन्या-चांदीच्या प्रतिमेतून!!

अर्थात हा पुष्पमालांचा संभार वहात भावनोत्कट नि आनंदभरित जनसंमर्दातून मी मार्ग काढीत असता माझ्या अंतःकरणात एकीकडे मला वाटत होते की, आयुष्यपथावरचा हा एक केवळ रोमांचकारी अपघात आहे. कोणत्याही क्षणी ही नाजूक फुले नि सोन्याचांदीचे हे जे करंडक यांचे रूपांतर लोहशृंखला नि अग्निदिव्ये यात होईल, त्याला तोंड देण्यास मी सिद्ध असले पाहिजे. आपला मार्ग पुष्पाच्छादित नि सुवर्णमय असेल अशा निश्चितीने स्वातंत्र्यासाठी चाललेल्या झुंजीत कोणीही भाग घेऊ नये. लाखांपैकी एखाद्यालाच तो सन्मान मिळतो. परमेश्वराच्या प्रत्येक प्रेषिताने, प्रत्येक सैनिकाने, ध्येयाची ध्वजा घेऊन अवश्य तर कीर्तिहीन नि नामहीन मरण पत्करणाच्या सिद्धतेने या कार्यात उडी घ्यावी. कारण सत्याच्या प्रेषितांना तत्काळ यश वा मान मिळणे हा केवळ अपघात होय, उपेक्षित त्याग हाच नियम!”

## प्रा. माटे व डॉ. मुखर्जी यांना उत्तर

१० फेब्रुवारी १९४३ रोजी गांधीजींनी बंदिगृहात उपोषण चालू केले तेव्हा त्यांच्या समर्थकांनी व्हॉइसरॉय कौन्सिलमधील सदस्यांनी त्यागपत्र द्यावीत अशी मागणी चालू केली. पुण्याचे प्रा. माटे आणि डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी यांनीही वीर सावरकरांना तार करून विनंती केली की त्यांनी गांधीजींचे प्राण वाचविण्यासाठी सर ज्वालाप्रसाद प्रभृतींना व्हॉइसरॉयच्या कार्यकारिणीचे त्यागपत्र देण्यास सांगावे. हे आपणास मान्य नसेल तर कार्यकारिणीची सभा त्वरित बोलवावी. या तारेला दिलेल्या उत्तरात सावरकरांनी लिहिलेः

“श्रीवास्तवजी हे काही हिंदू सभा दर्शिकेवर निवडून आलेले नाहीत किंवा तिचे प्रतिनिधी म्हणून नियुक्त झोलेले नाहीत हे कृपया ध्यानी घ्यावे! नैतिक दाबासंबंधी सांगायचे म्हणजे पंधरा दिवसांपूर्वीच महासभेच्या कार्यकारिणीची सभा होऊन तिने सर्वांगीण चर्चा करून जो एक ठराव संमत केला त्याचा काय नैतिक परिणाम व्हायचा तो होईल. माझा स्वतःचा नि कार्यकारी मंडळाच्या अनेक सभासदांचा केवळ हिंदुसदस्यांना त्यागपत्रे द्यावयास भाग पाडण्यास विरोध आहे. या प्रश्नांची चर्चा पंधरा दिवसांपूर्वीच झाली असल्याने पुन्हा कार्यकारी मंडळ बोलावण्याची आवश्यकता नाही. तरी अध्यक्षांचा विचार न घेता कार्यकारी बोलावण्याचा प्रयत्न करू नये!!

## संयुक्त मंत्रिमंडळे कां हवीत?

लीगच्या मंत्रिमंडळातही घुसा, असा आदेश जेव्हा सावरकरांनी दिला तेव्हा त्यांचे विपक्षीय टीकाकराच काय पण काही स्वपक्षीयसुद्धा त्यांना नावे ठेवू लागले. रक्तातीलपाकिस्तानी म्हणू लागले. तेव्हा अशा आक्षेपांना उत्तर देण्यासाठी १० जुलै १९४३ रोजी सावरकरांनी एक विस्तृत पत्रक काढले. ते असेः

“संयुक्त मंत्रिमंडळे बनविण्याविषयी मी जे पत्रक काढले, त्याचा उपयोग अपेक्षेप्रमाणे झाला आहे. सध्याच्या परिस्थितीत संयुक्त मंत्रिमंडळे बनविण्याविषयी मी कधीच फारसा उत्सुक नव्हतो. युद्धकाळात सत्तेचे केंद्रीकरण झालेले सरकारला अत्यंत सोयिस्कर असल्यामुळे प्रत्येक प्रांतात तशी केंद्रीभूत झालेली सत्ता सोडून देण्याची सरकारची अच्छा आहे असे मला तितकेसे वाटत नाही. पण संयुक्त मंत्रिमंडळाची कल्पना निघून कित्येक प्रांतांतून या ना त्या प्रमुख गटाने त्या दृष्टीने हालचाली करण्यास प्रारंभ केला. तेव्हा हिंदुत्वनिष्ठांनी हात जोडून स्वस्थ बसता येणे शक्यच नव्हते. अशा मंत्रिमंडळासंबंधी हिंदुहितरक्षणाचे दृष्टीने आपणा कोणते धोरण स्वीकारावे हे समजून घेण्याची अच्छा असलेल्या इतर पक्षांच्या पुढाऱ्यांनी याविषयी तातडीने, प्रसंगी तारेने समावेश मागितला. प्रस्तुतच्या घटनेच्या मर्यादा लक्षात घेऊन अधिकाधिक राष्ट्रहित साधण्याच्या दृष्टीने कोणते धोरण स्वीकारावे याचा माझ्या पत्रकावरून त्यांना स्पष्ट उलगडा झाला. बरेच जणांचे डोळे त्याने उघडले आणि खोटी आशा आणि खोटी भीती यांच्यामुळे उडालेला विचारांचा गोंधळ नाहीसा झाला.

माझ्या पत्रकामुळे पहिली गोष्ट जर कोणती साध्य झाली असेल तर ही की, हिंदू-मुस्लिम अैक्यासंबंधीच्या ‘याल तर तुमच्यासह’ या माझ्या तत्त्वानुसार सहकार्याविषयीच्या किवा संयुक्त

मंत्रिमंडळाविषयीच्या कोणत्याही प्रामाणिक योजनेचे स्वागत करण्यास आणि हिंदू नि अहिंदू अशा सर्व हिंदी लोकांच्या हातात हात घालून प्रत्यक्ष व्यवहार्य राजकारणात काम करण्यास मी सिद्ध आहे हेही स्पष्ट झाले.

मात्र मुसलमानांनी देशभक्त व्हावे म्हणून हिंदूंच्या अधिकाऱ्याची लाच मुसलमानांना देण्यास मी सिद्ध नव्हतो. संयुक्त मंत्रिमंडळे जर देशभक्तीच्या हेतून प्रेरित झालेली असतील आणि सर्व नागरिकांना समानतेने वागविण्याच्या तत्त्वानुसार चालविण्यात आलेली असतील तर त्यामुळे एक राष्ट्र म्हणून तत्परतेने संघटित होण्याचे शिक्षण मिळण्याचा संभव आहे. आपल्या अहिंदू देशबांधवांबरोबर अशा रीतीने संयुक्त मंत्रिमंडळात काम करण्याचा आदेश हिंदुसंघटनवादी जनतेला मी दिल्यामुळे ही गोष्ट अगदी ढळढळीतपणे सिद्ध झाली की, मी घालून दिलेले हिंदुसंघटनी धोरण तथाकथित राष्ट्रीय काँग्रेसच्या धोरणापेक्षाही अधिक राष्ट्रीय आहे.

विधिमंडळात काँग्रेस पक्षाचे बहुमत असल्यामुळे मंत्रिमंडळ बनविण्याचा वा मोडण्याचा सर्वाधिकार काय तो त्या एकाच पक्षाला आहे ह्या अडाणी समजुतीचे संयुक्त मंत्रिमंडळे बनविण्याच्या प्रयत्नांचे मी समर्थन केल्यामुळे पार उच्चाटन झाले! काँग्रेसची मंत्रिमंडळे ही एका पक्षाची होती. तरीही त्यांनी सबंध प्रांताच्या वा देशाच्या नावाने कारभार हाकला. अगदी त्याचप्रमाणे अल्पसंख्य गटांनी बनविलेल्या संयुक्त मंत्रिमंडळांनाही कारभार चालविण्याचा अधिकार आहे. काही सदस्य पुरस्सर लोकनियुक्त संस्थेतून बुद्धीपुरस्सर बाहेर राहिले तर उवर्रित प्रतिनिधी हेच त्या काळापुरते ती संस्था असून, तिचे प्रतिनिधी म्हणून तिच्या नावाने त्यांनी कारभार चालवावा हे क्रमप्राप्तच आहे. काँग्रेस मंत्रिमंडळांनी त्यागपत्रे देताच गव्हर्नरनी सारी सत्ता आपल्या हातात घेऊन विधिमंडळांना कुलूप ठोकले ही गोष्ट खरी पण युद्धकाळात सर्व सत्ता गव्हर्नरच्या हातात राहणे सरकारला सोयीचे होते. सरकारला कारण हवे होते आणि काँग्रेसने अजाणतेपणी मंत्रिमंडळे सोडून देऊन ते कारण तर पुरविले. अशा परिस्थितीत मंत्रिमंडळे बनविण्याचा प्रयत्न करून विधिमंडळे चालू करा अशी मागणी करण्याचा इतर पक्षांचा अधिकार काही त्यामुळे हिरावला गेला नाही. काही प्रांतात हे प्रयत्न यशस्वी होतीलही आणि ते तसे यशस्वी झाले तर ही मंत्रिमंडळे इतर कोणत्याही मंत्रिमंडळाप्रमाणे अगदी न्याय्य, घटनात्मक नि समर्थनीय अशीच ठरतील.

आपला एकाधिकार म्हणून ज्या मंत्रिमंडळाकडे काँग्रेसवाले पाहतात, ती मंत्रिमंडळे काँग्रेसेतर लोकांच्या हाती पडण्याचा संभव दिसताच काँग्रेस गोटात अस्वस्थता निर्माण झाली. गेल्या ऑगस्टचा 'चलेजाव' चा ठराव मागे घेण्याचा अत्यंत मानहानीकारक मार्ग स्वीकारूनही मंत्रिमडळे नि विधिमंडळे यावरील बहिष्कार उठविण्याची जी चर्चा चालू आहे तीसुद्धा अगदी याच कारणाकरिता मान वाकवून तोंडाने रामराम म्हणत काँग्रेसला 'हराम कौन्सिला' त जाण्यास हंगामी मंत्रिमंडळांनी भाग पाडले! तशीच परिस्थिती आज निर्माण झाली आहे.

माझ्या पत्रकात आणखी एका विषयावर भर देण्यास आला आहे. एखाद्या मंत्रिमंडळात जोपर्यंत लीगेतर मंत्री आहेत आणि आपला अधिकार म्हणून तेथे काम करीत आहेत तोपर्यंत त्या मंत्रिमंडळात

बहुसंख्य मंत्री लीगवाले आहेत म्हणून ते मंत्रिमंडळ काही लीगचे होत नाही. सिधमध्ये लीग-हिंदु सभा मंत्रिमंडळ आहे, बंगालमध्ये लीग-हिंदू मंत्रिमंडळ आहे तर सीमा प्रांतात लीग-शीख मंत्रिमंडळ आहे.

हिंदू अल्पसंख्य प्रांतात मुस्लिम मंत्र्यांनी जर पाकिस्तानचा किंवा स्वयंनिर्णयाचा ठराव संमत करून घेण्याचा प्रयत्न केला तर सामुदायिक दायित्व झुगारून देऊन तशा प्रस्तावाला विरोध करण्याचा अधिकार हिंदूमंत्र्यांना असलाच पाहिजे असे मी माझ्या पत्रकात म्हटले होते. आणि प्रत्यक्ष तसे वागताना सिधच्या हिंदू सभामंत्र्यांनी जे धैर्य दाखविले ह्याविषयी त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. त्याचप्रमाणे संयुक्त मंत्रिमंडळात शिरून हिंदूंचे हित साधेल की नाही हे ठरविण्याचा प्रश्न माझ्या पत्रकांतील मूलभूत हेतू लक्षात घेऊन प्रांतिक हिंदू सभांच्या विवेकबुद्धीवर सोपविण्यात आला होता. सद्हेतूने टीका करण्याऱ्यांच्या लक्षातही ही गोष्ट आली नाही. निरनिराळया प्रांतातील हिंदूंनी, विशेषतः अल्पसंख्य हिंदू प्रांतांच्या परिस्थितीप्रमाणे निरनिराळे धोरण आखले पाहिजे. उदाहरणार्थ, लीगच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या मंत्रिमंडळांना आपण खेचून काढू अतके आपले सामर्थ्य असल्याचे बंगाल हिंदू सभेला वाटत आहे, तर सीमाप्रांतातील हिंदू सभा पुढाऱ्यांना काँग्रेसशी सहकार्य करून एकत्र निवडणुकी लढविणे अधिक श्रेयस्कर वाटत आहे. हिंदूंच्या न्याय्य अधिकाराचे संरक्षण करण्याचे आपले वचन तेथील काँग्रेसवाल्यांनी पाळले तर हिंदू सभा पुढाऱ्यांचे वर्तन समर्थनीय नि माझ्या पत्रकाच्या आराखड्यासारखेच आहे. सिधमध्ये हिंदू सभेने लीग सभा मंत्रिमंडळाला पाठिंबा दिला आहे. कारण याच मार्गाने हिंदुहित अधिक उत्तम प्रकारे साधेल असे तेथील हिंदू सभा पुढाऱ्यांना वाटते. तेव्हा महासभेचे धोरण गोंधळ उत्पन्न करणारे, विसंगतीपूर्ण नि प्रांताप्रांतातून परस्परविरोधी आहे असा कांगावा करणाऱ्या लोकांची दृष्टीच दूषित झाली आहे. महासभेच्या धोरणात विसंगतीचा केवळ आभास आहे. हिंदुहिताच्या दृष्टीने त्याच्याकडे पाहिले म्हणजे ते पूर्ण सुसंगत नि सुसंबद्ध असल्याचे दिसून येते. हिंदू बहुसंख्य प्रांतापुरते पाहिले तर माझ्या पत्रकात जे धोरण आखून देण्यात आले आहे त्यामुळे पाकिस्तानचा प्रश्न निघण्याची गोष्ट अशक्य कोटीतली झाली आहे. पाकिस्तानचा प्रश्न मंत्रिमंडळाच्या कक्षेबाहेरचा आहे या अटींवर संयुक्त मंत्रिमंडळ बनविण्याचे यत्न व्हावेत असे ह्या माझ्या पत्रकात मी सांगितले होते.

कित्येक प्रांतातून हिंदू सभा तिकिटांवर निवडून आलेले उमेदवार अगदी थोडे आहेत किवा नाहीतही. तथापिकाँग्रेसेतर दर्शिकेवर निवडून आलेले किंवा काँग्रेसच्याही दर्शिकेवर निवडून आलेले असे कित्येक सदस्य आता हिंदू सभेला मिळाले आहेत किंवा हिंदू मनोवृत्तीचे झाले आहेत. ही गोष्ट काँग्रेसवाले पुरेपूर जाणून आहेत. हिंदुसंघटनी संयुक्त मंत्रिमंडळे बनविण्याचे प्रयत्न चालू असल्याचे पाहून मंत्रिमंडळे करण्या-मोडण्याचा आपला एकाधिकार आपल्या हातातून निसटणार म्हणून त्यांचे धाबे दणाणले आहे. त्यामुळे काँग्रेसवाल्या वृत्तपत्रांनी माझ्या पत्रकाविरुद्ध काहूर उठविले, अन् ते साहजिकच होते. पण या टीकेत त्यांनी माझ्यावर मोठा आरोपकोणता केला आहे असे तुम्हाला वाटते? संतापाच्या भरात 'पाकिस्तानानुकूल' म्हणून माझा त्यांनी धिक्कार केला! पण असे करताना आपण स्वतःचा नि काँग्रेसचा आणि काँग्रेस पुढाऱ्यांचा शतशः धिक्कार करीत आहो याचे भान त्यांना राहिले नाही!

कोणत्याही स्वरूपात पाकिस्तानच्या योजनेला मान्यता द्यावयाची नाही असा आदेश माझ्या पत्रकात मी स्पष्टपणे दिलेला असतानासुद्धा ‘पाकिस्तानानुकूल’ असल्याचा नि ‘लीगला शरणचिठ्ठी’ दिल्याचा आरोपकाँग्रेसपत्रांनी माझ्यावर केला. त्यामुळे मला खरोखर आनंद झाला. माझ्या पत्रकाचा परिणाम अपेक्षेबाहेर झाला. कारण काँग्रेसपत्रांनी मला ‘पाकिस्तानानुकूल’ म्हणावे आणि माझ्यापेक्षा नि माझ्या सहकाऱ्यांपेक्षा हिंदूहिताची अधिक चिंता वहावी हा गेली काही वर्षे नवीन हिंदुसंघटनी ध्येयवादाचा आम्ही जो ‘झंझावाती’ प्रचार केला त्याचाच विजय आहे! ज्यामुळे राष्ट्राच्या नावाने जीनांच्या हातावर ‘जातीय निवड्याचे’ उदक सुटते, त्या विधिमंडळातील काँग्रेसवाल्यांच्या तटस्थतेला याच काँग्रेसपत्रांनी उचलून धरले नव्हते काय? स्वयंनिर्णयाला काँग्रेसने मान्यता दिली; शेषाधिकार प्रांताकडे असावेत म्हणून ठराव केला; शंभर टक्के मध्यवर्ती सत्ता लीगच्या हातात देण्याची सिद्धता दर्शविणारे पत्र अगदी ‘मनःपूर्वक’ गांधीजींनी जीनांना लिहिले; आपल्यावरील याजेनेचा पुनरुच्चार करणारे पत्र गांधीजंीींनी व्हॉइस रॉयांना लिहिले या सर्व गोष्टींना पाठिबा देऊन त्यांची तळी याच काँग्रेसपत्रांनी उचलून धरली नव्हती काय? काँग्रेसवाल्यांचा हा एकटा हत्ती गेल्यावर आता कपोलकल्पित शेपूट जाईल म्हणून त्यांचा प्राण कासावीस झाला आहे! हा आमच्या प्रचाराचा एक विजय आहे!

पण ही टीका जर मनःपूर्वक करण्यात आली असेल तर त्यात मला आनंदच आहे. कारण हिंदूंवर अत्यंत हीन नि गलिच्छ आरोप जर कोणता करावयाचा, तर तो ‘पाकिस्तानानुकूल’ नि लीगला किवा ‘मुसलमानांना संतुष्ट करण्याकरिता हिंदुहिताचा घात करणारा’ हा होय. ही गोष्ट शिकण्यास काँग्रेसवादी हिंदूंना मी अंती भाग पाडले! मी वारंवार सांगत आलो असल्याप्रमाणे काँग्रेसवादी हिंदूंना केवळ अंगावर नव्हे तर कोटावर जानवे घालून हिंदुसंघटनी तत्त्वांचा प्रचार करणे भाग पडले आहे!! पण या पुढारी लोकांचे पुढारी बंदीतून सुटल्यावर हिंदुस्थानच्या फाळणीच्या करारावर स्वाक्षरी करण्याकरिता आणि काँग्रेसच्या अर्धवट राष्ट्रीयत्वाच्या वेदीवर हिंदुहिताचा बळी देण्याकरिता ज्यावेळी लीगच्या शिबिरात जातील, त्यावेळी हे लोक त्यांची संभावना कशी करतील हा विचार मनात येऊन या लोकांची कीव करावीशी वाटते.

त्याचे काहीही असो, माझ्या हिंदुसंघटनी बांधवांना माझे पुन्हा असे सांगणे आहे की, देशाच्या राज्ययंत्रावरील मिळतील ती महत्त्वाची स्थाने त्यांनी वर निर्दिष्ट केलेल्या अटी लक्षात ठेऊन, आपल्या हाती घ्यावीत. भूदल, नाविक दल, विमान दल, दारुगोळयाचे कारखाने आणि सैन्यविषयक अशाच इतर शाखा यात हिंदुसंघटनावादी लोक जितके अधिक शिरतील तितके हिंदू राष्ट्र अधिक बलवान होईल. राजकारणात त्याचा विचार करणे हे तर अपरिहार्य होऊन बसेल आणि घटना परिषदा किंवा अखंड नि स्वतंत्र हिंदुस्थानची घटना यावर त्यांचेच वर्चस्व राहील.”

## जीनांवरील हल्ल्याचा निषेध

सावरकर - जीना ह्यांच्या भेटी संबंधात सावरकरांवर केवळ टीकाच करण्यात आली, पण एका मुसलमानानेच जीनांवर प्राणघातक वार केले ! जीना यामधून वाचले. यासंबंधात २७ जुलैला काढलेल्या एका पत्रकात सावरकर म्हणतातः

“ह्या प्राणघातक संकटातून जीना बचावले यासाठी मी त्यांचे अभिनंदन करतो. मुसलमान पुढाऱ्याच्या जीवितावर घाला घालण्याचा प्रयत्न एका मुसलमानानेच करावा याविषयी जीनांना वाईट वाटणे साहजिकच आहे. आपआपसात केलेले अशा प्रकारचे अकारण हल्ले हे सार्वजनिक जीवनावरील कलंकच होत. त्याचा तीव्र निषेध केला पाहिजे.”

## द्विराष्ट्रवादाचे स्पष्टीकरण

नागपुरातील पत्रकारांशी वार्तालापकरताना सावरकरांनी जी तात्त्विक चर्चा केली; ती त्या पत्रकारांना पुरेशी न समजल्यामुळे किवा पत्रकारांतील कधी कधी उफाळणाऱ्या कळलाव्या नारदी स्वभावाप्रमाणे या चर्चेविषयी प्रतिवृत्त प्रसिद्ध करताना त्यांनी लिहिले की, “भारतात हिंदू आणि मुसलमान ही दोन समान राष्ट्रे आहेत आणि सावरकर हे द्विराष्ट्रवादाचे प्रणेते नि पुरस्कर्ते आहेत.” हे वृत्त प्रसिद्ध झाल्यावर पुण्याच्या दै. काळच्या प्रतिनिधीने सावरकरांची भेट घेतली. तेव्हा २३ ऑगस्ट १९४३ रोजी त्यांच्याशी बोलताना सावरकर म्हणालेः

“नागपूर येथील माझ्या पत्रकार चर्चेचे जे प्रतिवृत्त प्रसिद्ध झाले आहे ते संक्षिप्त स्वरूपाचे असल्याने आणि त्यात स्थळाअभावी मागचा पुढचा संदर्भ नीट न दिला गेल्याने द्विराष्ट्र कल्पनेचे विपर्यस्त स्वरूप वाचकांसमोर मांडले गेले आहे. पत्रपंडितांनी ज्यावेळी मला प्रश्न विचारले त्यावेळी या द्विराष्ट्र कल्पनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी मी विशद केली. ऐतिहासिक काळात केवळ भारतातील नव्हे तर सर्व जगातील मुसलमान समाज स्वतःला एक धार्मिक राष्ट्र मानीत असे. अर्थात हे राष्ट्र धार्मिक पायावर उभे असल्याने त्याला भौगोलिक मर्यादा नव्हत्या. खलिफा हा त्या सर्व मुसलमानांचा एकच धर्मगुरू नि राज्यकर्ता होता. ह्या दृष्टीने मुसलमान हे स्वतःला एक अलग राष्ट्र मानतात. त्यांचा हा दावा असला तरी वस्तुस्थिती अशी आहे की राजकीय आणि लोकशाहीच्या दृष्टीने विचार करता हिंदुस्थानमध्ये हिंदू हेच राष्ट्र आहे. कारण अनादी कालापासून तेच येथे बहुसंख्य आहेत; हीच त्यांची पितृभूमी आणि पुण्यभूमी आहे. येथे मुसलमान ही एक अल्पसंख्य नि आक्रमक जमात आहे. तिने काही काळ येथे राज्यही केले पण हिंदूंनी पुन्हा उचल घेऊन त्यांना पराभूत केले. या संबंधीचे विवेचन मी कर्णावती येथील अध्यक्षीय भाषणात केलेले आहे. ती माझी भूमिका त्या पत्रकारांना समजली तर हा अपसमज निश्चितपणे दूर होईल.”

## दुष्काळग्रस्तांना साहाय्य करा !

सावरकरांनी बंगाल नि राजपुताना येथील दुष्काळासंबंधीची पत्रे वाचली आणि त्या पत्रातील विनंतीनुसार २ सप्टेंबर १९४३ रोजी त्यांनी अन्नधान्य विषयक प्रश्नासंबंधी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी एक पत्रक काढले. त्यात ते लिहितातः

"हिंदुस्थानच्या बाहेर देशादेशातून मानव मानवाविरुद्ध लढत आहे तर अकडे हिंदुस्थानात निसर्गानेच मानवाविरुद्ध युद्ध पुकारले आहे. बंगाल, राजपुताना आदी भागातील निरनिराळया ठिकाणाहून पुराने उडविलेल्या अनर्थाचे भीषण प्रतिवृत्त प्रतिदिन प्रसिद्ध होत आहे. तिकडे संतप्त नद्यांनी रात्रीच्या रात्रीत शेकडो खेडी जलमय करून टाकली आणि त्यात माणसे नि गुरेढोरे नष्ट झाली. ओला दुष्काळ नि अन्नटंचाई यामुळे युद्धात जसा मनुष्य संहार व्हावा तशी उपासमारीने अनेक माणसे मृत्युमुखी पडली नि अद्यापही पडत आहेत. अशा ह्या भीषण संकटाने सबंध राष्ट्राचे अंतःकरण हेलावले असून या संकटाला तोंड देण्याचे प्रयत्न सर्वत्र चालू झाले आहेत. बंगाल नि राजपुताना प्रांतातील हिंदू सभाही निरारश्रितांना अन्न, आधार नि औषधपाणी पुरविण्याची पराकाष्ठा करीत आहेत.

तथापि या महान आपत्तीस तोंड देण्यास हे प्रयत्न अपुरे पडत असल्याने इतर प्रांतातील जनतेनेही त्या त्या प्रांतात आपले स्वयंसेवक नि साहाय्य पाठविणे अवश्य आहे पण केवळ एवढ्यानेच हा प्रश्न सुटण्यासारखा नसल्याने प्रांतिक नि केंद्रशासनाने या प्रश्नात तत्काळ लक्ष घालून तेथे योग्य प्रमाणात अन्नपुरवठा नि अन्नवाटपकरण्यासाठी वाहतुकीची साधने दिली पाहिजेत. तसेच येथील अन्नटंचाई लक्षात घेऊन अन्न परदेशात पाठविणे तत्काळ बंद केले पाहिजे. केंद्रशासनाचे अनुभवी नि कार्यक्षम अन्नमंत्री श्री. ज्वालाप्रसाद श्रीवास्तव हेही या प्रश्नी तत्काळ लक्ष घालून शक्य ते ते प्रयत्न करतील अशी माझी निश्चिती आहे. या कामी जनतेनेही त्यांना शक्य ते साहाय्य करावे असे माझे आवाहन आहे."

## हिंदू सभेचे सभासद वाढवा

काही काही चर्चेत सावरकर अन्य अनेक गोष्टींप्रमाणे हिंदू महासभेचे सभासद वाढवा या कार्यावरही भर देत असत पण सभासद वाढविण्याचे महत्त्व काय हे अनेकांना कळतच नसे म्हणून सभासद वाढविण्याचे महत्त्व काय हे सांगणारे एक विस्तृत पत्रक सावरकरांनी ऑगस्ट १९४३ मध्ये काढले. ते पत्रक चिरंतन मार्गदर्शक ठरणारे आहे. ते समग्र पत्रक पुढीलप्रमाणे आहेः

"या वर्षी महाराष्ट्रात हिंदू सभेने सभासद वाढविण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. हिंदू सभेच्या प्रतिनिधीत्वाचा मुख्य पाया आणि कसोटी तिचे सभासद किती या प्रश्नावरच मुख्यतः अवलंबून असणार. व्हॉइसरॉयपासून ते अमेरिकन पत्रप्रतिनिधीपर्यंत प्रत्येकाचा पहिला प्रश्न साहजिकच हा असतो की, महासभेचे सध्या सभासद किती आहेत ? ह्या दिखाऊ मंडळींसाठीच नव्हे परंतु हिंदू समाजाचे स्वयंसंरक्षणाचे बळ वस्तुतः किती वाढते आहे हे आपले आपल्याला कळणे हेही अत्यत आवश्यक आहे. आणि ते मापण्याच्या कामी आपले सभासद किती आहेत हीही एक महत्त्वाची कसोटी आहे.

तरी महाराष्ट्रातील प्रत्येक हिंदूने या वर्षी हिंदू महासभेचे सभासद होण्यासाठी आपण होऊन पुढे आले पाहिजे. हिंदू सभेच्या संघटकांनी नि स्वयंसेवकांनी सभासद नोंदणीसाठी येत्या महिन्यात यत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. एकही गाव असे न रहावे की, ज्यात हिंदू सभेचा स्वयंसेवक जाऊन सभासद नोंदणीसाठी घरोघर फिरून आलेला नाही. नगरानगरांतून लहान लहान विभाग पाहून सभासद नोंदणीचे काम अशा चिकाटीने नि पद्धतशीरपणे व्हावे की, एकही चाळ किवा चाळीतील घर हिंदू सभेच्या सभासद नोंदणीसाठी ज्यात प्रयत्न झालेला नाही असे उरू नये. प्रत्येक जिल्हा वा प्रांतिकच्यावतीने एक एक प्रचारक जो नेमण्यात येईल त्याने त्या त्या जिल्ह्यात हे कार्य शक्य त्या नेटाने सर्व शाखांकडून करून घेतले पाहिजे. हा सबंध महिना त्या त्या जिल्ह्यावरील प्रांतिक निरीक्षकांनी सभासद वाढविण्याच्याच कामी खर्चिला पाहिजे.

महाराष्ट्रात या वर्षी मागच्या तिपटीने तरी हिंदू सभेचे नदविलेले सभासद झालेच पाहिजेत असा संकल्प सर्व स्त्री-पुरुष हिंदुसंघटकांनी आताच्या आता करून आपापल्या गावा - गावापुरता तरी तो पुरा करून दाखवावा. इतक्यावरही जर आपण आटोकाट प्रयत्न केला असताही हिंदू सभेचे सभासद फारसे वाढले नाहीत तर मग त्याचा दोष हिंदुसंघटकांवर पडणारा नसून तो त्या हिंदू समाजाच्या आत्मघातक नि आंधळया प्रवृत्तीवर पडेल. हिंदूंचे हितरक्षण करणारी आणि हिंदू राष्ट्राच्या स्वतंत्र, श्रेष्ठ आणि बलिष्ठ भवितव्यासाठी लढत आलेली हिंदू सभा ही आज एकच एक संस्था आहे! हिंदुत्वाचा अभिमान असणाऱ्या हिंदुकुळात जन्मलेल्या प्रत्येक हिंदू स्त्री-पुरुषाने तिचे सभासद झालेच पाहिजे.

ह्या कर्तव्याची जाणीव आपण आपल्या गावातील वा नगरातील प्रत्येक घरी भेट देऊन प्रत्येक हिंदू स्त्री-पुरुषास करून दिली की, सभासद नोंदणीविषयी तरी हिंदुसंघटकाचे कर्तव्य त्याने केले असे होईल.

मग कोणी सभासद होवोत वा न होवोत. आत्मघाताचे पाप त्यांच्या माथ्यावर ! येत्या ऑक्टोबर १० च्या आत सभासद नोंदणीचे काम पुरे होऊन सर्व सभासद नामावल्या संपूर्ण झाल्याच पाहिजेत."

## नगरसेवकांनी ते काम प्रथम करावे

महापालिका निवडणुकीसंबंधी मतदारांना आवाहन म्हणून काढलेल्या (९ ऑक्टोबर १९४३) एका विस्तृत पत्रकात सावरकर लिहितातः

“नगरसेवकाचे मुख्य काम नगरपालिकेत उपस्थित राहून नागरिक अधिकारांचे संरक्षण करणे. पण काँग्रेसी नगरपिते बंदिवासात जात आहेत. बंदिवासात जाणे ही देशभक्ती आहे पण अशा देशभक्तांनी नगरपालिकेची जागा अडवू नये. श्रमविभागाच्या दृष्टीने ते काम त्यांनी दुसऱ्या दलाला करू द्यावे. कारण अशा लोकनियुक्त संस्था लोकांच्या हितासाठी चालविणे हीही देशभक्तीच आह. एखादा सेवक देशभक्ती म्हणून बंदिवासात गेला तर आपण त्याच्या देशभक्तीचे कौतुक करू. पण जर तो सांगू लागला की तुम्ही माझ्या स्थानी दुसरा सेवक ठेवताच कामा नये तर तो त्याचा वेडेपणा ठरेल. बंदिवासात गेलेले जसे देशभक्त आहेत तसेच हिंदू सभेचे इच्छुक हेही देशभक्तच आहेत. तसे ते नाहीत असे जे म्हणतात ते अधम आहेत. काँग्रेसने आपल्या ठरावात ब्रिटिशांना सांगितले कीं तुम्ही निघून जा पण सैन्य येथे ठेवा. त्यांनीच आपण होऊन हा बंदिवास पत्करला आहे. तेव्हा वास्तविक त्यांनीच ही महापालिकेतील आसने सोडणे त्यांच्या तत्त्वाला धरून झाले असते. तरी त्यांची ती चूक सुधारण्यासाठी मतदारांनी श्री. ढमढेरे नि वैद्य या हिंदू सभा अच्छुकांना विजयी करावे.

सावरकर हिंदुत्वनिष्ठ मतदारांना आपल्या कर्तव्यासंबंधी लिहिताना म्हणतात, हिंदू पक्षाचा प्रतिनिधी म्हणून जो हिंदू सभेच्या तिकिटावर प्रकटपणे उभा राहील आणि मी केवळ हिंदूंचेच हित करण्यास बांधलेला आहे म्हणून वचन देईल त्यासच काय ते हाडाच्या हिंदूने मत दिले पाहिजे! इतर प्रश्न गौण आहेत.

(१) मुंबईच्या नगरसंस्थेच्या (कॉर्पोरेशनच्या) रिकाम्या पडलेल्या जागांसाठी हिंदू मतदारसंघाच्या वतीने निवडणुका होणार आहेत. त्यासाठी काँग्रेसने आपले इच्छुक (उमेदवार) गिरगाव नि दादर या विभागात हिंदू महासभेनेही आपले इच्छुक अनुक्रमे श्री. कृ. ह. ढमढेरे नि रा. के. वैद्य उभे केले आहेत. काँग्रेसचे इच्छुक हे सध्या बंदिवासात असूनही आणि त्यांची निवडणूक झाली तरी ते सुटतील अशी कोणतीही शाश्वती नसतानाही त्यांनाच मते द्यावी म्हणूनच काँग्रेसचा आग्रह आहे. त्यांनी त्यांच्या म्हणण्याच्या समर्थनार्थ पुढे आणलेल्या मुख्यमुख्य अशा नि असावध मतदारांना सहजी भुरळ पाडू शकणाऱ्या अशा प्रश्नांची उत्तरे खाली दिली आहेत.

### देशभक्तीचा गौरव

काँग्रेसचे इच्छुक हे बंदिवासात असल्यामुळे त्यांनाच निवडून देणे हा त्यांच्या देशभक्तीचा गौरव करणे होय असे काँग्रेसचे म्हणणे आहे. परंतु नगरसंस्थेच्या निवडणुकीत मुख्य प्रश्न नुसता देशभक्तीचा गौरव नाही, तर लोकांची जी सुखदुःखे आणि सार्वजनिक कामे नगरसंस्थेत उपस्थित राहून करायची असतात त्यासाठी प्रत्यक्ष काम करणारे प्रतिनिधी निवडणे हाच आहे. बंदिवासात असणाऱ्या आपल्या बांधवांच्या देशभक्तीविषयी ते सुटतील तेव्हा त्यांचा गौरव त्या प्रकरणापुरता करण्यास हिंदू महासभासुद्धा, काँग्रेसच्या इतर हिंदू घातक धोरणाविषयी तीव्र मतभेद असताही, मागे घेणार नाही. परंतु ते बंदिवासात आहेत तो पावेतो राष्ट्राच्या सेवेची सहस्रावधी कामे चालविण्यासाठी इतर देशभक्तांनी पुढे येऊन त्यांच्या

अनुपस्थितीत राष्ट्राची सेवा अधिक उत्तम प्रकारे करून दाखविणे, राष्ट्रीय कार्ये - लहान वा मोठी - अधिक नेटाने पुढे ढकलणे, ज्या राष्ट्रीय संस्थांतील त्यांची आसने रिकामी पडली आहेत ती नव्या नव्या कार्यकर्त्यांकडून भरून काढून ती ती कामे अखंड चालू ठेवणे हाच राष्ट्रीय देशभक्तीचा खरा मार्ग होय. वैयत्ति क देशभक्तीचा गौरव हा राष्ट्रीय कार्यापुढे नेहमी दुय्यम प्रश्नच ठरणार. तरीसुद्धा तुमच्यामागे आम्ही राष्ट्रांतील राष्ट्रीय संस्थांचा आणि लोकसेवेचा गाडा सर्व प्रकरणी पुढेच ढकलीत गेलो आहत हे सिद्ध करून दाखविण्यातच त्यांच्या वैयत्ति क देशभक्तीचाही खरा गौरव होणार आहे. दुसरी गोष्ट अशी की, काँग्रेसच्या बंदिगृहातील सभासदांचा खरा गौरव करण्याचे साधन जर नगरसंस्था प्रभृती राष्ट्रीय संस्था ओसाड पाडणे किवा अनिष्ट हितशत्रूंच्या हाती त्या पडू देणे हाच आहे असे काँग्रेसला वाटत असेल तर तिचे आज बंदिवासाबाहेर असलेले सभासदही बंदिवासामध्ये का गेले नाहीत? त्यांच्या व्याख्येप्रमाणे तरी ते देशभक्त का होत नाहीत? किंवा निदान नगरसंस्थेतील आपल्या सर्व जागा सोडून देऊन बाहेर का पडत नाहीत? त्यांच्या काँग्रेसीय सहकाऱ्यांच्या जागा ते बंदिवासात गेल्यामुळे रिकाम्या पडल्या असताही हे काँग्रेसीय सभासद तेवढे बंदीबाहेर राहून आपापल्या जागांना चिकटून आपली स्वतःची कामे का करीत राहिले आहेत? मुंबई नगरसंस्थेवर प्रथम बहिष्कार टाकून नंतर पुन्हा नाक मुठीत धरून हे नगरसंस्थेत का घुसले? ह्या त्यांच्या विसंगत कृतीमुळे त्या बंदिस्त काँग्रेस सभासदांच्या देशभक्तीचा अपमान झाला असे जर त्यांना वाटत नाही, आपले सहकारी बंदिवासात असतानाही आपण तेवढे बाहेर राहून तेथील कामे अडवून ठेवण्याने नागरिकांच्या हिताची मोठी हानी होईल आणि प्रतिपक्षाची काही एक हानी न होता निष्कारण सार्वजनिक, कार्याचा गाडा अडविल्याचे पाप मात्र पदरी पडेल म्हणून आम्ही नगरसंस्थेत कामे करतो असे समर्थन जर ते स्वतःच्या वर्तणुकीचे करू लागतील तर त्याच समर्थनाप्रमाणे हिंदू सभेचे इच्छुकही नगरसंस्थेत निवडून जाऊन रिकाम्या पडलेल्या जागा भरून काढून या नगरांतील एकंदर नागरिकांचे आणि त्यातही विशेषतः बहुसंख्य असलेल्या येथील हिंदू समाजाच्या विशिष्ट हिंदुहितास जपण्याचे नि संवर्धिण्याचे राष्ट्रीय कार्य जे करू अच्छितात त्यांचेही समर्थन ही काँग्रेस आपल्याच तोंडाने नि आपल्याच कृतीने करीत नाही काय? देशभक्तीविषयीच बोलावयाचे तर काँग्रेसमध्ये देशभक्त आहेत आणि हिंदू महासभेच्या धोरणाचे समर्थन करणाऱ्यांत देशभक्त नाहीत असे म्हणणारा काँग्रेसमध्ये कोणी निघेल असे वाटत नाही. पण कोणी जर निघालाच तर तो अधमांतील अधम होय.

(२) काही देशभक्तांनी चूक केली म्हणजे सबंध देशानेही ती चूक केलीच पाहिजे असे नाही, तर उलट ती सुधारली पाहिजे. वास्तविक नगरसंस्थेचे जे दहा-बारा काँग्रेस सभासद 'क्विट अंडिया बट कीप युवर आर्मी हिअर' या ठरावासाठी कारागृहात गेले आहेत त्यांनीच आपण होऊन नगरसंस्थेतील आपल्या जागा मोकळया करून द्यायला हव्या होत्या. आरोग्य, अन्नपाणी, प्रकाश यांसारख्या प्रश्नांतून तो उद्या प्लेगसारखी एखादी भयंकर साथ सुरू झाली तर अशा मरणांतिक संकटापर्यंतच्या प्रकरणी लाखो नागरिकांच्या संरक्षणाची दैनंदिन कामे

करणाऱ्या नगरसंस्थेच्या त्या जागा आमच्यासाठी रिकाम्या टाकू नका तर नवीन प्रतिनिधींना ती लोकसेवा करू द्या, असे त्यांनीच सांगून आपल्या देशभक्तीची पत राखावयास पाहिजे होती. पण विधिमंडळात काय किंवा नगरसंस्थेत काय कामे करण्यासाठी म्हणून हिंदू मतदार संघाकडून निवडून यायचे, आपल्या लहरीप्रमाणे मतदारसंघास न विचारता ती कामे सोडून दुसरीकडे निघून जावयाचे आणि पुन्हा आपल्या अनुपस्थितीत ती कामे दुसऱ्या कोणी करू नयेत म्हणून देशघातक दुराग्रह धरावयाचा, आपली आसने मोकळी करून द्यावयाची नाहीत हे एक काँग्रेसचे आप्पलपोटे धोरण सर्वच प्रकरणी चालू आहे. ती देशभक्तांनी केलेली असली तरीही राष्ट्रहितघातक घोडचूकच आह आणि म्हणून हिंदू मतदारांनी तिचा जाब विचारून ती यापुढे सुधारली पाहिजे. निवडून दिलेले प्रतिनिधी हे लोकांचे सेवक म्हणवितात. जर का एखाद्या गृहस्थाने एखाद्या कामासाठी ठेवलेला सेवक एके दिवशी अकस्मात आपणास देशभक्ती करावयाची म्हणून धन्यास न विचारता निघून गेला तर त्याचा धनी तो विचारून गेला नाही या अपराधाकडेही एकवेळ दुलर्क्ष करील, पण जर तो सेवक म्हणू लागला की, 'मी तर गेलोच. पण मी देशभक्त असल्यामुळे तुम्ही तुमची कामे करण्यासाठी माझ्या जागी दुसरा सेवक निवडता कामा नये. ती कामे तशीच पडू द्यात. कारण मी देशभक्त आहे, तर त्याचा तो हट्ट निव्वळ वेडगळपणाच ठरेल. किवा एकाने आपला खटला लढविण्यास एक विधिज्ञ दिला. पुढे त्या विधिज्ञाला ब्रह्मज्ञानाची लहर येऊन वादीप्रतिवादी ही सगळी माया आहे असे वाटून तो खटला चालविनासा झाला तर त्याने आपल्या पक्षकारास 'तू दुसरा विधिज्ञ दे. मी हे काम सोडले आहे. ' असे सांगणे हे त्याचे पहिले कर्तव्य होय. पण ते न करता तो जर त्या पक्षकारास दम भरू लागला की 'तुझी विधिज्ञकी मी करणार नाही पण तू मात्र माझे विधिज्ञपत्र रद्द करू नये, दुसरा विधिज्ञही नेमू नये. तसे करणे माझ्या ब्रह्मवादी साधुत्वाचा अपमान होईल. ' तर तो त्याचा दुराग्रह जसा ब्रह्मवादीपणाचा ठरणारा नसून दांभिकपणाचा ठरणारा आहे तसाच हिंदूंचे प्रतिनिधी म्हणून, दैनंदिन लोकसेवेची कामे करण्याकरिता निवडून येऊन ज्यांचे आपण प्रतिनिधी त्यांना न विचारताच आपली आसने विधिमंडळातून नि नगरसंस्थांतून मोकळी टाकायची, त्यायोगे प्रतिपक्षाची सत्ता अधिक बळकट करायची आणि दुसऱ्या लोकसेवकांना ती कामे करण्यासाठी मतदार निवडून देऊ लागले तर मी माझ्या लहरीप्रमाणे सोडलेली लोकसेवेची कामे दुसऱ्या कोणीही करता कामा नयेत. माझी जागा एक प्रकारची माझी जहागीर समजली गेली पाहिजे असे म्हणायचे! आमच्या काँग्रेसी मंडळींची अशीच प्रवृत्ती आहे. हा त्यांचा दुराग्रह विचित्रपणाचा नि काही अंशी निव्वळ दांभिकपणाचाच आहे.

(३) सरकारला हे आव्हान नव्हे, आळवणी आहे, आवेदन आहे. काँग्रेसी प्रचारक एक प्रचारक ढंग म्हणून भोळसट मंडळींना सांगतात की, ही निवडणूक म्हणजे सरकारला आव्हान आहे. सरकारने या काँग्रेसी सभासदांना पकडले ते 'क्विट अंडिया बट कीप युवर आर्मी हियर' या ठरावासाठी पकडले. म्हणून नगरसंस्थेतील त्यांच्या आसनांवर त्यांनाच पुन्हा निवडून देणे

हे सरकारच्या आव्हानालाच एक उत्तर आहे. आणि प्रतिआव्हान आहे असे त्यांचे म्हणणे. परंतु ही निवडणूक जर सरकारची कोणत्याही प्रकारने अनुज्ञा न घेता, आवेदन न करता, सरकारने बंदी केली असताही तीस न मानता आपल्या स्वतंत्र झालेल्या देशाच्या एखाद्या नगरसंस्थेतील असती तर असल्या गर्जनांना काहीतरी अर्थ होता पण आजच्या ह्या मुंबई नगरसंस्थेच्या निवडणुकींना सरकारने दिलेले आव्हान किवा सरकारला दिलेले प्रतिआव्हान म्हणणे या निव्वळ वल्गना आहेत. कारण ज्या सरकारला 'क्विट अंडिया' म्हणून ज्यांनी आज्ञापिले त्याच सरकारची अनुज्ञा घ्यावी, त्याच सरकारच्या अनुज्ञेप्रमाणे जी निवडणूक होऊ शकते, ज्या दिनांकाला होऊ शकते. ज्या नियमांप्रमाणे होऊ शकते ते त्यांचे सगळे नियम शिरोधार्य मानून त्या सरकारच्या सत्तेखाली एका साधारण नगरसंस्थेत आपली निवडणूक व्हावी म्हणून आळवणी करणे, अवश्य ते आवेदन करणे म्हणजे त्यांनी होऊन त्यांच्या 'क्विट अडिया'च्या पतीचे अगदी दिवाळे वाजविणे होय. ते आता या निवडणुकीच्या प्रकरणी तरी 'क्विट अंडिया'च्या पातळीवरून केवळ अंग्रजांच्या नगरसंस्थेत घुसू अच्छिणारे एक इच्छुक या पातळीवरच काय ते उभे आहे. या निवडणुकीच्या प्रकरणी तरी त्यांना एक इच्छुक या नात्यानेच इतर अच्छुकांप्रमाणे वागविले पाहिजे.

नगरसंस्थेच्या निवडणुकीत त्यांनी भाग घ्यावा या धोरणाला आम्ही स्वतः काहीच दोष देत नाही. किंवा कोणाच्या देशभक्तीस ते उणेपणाचे आहे असे समजत नाही. परंतु काँग्रेसचे इच्छुक हेच तेवढे देशभक्त किंवा सरकारचे नियम अक्षरशः पाळणाऱ्या काँग्रेसी अच्छुकांना मते देणे म्हणजेच काय ते सरकारला आव्हान देणे होय अशा ज्या वल्गना काँग्रेसचे प्रचारक करीत आहेत, त्या फोल आहेत आणि 'क्विट अंडिया बट कीप युवर आर्मी हियर' या ठरावाइतक्याच विसंगत आणि निरर्थक आहेत हे सांगण्यापुरताच काय तो वरील दोन-तीन कारणांचा विचार करणे भाग पडेल.

(४) परंतु वास्तविक पाहता ज्याला ज्याला हिंदुत्वाचे न्याय्य अधिकार रक्षण करायचे आहेत त्याला त्याला काँग्रेसच्या कोणत्याही कोटीक्रमाशी काहएक कर्तव्य नाही. बंदिस्त असलेल्या किवा नसलेल्या दुय्यम किवा प्रमुख अशा कोणत्याच काँग्रेसच्या इच्छुकाला कोणत्याही निवडणुकीमध्ये आपले प्रतिनिधित्व, आपले मत न देणे हेच प्रत्येक हिंदुमात्राचे एक आद्यकर्तव्य होय. कारण की काँग्रेस स्वतःच अट्टाहासाने सांगत आहे की, ती हिंदूंची संस्था नव्हे, हिंदूंचे विशिष्ट हित सांभाळण्याचे त्यांचे ब्रीद नाही. तसे करणे हे राष्ट्रीय अधोगतीचे लक्षण आहे असे प्रकटपणे सांगणाऱ्या संस्थेने हिंदूंची मते मागणे हेच लज्जास्पद आहे. यास्तव मुंबई नगरसंस्थेच्या निवडणुकीतच काय पण कोणत्याही निवडणुकीत हिंदुत्वनिष्ठ मतदारांचे मुख्य कर्तव्य हे की हिंदुपक्षाचा प्रतिनिधी म्हणून जो हिंदू महासभेच्या तिकिटावर उभा राहील आणि मी केवळ हिंदूचेच हितरक्षण करण्यास बांधलेला आहे म्हणून वचन देईल त्यासच काय ते हाडाच्या हिंदूने मत दिले पाहिजे. इतर प्रश्न गौण आहेत. या तत्त्वानुसार हिंदू महासभेचे

अधिकृत इच्छुक गिरगाव विभागातील श्री. कृ. ह. ढमढेरे आणि दादर विभागातील श्री. रा. के. वैद्य यांसच मतदारांनी आपली मते द्यावीत.”

## निवडणूक निर्णयाचा बोध

गिरगाव महापालिकेच्या निवडणूक निकालानंतर ऑक्टोबर १९४३ मध्ये सावरकरांनी जे पत्रक काढले ते चिरंतन महत्त्वाचे आणि सावरकर विचारांचे दिग्दर्शन करणारे आहे. ते समग्र पत्रक असेः

“गिरगाव चौपाटी विभागात मुंबई नगरसंस्थेच्या दोन आसनांची जी पोटनिवडणूक परवा झाली, तीत या काँग्रेसचे दोनही इच्छुक निवडून आले याविषयी काँग्रसेनिष्ठांना आनंद वाटणे साहजिकच आहे नि जर हिंदुत्वनिष्ठांचा काँग्रेसलासुद्धा हादरून सोडणारा विरोध ज्या मुख्य कारणांसाठी होता ती कारणे विचारात घेऊन हे निवडून आलेले काँग्रेसनिष्ठ इच्छुक हिंदुत्वाचे न्याय्य अधिकार निर्भयपणे रक्षण करतील नि त्यायोगे राष्ट्रीय सभा ही खरोखरीच राष्ट्रीय आहे असे सिद्ध करतील तर हिंदुत्वनिष्ठांना ते निवडून आले म्हणून दुःख वाटण्याचे काहीच कारण नाही.

परंतु काँग्रेस ही स्वतःला तिच्या स्वतःच्याच प्रतिज्ञेमुळे हिंदूंची प्रतिनिधी म्हणवू शकत नाही आणि अशा किरकोळ पोटनिवडणुकांतून निवडून आलेले सभासद क्वचित हिंदुत्वनिष्ठ जरी असले तरीही काँग्रेसचे हिंदुहित आणि राष्ट्रहितविरोधी असे असलेले धोरण लहानसहान प्रश्नापासून ते पाकिस्तानसारख्या भयंकर प्रश्नापर्यंतसुद्धा बदलू शकणार नाही ही गोष्ट अगदी ठाम आहे. त्याचप्रमाणे हिंदुत्वनिष्ठ तिकिटावरच उभे असलेल्या प्रतिनिधींना हिंदू मतदारसंघ आपला हिंदूंच्या वतीने बोलण्याचा समग्र अधिकार जेव्हा देईल आणि ज्या ज्या प्रमाणात देत जाईल तेव्हा आणि त्या त्या प्रमाणातच काय ते हिंदूंचे न्याय्य हित साधू शकेल. अतकेच काय पण हिंदुस्थानचे राष्ट्रीय अखंडत्वही संरक्षिले जाईल, ही गोष्टही तितकीच ठाम आहे. श्री. श्रीप्रकाश, श्री. राजगोपालाचार्य नि श्री. गोपीनाथ श्रीवास्तवांपासून ते आझाद गांधींपर्यंत काँग्रेसच्या अनेक धुरंधर नेत्यांनी मुसलमानांच्या हाती अधिक प्रतिनिधित्वाचेच नव्हे तर पाकिस्तानचेही उदक सोडण्यास आपली स्पष्ट नि लेखी संमती वारंवार दिलेली आहे.

म्हणूनच एक निवडणूक जिंकली काय किवा दहा निवडणुकी हरल्या काय प्रत्येक हिंदुत्वनिष्ठाचे कर्तव्य हेच असणार की मी माझे मत तरी हिंदुत्वनिष्ठ इच्छुकासच देणार! मी तरी माझ्या हिंदू बांधवांना काँग्रेसला हिंदूंचे प्रतिनिधित्व अर्पिण्याच्या मारक धोक्यापासून सावध करीत राहणार! मग ज्यांना जाणूनबुजून आत्महत्याच करायची असेल त्या लाखो

www.savarkarsmarak.com

हिंदूंनी जर आंधळेपणाने वा हट्टाने काँग्रेसलाच मते देऊन आपले राष्ट्रीय मरण आपल्यावर ओढवून घेतले तर त्याचे पाप त्यांच्या माथ्यावर!

अशा प्रकारच्या बाणेदार हिंदुत्वनिष्ठेने या परवाच्या निवडणुकीच्या वेळी हिंदूमहासभेच्या वतीने सर्व भार नि दायित्व आपण स्वतः सोसून हिंदू महासभेचे इच्छुक म्हणून जे निवडणुकीस उभे राहिले आणि शेवटपर्यंत ज्यांनी धीरोदात्त वृत्तीने ती निवडणूक लढविली त्या श्री. कृष्णाजी हरी ढमढेरे यांनी सर्व हिंदुत्वनिष्ठांस खरोखरच उफत कले आहे. त्याचप्रमाणे तशाच तत्त्वनिष्ठेने हिंदूंची दोन-तीन हजार मते महासभेच्या इच्छुकाला पडली ही गोष्ट कोणत्याही उदयोन्मुख पक्षाला अभिनंदनास्पद आहे. अशा सर्व मतदारांचेही आम्ही आभारी आहोत. या निवडणुकीत हिंदुत्वाचा जो दांडगा प्रचार झाला आणि हिंदुत्वनिष्ठांच्या वाढत्या संघटणेने जो प्रभाव काँग्रेसच्या मनावरही पडल्यावाचून राहिला नाही; त्या विषयी हिंदूपक्षाच्या तत्त्वनिष्ठ, जिवापाड श्रम करणाऱ्या नि निरुत्साहास केव्हाही थारा न देणाऱ्या शेकडो स्वयंसेवकांचेही मी मनःपूर्वक आभार मानीत आहे.

निवडणुका जिंकण्याची किंवा हरण्याची अनेक कारणे असतात. त्यावरून कोणत्याही पक्षाचे चिरंतन बल हेरणे चुकीचे आहे. याच विभागात गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसची धुळदाण उडवून महासभेने पुरस्कृत केलेले इच्छुक बॅ. जमनादासजी मेहता पहिल्या क्रमांकाला निवडून आले होते आणि श्री. तळपदे, श्री. तटणीस, श्री. भगवंतराव परळकर प्रभृती महासभेने पुरस्कृत केलेल्या अच्छुकांनीही इतर विभागातून काँग्रेसचा पराभव केला होता.

अशी एक काय पण शंभर निवडणुका जरी आम्ही हरलो तरीदेखील एकशेएकावी निवडणूक जी येईल ती पण हिंदुत्वनिष्ठ पक्ष लढतील आणि तीतही हिंदू मतदारांना सत्य तत्त्व म्हणून सांगतच राहील की “हिंदुस्थानचे स्वातंत्र्य, हिंदुस्थानचे अखंडत्व आणि हिंदू राष्ट्र रक्षिण्याचे ब्रीद प्रकटपणे घेतलेल्या हिंदुत्वनिष्ठ प्रतिनिधीसच, जो जो हाडाचा हिंदू असेल त्याने मत दिले पाहिजे.

मतदारांचे कर्तव्य मतदार करोत वा न करोत मी हिंदू राष्ट्राचा एक सैनिक म्हणून माझ्यापुरते तरी माझे कर्तव्य मी केलेच पाहिजे!”

## दुष्काळातील बाटवाबाटवी

१९४३ साली बंगाल-ओरिसामध्ये पडलेल्या दुष्काळासंबंधी काढलेल्या एका पत्रकात सावरकर लिहितातः

“बंगाल, ओरिसा आणि इतर प्रांतात अन्नदुर्भिक्ष्याने अतका कहर उडवून दिलेला आहे की, हिंदुस्थानातील कोनाकोपऱ्यांतून प्रत्येकाचे अंतःकरण या विभागांतील लोकांचे हाल पाहून वा अैकून गदागदा हलविले गेले आहे आणि हिंदुस्थानातील संस्था नि व्यक्ती यांच्याकडून मदतीसाठी पैशाचा पाऊस दुर्भिक्ष्याच्या प्रांतावर पाडण्यात येत आहे. तरीदेखील सुधारावी तशी परिस्थित सुधारत नाही, मृत्यूच्या दाढेतून या दुष्काळपीडितांना वाचविण्यासाठी सर्व हिंदुस्थान आज प्रयत्न करीत आहे. यावरून या आपत्तीचे स्वरूप किती भयंकर असेल याची कल्पना येण्याजोगी आहे.

परंतु दुष्काळग्रस्त प्रांतांतील हिंदु समाजावर वरील आपत्तीपेक्षाही भयंकर अशी आपत्ती या दुष्काळामुळे आलेली आहे. ती म्हणजे शारीरिक मरण टाळण्यासाठी सांस्कृतिक नि धार्मिक मरण ओढवूनच घ्यावे लागत आहे ही होय.

या दुष्काळी प्रांतांतून उपाशी हिंदूंना अन्नाची आशा दाखवून मुसलमान बनविण्याचे संघटित प्रयत्न तेथील मुस्लिम संस्था करीत आहेत याची माहिती बहुसंख्य हिंदूंना आहे काय? मरत असलेल्या हिंदू मनुष्यास मुसलमान अन्न देतो, पण केव्हा, तर तो हिंदुत्व सोडून इस्लामला कवटाळील तेव्हाच! नाहीतर त्या मरणाऱ्या व्यक्तीकडे मुसलमान मजेने पहात राहतो! या वृत्तीचे धर्माच्या नावाखाली मुसलमान लोक मोठ्या अभिमानाने समर्थन करतात! तसेच राजकीय डावाच्या नावाखाली हे प्रयोग क्षम्य मानले जात आहेत! मृत्यूच्या शय्येवर पडलेल्या आणि मेलेल्या अशा मुलांना आणि बाया-बापड्यांना कोल्ह्या-कुत्र्यांनी खाल्ल्याची उदाहरणे वाचून कितीतरी जणांना वाईट वाटले असेल. परंतु वरील मुसलमान हे त्या कोल्ह्या-कुत्र्यापलीकडचे पशू ठरत नाहीत काय? कोल्ही-कुत्री हे तर बोलून चालून पशूच आहेत. परंतु हे मनुष्यवेशधारी पशू त्यांच्यापेक्षा भयानक होत.

म्हणून हिंदुत्वाची चाड बाळगणाऱ्या सर्व संस्थांनी आणि व्यक्तींनी यावेळी आपली शिकस्त करून आपल्या हिंदू बांधवांना या प्राणघातक संकटांतून सोडविले पाहिजे.

गेल्या कित्येक शतकांचा अतिहास आपणास हेच सांगतो की, दुष्काळ, रोगांच्या साथी आणि राष्ट्रीय आपत्ती ही सर्व मुसलमानांच्या इस्लामीकरणाच्या कारवायात साधनासारखीच उपयोगी पडली आहेत.

बंगालमध्ये मानवाच्या उदात्त भूमिकेवर जातगोत न पाहता सरसहा सर्वांनाच साहाय्य करणाच्या कामी रामकृष्ण मिशन, बंगाल साहाय्यक समिती आदी संस्था काम करीतच आहेत. परंतु मुसलमान लोक त्यांचा लाभ अन्य रीतीने घेत आहेत. हिंदुस्थानातही मुसलमानांनी केवळ मुसलमानांच्याच साहाय्याकरीता म्हणून निधी जमविला आहे आणि वर उल्लेखिलेल्या प्रकारच्या लोकसंस्थातून मुसलमान उपवासितांना साहाय्य मिळत असल्याकारणाने मुसलमानांनी जमविलेल्या निधीचा विनियोग हिंदूंना बाटविण्याच्या कामी निर्माण केलेल्या संस्थेच्या कार्यात ते करीत आहेत. म्हणून यापुढे तरी हिंदूंनी केवळ हिंदूंकरिताच म्हणूनच साहाय्य पाठवावे म्हणजे मुसलमानांना आपला निधी मुसलमानांनाच पोसण्यासाठी खर्च करावा लागेल आणि हिंदूंना बाटविण्यासारख्या या घातुक वृत्तीकडे त्यांना लक्ष देण्यास फुरसतच मिळणार नाही. हिंदूंना हानिकारक असलेल्या ह्या गोष्टी मी जाणूनबुजून उजेडात आणीत आहे. याचे कारण बहुतेक सर्वसाधारण जनता वृत्तपत्रे नि व्याख्याने यांना आणि विधिमंडळाच्या अधिवेशनांनादेखील या गोष्टी प्रसिद्ध करण्यास लाज वाटली म्हणून मला हे कटू सत्य सांगावे लागत आहे.

## बंगाल युद्धतळ होणार

११ जानेवरी १९४४ रोजी सावरकरांनी चेतावणी देणारे एक पत्रक काढले ते असेः

“आता लवकरच युद्धाचा तळ म्हणून बंगालचे महत्त्व वाढत असताना तेथे हिंदुस्थानच्या केंद्रशासनला धाब्यावर बसवू पाहणारे मुस्लीम लिग नि पाकिस्तानी प्रवृत्तीचे मंत्रिमंडळ नांदू देणे धोक्याचे आहे.

केंद्रीय मंत्री सर ज्वालाप्रसाद यांनी अन्नप्रश्नात राजकारण घुसडून या बंगालची कोंडी केल्याची लीगची बडबड धादांत खोटी आहे. प्रांतिक स्वायत्ततेच्या रक्षणासाठी आपण केंद्राशी झगडत आहोत हा त्या मंत्रिमंडळाचा दावाही चुकीचा आहे. कारण त्यांनीच १९३९ साली काँग्रेसने मंत्रिपदे सोडली तेव्हा मुक्ति दिन साजरा करून केंद्रीय सत्तेचा पुरस्कार केला आहे आणि १९४३च्या बंगालमधील भयंकर दुष्काळात मुस्लीम लिगनेच जातीय वृत्ती जोपासली हे डॉ. मुखर्जी यांनीही दाखवून दिले आहे. संपूर्ण हिंदुस्थानात एक धोरण राहूच नये या पाकिस्तानी वृत्तीनेच बंगालचे मंत्रिमंडळ वागत असल्याने, तसेच सैनिकी दृष्टीनेही बंगालमध्ये मुस्लिम लीगी राजवट धोक्याची ठरणार असल्याने केंद्राने तेथील कारभार आपल्या हाती घ्यावा."

## तो निर्णय युद्धदेवतेच्या हाती !

युद्ध संपेपर्यंत येथील कोणत्याही प्रश्नाचा विचार न करता आपण केवळ शत्रूला पराभूत करण्यासाठी पूर्वाभागातील सेनाप्रमुखांना साहाय्य करणे आणि हे युद्ध जिंकणे यासाठी काय ते प्रयत्न करण्यात येतील; या व्हॉइसरॉय वॅव्हेल यांच्या धोरणावर आपले विचार व्यक्त करणारे एक पत्रक सावरकरांनी फेब्रुवारी १९४४ मध्ये काढले त्या पत्रकात ते लिहितातः

"व्हॉइसरॉयनी आपले धोरण स्पष्ट केल्यामुळे त्यांच्या भाषणाकडे स्वातंत्र्याच्या आशेने पाहणाऱ्या अनेक अंधविश्वासू नि आशाळभूत लोकांचे डोळे उघडतील अशी आशा आहे. व्हॉइसरॉयनी स्पष्टच सांगितले आहे की सध्या कोणतेही नवे सरकार स्थापन केले जाणार नाही, राजकीय बंद्यांना ते सरकारचे सांगणे मानीत नाहीत तोवर सोडणार नाही आणि प्रांतांना अधिकार न देता सर्व सत्ता केंद्रीभूत केली जाईल. युद्धानंतर आपण काय करू याचेही एक शब्दचित्र या भाषणात व्हॉइसरॉयनी रेखाटलेले आहे, पण त्यात नवीन असे काहीच नाही. तसेच युद्धानंतर काय होईल ते त्यांच्या हाती नसून तो निर्णय युद्ध-देवतेच्या हाती राहील.

तसेच प्रांतांना विशेष अधिकार न देण्याच्या त्यांच्या घोषणेने मुसलमानांचे हिंदूंना विरोध करून पाकिस्तान मिळविण्याचे स्वप्नही भंग पावेल. मुसलमानांनी लक्षात ठेवावे की ब्रिटिश त्यांच्या हितासाठीच केंद्रसत्ता दुर्बल होऊ देणार नाहीत. अलग राज्याला हिंदूंपेक्षा ब्रिटनच अधिक विरोध करील. क्रिप्स मिशनला सादर केलेल्या निवेदनात भारत अखंड ठेवावा यासंबंधी जी कारणे हिंदू सभेने दिली होती तीच कारणे यावेळी वेव्हेल यांनी त्यांच्या भाषणात सांगितली आहेत. त्यांना हा युक्ति वाद जर खरोखर पटला असेल तर त्यांनी क्रिप्स योजनेतील स्वयंविर्णयाची योजना सोडल्याची घोषणा करणे आवश्यक आहे. पण या संबंधी त्यांनी जाणूनबुजून मौन पाळले आहे की अज्ञानाने तसे घडले आहे?

कसेही असो, जमनादास मेहतांनी म्हटल्याप्रमाणे सध्या तरी पाकिस्तानचे कबरस्तान झाले आहे. तरी आता यापासून बोध घेऊन जीनांनी नि मुसलमानांनी बहुसंख्य हिंदूंशी प्रेमाने वागून ह्या भारतमातेची सेवा करावी.”

## वर्ष प्रतिपदेस घरोघर हिंदुध्वज उभारा

युद्धदेवता आपल्याला अनुकूल व्हावी, त्यासाठी हिंदू राष्ट्र सज्ज व्हावे या जागृतीसाठी सावरकारांनी जे सतत प्रयत्न चालविले त्याचाच एक भाग म्हणजे त्यांनी १४ मार्च १९४४ रोजी एक पत्रक काढून सर्व महाराष्ट्रीय हिंदूंना आवाहन केले की ttत्यांनी येत्या वर्षप्रतिपदेच्या दिवशी घरोघर भगवे ध्वज उभारावेत. त्या पत्रकाचा सारांश असाः

“प्राचीन काळापासून वर्षारंभाच्या दिवशी घराघरावर ध्वज उभारण्याची प्रथा आपल्याकडे आहे. आपल्या हिंदू राष्ट्रात वेगवेगळे वर्षारंभ मानले जात आहेत त्यापैकी महाराष्ट्रात चैत्रप्रतिपदा हा वर्षारंभ आहे. पण पारतंत्र्याच्या काळापासून गुढी म्हणून आपल्या घरापुढे रेशमी वस्त्र, झबली, कुंच्या,

चोळया बांधून त्यावर गडू ठेवला जातो. ज्या राष्ट्राचा ध्वजच चोळीचा वा चरख्याचा, त्या राष्ट्राच्या पौरुषाविषयी वा पराक्रमाविषयी काय बोलावे? तरी गुढीचे हे विडंबन सोडून आता गुढीपाडव्याला घरोघर हिंदुध्वज उभारा. त्यातही सध्या हिंदुसंघटनाचे नि हिंदू पुनरुत्थानाचे प्रतीक असलेला नि भारतात लक्षावधी जागृत हिंदूंकडून मान्यता पावलेला कुण्डलिनी-कृपाणांकित हिंदुध्वज झोपडीपासून राजवाड्यापर्यंत सर्वत्र उभारला जावा."

## हिंदुसभेचे यश

मुंबई महापालिकेत मुसलमानांना चार स्थाने अधिक द्यावीत अशी सूचना शासनाने राजपत्रात प्रसिद्ध करून त्यावर लोकांची मते मागवली. मुंबई हिंदू सभेने ह्या सूचनेला विरोध केला. त्यानंतर शासनाने ही सूचना स्थगित केली. त्यासंबंधी २१ मार्च १९४४ रोजी काढलेल्या एका पत्रकात सावरकर लिहितातः

"शासनाने दिलेले निवडणुका स्थगित करण्याचे कारण लंगडे वाटते. हिंदू सभेच्या ह्या विजयाचा आणखीही एक अर्थ आहे. मुंबई महापालिकेत काँग्रेसचे बहुमत आहे आणि काँग्रेसचे वरिष्ठ नेते मुसलमानांना ही चार स्थाने बहाल करण्यास सिद्ध होते. पण हिंदू सभेने त्याविरुद्ध आंदोलन चालविल्याने काँग्रेसमधील बहुसंख्य हिंदू सभासद विचारात पडले. आपण मुसलमानी मागणीस संमती दिल्यास बहुसंख्य हिंदू मतदार आपणाला निवडून देणार नाहीत; अशीही त्यांना भीती वाटू लागली. ह्यासाठी हिंदू सभा निवेदनावर स्वाक्षऱ्या करणारे तीस सहस्र मतदार. तसेच मुंबई हिंदू सभेचे नेते सी. के. बोले, राजा नारायणलाल, अधिवक्ते तळपदे, ल. ग. थत्ते प्रभृतींचे मी अभिनंदन करतो.

## गांधींप्रमाणे इतरांनाही सोडा

महात्मा गांधींच्या २१ महिन्यांच्या बंदिवासानंतर ६ मे १९४४ रोजी सुटका झाली, तेव्हा सावरकरांनी त्यासंबंधी काढलेल्या एका पत्रकात त्यांची सहृदयता दिसून येते. ते पत्रक असेः

"अशक्त प्रकृतीमुळे गांधीजींची मुक्तता झाल्याचे अैकून तर अखिल राष्ट्राला हायसे वाटत आहे. भूतदयेने प्रेरित होऊन सरकारने त्याना विमुक्त केले आहे. महात्माजींच्या प्रकृतीला लवकर आराम पडावा असे मी इच्छितो शासनाने आता पंडित जवाहरलाल नेहरू आणि इतर स्थानबद्ध काँग्रेस कार्यकर्ते यांनाही मुक्त करावे अथवा त्यांच्यावर अभियोग भरून त्यांना कोणत्या आरोपाखाली अटकेत ठेवले आहे ते जनतेला स्पष्ट करून सांगावे."

## जीनांना उत्तर

१० मे १९४४ रोजी काढलेल्या एका पत्रकात बॅ. जीना यांना उत्तर देताना सावरकर लिहितातः

“पंजाबातील संयुक्त मंत्रिमंडळासंबंधी माझ्या पत्राचा जो अर्थ जीनांनी लावला आहे तो चुकीचा आहे. असे चुकीचे अर्थ हेतुतः लावून जर माझी खरी पत्रके बाहेर पाडण्याचा त्यांचा डाव असेल तर त्यांनी लक्षात घ्यावे की मी काही अतका सहज फसणारा नेता नाही. जीनांच्या अलीकडील वत्त व्यांवरून त्यांनाही हिंदूसभेची मैत्री पाहिजे असे दिसू लागले आहे. पण त्यांनी लक्षात ठेवावे की ही मैत्री अतकी सोपी नाही. आज सिध किवा सीमाप्रांतात जे हिंदू मंत्री लीगच्या मंत्र्यांशी सहकार्य करीत आहेत, त्यांनी लीगच्या ध्येयधोरणाला पाठिंबा दिलेला नाही तर केवळ हिंदू-शीख यांच्या हितरक्षणार्थ ते त्या मंत्रिमंडळात गेले आहेत. त्याचप्रमाणे पंजाबातही जर हिंदू नि शीख युती पक्की राहिली तर ती मातृभूमीच्या विच्छेदनाची जीनांची स्वप्ने हाणून पाडून अखंड भारताचे स्वातंत्र्य संपादन नि रक्षण करण्यास समर्थ ठरेल.”

## उर्दूविरुद्ध युद्ध पुकारले पाहिजे

६ जून १९४४ रोजी सावरकरांनी वीर रामचंद्र शर्मा यांच्या उपोषणासंबंधी एक पत्रक काढले. त्याचा सारांश असाः

“जयपूरचे मुख्यमंत्री सर मिर्झा अस्माईल यांच्या हिंदूविरोधी कारभाराच्या निषेधार्थ प्रसिद्ध हिदुंसंघटनी कार्यकर्ते वीर रामचंद्र शर्मा गेले वीस दिवस दिल्लीत उपोषण करीत आहेत. हिंदूंचा समूळ नायनाट करण्याच्या दुष्ट बुद्धीने वागणाऱ्यांचे अशा उपोषणाने हृदयपरिवर्तन होईल की नाही या प्रश्नाची चर्चा करण्यास वेळ नाही. सध्या वस्तुस्थिती अशी आहे की शर्माजींच्या सेवेला डॉक्टर्स नाहीत तसेच शर्माजी काही उत्तेजक नि पोषक औषधेही घेत नाहीत त्यामुळे त्यांची प्रकृती सतत क्षीण होत आहे. तसेच जयपूरमधील व्यवहार देवनागरीत लिहिलेल्या हिंदीमध्ये चालावा आणि उर्दू लिपी शिकण्याची सेवकांवर सक्ती नसावी; ह्या शर्मांच्या दोन्ही मागण्या हिंदुत्वाचे दृष्टीने महत्त्वाच्या आहेत.

सध्या मुसलमान समाज सर्व ठिकाणी उर्दूसाठी आग्रह धरीत आहे. सर्व मुसलमान संस्थानातून उर्दू हीच राज्यभाषा म्हणून मान्यता पावत आहे. एवढेच काय पण बंगाल नि कोंकण येथील मुसलमानसुद्धा उर्दूसाठी आंदोलने करीत आहेत. त्या आंदोलनाचा एक भाग म्हणूनच सर मिर्झा ९३ टक्के हिंदुवस्ती असलेल्या जयपूर ह्या हिंदू राज्यातही उर्दूचे प्रस्थ वाढवीत आहेत. दैव एवढेच की त्याने अद्याप महाराजांना नि त्यांच्या कुटुंबीयांनाही गादीवर बसायचे तर उर्दू आलीच पाहिजे अशी आज्ञा काढली नाही!! अशा परिस्थितीत देवनागरी हिंदी हीच आपली राष्ट्रभाषा आहे, अथवा मातृभाषा आहे असे जे मानतात त्यांनी उर्दूविरुदध युद्ध पुकारले पाहिजे. कारण हा प्रश्न केवळ भाषेचा नसून राजकारणाचाही आहे.

या युद्धाची पहिली तुतारी जयपुरात फुंकून इतर सर्व किरकोळ मतभेद बाजूला ठेवून सर्व हिंदूंनी एकमुखी मागणी करावी की जयपूरची राज्यभाषा म्हणून देवनागरी लिपीतील हिंदीलाच मान्यता मिळावी आणि उर्दू शिकण्याची अट काढून टाकावी. यासाठी श्रमविभाग म्हणून हे आंदोलन मुख्यतः हिंदी प्रांतांतील हिंदी भाषेच्या अभिमान्यांनी चालवावे. हिंदू महासभा त्यांना साहाय्य करीलच पण तिला पाकिस्तानापासून खेडेगावातील दंग्यांपर्यंत अनेक संकटांना तोंड द्यावे लागत आहे त्यामुळे तिला ह्या आघाडीवरच सर्व लक्ष केंद्रित करता येणार नाही. मात्र हिंदी भाषी संस्थांना ती या लढ्यात सर्व प्रकाराने साहाय्य करील.

याचा प्रारंभ म्हणून १५ जून ते २२ जून उर्दूविरोधी सप्ताह पाळावा. या सप्ताहात सर्व हिंदुत्वनिष्ठ संस्थांनी प्रस्ताव करून वीर शर्मा यांच्या मागण्यांना पाठिंबा द्यावा आणि हे प्रस्ताव जयपूरचे महाराज, राजकीय प्रतिनिधी आणि मुख्यमंत्री मिर्झा यांच्याकडे पाठवावेत. हिंदी वृत्तपत्रांनीही ह्या आंदोलनाचे समर्थन करावे; त्याला चालना द्यावी.

नंतर शक्य त्या संस्थांनी महाराजांकडे शिष्टमंडळे पाठवावीत. तसेच संपूर्ण राजस्थानात ह्या मागणीचा प्रचार करावा. एवढे काम नेटाने झाले की महाराज आणि मिर्झाही हिंदूंची मागणी मानतील.

पण हिंदुसंघटकांनी हा प्रश्न सहज सुटेल असे न समजता ह्या लढाईत कोणत्याही विरोधास तोंड देण्यास सिद्ध रहावे कारण हा पाकिस्तानविरोधी युद्धाचा एक भाग आहे!!

## पंढरपूर यात्रेवरील बंदी उठवा

शासनाने पंढरपूरच्या आषाढी यात्रेवर बंदी घातली आहे तरी यासंबंधात काय करावे असे सावरकरांना विचारण्यात आले. तेव्हा त्यासंबंधी १५ जून १९४४ च्या पत्रकात सावरकरांनी लिहिलेः

“काहीतरी चुकीच्या समादेशामुळे राज्यपालांनी ही बंदी घातलेली दिसते. त्यांना बहुधा पंढरपूरचे महत्त्व माहीत नसावे. ख्रिश्चनांना रोम जितके पवित्र वाटते तितकेच मराठ्यांना पंढरपूर पवित्र वाटते. अतिहास काळात पंढरपूरची मूर्ती फोडणाऱ्या मुसलमान सरदाराचे शीरच मराठ्यांच्या राजाने छाटून टाकले आणि ते थेट विजापूरला घुसले. हाजच्या यात्रेला या युद्ध काळातही अनुज्ञा देणाऱ्या शासनाने पंढरपूर यात्रेला बंदी करावी हा हिंदूंवर अन्याय आहे. यासंबंधात मी राज्यपालांना पत्र लिहून कळविले आहे की ह्या यात्रेला अनुज्ञा दिल्याने युद्ध प्रयत्नात किंवा अन्नधान्य उत्पादनात नि वाटपात कोणताही अडथळा येणार नाही. तरी ही परिस्थिती लक्षात घेऊन ही बंदी उठवावी.”

## पंढरपूरच्या यात्रेकरूंचे अभिनंदन

सावरकरांच्या ह्या सावधानतेमुळे किंवा शासनाला बंदी घालणे अष्ट न वाटल्याने, कसेही असो पण पंढरपूरच्या यात्रेवरची बंदी उठली आणि ती यात्रा प्रतिवर्षापेक्षाही अधिक उत्साहाने आणि हिंदुसंघटनेच्या जागृतीने यशस्वी झाली. त्यासंबंधी ५ जुलै १९४४ रोजी काढलेल्या पत्रकात सावरकर लिहितातः

"पंढरपूरमध्ये एकाही यात्रेकरूने प्रवेश करू नये अशी आज्ञा असताही तेथे दीड लाख यात्रेकरू जमले. त्यांना धान्य देऊ नये अशी आज्ञा असताही त्या भागातील शेतकऱ्यांनी चपात्यांचे ढीग रचून यात्रेकरूंना अन्न पुरविले. उपहारगृहांना अन्न देण्याची बंदी असल्यामुळे तर तेथील नागरिकांनी हिंदू सभेच्या स्वयंसेवकांच्या मार्गदर्शनाने वेळी स्वतः अर्धपोटी राहून यात्रेकरुंना भोजन दिले. अशा प्रकारे पंढरपूरची यात्रा यशस्वी झाली. तिकडील गावोगावच्या हिंदूंनाही कळले की हिंदू महासभा हीच ह्या कार्यी लढणारी संस्था आहे. भागानगर नि भागलपूरनंतरचा हिंदू सभेचा हा एक मोठा विजय आहे. यासाठी मी सर्व कार्यकर्त्यांना धन्यवाद देतो."

## गांधींनी फाळणी स्वीकारली

पाकिस्तानला गांधीजींनी नि काँग्रेसने मान्यता दिली. तेव्हा त्यासंबंधी सावरकरांनी १४ जुलै १९४४ रोजी एक विस्तृत पत्रक मुंबईहून प्रसिद्ध केले. त्यात ते लिहितात:

"ह्या योजनेला गांधींनी मान्यता दिली आहे यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही! कानपूरच्या माझ्या भाषणात मी हे सर्व सांगितले असून ते तंतोतंत खरे ठरले आहे. अतिमानुष असा आतला आवाज माझ्याजवळ असल्याने मला ढोंग करावयाचे असते तर आज मी मोठा भविष्यवादी म्हणून मिरवलो असतो. 'भारत सोडा' चळवळीचा शेवट आता 'भारत तोडा' अशा मागणीत होत आहे. पण या शोकांतिकेचे खलनायक एकटे राजाजी आहेत असे समजणे अन्यायाचे आहे. त्यांचा दोष एवढाच की ते गांधींच्या हातातील खेळणे बनले.

यापुढेही राजाजींनी लक्षात ठेवावे की ते केवळ नावाचे राजे आहेत. हिंदुस्थानातील प्रांत ही काही त्यांची किंवा गांधींची वैयत्ति क मत्ता नाही की जी त्यांनी कोणालाही देऊन टाकावी. आमच्या ह्या पुण्यभूमीचा लहानसहान लचका तोडण्याचा विचार कोणा विश्वासघातकी भ्रांत राष्ट्रवाद्यांनी, लेचापेच्या मूर्खांनी किंवा स्वार्थसाधू लोकांनी केला तर त्यांना आव्हानीत हिंदू महासभा नि हिंदुसंघटनी जनता त्यांच्या मार्गात उभी आहे हे त्यांनी लक्षात ठेवावे.

केवळ तात्कालिक लाभावर दृष्टी ठेवून गांधी नि त्यांचे भगतगण, कोणाचीही संमती न घेता, देशघात करू पाहत आहे. अशा वेळी ज्या काँग्रेसी हिंदूंच्या अंगी हिंदू रक्त उसळत आहे, तसेच हिंदी राष्ट्राची एकता हे ज्या प्रागतिकांचे ब्रीद आहे त्यांनी त्यांनी पाकिस्तानविरोधी आघाडी उघडण्याच्या कामी हिंदू महासभेशी सहकार्य करावे.

या पाकिस्तानविरोधी मोहिमेची पहिली पायरी म्हणून या महिन्यात ठिकठिकाणी सभा भरवून गांधी-राजाजींच्या पाकिस्तानी योजनेस विरोध करणारे ठराव संमत करून ते व्हॉइसरॉयकडे पाठवावेत. आता सर्व संस्थांनी गुळमुळीतपणा सोडून निःसंदिग्ध शब्दात आपले मत व्यक्त करावे आणि आपल्या बाजूला कोण नि विरोधी कोण हेही पाहून घ्यावे आणि ह्या लढ्यासाठी आपले बळ संघटित करावे."

हे बळ कसे संघटित करावे यासंबंधी १८ रोजी सावरकरांनी दुसरे एक पत्रक काढले. त्यात त्यांनी लिहिले :

“कोणाचीही संमती न घेता गांधींनी जीनांना स्वयंनिर्णयाचा अधिकार दिलेला आहे. याविरुद्ध लोकमत जागृत करण्यासाठी सर्व हिंदू सभांनी ऑगस्टचा पहिला सप्ताह अखंड हिंदुस्थान सप्ताह किंवा पाकिस्तानविरोधी सप्ताह म्हणून साजरा करावा. त्यामध्ये (१) प्रत्येक हिंदूने अखंड भारतासाठी लढण्याची प्रतिज्ञा घ्यावी. (२) आपल्या या भागातील विविध पक्षांच्या नेत्यांचा अखंड भारतावर विश्वास असल्याच्या स्वाक्षऱ्या घ्याव्यात आणि त्यांच्या सहीची तशी पत्रके प्रसिद्ध करावीत. (३) माझ्या संपूर्ण पत्रकाचे आपल्या येथील भाषात भाषांतर करून त्याच्या सहस्रावधी प्रती काढून त्या लोकांना द्याव्यात. (४) ह्या संबंधीचे ठराव नि स्थानिक पुढाऱ्यांची पत्रके यांच्या प्रती व्हॉइसरॉयकडे पाठवाव्यात.”

## गांधींची मान्यता म्हणजे
## सर्वांची मान्यता नव्हे

गांधींची जीनांपुढे शरणागती स्वीकारण्याची सिद्धता पाहून २९ जुलै १९४४ रोजी सावरकरांनी भारतमंत्री अमेरी आणि अमेरिकेमधील वृत्तसंस्थांना एका पत्रकाद्वारे कळविले की :

“गांधींनी जरी देशविच्छेदनाला संमती दिली असली तरी ती सर्व हिंदूंची संमती समजली जाऊ नये. हिंदूंच्या हितरक्षणासाठी कटिबद्ध असलेल्या हिंदू महासभेला तसेच देशातील अन्य अनेक पक्षांना गांधीजींची तडजोड मान्य नाही. कलकत्ता येथील अंडियन असोसिएशननेसुद्धा पाकिस्तानी योजनेचा धिक्कार करून राष्ट्रीय वृत्तीच्या मुसलमान आणि ख्रिश्चनांनीही ही योजना धिक्कारावी असे एक आवाहन केले.”

## राजाजींना उत्तर

पुण्याच्या गाडगीळांप्रमाणेच प्रत्यक्ष राजाजी हेही सावरकर यांच्या प्रचाराने उफाळून सावरकरांवर टीका करीत होते. सावरकर भक्तांनी गाडगीळांवर अंडी फेकली तर स्वतः सावरकरांनी २४ ऑगस्ट १९४४ रोजी राजाजींना एक तर्कशुद्ध प्रत्युत्तर दिले. ते थोडक्यात असेः

“एका हिंदू महासभेवाचून सर्वांचा पाकिस्तानला पाठिंबा आहे, असे म्हणून श्री. राजगोपालचार्य यांनी हिंदू सभेचा गौरव केला आहे असे मी समजतो. राजाजींनी विषादपूर्ण भाषेत असे उद्गार काढले ही गोष्ट मात्र ध्यानात घेणे आवश्यक आहे. आपल्या कुटिल बुद्धीचा आणि काँग्रेसमधील लाखोपतींच्या द्रव्याचा उपयोग हिंदू महासभेला विकत घेण्यासाठी गेली तीन वर्षे राजाजी करीत आहेत. पण त्यांच्या या प्रयत्नांना यश येणे बाजूलाच राहिले, उलट हिंदू महासभा पाकिस्तानविरुद्ध छातीचा कोट करून धिटाईने उभी राहिलेली दिसते. हे राजाजींचे खरे दुःख आहे, हे पाहूनच की काय राजाजींचे मस्तक भणाणले असून ते मलाच स्वातंत्र्याचा उपदेश करू लागले आहेत. राजाजी म्हणतात, “माझ्या योजनेचा धिक्कार करण्यासाठी सावरकरांनी प्रत्येक हिंदूसंघटनवाद्याला उठावणी दिली आहे. पण आज हिंदी संघटनवाद्यांचे ध्येय मुसलमानांविरुद्ध संघटना करणे हे नसून देशाचे स्वातंत्र्य मिळविणे हे आहे’ माझ्या लेखनापासून आपल्याला स्वातंत्र्याची स्फूर्ती मिळाली असे पूर्वी प्रकटपणे सांगणारे राजाजी मलाच स्वातंत्र्याचा उपदेश करतात हे आश्चर्य नव्हे काय?

आचार्य कुलात जन्माला आलेल्या राजाजींचे संस्कृत भाषेचे ज्ञान जागृत असेल तर संघटन म्हणजे एकीकरण किवा दृढीकरण, संघटन म्हणजे विभाजन वा विच्छेदन नव्हे हे त्यांच्या ध्यानात येईल अशी मला आशा आहे.

या अर्थाने पाहिले तर राजाजींना पाहिजे असलेला खरा हिंदी संघटनवादी कोण? अखंड हिंदुस्थानचा पुरस्कर्ता का मुसलमानांना वेगळे राज्य द्यावे असे सांगणारा फाळणीचा पुरस्कर्ता राजाजी?"

## गांधींना गंडवून पाकिस्तान मिळणार नाही.

सप्टेंबर १९४४ मध्ये गांधी-जीना भेटी संबंधात युनायटेड प्रेसच्या वार्ताहरांशी बोलतांना सावरकर म्हणालेः

"या गांधी-जीना भेटीत मला काहीच आश्चर्य वाटत नाही. हिंदूंनी शरणागतीचे नि देण्याचे सत्र अविरतपणे आरंभल्यानंतर जर जीनांनी त्या हिंदूंना पिळण्याचा विचार केला नाही तर जीनांमध्ये शहाणपणाचा काहीच अवशेष उरला नाही असेच म्हणावे लागेल. जर देणारा दमत नसेल तर घेणाऱ्याने तरी का दमावे? तलवारीच्या बळाने जे जिंकता येणार नाही ते गांधींना गंडवून मिळविण्याची अपेक्षा मुसलमान करीत आहेत. परंतु खड्गाच्या बळावर हिंदूंना जिंकण्याची त्यांची आशा जशी फोल ठरली तशी हीही आशा निष्फळ झाल्यावाचून राहणार नाही."

## हिंदुसभेने काँग्रेसच्या हातांतील बाहुले बनू नये

प्रकृती बिघडल्यामुळे, ह्या वर्षी आपले नाव अध्यक्षपदासाठी सुचविले जाऊ नये असे सर्व हिंदू सभा शाखांना निक्षून सांगणारे एक पत्रक सावरकरांनी नोव्हेंबर १९४४ मध्ये काढले. त्यात त्यांनी व्यक्त केलेले विचार पुढीलप्रमाणेः

“या सात वर्षांत सतत केलेल्या कामामुळे मीही आता थकलो आहे. या काळात ज्यांनी ज्यांनी मला सहकार्य केले, माझ्यातील दोषांकडे दुलर्क्ष करूनही ज्यांनी मला सहकार्य दिले त्या सर्वांचे मी मनःपूर्वक पुन्हा एकदा आभार मानतो. या सात वर्षांत आपल्या सर्वांच्या सहकार्याने हिंदू महासभा सतत बलवत्तर बनत गेली आहे. तिने सर्व हिंदू जगतात नवी जागृती निर्माण केली आहे. त्यामुळे काश्मीरमधील हिंदूंच्या दुःखाच्या वेदना मद्रासमधील हिंदूलाही समजू लागल्या आहेत. या सात वर्षांच्या सतत परिश्रमाने त्या काळात उठलेल्या सर्व वादळांना तोंड देऊन हिंदूंचा एक सबळ पक्ष, हिंदू जातीच्या आकांक्षा निर्भयपणे व्यक्त करणारी संस्था म्हणून हिंदू सभा ओळखली जात आहे. याचेच प्रत्यक्ष प्रत्यंतर म्हणजे गांधी जीनांशी तडजोड करून देशाचे विभाजन करण्यास प्रवृत्त झाले असता ह्या दोन्ही शक्ति विरुद्ध कोणतीही जर-तरची लटपट न करता एक हिंदूसभाच देशाच्या अखंडत्वासाठी ठामपणे उभी राहिली. हिंदू सभा कार्यकर्त्यांच्या सतत प्रचाराने घाबरून जाऊन आज तरी फाळणीवाल्यांनी घाबरून त्यांची बोलणी बंद करून सशाप्रमाणे आपल्या बिळांचा आश्रय घेतला आहे. पण लक्षात ठेवा, ते अनुकूल काळाची वाट पाहत आहेत.

अखंड भारताचे संपूर्ण स्वातंत्र्य हे ध्येय साध्य करण्यासाठ‌ी संमिश्र मंत्रिमंडळात सहभागी होण्यापासून सशस्त्र क्रांतीपर्यंत योग्य वाटेल तो उपाय प्रतिसहकाराच्या तत्त्वावर अवलंबिणे, सध्याचा कार्यक्रम म्हणून राजनीतीचे हिंदूकरण आणि हिंदूंचे सैनिकीकरण करणे, या मार्गे हिंदूमहासभेचे सामर्थ्य सतत वाढत राहो. अशाच पद्धतीवर दृढ विश्वास ठेवून, काँग्रेस अथवा लीग यांच्या हातातील बाहुले न बनता, जर हिंदू महासभा हिंदुसंघटन करीत राहील तर अपेक्षेपेक्षाही लवकरच्या काळात हे हिंदू राष्ट्र स्वतंत्र नि समर्थ होईल!!”

## हिंदी हीच राष्ट्रभाषा करा

६ नोव्हेंबर १९४४ रोजी जयपूरमधील आंदोलनासंबंधी काढलेल्या एका पत्रकात सावरकर लिहितातः

“सध्या जयपूरचे दिवाण सर मिर्झा हे निरनिराळ्या लोकांकडून स्वतःच्या निःपक्षपाती धोरणासंबंधी प्रमाणपत्रे मिळवीत आहेत आणि त्यांच्या आवरणाखाली आपले हिंदूविरोधी धोरण झाकण्याचा प्रयत्न

करीत आहेत. ती प्रमाणपत्रे पाहूनही मी निश्चितपणे सांगतो की हिंदू महासभेने आजवर सर मिर्झा यांच्यावर केलेले आरोप साधार सत्य नि न्याय्य आहेत.

जयपूर शासनाच्या सेवेत भरती करावयाच्या नवीन सेवकांना एवढेच नव्हे तर प्रत्येक भारतीयाला उर्दू भाषा लिहिता वाचता आलीच पाहिजे असा आग्रह सर मिर्झांनी धरला नाही काय? जयपूर संस्थानच्या नवीन घटनेत त्यांनी मुसलमानांसाठी अधिक राखीव स्थाने दिलेली नाहीत काय? हिंदूंची मंदिरे हलविण्याच्या निषेधार्थ शेकडो हिंदूंनी प्रतिकार केला, हरताळ पाळले आणि बंदिवास भोगला हे खरे नाही काय? मार्गरुंदीच्या वेळी केवळ हिंदू मंदिरे तेवढी हलविली आणि मुसलमान हे अज्ञानी नि बंडखोर आहेत हे कारण देऊन मशिदी तेवढ्या राहू दिल्या हे खरे आहे ना? याचा अर्थ हिंदूंनीही त्यांच्या मंदिर रक्षणासाठी प्रक्षुब्ध व्हावे असा होत नाही काय?

पण असे पुरावे देत बसण्यात काही अर्थ उरलेला नाही. सध्या तरी हिंदूंवर नवे अन्याय होऊ नयेत आणि झालेले अन्याय, शक्यतो सहकार्याने आणि हिंदूंचा अपमान न होता, दूर करून घेणे हेच हिंदूसभेचे मुख्य कार्य आहे. या दृष्टीने तेथील हिंदुसंघटकांनी, विशेषतः वीर रामचंद्र शर्मांनी, जे प्रभावी आंदोलन केले तसेच प्रा. वि. घ. देशपांडे, रामचंद्रराव आणि बाबाराव खापर्डे यांनी तेथे जाऊन जी पाहणी केली आणि हिंदूंना आश्वासने दिली त्यामुळे आता कोणीही अधिकारी पूर्वीप्रमाणे हिंदूविरोधी कृत्य करण्यास धजणार नाही.

आता प्रथम महाराजांनी लक्ष घालून देवनागरीमध्ये लिहिल्या जाणाऱ्या हिंदीतच राज्याचा कारभार चालेल अशी आज्ञा काढावी. जुने कागद पाहण्यासाठी काही उर्दू जाणणारे ठेवावे. पण आता यापुढे उर्दू बंद केली की थोड्याच वर्षात उर्दूची आवश्यकताही उरणार नाही आणि असे करणे फारसे कठीण नाही. तुर्कस्तानच्या केमालपाशाने पाच वर्षांत अरबी भाषेचे पार उच्चाटण केले नाही का? त्यापेक्षा जयपूरची राज्यभाषा हिंदी करणे किती तरी सोपे आहे. कारण येथील ९० टक्के लोकांची मातृभाषा हिंदी आहे. यावर सर मिर्झा सांगतील की ते केमाल पातशहा नाहीत. यावर उत्तर असे की तशी शक्ती त्यांच्यात नसेल तर त्यांनी त्यागपत्र द्यावे. तसेच सध्याच्या परिस्थितीत हिंदू संस्थानिकांनी आपल्या मुख्य मंत्रीपदी मुसलमानांची नेमणूक करू नये. कारण सर मिर्झा यांनीही लीगशी लगट चालविली नाही काय? तसेच ही मागणी प्रभावी करण्यासाठी हिंदूंनी आंदोलने करावीत. हिंदू लोकांनी उर्दू बहिष्काराची प्रतिज्ञा करून सर्वत्र राजस्थानात हिंदी हीच राज्यभाषा करण्याचा निर्धार करावा.”

## हे पत्रकार ढोंगी की अप्रामाणिक

व्हॉइसरॉयशी झालेली सावरकरांची भेट आणि त्यांची पत्रकारांशी झालेली प्रश्नोत्तरे यासंबंधी निरनिराळ्या वृत्तपत्रांनी निरनिराळी वृत्ते छापली. त्यासंबंधी स्पष्टीकरण करणारे एक पत्रक १ डिसेंबर १९४४ रोजी मुंबई येथून सावरकरांनी प्रसिद्ध केले. त्या पत्रकाचा मथितार्थ असाः

"माझ्या नि व्हॉइसरॉयच्या भेटीसंबंधी प्रसिद्ध झालेले वृत्तपत्रांतील सर्व तर्क चुकीचे आहेत. मी सत्यार्थ प्रकाशवरील बंदी उठविण्यासंबंधी व्हॉइसरॉयशी चर्चा केली असेच मी पत्रकारांना सांगितले. पत्रकारांशी मी जी चर्चा केली तिचा व्हॉइसरॉय भेटीशी काही सबंध नव्हता. पत्रकारांच्या प्रश्नांना ती केवळ उत्तरे होती.

युद्ध संपेपर्यंत ब्रिटिश सरकार कोणतीही सत्ता भारताला देणार नाही. या माझ्या निवेदनावर लिहिताना काही संपादकांनी म्हटले आहे की, ही गोष्ट कळायला सावरकरांना अतके दिवस कशाला

लागले? असे लिहिणाऱ्या पत्रकारांची मला कीव येते! ते ढोंगी आहेत की अप्रामाणिक आहेत हाच प्रश्न पडतो. कारण अगदी युद्ध चालू झाले तेव्हापासून मी सांगत आलो आहे की ब्रिटन हे युद्ध लोकशाही नि स्वातंत्र्य आदी उच्च ध्येयांसाठी लढत नसून केवळ साम्राज्य रक्षणासाठी लढत आहे. या उलट हे पत्रकार ज्यांची भाटगिरी करतात, ते गांधी-नेहरू आणि काँग्रेसचे प्रस्ताव सांगत होते की ब्रिटन हे युद्ध लोकशाही रक्षणासाठी लढत आहे!! पुढे याच लोकांनी ब्रिटिशांना 'चले जाव, पण सैन्य येथे राहू द्या' असे सांगितले. तेव्हाही मी लगेच सांगितले की ह्या 'भारत सोडा' चळवळीचा अंत तर 'भारत तोडा'मध्ये होईल. तेही माझे भविष्य आज दुर्दैवाने खरे ठरत आहे. ह्या उथळ भाबड्या वा बनेल टीकाकारांनी लक्षात ठेवावे की माझी राजकारणातील मूलभूत बुद्धी ही चरखा फिरवून एका वर्षात नव्हे एका महिन्यात स्वराज्याचे स्वप्न पाहणाऱ्या आतल्या आवाजावरील आंधळया श्रद्धेसारखी भोंदू नाही!!"

## क्रांतिवीर रासबिहारी नि पं. चंद्रगुप्त यांस श्रद्धांजली

हिंदू सभेतील तरुण अनुयायी पं. चंद्रगुप्त वेदालंकार नि दुसरे क्रांतिकारक सहकारी रासबिहारी बोस निधन पावल्याच्या दुःखद वार्ता समजल्या तेव्हा त्या दोघांही कर्मवीरांना सावरकरांनी जानेवारी १९४५मध्ये प्रकटपणे श्रद्धांजली वाहिली. तिचे शब्द असे :

"रासबिहारी बोस यांच्या निधनाची वार्ता अैकून मला मोठा खेद झाला. ते आंतरराष्ट्रीय कीर्तीचे विद्वान, निवार्सित क्रांतिकारक नि हिंदुत्वनिष्ठ नेते होते. हिंदुस्थान नि जपान यांमधील संबंध दृढ करण्याचे महान कार्य त्यांनी केले. हिंदूंच्या पुनरुज्जीवनाच्या कार्यातील आघाडीचे एक प्रमुख नेते म्हणून त्यांचे नाव अजरामर राहील. जपानमधील हिंदू महासभेचे ते अध्यक्ष होते. युद्ध चालू झाल्यापासून त्यांच्यासंबंधी वृत्त येणे बंद होते. जे पुन्हा वृत्त आले ते त्यांच्या निधनाचे!"

पंडित चंद्रगुप्त वेदालंकार यांच्यासंबंधी त्यांचे शब्द असेः

"त्यांच्या अकाली निधनाचे वृत्त धक्का देणारे आहे. ते कर्तृत्ववान देशभक्त नि उत्तम वक्ते होते. त्यांच्या निधनाने हिंदुसंघटन चळवळीची मोठी हानी झालेली आहे. ईश्वर त्यांच्या विद्याविभूषित पत्नीला हा दुःखभार सहन करण्याचे सामर्थ्य देवो."

## निजामपुत्राला वेळीच विरोध करा

बहुसंख्य हिंदू निद्रिस्थ नि घाबरट झाले असताना त्यांना एक अषारा देणारे पत्रक सावरकरांनी जानेवारी १९४५ मध्ये काढले. ते असे :

“पाकिस्तानच्या कल्पनेला वेळीच मुठमाती दिली नाही म्हणूनच आज ती एक धोंड होऊन उरावर बसली. ती स्थिती हळूहळू ह्या उस्मानी स्थानाची होऊ नये म्हणून तिला विरोधण्यास हवेच होते. त्या विरोधाचा श्रीगणेशा करावयास हिंदूंना निजामपुत्राच्या वऱ्हाडमधील आगमनाची ही आयतीच संधी मिळाली आहे.

त्यावेळी त्याच्या आगमनास विरोध करण्यासाठी सर्वात शिष्टतम मार्ग म्हणजे प्रत्येक ठिकाणच्या हिंदुत्वनिष्ठ संस्थांनी आपापल्या सभा करून निजामपुत्रांना कळवावे की आपण आपली वऱ्हाडचा राजपुत्रही आम्हा हिंदूंस अत्यंत अपमानकारक आणि अतिहासदृष्ट्या निव्वळ लफंगेगिरीची पदवी प्रथम सोडून द्यावी आणि मगच वऱ्हाडात यावे.

एक माननीय राजपुत्र म्हणून वऱ्हाडात ज्या हिंदूंनी कळत वा नकळत त्या निजामच्या राजपुत्रास बोलाविले असेल त्यांनी धर्मवीर डॉ. मुंजे यांनी आधीच सुचविल्याप्रमाणे त्या राजपुत्रास स्पष्टपणे कळवावे की, ह्या मानपत्राचा किंवा सन्मानाचा असा अर्थ मुळीच होत नाही की ह्या योगे वऱ्हाड निजामला द्यावा असे आमचे मत आहे. त्या प्रकरणाशी आमच्या ह्या सन्मान समारंभाचा काहीएक संबंध नाही.

तिसरे असे की, ह्या हिंदुत्वनिष्ठ संस्थांच्या आणि हिंदू आमंत्रकांच्या अनेक सूचना मिळाल्या असताही जर त्यास न जुमानता हैद्राबादचे राजपुत्र म्हणून आले तर अशा आगंतुकांचा निषेध करण्यासाठी वऱ्हाडच्या हिंदुत्वनिष्ठ जनतेने शक्य तेथे प्रकट आणि शक्य नाही तेथे सांस्थिक सभा भरवून निषेधाचे ठराव करावे आणि त्यांच्या प्रती व्हॉइसरॉय, गव्हर्नर आणि निजाम यांना धाडाव्या. प्रत्येक नगरांतून सर्व हिंदुत्वनिष्ठांनी वऱ्हाडभर काळी निशाणे उभारावी. ही निशाणे एखाद्या गावी दोन-तीन जरी असली तरी देखील आपले विरोधप्रदर्शनाचे कार्य परिणामकारक झाल्यावाचून राहत नाही. शक्य असेल तेथे काळ्या निशाणासहित वऱ्हाडभर निजाम सांगत असलेल्या त्याच्या वऱ्हाडवरील अधिकाराचा निषेध करीत सामुदायिक आणि वैयत्ति क मिरवणुका काढाव्या. सभ्यपणा आणि नैर्बंधिक योग्य कक्षा संभाळून ज्यास जे परवडेल ते त्या त्या मार्गांनी हिंदुत्वनिष्ठांनी आपला निषेध प्रदर्शवून त्या दक्षिणेतील पाकिस्तानच्या बेताला हाणून पाडणारे घाव एव्हांपासून घालीत रहावे.

खरा अतिहास असा आहे की, उद्गीर, खर्डा प्रभृती अनेक समरांगणात निजामला धूळ चारून आम्ही मराठ्यांनी वऱ्हाडांत हिंदू राज्य प्रस्थापित केले होते तेव्हा वऱ्हाडचे राजपुत्र जर कोणाला म्हणावयाचेच असेल तर ते आमच्या श्रीमान भोसल्यांच्या राजपुत्रालाच होय. वऱ्हाडच्या पायात आधीच पडलेली ब्रिटिश सत्तेची जडबेडी दुःसह आहे म्हणून ही दुसरी निजामी बेडी हिंदूंनी पत्करावयाची काय?”

## निजामाच्या पत्रकाचा बुरखा फाडला

हिंदूमहासभेच्या प्रचाराला उत्तर देण्यासाठी निजामच्या प्रतिनिधीने नागपूर येथे पत्रकारांपुढे असे स्पष्टीकरण केले की, दक्षिणेत धर्माधिष्ठित पाकिस्तान स्थापण्याची कल्पनाही निजामाच्या मनात नाही. त्याच्या ह्या निवेदनाला १२ फेब्रुवारी १९४५ रोजी सावरकरांनी एका पत्रकाद्वारे तत्काळ जे उत्तर दिले, त्यातील महत्त्वाचा भाग असा :

"इस्लामच्या मूळ तत्त्वज्ञानातच दार-उल-इस्लाम आणि दार-उल-हरब असे पृथ्वीचे दोन भाग कल्पिलेले आहेत. निजामी राज्याच्याही घटनेत निजाम मुसलमान म्हणून राज्य इस्लामी अशी घोषणा आहे नि त्याचे प्रत्यंतर तेथील हिंदूंना पदोपदी येत आहे. त्यामुळे नागपूरला पाकिस्तानविरोधी घोषणा करणारा निजामाचा प्रतिनिधी जर प्रामाणिक असेल तर त्याने हिंदूवर अन्याय करणाऱ्या निजामच्या सेवेतून प्रथम मुक्त व्हावे. नाहीतर त्यांच्या ह्या निवेदनामागे दुसराच हेतू दडलेला आहे असेच म्हणावे लागेल.

उदयोन्मुख कार्यकर्त्यांच्या माहितीसाठी हे ठासून सांगावयास हवे की काँग्रेसची स्थापना झाली तेव्हापासूनच मुसलमानांच्या मनात त्यांचे गेलेले अधिराज्य परत मिळविण्याची महत्त्वाकांक्षा घोळू लागली आहे. यासाठी ब्रिटिशांचे साहाय्य आवश्यक आहे हे त्यांना स्पष्टपणे पटले होते आणि मुसलमानांना भुलविण्याचे सरकारचे संकटही तितके दूर लोटले जात होते. या मुस्लिम महत्त्वाकांक्षेचे दोन मुख्य आधार होते ते म्हणजे एक पाकिस्तान नि दुसरे निजामीस्थान!!

मुसलमानांची महत्त्वाकांक्षा लक्षातच न घेतल्याने या गांधीवादी काँग्रेसने हिंदू सभेला जातीय म्हणून झिडकारले आणि देशाची फाळणी करणाऱ्या मुसलमानांना भाई म्हणून कवटाळले!! मुसलमानांनीही लोकशाहीच्या नावाखाली सिंध तोडून घेतला आणि आता स्वयंनिर्णयाच्या नावाखाली काँग्रेसकडून पाकिस्तानलाही मान्यता मिळविली आहे!! त्यांची लोकशाहीची घोषणा लोकसत्ताक राज्यपद्धतीचा

अभिमान बाळगणाऱ्या भ्रांत राष्ट्रवाद्यांना आत्मघातकी औदार्याचा मोह व्हावा यासाठी टाकलेला डाव आहे!!

दुर्दैवाने लेखणीच्या फटकाऱ्यासरशी पाच-सहा प्रांत घशात घालणारा हा लोकसत्तेचा मायावी बुरखा अकडे निजामस्थानच्या मूळावरच घाव घालू लागला. ब्रिटिशांशी मैत्री करून वऱ्हाड, आंध्र, तामिळनाडू नि कर्नाटकचा प्रदेश त्यांच्याकडून घेऊन दख्खनचा सम्राट होण्याची ही निजामाची स्वप्ने या लोकशाहीच्या आणि धार्मिक लोकसंख्येच्या तत्त्वाने पार नष्ट होणार आहेत. कारण या भागात हिंदूंची प्रचंड लोकसंख्या असल्याने लोकशाहीचा नि मतदानाचा कौल निजामी किवा इस्लामी राज्याच्या बाजूने लागणे अशक्य आहे.

त्यामुळे निजामी राज्याचे छुपे प्रचारक, पाकिस्तानविरोधी घोषणा देत असून शेळीचे कातडे पांघरून अनेक लांडगे हिंदूंमध्ये घुसत आहेत. त्यांना माहीत आहे की देशातील अनेक हिंदू सध्या राष्ट्रीय मुसलमानांच्या शोधात असून तसा मुसलमान सापडताच ते त्याची सांजसकाळ आरती करून त्याच्यापुढे हिंदुहिताचा बळी देण्यास सदैव सिद्ध आहेत. हा हिंदूंचा स्वभाव ओळखून पाकिस्तानी मुसलमानही शेळीचे कातडे पांघरणाऱ्या ह्या राष्ट्रीय लांडग्यांना शिव्याशाप देऊ लागतील. ते अैकून हे भोळेभाबडे हिंदू ह्या निजामीस्थानाच्या जाळ्यात फसतील. तरी हा धोका टाळण्यासाठी हिंदुत्वनिष्ठांनी जागे राहून निजामस्थानचा हा कपटी डाव उधळून लावला पाहिजे.

निजामी प्रचारक ब्रिटिश नि निजाम यांमधील जुन्या कागदपत्रांचा, संधीचा आधार देऊन हिंदुस्थानचा भूप्रदेश निजामाला द्यावा अशी मागणी करीत आहेत. पण जर जुन्याच कागदांचा आधार घ्यायचा असेल तर ते कागद शंभर वर्षांपूर्वीचेच कशाला पाहता? त्या आधीचे कागद पहा म्हणजे तुम्हाला त्या आधारे हा विशाल हिंदुस्थान हिंदू राज्यातच ठेवावा लागेल. तसेच मुसलमानांनी लक्षात ठेवावे की त्यांच्याप्रमाणेच हिंदूनाही काही महत्त्वाकांक्षा आहेत आणि त्या साध्य करून घेण्यासाठी ही हिंदू जाती सहस्रावधी वर्षे पिढीमागून पिढी लढत आली असून आजही जिवंत आहे. हिंदूंनी आपला हा प्राचीन काळापासूनचा तेजस्वी अतिहास लक्षात घेऊन कोणाही हिंदूने भाकरीच्या तुकड्याने फसून आपल्या जातीचा विश्वासघात करू नये!!”

## भुलाभाई लियाकत कराराला विरोध

केंद्रीय विधानसभेतील काँग्रेस पक्षाचे नेते श्री. भुलाभाई देसाई आणि मुस्लिम लीगचे नेते श्री. लियाकत अल्ली यांची संयुक्त आघाडीचीच बोलणी चालू होती. त्यासंबंधी निषेध व्यक्त करणारे एक पत्रक सावरकरांनी १० मार्च १९४५ रोजी काढले. त्यात ते लिहितातः

"भुलाभाई-लियाकत बोलण्याविषयी ज्या वार्ता प्रसिद्ध होत आहेत त्यात काही तथ्य असेल तर त्या योजनेचा निषेध करणे आवश्यक आहे. कारण त्यांच्यामधील संधी हा हिंदू राष्ट्रालाच नव्हे तर भारतीय एकात्मतेलाही अहितकारक आहे.

अतके दिवस काँग्रेसवाल्यांनी अधिकारांच्या स्थानावर बहिष्कार टाकला. ती स्थाने घेणाऱ्यांची निंदा केली. आता तेथे जाण्याने, निदान ती स्थाने चांगल्या माणसांच्या हाती राहू शकतात हे तत्त्व त्यांना कळू लागले असेल तर तुमच्या आधी ती स्थाने घेणाऱ्या लोकनेत्यांची कृती तुमच्यापेक्षा अधिक शहाणपणाची नि न्यायाची ठरत नाही काय?

याच दृष्टीने मी आजवर ज्या हिंदू मंत्र्यांना पाठिंबा दिला तेच खऱ्या राष्ट्रीय वृत्तीचे होते हे सिद्ध झाले आहे. काँग्रेसवाल्यांप्रमाणे हिंदुत्वाविषयी संकोच नि लज्जा न बाळगता निर्भिडपणे त्यांचा अभिमान बाळगीत आले आहेत. यामुळे भारत वर्षातील हिंदुत्वनिष्ठांचा पाठिबा त्यास मिळत राहिल्याने त्यांचे प्रतिनिधित्वही त्यास एकप्रकारे प्राप्त झाले आहे. हिंदू-मुस्लिम अैक्याच्या वेडाने पछाडलेल्या गांधींनी बंदिवासातून सुटताच पाकिस्तानच्या चळवळीला प्रोत्साहन दिले. त्याला हिंदू महासभेने विरोध केला. त्यासाठी अखंड हिंदुस्थान परिषद घेतली. त्या परिषदेत मी पाठिंबा दिलेल्या हिंदू मंत्र्यांनी निर्भयपणे भाग घेऊन पाकिस्तानचा विरोध करणारी भाषणेही केली. हिंदुत्वनिष्ठांचे हे सामर्थ्य पाहून गांधीजीही त्यांचा पाकिस्तानी प्रचार स्थगित करून वर्ध्याला जाऊन स्वस्थ बसले.

हिंदुत्वनिष्ठांनी अधिकाराची स्थाने स्वीकारण्याचे जे धोरण अंगीकारले त्याचा कसा परिणाम होत हे आता काँग्रेसवाल्यांना उमगले आहे !

गांधी-जीना भेटीच्या वेळी व्हॉइसरॉय कार्यकारी मंडळ भुला-खान यांना भेटले असते तर? तर त्यांनी हिंदू-मुसलमान नेत्यांच्या संयुक्त स्वाक्षऱ्यांनी पाकिस्तान योजना आम्हाला मान्य आहे असा निर्वाळा देऊन या देशाच्या विच्छेदीकरणास मान्यता दिली असती ! त्या वेळेस जे त्यांना जमले नाही ते साध्य

करण्यासाठी ही भुला-खान योजना पुढे येत आहे. ज्या हिंदूंनी ह्या काँग्रेसवाल्यांना निवडून दिले त्यांच्याच घात ते करू पाहत आहेत. शेकडा २५ लोकसंख्या असणाऱ्या जातीला ते व्हॉइसरॉयच्या कार्यकारी मंडळात शेकडा ५० टक्के स्थाने देत आहेत. हिंदुहिताचा हा होमच नव्हे काय ?

एवढे पचनी पडताच मुसलमान आणखी मागतीलच त्यामुळे मुसलमान नि ब्रिटिश यांचेच हात या भुला-खान कराराने बळकट होतील!! याच दृष्टीने हिंदुत्वनिष्ठांना माझे आवाहन आहे की त्यांनी स्पष्ट घोषणा करावी की राष्ट्रसंघाच्या नियमानुसारच मुसलमानांना त्यांच्या २२ टक्के लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा कोणत्याही क्षेत्रात एकही स्थान अधिक मिळणार नाही. भुला-खान कराराने मुसलमानांना अशी अधिक स्थाने दिली जाणार असल्याने त्यांच्या मंत्रीमंडळापेक्षा सध्याच्या हिंदू मंत्र्यांच्या हातातच हिंदुहित अधिक सुरक्षित आहे. तेव्हा कोणाचा काही करार झाला म्हणून सध्याचे कार्यकारी मंडळ पालटणे उचित होणार नाही.”

## वेव्हेल योजनेचा धोका आधीच ओळखा

भारतीय जनतेत आणि सैन्यात स्वातंत्र्याची आकांक्षा प्रज्वलित होत होती. त्यामुळे विजयी इंग्लंड लाही भारताला काही अधिकार देणे आवश्यक वाटत होते. या दृष्टीने भारताचे व्हॉइसरॉय वेव्हेल स्वतः इंग्लंड ला जाऊन परत आले. ते काही तरी नवीन योजना घेऊन आले होते. ही योजना पूर्णपणे प्रकट झाली नव्हती. अशा परिस्थितीत ८ जून १९४५ रोजी सर्व हिंदुत्वनिष्ठांना त्या योजनेसंबंधी पूर्वसूचना देणारे एक अत्यंत महत्त्वाचे पत्रक सावरकरांनी काढले; ते पत्रक असेः

(१) काँग्रेस-लीग तडजोडीच्या भूमिकेवरून या देशाच्या सरकारात करण्यात आलेले कोणतेही पालट केवळ त्या तडजोडीवर आधारलेले आहेत म्हणून न्याय्य नि समर्थनीय ठरणार नाहीत आणि ते हिंदूंना मान्य होणार नाहीत. लीग ही कदाचित मुसलमानांची प्रतिनिधी असेल, पण काँग्रेस ही हिंदूंची प्रतिनिधी नाही ही गोष्ट तिने स्वतः अनेकदा सांगितली आहे. हिंदूंच्या हितसंबंधाचे रक्षण ती कधी करणार नाही. अतकेच नव्हे तर तिने आतापर्यंत अनेकदा ते हितसंबंध धाब्यावर बसविले आहेत. भुलाभाई-लियाकत संधी, गांधी-राजाजीची पाकिस्तानी योजना या सर्व घटनांच्या वेळी ते सिद्ध झालेले आहे आणि पुन्हाही ते होणे असंभवनीय नाही. काँग्रेस ही दुबळया नि ढोंगी राष्ट्रवादी म्हणवून घेणाऱ्या गटाची प्रतिनिधी आहे. हिंदूंची ती प्रतिनिधी नाही.

या देशात ७५ टक्के हिंदू असून राज्यशासन यंत्राचा ते पायाच आहेत. त्यांच्या हितसंबंधाचे रक्षण करणारी हिंदू महासभा हीच एक संघटना आहे. म्हणून तिची आधी संमती घेतल्यावाचून व्हॉइसरॉयने केवळ काँग्रेस लीग करारावर आधारलेले कोणतेही हंगामी वा दीर्घकालीन पालट या देशाच्या सध्याच्या मध्यवर्ती शासनयोजनेत करू नयेत. कोणत्याही पालटात हिंदूंना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळालेच पाहिजे. हिंदू महासभा हीच राष्ट्रीयत्व नि लोकशाहीच्या तत्त्वांना हरताळ न फासता हिंदूंच्या हितसंबंधाचे रक्षण करणारी एकमेव संघटना आहे.

(२) हिंदुस्थानच्या राजकीय प्रश्नासंबंधी उडविण्यात येणाऱ्या सर्व वावड्यांमध्ये सर्वत्र एक मूलभूत चुकीची कल्पना असते की हिंदू हे बहुसंख्य आहेत आणि म्हणून त्यांनी अल्पसंख्य मुसलमानांना वाटणारी हिंदूंच्या वर्चस्वाची भीती नष्ट करण्यासाठी राखीव जागा, विशेष प्रतिनिधित्व, स्वतंत्र मतदारसंघ नि इतर विशेष अधिकार देऊन स्वतः दुबळे होणे हे न्याय्यच आहे.

आमचा असा ठाम आग्रह आहे की, बहुसंख्य हिंदूंवर किंवा अन्य कोठेही कोणत्याच बहुसंख्याकांवर असे अल्पसंख्याकांना संतुष्ट करण्याचे नैतिक बंधन नाही.

मुसलमानांना स्वतः अथवा दुसऱ्याच्या साहाय्याने हिंदूंवर मात करता येईल अशा तऱ्हेचे स्थान निर्माण करून देणे हा अन्यायाचा कळस होईल. अल्पसंख्याकांच्या अशा मागण्यांचा किंवा कोणत्याही अशा घटनात्मक उपायांचा राष्ट्रसंघाने तीव्र शब्दात निषेध केला आहे.

हिंदू बहुसंख्य आहेत हा काही त्यांचा अपराध नव्हे. तेवढ्यासाठी त्यांनी अंगाला भस्म चर्चून संन्यास घ्यावा नि आपले जन्मजात अधिकार घालवावेत असे कोणास म्हणता येणार नाही. जगात सर्वत्र अस्तित्वासाठी चालू असणाऱ्या झगड्यात हिंदू हे टिकून राहिले आहेत आणि त्यांनी आपले बहुसंख्यत्व टिकविले आहे यावरून त्यांच्यातील जिवंतपणाच स्पष्ट होत आहे. मुसलमानांनी महमदबिन कासम नि त्यानंतरचे औरंगजेब यांच्याकरवी हिंदुत्व नष्ट करण्यासाठी पराकाष्ठेचे प्रयत्न करूनही ते या देशात अल्पसंख्य राहिले यात काही त्यांचा हिंदूच्यावर उपकार नाही. महमद कासम किंवा औरंगजेब यांना जे साधले नाही, ते जीना आणि मौलाना आझाद यांनाही साधणार नाही.

अल्पसंख्य मुसलमानांना जर हिंदू वर्चस्वाची भीती वाटत असेल तर त्यांनी बहुसंख्य हिंदूंना आपले स्नेही करून घ्यावयास हवे. मातृभूमी नि मध्यवर्ती सरकार यांच्याशी एकनिष्ठ राहून त्यांना हा स्नेह संपादन करता येईल. हिंदू स्वतः कोणत्याही घटनेत सर्वांना समान नागरिकत्वाचे मूलभूत अधिकार, सर्वांना समान धार्मिक स्वातंत्र्य, सामाजिक नि नैर्बंधिक समानता यांचा समावेश करण्यास सिद्धच असतात. राष्ट्रसंघाने मान्य केलेली तत्त्वे हिंदूंनीही मानलेली आहेत.

(३) वरील सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे कोणत्याही घटनात्मक पालटाचा न्याय्य पाया म्हणजे लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देणे हाच होय. या पायावर आधारलेली नाही अशी कोणतीही घटना असेल तर तिला सर्व राष्ट्रभक्त हिंदूंनी कसून विरोध केला पाहिजे. प्रांताना फुटून निघण्याचे तोतया स्वातंत्र्य देणाऱ्या कोणत्याही फाळणीच्या योजनेचा हिंदूंनी कडक प्रतिकार केला पाहिजे.

एखाद्या राष्ट्राला नि त्या देशाच्या घटनात्मक सरकारला स्वयंनिर्णय देणे हे समर्थनीय ठरेल. पण एखाद्या जिल्ह्याला, प्रांताला, गावाला वा गल्ली-बोळाला असला स्वयंनिर्णय देणे याच्याअतका मूर्खपणा दुसरा नाही. प्रांत हा शब्दच असे स्पष्ट दाखवितो की तो प्रांत हा दुसऱ्या एका राष्ट्राच्या नि देशाच्या अवयवासारखा आहे म्हणून त्याला स्वयंनिर्णयाच्या नावाखाली फुटण्याची सवलत देणे हे चूक आहे.

थोडक्यात म्हणजे हिंदूंनी काँग्रेस-लीग तडजोडीवर आधारलेल्या नि हिंदू महासभेची संमती नसलेल्या कोणत्याही पालटाला कसून विरोध करावा. सध्याच्या व्हॉइसरॉयच्या कार्यकारी मंडळापेक्षा या करारावर आधारलेले कार्यकारी मंडळ हे हिंदूंना निश्चितपणे अधिक अपायकारक होईल असे मी ठामपणाने सांगतो. काँग्रेसचा सर्वच कार्यक्रम हा लीगप्रमाणे हिंदूविरोधी असा आहे म्हणून त्या दोघांच्या हाती संयुक्त राज्यकारभार करण्याची सत्ता दिली तर हिंदुत्वाच्या दृष्टीने ती अत्यंत तापदायक होईल याविषयी तिळमात्र शंका नको.

हिंदुसंघटनवाद्यांनी तरी अशा घटनेला वा कराराला प्रतिकार केला पाहिजे. जे अटळ होईल ते भोगलेच पाहिजे. त्याचा बदला घेण्यासाठी अनुकूल काळ येण्याची वाट पाहिली पाहिजे. पण हिंदुत्वनिष्ठांनी तरी अशा आत्मघातकी योजनेवर स्वमताने स्वाक्षरी करता कामा नये.”

## शरद बोस यांचीही सुटका करा

ब्रिटिशांच्या मनात काँग्रेस नेत्यांविषयी प्रेम नि विश्वास होता. मध्यंतरी थोडी उर्मट बनलेली काँग्रेस आता सरळ मार्गावर आली होती आणि परिस्थितीही पालटली होती म्हणून १ जूनला व्हॉइसरॉयने काँग्रेसच्या कार्यकारी मंडळाची बंदिगृहातून सुटका केली. ते वृत्त समजताच १६ जून १९४५ रोजी सावरकरांनी जे एक पत्रक काढले ते असेः

"अलीकडेच मुक्त झालेल्या काँग्रेस नेत्यांचे मी अभिनंदन करतो. त्यांनी देशप्रेमाने नि धैर्याने जे कष्ट भोगले त्याविषयी सारे राष्ट्र त्यांचे ऋणी आहे. सर्व देशात शांतता नि विश्वास उत्पन्न करणे हा ह्या सुटकेमागील उद्देश असल्याचे शासन सांगत असता त्याने केवळ काँग्रेस कार्यकारिणीच्या नेत्यांचीच तेवढी सुटका का केली? वास्तविक राजकारणासाठी बंदिगृहात ठेवलेल्या सर्वांचीच सुटका करणे योग्य

होते. त्यातही भावी घटना बनविण्याच्या दृष्टीने सुयोग्य असलेले आणि लोकजागृती करू शकणारे तसेच बंदिगृहात आजारी असलेले श्री. शरदचंद्र बोस यांची तरी या नेत्यांसमवेत सुटका करणे आवश्यक होते.”

## वेव्हेल योजनेविरुद्धचा लढा यशस्वी

‘फ्री हिंदुस्थान’ या अंग्रजी साप्ताहिकाच्या पहिल्याच अंकात हिंदू महासभेने वेव्हेल योजनेच्या विरुदध देशभर जे आंदोलन केले त्याचे वर्णन आहे. पुढे ती योजना बारगळली तेव्हा २५ जुलै १९४५ रोजी त्यासंबंधी काढलेल्या पत्रकात सावरकर लिहितातः

“उत्तम झाले! हिंदुसंघटनवाद्यांनो, तुम्ही संपूर्ण भारतात वेव्हेल योजनेविरुद्ध अखिल हिंदूंच्या निषेधाचे चांगले प्रदर्शन केलेत. हाती आलेल्या प्रतिवृत्तावरून दिसते की केवळ तुम्हीच नव्हे तर तुमच्या ह्या आंदोलनात काँग्रेसमधील काही हिंदूंही सहभागी होते. हिंदू महासभेचा विचार घेतल्यावाचून आपण काहीही करू शकू असा सरकारचा नि काही काँग्रेस नेत्यांचा असलेला भ्रम तुमच्या ह्या आंदोलनाने दूर झाला आहे.

वेव्हेल योजनेविरुद्ध ठिकठिकाणी सभा झाल्या, फेऱ्या निघाल्या, हरताळ पाळले गेले आणि लक्षावधी लोकांनी ह्या निषेध पत्रकांवर सह्याही केल्या आहेत. ह्या चर्चेसाठ शासनाने निवडलेल्या थंड नि एकान्त अशा सिमल्यातही हिंदूसंघटकांनी उष्ण वातावरण निर्माण केले. तेथे जाऊन हिंदुसंघटनी कार्यकर्त्यांनी काँग्रेस नेत्यांचे हात पकडून त्यांना त्या घातक करारावर सही करण्यापासून परावृत्त केले. शिया, अहरार, मोमीन, मजलीस आदींनी मुस्लिम लीग त्यांची प्रतिनिधी नाही असे सांगितले तर हिंदू महासभेने बजावले की काँग्रेस ही सर्व हिंदूंची प्रतिनिधी नाही. त्यामुळे व्हॉइसरॉयनाही शेवटी सांगावे लागले की काँग्रेस संस्था ही केवळ तिच्या सदस्यांची प्रतिनिधी आहे. त्यांचे हे मत सत्य, तर्कशुद्ध नि वस्तुस्थिती निदर्शक आहे. हिंदुसंघटकांनो, तुमच्या आंदोलनामुळे हे सत्य मान्य झाले आहे. पण आता एवढ्यावरच न थांबता निवडणुकीच्या क्षेत्रातही याच सामर्थ्याने नि नेटाने आपण लढले पाहिजे. श्रीखंडाची परीक्षा ते खाल्यानेच कळते. जर प्रत्येक हिंदूने हिंदुसंघटनी इच्छुकालाच मत दिले तर केवळ काँग्रेसच्या मतपेटीचाच तळ उखडला जाईल असे नव्हे तर हिंदूविरोधी नि राष्ट्रघातकी काँग्रेसच तळापासून उखडली जाईल नि त्यांना हिंदू अधिकारांशी खेळ करण्याचा अधिकारही राहणार नाही. तरी हिंदूंनो! हिंदुसंघटनी इच्छुकालाच मते द्या नि काँग्रेसला कधीही मत देऊ नका!! हिंदुराष्ट्र की जय.

## हिंदू महासभेत अहिंदूंना प्रवेश नसावा

या देशात जे काही थोडेबहुत मुसलमान नि ख्रिश्चन राष्ट्रीयवृत्तीचे आहेत त्यापैकी ज्यांना हिंदू सभेची तत्त्वे पटतात त्यांना हिंदू महासभेत प्रवेश द्यावा. त्यांना निदान हिंदू महासभेच्या राजकीय नि आर्थिक समित्यातून प्रवेश द्यावा अशा सूचना दिल्लीत काही अतिसहिष्णू नि सद्‌गुणी लोक मांडत होते. तसा प्रचारही चालविला होता आणि तसा प्रस्ताव दिल्लीला भरणाऱ्या कार्यकारिणीच्या नि महासमितीच्या सभेत मांडावा असा प्रयत्नही चालू होता. सावरकरांना त्यासबंधी विचारण्यात आले तेव्हा त्यांनी ऑगस्ट १९४५ मध्ये एका प्रकट पत्रकादवारे उत्तर दिले ते पुढीलप्रमाणे :

“हिंदू महासभेच्या केवळ आर्थिक वा राजकीय आघाडीतही अहिंदूंना प्रवेश देणे हे शेवटी हिंदू एकात्मतेला घातक ठरेल. कारण सध्या या देशातील प्रत्येक राजकीय प्रश्न हा धार्मिक वा सांस्कृतिक असून प्रत्येक धार्मिक नि सांस्कृतिक प्रश्न राजकारणाशी गुंतलेला आहे. शुद्धीही धार्मिक असली तरी राजकीय आहे आणि पाकिस्तानचा प्रश्न हा राजकीय आहे असे भासवले जात असले तरी तो धार्मिक आहे. हिंदू महासभा मंदिरात राजकीय शिवाची पूजा करण्यासाठी केवळ हिंदूच प्रवेश करू शकतात. त्या मंदिराची आपण मशीद वा मंडई करू नये. अशा चुकीने हिंदू आपले स्वत्व गमावतील आणि काँग्रेसप्रमाणे हिंदू सभेचाही अधःपात होईल. हिंदूहिताकडे दुलर्क्ष न करता आपण दुसऱ्या एखाद्या अहिंदू राष्ट्रवादी लोकांना प्रवेश असणाऱ्या राजकीय आघाडीत एका गटाने निवडणुकीसाठी आवश्यक

तर सहकार्य करावे. पण ज्या ठिकाणी कोणीही अहिंदू अधिकाराने प्रवेश करू शकणार नाही; अशी एखादी स्वतंत्र हिंदुसंघटना असलीच पाहिजे. जेथे आपण हिंदू म्हणून एकत्र येऊन हिंदुहितासाठी विचारविनिमय योजना, संघटना नि कार्यक्रम आखू शकू. नाहीतर एखादे दिवशी एखादा मुसलमानही हिंदू सभेचा अध्यक्ष होईल. जोवर या हिंदुस्थानात केवळ मुसलमान, ख्रिश्चन वा पारशी यांच्या संस्था आहेत तोवर तरी केवळ हिंदूंसाठी अशी एक तरी हिंदू संस्था हवी. याच हेतूने हिंदुमहासभा स्थापन झाली, वाढविली आणि हिंदू एकात्मता नि शक्ती यांचे केंद्र बनली. केवळ शासनातील काही अधिकारपदांच्या फसव्या मोहाने हे स्मृतिमंदिर भग्न करू नका. हिंदू महासभा हीच हिंदुस्थानची राष्ट्रीय संसद करण्याची एक महत्त्वाकांक्षा आपण पुढील पिढीपुढे ठेवा!”

## हिंदी हवी उर्दू नको

गुंडगिरीला गुंडगिरीनेच उत्तर द्यावे, जशाच तसे, ठोशास ठोसा हे सावरकरवादी विचारसरणीचे एक सूत्रच होते. तसेच युक्ति वाद आणि राष्ट्रनिष्ठ प्रवृत्ती चेतविणे हेही या वादाचे मुख्य सूत्र होते. त्याचे प्रत्यंतर सावरकरांनी २०-९-१९४५ रोजी काढलेल्या एका प्रकट पत्रकात पहावयास मिळते. या पत्रकात हिंदी नि उर्दूसंबंधीची महत्त्वाची मते मांडलेली आहेत. ते समग्र पत्रक असे :

“पंचवीस वर्षांपूर्वी मला राजबंदी या नात्याने अंदमानातून रत्नागिरीला आणण्यात आले. त्यावेळेपासूनच उर्दू ही भाषा आमच्यावर राष्ट्रभाषा म्हणून लादली जाणार अशी भीती वाटू लागली होती. स्वतः गांधीजीसुद्धा या अतीनिंद्य कटात मुसलमानांशी स्वच्छेने सहकार्य करणार हेही मला माहीत होते. ह्या खोडसाळ प्रचारास वेळीच पायबंद घालण्यासाठी मी नि माझ्या सहकाऱ्यांनी उर्द शब्दांचे उच्चाटन करण्याची मोहीम सुरू केली आणि आरंभीचे कार्य म्हणून मराठीतील उर्दू शब्दांचे उच्चाटण करण्याचे आंदोलन हाती घेतले. जरी मराठीतील उर्दू शब्दांचे प्राबल्य उत्तरेकडील भाषांच्या मानाने अल्प होते. हिंदूंना ह्या गोष्टींची गंधवार्ताही नव्हती. त्यांनी नेहमीच्या सुस्तीत माझ्या चळवळीला काल्पनिक नि धर्मवेडेपणाची अशी दूषणे लावली. अतकेच नव्हे तर हिंदी हीच राष्ट्रभाषा असावी असे म्हणणाऱ्या हिंदूंकडूनच लक्षावधी रुपये जमा करून ते उर्दू किंवा हिंदुस्थानी ही भाषा राष्ट्रातील प्रत्येकाला शिकविण्याच्या कामी उपयोजिले जाऊ लागले. प्रथम आम्ही हिंदीच शिकवीत आहोत असा त्यांनी बहाणा केला, नंतर हिंदी म्हणजेच हिंदुस्थानी असा प्रचार केला आणि आता आपल्या पोतडीत लपविलेले उर्दूरूपी मांजराचे पिल्लू त्यांनी उघडपणे बाहेर काढले असून खरा राष्ट्रीय म्हणवून घेण्याऱ्यांनी उर्द लिपी नि भाषा शिकलीच पाहिजे असा आक्रोश त्यांनी मुक्त कंठाने चालविला

आहे. आम्ही वर उल्लेखिलेली चळवळ (मराठी भाषा तरी उर्दूच्या कचाट्यातून सोडविण्याची) उर्दू शब्द कित्येक शतके मराठीत रूढ झाले असताही कल्पनेच्या बाहेर यशस्वी होत चालली. तिचा धक्का सर्व मराठी भाषिकांना बसल्याविना राहिला नाही आणि जी केवळ एक नवी चळवळ होती ती मराठी लेखकांची नैसर्गिक प्रवृत्ती होऊन बसली. मराठी प्रतिशब्द असेल त्या अर्थाचा उर्दू शब्द वापरणे आता निषिद्ध ठरले असून नवीन प्रतिशब्द संस्कृतातून निर्मिले जात आहेत. कारण संस्कृत ही अखिल हिंदू राष्ट्राची देवभाषा असून सर्व देशी भाषांची मातृभाषा आहे. शब्दसौंदर्यात नि समृद्ध शब्दकोशात तिची बरोबरी कोणतीही भाषा करू शकत नाही. हीच उर्दू बहिष्काराची मोहीम हिंदी भाषेमधून चालू व्हावी ह्यासाठी मी बरेच प्रयत्न केले. माझ्या मित्रांना पत्रे लिहून विशेषतः हिंदी ही मातृभाषा असणाऱ्यांनी तरी याकडे लक्ष द्यावे असे सुचविले. आम्हाला हिंदी ही राष्ट्रभाषा वाटते पण त्यांची तर ती राष्ट्रभाषाच केवळ नसून मातृभाषासुद्धा आहे कारण बोबडे बोल ते बोलू लागले तेव्हाच आईच्या दुधाप्रमाणे तिचाच आधार त्यांनी घेतला. म्हणून आग्रा, लखनौ इत्यादी विभागांतील हिंदी भाषा बोलणाऱ्या हिंदूंनी आपल्या मातृभाषेलाच प्राधान्य देण्यात यावे असा आग्रह धरून उर्दूलाच राष्ट्रभाषेच्या सिंहासनावर चढविण्याच्या गांधी नि मुसलमान यांच्या कटाविरुद्ध बंड पुकारले असे समजले तेव्हा मला अत्यानंद झाला. गांधीजींची वर्धा स्कीम, त्यांचा नवा हिंदुस्थानी तालिमी संघ इत्यादी प्रचार सभा, नभोवाणीचे उर्दूप्रेमाचे धोरण, प्रत्येक मुसलमानी संस्थानिकांनी आपल्या संस्थानात उर्दूची केलेली सक्ती, निरनिराळया शिक्षण संस्थांतून उर्दू हेच शिक्षणाचे माध्यम ठेवण्याची घेण्यात येणारी दक्षता, सैनिकी परीक्षांच्या प्रश्नपत्रिकासुद्धा उर्दूमधून ठेवण्यासारखी उदाहरणे ही सर्व हिंदी भाषेवरील चढाईची दृश्यस्वरूपेच आहेत. त्यामुळे आमची राष्ट्रभाषा हिंदी ही भयंकर संकटात सापडलेली आहे नि म्हणून हिंदीविरोधी अर्थात हिंदूविरोधी चळवळींच्या निषेधार्थ हिंदूंनी एक दिवस आपला निषेध सर्व हिंदुस्थानभर प्रकट करावा, ही सूचना या दृष्टीने स्वागतार्ह आहे. परंतु प्रत्यक्ष प्रतिकाराचे बळ मागे असल्याविना नुसत्या निषेधाचा काहीही उपयोग होणार नाही. उर्दू शब्दांवर बहिष्कार टाकण्याची प्रतिकारक गोष्ट तर सर्वस्वी आपल्या हातातीलच आहे. परकीय वस्तूंवर बहिष्कार घालण्याची चळवळ स्वदेशी उद्योगधंद्यांना पोषक होऊन त्या क्षेत्रात आपली प्रगतीच झाली म्हणून काँग्रेसमध्ये असणाऱ्या वा महासभेत असणाऱ्या सर्व हिंदूंनी या निषेध दिनामध्ये भाग घेऊन निश्चय करावा की, कोणाही हिंदूंने उर्दू भाषा लिहू, वाचू किंवा बोलू नये नि अशास्त्रीय उर्दू लिपी शिकूही नये. हिंदूंच्या हितसंबंधाला धोका येईल असा प्रसंग आला तरच हा नियम मोडावा नाहीपेक्षा कडकपणे पाळावा. उर्दूला एवढे आक्रमक स्वरूपकशाने आले हे हिंदूंना माहीत नाही काय? मुसलमानांच्या कारवायांमुळे नव्हे तर राजा तोडरमल्लांपासून गांधींपर्यंत निर्माण झालेल्या सर्व फितूर देशद्रोह्यांच्या प्रयत्नामुळे नि हिंदुस्थानी तालिमीसंघासारख्या संस्थांमुळेच ही उर्दू अतकी आक्रमक बनली आहे. हे ध्यानात ठेवून वृत्तपत्रकर्त्यांनी नि वक्त्यांनी उर्दूवर कडकडीत बहिष्कार टाकला पाहिजे. 'न वदेत् यावनी भाषा प्राणैः कंठगतैरपि' हा आपल्या पूर्वजांचा नियम त्यांनी मनःपूर्वक पाळावा.

अशा रीतीने शक्य त्या सर्व मार्गांनी उर्दूवर बहिष्कार घालण्याच्या चळवळीला राजकीयदृष्ट्याही पाठिबा मिळाला पाहिजे. तेही हिंदूंनो, सर्वस्वी तुमच्याच स्वाधीन आहे हे विसरू नका. सर्वांनी, विशेषत; हिंदू मतदारांनी, लक्षात ठेवावे की, काँग्रेसला मते दिलीत तर तुमच्यावर पंडित नेहरू, पंडित पंत आणि गांधी या मौलानांच्या नेत्रसंकेतानुसार नाचणाऱ्या बाहुल्यांचे राज्य सुरू झाले की सरकारी राज्ययंत्राचे सर्व सामर्थ्य हिंदीला गाडून टाकून उर्दूला राजमान्यता देण्यासाठीच उपयोजिण्यात येईल. विशेषतः शिक्षणखात्यात जर उर्दूचा धुडगूस राजरोसपणे सुरू होईल तर मुसलमानी राजवटीप्रमाणेच या काँग्रेवाल्यांच्या राज्यातही हिंदू मुलामुलंीींना उर्दू भाषा लिहावयास नि वाचावयास येणे अत्यावश्यक ठरविले जाईल. यासाठी आपली मातृभाषा वा राष्ट्रभाषा हिंदी जिवंत रहावी असे वाटत असेल तर त्यांनी उर्दूवर बहिष्कार टाकूनच न थांबता काँग्रेसला मते न देण्याचाही निर्धार केला पाहिजे.

म्हणून हिंदूंनो, हिंदुसंघटनवाल्यांनाच मते द्या. हिंदुसंघटनवादी ह्या हिंदीविरोधी धोरणाला काहीतरी आळा घालण्याचा प्रयत्न करतील; नुसता उर्दूचा निषेध करूनच ते थांबणार नाहीत तर हिंदी ही राष्ट्रभाषा आणि देवनागरी ही राष्ट्रलिपी यांनाही ते उत्तेजन देतील. म्हणूनच हिंदू बांधवांनो, उठा नि कार्यास लागा.”

## हिंदू सभेला विजयी करा

निवडणुकीच्यावेळी सावरकरांनी निरनिराळ्या कार्यकर्त्यांना लहान-मोठी अनेक पत्रे पाठवून त्यांना निवडणूक लढण्यास प्रवृत्त केले, धीर दिला. हा धीर निर्माण करण्यासाठी सावरकरांनी २२ ऑक्टोबर १९४५ रोजी एक विस्तृत पत्रक काढले. त्यातील महत्त्वाचा भाग असाः

"आज अनेक काँग्रेसवाल्यांच्या मनातही हिंदुहिताची तळमळ जिवंत असलेली दिसत आहे. त्यांना आजच्या काँग्रेसच्या चुकाही स्पष्ट दिसत असल्या तरीही ते काँग्रेसलाच चिकटून आहेत, कारण त्यांना वाटते की काँग्रेस पुढे - मागे ह्या चुका सुधारील. ह्या चुकीच्या विश्वासाने प्रेरित झालेले सहस्रावधी हिंदू पुढारी नि अनुयायी अजूनही काँग्रेसमध्येच आहेत. कारण त्यांना तिचा नि तिच्यापासून मिळणाऱ्या लाभांचा मोह सुटत नाही ! पण कित्येक निश्चयी हिंदूंनी तो मोह लाथाडून काँग्रेस सोडून दिली. निवडणुकीत निश्चित यश नि लोकप्रियता मिळवून देणारे काँग्रेसचे तिकीट त्यांनी टाकून दिले.

कारण त्यांना पटले आहे की आजची काँग्रेस ही टिळकांची वा अखंड हिंदुस्थानचे स्वातंत्र्य मिळवू अच्छिणारी खरी अंडियन नॅशनल काँग्रेस राहिलेलीच नाही. याचे काही पुरावे असे: (१) आजची काँग्रेस देशाचे तुकडे करण्यास प्रवृत्त झाली असून तिने पाकिस्तानला आणि स्वयंनिर्णयाला मान्यता दिली आहे. (२) पूर्वीच्या खऱ्या राष्ट्रीय सभेने, खऱ्या राष्ट्रीय वृत्तीने सर्व नागरिकांविषयी न्याय्य नि समान दृष्टी ठेवली होती. परंतु जातीय विषमता हे आजच्या काँग्रेसचे जीवनकार्य दिसून येते. या जातीयतेमुळेच आपली प्रतिष्ठा वाढली, असे तिला वाटत आहे. त्यामुळे तिने एका हिंदूला एकच मत आणि एका मुसलमानाला तीन मते असले भरमसाट प्रतिनिधित्व स्वीकारले असून मुसलमानांनी हिंदूंवर मोठा उपकार केला एवढेच नाही तर एका घोर संकटातून आपण देशाला वाचविले असे वेडे समाधान या काँग्रेस नेत्यांना वाटत आहे!! पण एवढ्यानेही मुसलमानांचे समाधान झाले नाही. तेव्हा काँग्रेसने त्यांना समान प्रतिनिधीत्व मान्य केले! मुसलमानांना प्रसन्न करण्यासाठी काँग्रेसी मुख्यमंत्र्यांनी हिंदूंवर अनके बंधने घातली आहेत.

मुसलमानांच्या राष्ट्रद्रोहाचे पारितोषिक म्हणून आजची काँग्रेस त्यांना अधिकार देत आहे आणि हिंदू समाज नित्याचा लुळा-पांगळा करून ठेवण्याच्या मागे असलेल्या कृतघ्नांना हिंदू हेच ह्या राष्ट्रांत बहुसंख्य असून त्यांनीच काँग्रेसला पुष्टी आणली आहे याचेही स्मरण आजच्या काँग्रेसला उरलेले नाही. तरी काँग्रेसमधील हिंदुत्वनिष्ठांनो, माझी स्वतःची विनंती अशी की तुम्ही आपल्या सदसद्विवेकबुद्धीची आज्ञा पाळून काँग्रेसमधून बाहेर पडा आणि हिंदुसंघटकांना येऊन मिळा.

येत्या निवडणुकीस फारच महत्त्व आलेले आहे. कारण जे जे हिंदू आता निवडले जातील त्यांनाच घटना समितीत स्थान मिळेल नि काँग्रेसी हिंदूच निवडून गेले तर त्यांचे मत तेच बहुसंख्य हिंदूंचे मत असे गृहीत धरले जाईल. पण निवडणुकीत हिंदू सभा नि हिंदुसंघटक पक्ष विजयी झाला आणि प्रभावी अल्पसंख्य पक्ष म्हणून गणण्याअतके जरी त्यांस मताधिक्य लाभले तरी पूर्ण हिंदुत्वाच्या भूमिकेवरून त्याला या अनिष्ट प्रकारांना आळा घालता येईल आणि काँग्रेस नि लीग यांनी काहीही ठरविले, पाकिस्तान वा समप्रतिनिधित्व मान्य केले तरी ते हिंदू जनतेवर बंधनकारक नाही एवढे तरी जगास माहीत होईल. मग काँग्रेस ही केवळ स्वतःचीच प्रतिनिधी राहील. इतर कोणाच्या प्रतिनिधित्वावर तिला अधिकार सांगता येणार नाही. हिंदू जाती पृथ्वीतलावर रहावी, हिंदूंचा सन्मान निष्कलंक रहावा, आपला हिंदुस्थान अखंड नि एकराष्ट्र रहावा, राजकीय दृष्ट्या तो स्वतंत्र व्हावा, एक बलशाली राष्ट्र या नात्याने त्याला वैभवाची प्राप्ती व्हाही असे हिंदूंनो, तुम्हाला वाटत असेल तर तुम्हास काँग्रेस सोडणे अपरिहार्यच आहे! तुम्ही हिंदुसंघटन पक्षातच ते ध्येय सिद्ध करू शकाल. हिंदू महासभा ही एकच संस्था ह्या सर्व अहिंदू शक्तींशी अविरतपणे झुंजत आहे. तिच्या ध्वजाखालीच सर्व हिंदूंनी गोळा झाले पाहिजे. जर तुम्हास ते करता येत नसेल तर निदान आपले मत तरी तुम्ही हिंदू सभावाद्यांनाच अचूकपणे दिले पाहिजे. कारण तेच हिंदुहिताचे रक्षण करण्यास सिद्ध आहेत. काँग्रेसला कोणाही हिंदूने चुकूनसुद्धा मत देता कामा नये.

अखिल हिंदूंच्या विजयध्वजाच्या भोवताली जमून आम्ही एकाकी झुंजत आहोत. मानवी प्रयत्नांची परिसीमा आम्ही करीत आहोत. गेल्याच आठवड्यात ९ वर्षांचा हिंदुबालक त्याच्या कट्टर हिंदुत्व निष्ठेसाठी ठार केला गेला. त्याचा अपराध हाच की तो राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सदस्य होता! दरवर्षी हिंदू मंदिराच्या रक्षणार्थ नि हिंदू स्त्रियांच्या पावित्र्याच्या संरक्षणासाठी दंगेखोर मुसलमानांच्या अत्याचारांनी कितीतरी हिंदू प्राणास मुकत आहेत. तरी काँग्रेसमधील हिंदूंनो, तुम्ही महासभेस साहाय्य करून आमच्या कार्याची त्वरित सिद्धी मिळण्यासाठी आम्हास येऊन मिळणार का नाही? लक्षात ठेवा की, आम्ही अल्पसंख्य हिंदू, हिंदुहितार्थ झगडत असताना जर आमचा पराजय झाला तर त्याचा दोष आमच्यावर येणार नसून तुम्हीच त्या पापाचे धनी व्हाल. अल्पसंख्य झुंजारांना नव्हे तर त्यांचे कार्य पाहत राहून त्यांना साहाय्य न देणाऱ्या कोट्यवधी हिंदू जनतेलाच त्या पापाचा कलंक येऊन चिकटेल. कारण हिंदुध्वज निष्कलंक राखण्यासाठी तुम्ही काहीच हालचाल केली नाहीत तर त्याचा एकच परिणाम होईल तो म्हणजे हिंदुस्थान हा हिंदुस्थान न राहता तो पाकिस्तान होईल.

निराशाजनक परिस्थितीतही मी आशा बाळगतो की, माझ्या या हाकेस हिंदू जनता ओ देईल. कोणताही प्रामाणिक हिंदू यापुढे काँग्रेसमध्ये राहू शकणार नाही. किवा खरा हिंदू हिंदू महासभेला किवा हिंदुसंघटन पक्षाला मत दिल्याविना राहणार नाही. जर कोणाला तसे करता आले नाही तर त्याने अजिबात मतच देऊ नये. तटस्थ रहावे! पण खऱ्या हिंदूने आपले मत काँग्रेसला मुळीच देऊ नये."

## डॉ. मुखर्जींनाच मते द्या

डॉ. मुखर्जी यांनी निवडणूक लढविण्याचे ठरविले तेव्हा त्यांना पाठिंबा देण्यासाठी बंगालच्या हिंदू मतदारांना आवाहन करणारी एक तार सावरकरांनी १६ नोव्हेंबर १९४५ रोजी प्रकटपणे पाठविली. ती अशीः

"काँग्रेस विरुद्ध लढण्याचे धैर्य आपण दाखविले याविषयी अभिनंदन. बंगालच्या हिंदूंनो! हिंदू महासभेचे अध्यक्ष डॉ. शामप्रसाद मुखर्जी यांनी ही निवडणूक लढविण्याचा निर्णय घेऊन आपले कर्तव्य

बजावले आहे. आता बंगाली हिंदूंनो, तुम्ही आपले कर्तव्य पार पाडा. लक्षात ठेवा जर हिंदूंनी काँग्रेसला विजयी केले तर ती हिंदूंची अधिकृत प्रतिनिधी ठरेल आणि ती काँग्रेस स्वातंत्र्य मिळविण्याच्या आशेने निश्चितपणे फाळणीला आणि मुसलमानांच्या समान प्रतिनिधित्वाच्या मागणीला पाठिंबा देईल. तरी हा धोका ओळखून हिंदूंनो तुम्ही डॉ. मुखर्जींसारख्या योग्य नेत्याला आपली मते द्या. काँग्रेसचे आव्हान स्वीकारा आणि ही निवडणूक लढवा. समजा ही निवडणूक हिंदू महासभा हरली तरीही आपण निश्चितपणे सांगू शकू की काँग्रेस स्वतःला हिंदूसंस्था म्हणवून घेत नसल्याने ती हिंदूंचे प्रतिनिधीत्व करूच शकत नाही."

## दैनिक 'अग्रणी'ला साहाय्य करा

सावरकरांच्या गुप्त नि प्रकट मार्गदर्शनाप्रमाणे पकडले न जाता सुऱ्याला सुऱ्याने, आगीला आगीने उत्तर देणारे हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्ते ठिकठिकाणी लढत होते. अशा लोकांना उत्साह देण्याचे प्रकट कार्यसुद्धा सावरकरनिष्ठ वृत्तपत्रे करीत होती. त्यामुळे शासनाने त्या वृत्तपत्रांकडून प्रतिभू मागितले. 'अग्रणी हिंदुराष्ट्र' या दैनिकाकडून शासनाने ६ सहस्र रुपये प्रतिभू म्हणून मागितले. सुरू होऊन एक वर्षाच्या आतच त्या दैनिकावर हे संकट कोसळले. ह्या संकट निवारणासाठी अग्रणीने निधीसाठी आवाहन केले. त्या आवाहनाला पाठिंबा देणाऱ्या ऑक्टोबर १९४६च्या पत्रकात सावरकर लिहितातः

“हिंदुराष्ट्राच्या संरक्षणाचे नि अभ्युदयाचे कंकण बांधून एकनिष्ठ बाणेदारपणाने मागे ‘श्रद्धानंदा’ने जी अमूल्य कामगिरी बजावली, त्यानंतर तिक्याच एकनिष्ठ बाणेदारपणाने ते कार्य आज दैनिक ‘अग्रणी’ करीत आहे. हिंदुसंघटनाच्या समर्थनार्थ काही वृत्तपत्रे आपापल्या परीने आज हिंदुराष्ट्राची जी सेवा करीत आहेत ती तर अभिनंदनीय आहेच; परंतु हिंदुत्वनिष्ठांच्या आघाडीवर अखिल हिंदुध्वज हाती घेऊन झुंजणारा असा अग्रणी ‘अग्रणी’ हाच आहे. साऱ्या बृहन् महाराष्ट्रात त्याच्या होत असलेल्या प्रचाराने नि पडत असलेल्या प्रभावाने ‘अग्रणी’ने आज हे स्थान पटकावलेले आहे. ही माऱ्याची जागा तो झुंजवीत आहे नि ह्या हिंदुत्वाच्या झुंजार सेवेसाठी त्याला ६००० रुपयांचा प्रतिभू देण्याचा भुर्दंड झाला आहे.

हा भुर्दंड ‘अग्रणी’लाच नव्हे तर आपल्यालाच झाला आहे; असेच हिंदुत्वाचा अभिमान असलेल्या प्रत्येक हिंदूने समजले पाहिजे. मग तो कोणत्याही पक्षात असेना का? त्यातही वृत्तपत्र स्वातंत्र्याचा प्रश्न या प्रकरणात अनुस्यूत असल्यामुळे प्रत्येक नागरिकानेही या कार्यी अग्रणीला साहाय्य केले पाहिजे. आनंदाची गोष्ट ही की अशा पक्षनिरपेक्ष अभिमानाने काँग्रेस प्रभृती संस्थांमध्ये असलेले आपले अनेक हिंदू बंधू आणि वृत्तपत्रे ‘अग्रणी’स अशी सहानुभूती दाखवीत आहेत.

प्रतिभूसाठी मागितलेले सहा सहस्र रुपये एकमुठी देणारे दहापाच सज्जन मिळू शकतील. ती त्यांची हिंदुत्वनिष्ठा व्यक्तीशः गौरवास्पद आहे. परंतु माझी अच्छा अशी आहे की, यावेळी हिंदुत्वनिष्ठांच्या सामुदायिक साहाय्याचे निदर्शन झाले पाहिजे. यासाठी हा ‘अग्रणी निधी’ ऑक्टोबर अंतापर्यंत चालू ठेवावा आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून शक्य तितक्या हिंदूंनी आपल्या पैशाचा ‘अग्रणी’वर पाऊस पाडावा! यासाठी उत्तम योजना अशी: प्रत्येक हिंदुत्वनिष्ठ कुटुंबाने निदान १ रुपया ह्या कार्यास द्यावा. केवळ हा एक महिना बोलपट म्हणून त्या त्या कुटबाने पहावयाचा नाही अतके ठरविले नि तो रुपया ‘अग्रणी’कडे धाडला तरीही प्रत्येक कुटुंबाला अतकी बचत कोणताही आर्थिक ताण न पडता करता येईल. एकटे पुणेसुद्धा ही रक्कम अशा पद्धतीने उभारू शकेल.

परंतु आपल्याला हिंदुत्वनिष्ठेचे सामुदायिक निदर्शन हवे आहे. यास्तव प्रत्येक गावी, चाळीतून, आपापल्या मित्रमंडळींकडून स्वयंसेवक स्त्री पुरुषांनी प्रत्येक हिंदुत्वाभिमानी हिंदू कुटुंबाकडून निदान एकेक रुपया गोळा करून शक्य तितक्या त्वरेने अग्रणी कार्यालयाकडे धाडावा.

महाराष्ट्रातील सहस्रावधी हिंदू माझ्या विनंतीस मान देतील अशी आशा वाटणारा - वि. दा. सावरकर.

## हिंदू होण्याचा निश्चय कृतीत उतरवा

मुसलमानांच्या दंगलीमध्ये त्या काळात नौखालीत साधारणतः दीड लाख हिंदू मारले गेले आणि अनेक हिंदूंना बळाने बाटविले गेले. अशा बळाने बाटविल्या गेलेल्या काही हिंदूंकडून 'आम्हाला शुद्ध करून घ्या' अशी पत्रे सावरकरांकडे आली. त्या पत्रांना नोव्हेंबर १९४६ मध्ये सावरकरांनी एका पत्रकाद्वारे जे उत्तर दिले, ते या विषयासंबंधात महत्त्वाचे आणि चिरंतन मार्गदर्शक असणारे आहे. ते पत्रक असेः

"महाशय, आपले १९ नोव्हेंबर १९४६ चे पत्र पावले.

(१) पूर्वी बळाने बाटवून मुसलमान केलेल्या हिंदूंचे आपण वंशज आहात आणि सध्या वाळीत आहात. या दुस्थितीतून आपण अनेकजण परत हिंदू धर्मात नि हिंदुराष्ट्रात येण्यास सिद्ध आहात हे वाचून हिंदुसंघटनी पुढाऱ्यांना आनंद वाटला. आपल्यास एक विनंती करावयाची आहे ती ही की, हिंदूंच्या प्रचंड जागृतीमुळे मुसलमानांवर पडलेल्या बहिष्काराचा आपणाला त्रास होत आहे, एवढ्यासाठी आपणास पूर्वी आपल्याच असलेल्या हिंदू समाजात परत यावेसे वाटते, हे जरी साहजिक आणि अवश्य आहे तरीसुद्धा आपण परत हिंदू व्हावे याला त्याहीपेक्षा एक अत्यंत उदात्त आणि स्वाभिमानाचे द्योतक

असलेले बलवत्तर कारण आहे ते हे की, आपले पूर्वज आपल्या ह्या सामाजिक हिंदुराष्ट्र मंदिरातून मुसलमानांनी बळाने ओढून नेले त्या पूर्वजांच्या आत्म्यास संतोष देण्यासाठी आणि त्यांच्यावर मुसलमानांनी केलेल्या अन्यायाचा सूड घेण्यासाठी आज आलेल्या सुवर्णसंधीचा लाभ घेतला पाहिजे. हिंदुसंघटनाच्या प्रचंड चळवळीमुळे आज हिंदुराष्ट्राचे बळ शतपटींनी वाढले आहे. हे हिंदुराष्ट्र आजच्या आम्हा हिंदूंच्या पूर्वजांचेच काय ते नसून तुमच्या नि आमच्या पूर्वजांचे सामायिक घर आहे. तेव्हा आपण परत हिंदू होणे म्हणजे स्वतःच्या घरीच परत येणे आहे. अशा बंधुभावाच्या आणि समतेच्या भावनेने आम्ही आपणास आपल्याच पूर्वीच्या घराची दारे पुन्हा उघडू. आपणही त्याच ममत्वाच्या भावनेने हिंदू व्हावे! आजचा हिंदूंनी टाकलेला बहिष्काराचा त्रास नसता तरी मुसलमानांनी आपल्या पूर्वजांच्या केलेल्या छळाचा सूड उगविण्याची नि त्यांच्या आत्म्यास प्रसन्नविण्याची संधी आपण वाया दवडण्यासारखी नव्हती.

(२) आपण म्हणता तशी परिषद आता पुन्हा नव्याने भरविण्याची आवश्यकता नाही. आपणास संघटनाच्या चळवळीची समग्र माहिती नसावी म्हणून खालील दोन तीन गोष्टी लिहितो. अशा परिषदा सर्वत्र हिंदुस्थानभर हिंदू सभेच्या आर्यसमाजी प्रभृती पंथाच्या संमेलनात आणि शंकराचार्यसुद्धा मोठमोठ्या पंडितांच्या सभांतून भरल्या आहेत. बळाने बाटविलेल्या नव्हे तर जन्मतःच जे अहिंदूसुद्धा स्वेच्छेने हिंदुराष्ट्रात परत घेण्यात आलेेच पाहिजे. अशा अर्थाचे शेकडो ठराव गेली दहा वर्षे तरी झाले आहेत नि होत आहेत. गेल्याच आठवड्यात प्रत्यक्ष काशी येथील पंडितांच्या फार मोठ्या सभेत वरील आशयाचे ठराव एकमताने संमतिले गेले. बळाने बाटविलेल्यांना तर नुसत्या रामनामाच्या उच्चाराने शुद्ध होऊन हिंदू धर्मात येता येईल असा पंडितांनी निर्णय दिला. दुसरी गोष्ट अशी की, नुसते असे ठराव झाले अतकेच नाही तर अशा सहस्रावधी मुसलमान ख्रिश्चनांचे शुद्धीकरणाचे मोठमोठे समारंभ होऊन त्यांना हिंदू धर्मात परत घेण्यात आले आहे. मलकाना रजपूत लोकांच्या ४०,००० वर लोकांना स्वामी श्रद्धानंदांच्या काळापासून आतापर्यंत शुद्ध करून घेतलेले आहे. पोर्तुगिजांनी बळाने बाटविलेल्या गावागावांतील १०,००० पूर्व हिंदू ख्रिश्चनांना (गावड्यांना) श्री. मसूरकर महाराज ह्यांच्या नेतृत्वाखाली गोमांतकांत शुद्ध करून घेतले ह आपणही अैकले असेल. अतकेच नव्हे तर ते आता हिंदू समाजात एकरूपही होऊन गेलेले आहेत.

त्यांची सर्व धर्मकार्ये आणि व्यवहार हिंदू समाजात मिळून मिसळून निर्विघ्नपणे होत आहेत. ही दोनच ठळक नि प्रत्यक्ष उदाहरणे आपली शंका निरसण्यास पुरेशी आहेत. वास्तविक आज प्रत्यही बहुतेक हिंदू सभा शाखा नि आर्यसमाज शाखा शुद्धीकृतांची लग्नेही हिंदू समाजात घडवून आणीत आहेत. फार काय गेल्या सहा महिन्यांत पोलिश स्त्रिया नि अटालियन स्त्रियांना पुणे नि कोल्हापूर येथे शुद्ध करून घेण्यात आले आणि त्यांच्याशी उच्चवर्णीय हिंदू तरुणांनी सर्व संमतीने सशास्त्र विवाहही केले हे आपण वृत्तपत्रांतून वाचले असेल. रत्नागिरीच्या जिल्हा हिंदू सभेनेच गेल्या वीस वर्षांत तीनशे - चारशे मुसलमान ख्रिश्चनांना शुद्ध करून घेतले आहे.

(३) तरीसुद्धा आपल्या समाधानासाठी एक गोष्ट आणखी करू. आपला विशेष संबंध महाराष्ट्राशी येणार. हिंदू सभेचे वतीने लवकरच बार्शी येथे ‘हिंदू परिषद’ भरावयाची आहे. त्यात आपण म्हणता तसा निःसंदिग्ध ठराव बाटलेल्या मुसलमान ख्रिश्चनांना हिंदू धर्मात नि हिंदू समाजात घेण्याविषयी होईलच. जर मोठ्या गटानेच आपले लोक शुद्ध होतील तर एक हजारापर्यंत उच्च वर्णीय हिंदूंसह त्या शुद्धीकृत हिंदूंचा एक मोठा सहभोजन समारंभही घडवून आणण्यात येईल.

आजपर्यंत असे पन्नास-पन्नास हजारांचे सहभोजन समारंभ हिंदुस्थानभर घडवून आणल्याचे आपणास विदित असेलच. श्री. गद्रे (मुंबई प्रांतिक हिंदू सभेचे आजचे अध्यक्ष) यांची झुणकाभाकर सहभोजने तर प्रसिद्धच आहेत. प्रत्यक्ष मुंबईत गेल्या दहा वर्षात पूर्वी बाटविलेल्या शतावधी ख्रिश्चनांचे मोठमोठे शुद्धीसमारंभ होऊन त्यांना परत हिंदू धर्मात घेऊन सवर्ण हिंदूंचे सर्वाधिकार देण्यात आले. अतकेच नव्हे तर ते आज हिंदू समाजात सरमिसळपणे तसे बेखटक मिसळूनही गेले आहेत. आब्राह्मणांच्या शतावधी हिंदू स्त्रियांनीही त्यांचे स्त्रियांसह अखिल हिंदू हळदीकुंकू नि सहभोजन समारंभ प्रसिद्धपणे साजरे केले.

(४) वरील स्पष्टीकरणाने आपल्या बहुतेक अडचणी निरसल्या जातील नि आपण आपल्या सर्व गटांसह आपल्याच पूर्वजांच्या हिंदू धर्मात नि हिंदू राष्ट्रात परत येण्याचा निश्चय कराल अशी प्रबळ आशा आहे. कार्य करण्याचे निश्चित झाले की मधे येणाऱ्या बारीक - सारीक अडचणी निवारल्या जातील यात शंका बाळगू नये. कार्याचे आधीच फार घोळ मात्र घालीत बसू नये.

(५) रत्नागिरी, कुलाबा नि मुंबई येथील प्रख्यात हिंदू पुढारी श्री. रामभाऊ मंडलीक (एम. एल. सी. हिंदू सभेच्या तिकिटावर निवडून आलेले आणि म. प्रां. हिंदू सभेचे कार्याध्यक्ष) धर्मवीर बापूराव जोशी (महाड), श्री. अनंतराव गद्रे (अध्यक्ष मुंबई प्रांतिक हिंदू सभा) यांचेसह आणि महाराष्ट्राचे प्रख्यात हिंदुसंघटनी पुढारी धर्मवीर अण्णाराव भोपटकर, श्री. मसूरकरमहराज नि श्री. पांचलेगावकरमहाराज यांच्याशी पुढील पत्रव्यवहार अवश्य करावा. परंतु मुख्य गष्ट म्हणजे आता यापुढे फार घोळ न घालता आपल्या गटाचा शुद्ध होऊन परत हिंदू धर्मात येण्याचा निश्चय आधी कार्यवाहीत आणावा नि तसे केल्याचे आम्हास कळवावे. अडचणींचा बाऊ करू नये. म्हणजे अर्ध्या अडचणी अपोआपच नाहीशा होतील.

(६) जर क्वचित आपला सारा गट हिंदू होण्यास एकदम सिद्ध न झाला तर जे सिद्ध असतील त्यांची शुद्धी प्रथम उरकून घ्यावी. दहा-पाच कुटुंबे किवा चार-दोन व्यक्ती प्रथम उघडपणे शुद्ध होण्यास सिद्ध असल्यास त्यांनी शुद्ध होऊन दाखवावे. आम्ही वरील वैयत्ति क शुद्धीही करण्यास सिद्ध आहोत. त्या व्यक्तींच्या धाडसामुळे मागे राहणारा गटही सामुदायिक शुद्धीस सिद्ध होईल.”

## अस्पृश्यता लवकर नष्ट करा

सावरकर अस्पृश्यता निवारण्याच्या प्रश्नापुरते काँग्रेसशी सहकार्य करण्यास सिद्ध असत याचा एक पुरावा म्हणजे त्यांनी 'दलित सेवक' ह्या धुळ्याहून प्रसिद्ध होणाऱ्या पत्राचे संपादक श्री. वि. न. बर्वे यांना जानेवारी १९४७ मध्ये पाठविलेले पत्र. ते पत्र असे :

"वर्तमानपत्रांतून वाचले की काँग्रेस, हिंदू महासभा प्रभृती संस्थांतील सर्व हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्त्यांनी पक्षनिरपेक्ष अशी एक फळी उभारून अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्यासाठी कान्ह देशात त्या घातक रूढीवर आणखी एक चढाई करण्याचे कार्य हाती घेतले आहे. अतकेच नव्हे तर जन्मजात म्हणविणाऱ्या परंतु वस्तुतः आज केवळ पोथीजात असलेल्या जातिभेदाच्या उच्छेदनार्थही आणखी एक संघटित फळी उभारून एका अखिल हिंदुसहभोजनाचाही धुमधडाका कान्हदेशभर उडवून देण्यास सक्रिय आरंभ केला आहे हे वृत्त जर, वाचण्यात आले तितक्याच प्रमाणावर खरे असेल तर हे आंदोलन अगदी सामायिक नि अभिनंदनीय आहे. जर क्वचित माझी प्रकृती सुधारून सार्वजनिक कार्यात पडण्याअतकी शक्ती आली तर ह्या अस्पृश्यतेच्या नि पोथीजात जातिभेदाच्या उच्चाटनाचे कार्यच निदान एक दोन वर्षे तरी करावे आणि त्या घातक रूढीवर आणखी एक अखिल भारतीय चढाई करावी असे वारंवार मनात येते. अतके हे कार्य मला केवळ हिंदुसंघटनार्थच नव्हे तर मानवी संघटनार्थही आवश्यक वाटते!!"

ह्याच विषयावर दुसरे एक पत्र सावरकरांनी रत्नागिरी येथील साप्ताहिक 'बलवन्त'ला पाठविले. त्याचा आशय असाः

"रत्नागिरीची बहुतेक प्रमुख देवालये पक्षनिरपेक्ष अखिल हिंदू समाजाने पूर्वास्पृश्यांसह सर्व हिंदूंना खुली केली हे वाचून आनंद झाला. त्याविषयी रत्नागिरीच्या बांधवांना धन्यवाद. आता हे योग्य दिशेने पुढे पडलेले पाऊल कोणच्याही चोरवाटेने मागे घेण्यात येऊ नये याविषयी मात्र निदान आणखी दहा वर्षे तरी आपण सर्वांनी जपले पाहिजे. रत्नागिरी नगराने हे पुण्य कृत्य जसे केले तसे ते सर्व जिल्हाभरही त्या त्या ठिकाणच्या हिंदूंनी केले पाहिजे. येत्या तीन-चार महिन्यांच्या आत रत्नागिरी जिल्ह्यातही सर्व मंदिरे अखिल हिंदूंना उघडी झाली आहेत अशी वार्ता येऊन महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात ह्या एक

महतकार्यी तरी रत्नागिरी जिल्ह्याने अग्रपूजेचा मान मिळवावा अशी माझी उत्कट अच्छा आहे. अस्पृश्यतेचा प्रश्न आज केवळ सामाजिक राहिला नसून तो आपल्या हिंदुस्थान देशाच्या अखंडत्वासही सुरुंग लावू पाहत आहे. तो प्रश्न एक महत्त्वाचे राजकीय संकटही होऊ पहात आह हे आता सूज्ञांना काही सांगावयास पाहिजे असे नाही. पण त्या अस्पृश्य शब्दातील 'अ' तेवढा जर आपण एका वर्षात मारून टाकू तर आपल्या हिंदुराष्ट्राच्या अखंडत्वास पडणारे एक खिडार तरी आपण पडू न देता तटाची ती बाजूसुद्धा अभेद्य ठेवू शकू."

## पंजाबचा प्रश्न

देशाची फाळणी होणार याचे सावरकरांना अतिशय दुःख होत होते. तेव्हा यातून मार्ग काढण्यासाठी, या दुर्घटनेचा आपल्या उरलेल्या शक्तीनुसार प्रतिकार करण्यासाठी सावरकरांनी फेब्रुवारी १९४७ मध्ये एक पत्रक काढून सूचना केलीः

"गांधीजी नि काँग्रेस हे दोघेही हिंदूंचे खरे प्रतिनिधी नाहीत. ते स्वतःलाही हिंदूंचे प्रतिनिधी मानीत नाहीत. म्हणून पंजाब प्रश्नाची चर्चा करताना हिंदू महासभेचे अध्यक्ष श्री. भोपटकर आणि शिखांचे पुढारी मास्टर तारासिंग यांना अवश्य बोलावण्यात यावे."

## बंगालचे विभाजन

बंगालच्या फाळणीबद्दल एक विस्तृत पत्रक सावरकरांनी २ एप्रिल १९४७ रोजी प्रसिद्ध केले ते असे. :

"अखंड हिंदुस्थानच्या विभाजनाचा कट असफल करण्यासाठी आपण प्रथम त्यांचे पाकिस्तान दुभंगले पाहिजे. त्यासाठी तीन गोष्टी प्रथम कराव्यात. पहिले पाऊल, पश्चिम बंगाल हा हिंदू प्रांत निर्माण करावा, दुसरे पाऊल, पडेल ते मूल्य देऊन आसामात घुसलेल्या मुसलमानांना हाकलावे म्हणजे ते पूर्व पाकिस्तान दोन हिंदू प्रांतांच्या कैचीत सापडेल. तिसरे पाऊल म्हणजे पूर्व पंजाब हा हिंदू-शीख प्रांत निर्माण करावा आणि सिधमधील बहुसंख्याक हिंदू जिल्हे मुंबई राज्याला जोडावेत. अशा प्रकारे दहा मोठे हिंदू प्रांत एकत्र करून अखंड हिंदुस्थानचे असे एक सुसंघटित नि बलिष्ठ मध्यवर्ती राज्य निर्माण करावे, की जे थोड्याच काळात फुटून निघणाऱ्या पाकिस्तानी प्रदेशालाही अधिक परिणामकारक पद्धतीने ह्या हिंदी संघराज्याला जोडून घेईल.

पण जर आपण मुसलमानी प्रांतात हिंदूंना ज्या प्रकारे वागविले जाईल त्याच पद्धतीने हिंदू प्रांतातील मुस्लिम अल्पसंख्यांकांना वागविले जाईल असे ठामपणे सांगितले नाही आणि त्याप्रमाणे प्रत्यक्ष कार्यवाही केली नाही तर वर सांगितलेले सर्व उपाय किवा कोणतीही फसवी योजना हिंदूंचे संरक्षण करू शकणार नाही. ह्या सूचनांमुळे जीना, गांधी नि सुऱ्हावर्दी संतापत आहेत. याचाच अर्थ ह्या सूचना हिंदू जगताला लाभदायक असून मुस्लिम महत्त्वाकांक्षेला मारक आहेत. म्हणून आता नेटाची आंदोलने नि प्रत्यक्ष कृती करून हे सर्व कार्य पूर्ण केले पाहिजे."

## कोल्हापूर छत्रपतींचे अभिनंदन

मार्च १९४७ मध्ये सावरकरांनी कोल्हापूरच्या नूतन छत्रपतींचे त्यांच्या राज्यारोहणानिमित्त अभिनंदन करताना लिहिले:

“या गादीची प्राणप्रतिष्ठाच हिंदू राष्ट्राचे आणि हिंदू धर्माच्या संरक्षणार्थ नि संवर्धनार्थ झालेली असल्याने आपणही तेच ब्रीद एका हिंदुछत्रपतीला शोभेल अशा बाणेदारपणाने पाळाल अशी आशा आहे.”

पुढे जून १९४७ मध्ये ह्या राज्यारोहणाचा कोल्हापूर येथे मोठा उत्सव करण्यात आला. त्यावेळी सावरकर स्वतः उपस्थित न राहता त्यांनी एका पत्रद्वारे त्यांना लिहिले कीः

“हे छत्रपती शिवाजीमहाराजांचे सिहासन महाराष्ट्रावर होणारे हिंदू विरोधी संभाव्य आक्रमण मुळात मोडून टाकण्याचे सामर्थ्य शहाजीराजांना देते! सर्व हिंदू संस्थानिकांची सैनिकी नि वायुदल शक्ती संघटित करून हिंदू जगतावर होणारे आक्रमण थांबविले तरच गेलेले सर्व पुन्हा मिळविता येईल.”

## भोपाळसंबंधी पत्रक

बहुतेक हिंदू संस्थानिक हिंदू नेते नि हिंदू लोक राजकीय दृष्टीने हिंदुत्व विसरलेलेच होते! ज्या काही संस्थानात थोडी हिंदुत्वाची जागृती होती, त्यापैकी मुसलमानी राजवटीच्या भोपाळ

संस्थानातील हिंदू, हिंदू सभेच्या ध्वजाखाली संघटित होत होते. त्यामुळे भोपाळमध्ये नव्यानेच स्थापन झालेल्या मंत्रिमंडळात हिंदू सभेचे प्रतिनिधी श्री. भैरव प्रसादजी यांना मंत्रिपद देण्यात आले. तेव्हा त्यांचे अभिनंदन करताना १५ एप्रिल १९४७रोजी काढलेल्या एका पत्रकात सावरकर लिहितातः

"भोपाळ संस्थानातील अल्पसंख्य मुसलमानांना जितके अधिकार आहेत, तितके अधिकार बहुसंख्य हिंदूंना मिळाले नसले नि नव्या सुधारणेमध्ये कित्येक वैगुण्ये असली तरी हिंदू सभेला मिळालेले एक मंत्रिपद ही गोष्टही हिंदूंच्या दृष्टीने स्वागतार्ह आहे. त्यायोगे हिंदूंचे प्रतिनिधित्व मान्य करण्यात आले आहे. आता हे अधिकाराचे स्थान आपल्याला मिळाले असले तरी आपण त्यांच्या आहारी जाता कामा नये. भोपाळमधील हिंदूंचे अधिकार कोणते आहेत याची तेथील हिंदूंना जाणीव करून देण्याच्या दृष्टीने या महत्त्वाच्या अधिकारपदाचा भोपाळमधील हिंदुसंघटनवादी उपयोग करून घेतील असा मला विश्वास वाटतो. या मंत्रिमंडळात काँग्रेसला कोणाचे प्रतिनिधित्व म्हणून घेण्यात आले? मुस्लिम लीग मुसलमानांचे प्रतिनिधित्व करते तसेच हिंदू महासभा हिंदूंचे प्रतिनिधित्व करते, असे असता काँग्रेसला ह्या मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले, ते ं हदूंच्या अधिकाराला सुरुंग लावणारे ठरले आहे. त्या दृष्टीने नबाबी धोरण यशस्वी झाले आहे. कारण काँग्रेसने तिचा प्रतिनिधी म्हणून एका मुसलमानाचीच निवड केल्याने तेथील मंत्र्यांमध्ये आधीच अधिक असलेली मुसलमानांची संख्या आणखी वाढली आहे! काँग्रेसने हिंदूंवर केलेला हा अन्याय तेथील हिंदूंनी लक्षात घ्यावा."

## दंग्यांतील हिंदू कार्यकर्त्यांचे अभिनंदन

मुसलमान वस्तीत राहणाऱ्या हिंदूंना संरक्षण देणे, दंगलपीडित हिंदूंना सर्व प्रकारे साहय्य देणे, समुद्रमार्गे कोकणात जाणाऱ्या हिंदूंना मुस्लिम वस्तीतून जाताना नि येताना संरक्षण देणे, अशी अनेक कामे त्यावेळी मुंबईची हिंदू सभा करीत असे. ही कामे करणाऱ्या हिंदू सभेतील काही निवडक कार्यकर्त्यांचा धर्मवीर ल. ब. भोपटकर यांच्या अध्यतेखाली पुणे येथे एक प्रकट सत्कार करण्यात आला. या सत्कारात सहभागी होताना सावरकरांनी एप्रिल १९४७ मध्ये एका पत्रकाद्वारे जो संदेश पाठविला तो असाः

"मुंबईच्या कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आक्रमकांचा शौर्याने प्रतिकार करणाऱ्या मुंबईतील सहस्रावधी हिंदुवीर स्त्री-पुरुषांचाच हा आपण सत्कार करीत आहोत. आत्मसंरक्षणाच्या कामी सर्व हिंदू जर असेच शूर असते तर दंगे करण्याचे धाडस कोणासच झाले नसते. तेव्हा नैर्बंधिक, वीरोचित नि निश्चयी प्रतिकारापुरतेच बोलायचे तर कुलाबा जिल्ह्यातील हिंदुसंघटनवाद्यांनाही आपण प्रथम वंदिले पाहिजे."

## आसामच्या पंतप्रधानांना तार

आसामचाही समावेश पाकिस्तानात व्हावा ही मागणी पूर्ण करण्यासाठी पूर्व बंगालमधील मुसलमान आसामात घुसत होते. यासंबंधी सावरकरांनी पूर्वीच सूचना दिल्या होत्या. तरीही आसाममधील काँग्रेसी मंत्रिमंडळाने त्या प्रश्नांकडे दुलर्क्ष करून पुन्हा मुस्लिम लीगशी तडजोड करण्याचा प्रयत्न चालविला. तेव्हा २६ एप्रिल १९४७ रोजी सावरकरांनी आसामच्या पंतप्रधानांना एक तार पाठवून जाणीव दिली कीः

"आक्रमक मुसलमानांशी आपण भेकड वृत्तीने चालविलेल्या तडजोडीचा हिंदुसंघटनवादी जनता ठणठणीतपणे निषेध करीत आहे. पण अशा तडजोडीने त्यांचे समाधान तर होणार नाहीच नाही, उलट त्यांची आक्रमणाची वृत्ती मात्र वाढेल. ज्या नव्या वा जुन्या मुसलमान आक्रमकांनी आसामात प्रवेश केला आहे त्या सर्वांची अगदी शेवटच्या माणसांपर्यंत हकालपट्टी केलीच पाहिजे. त्यांना आता एक तसूभरही भूमी देऊ नये. गतकालात आपण त्यांना तसूतसूने भूमी दिली त्याचे कटू फल म्हणून आज सर्व हिंदुस्थान पादाक्रांत करण्याची त्यांनी आसुरी लालसा धरली आहे. आसामात घुसलेल्या औरंगजेबी सैन्याला खडे चारणाऱ्या शूर आसामी वीरांच्या आजच्या वंशजांनी लीगच्या आजच्या बाजारबुणग्यांना कधीही शरण जाऊ नये, तसे कधीही होऊ नये. ही अखंड हिंदुस्थानची पूर्व सीमा संरक्षिण्याचे पूर्वपरंपरागत कर्तव्य चोखपणे पार पाडण्याचे पवित्र कर्तव्य आसामी हिंदूंनी पार पाडलेच पाहिजे."

## अजून एक व्हा - फाळणी टळेल

ब्रिटिश मंत्रिमंडळाने भारताचे दोन तुकडे करून त्याला स्वातंत्र्य देण्याचा घेतलेला निर्णय थोड्याच काळात प्रसिद्ध झाला. तो निर्णय अैकताच २९ मे १९४७ ला काढलेल्या एका पत्रकात सावरकर म्हणतातः

"गेल्या निवडणुकीत हिंदू मतदारांनी काँग्रेसच्या अच्छुकांना जी मते दिली ती काही ह्या हिंदुस्थानची फाळणी करण्यासाठी दिलेली नाहीत! एवढेच नव्हे तर त्या निवडणुकीत काँग्रेस नेत्यांनी नि अच्छुकांनी देशाचे अखंडत्व अबाधित राखण्याचे प्रच्छन्न नि प्रकट अभिवचन दिल्यामुळेच त्यांना हिंदू मतदारांची मते मिळाली आहेत. पक्षांनीही देशाचे अखंडत्व रक्षिण्याची घोषणा त्या निवडणुकीत केलेली आहे, हे लक्षात घेता हे सिद्ध होते की प्रांतिक वा मध्यवर्ती विधिमंडळातील हिंदू सदस्यांना

मध्यवर्ती शासनसंस्थेची नि आपल्या मातृभूमीची फाळणी करण्याच्या कोणत्याही योजनेचा विचार करण्याचासुद्धा अधिकार नाही. कारण ज्या हिंदू मतदारांचे ते प्रतिनिधी आहेत त्यांच्याकडून त्यांना तसे अधिकारपत्र मिळालेले नाही.

सध्याच्या तथाकथित घटना समितीलाही या प्रश्नाचा मूलतः विचार करण्याचा अधिकार नाही. तेव्हा सध्याच्या मध्यवर्ती सत्तेपासून सर्वस्वी स्वतंत्र असे मुस्लिम राज्य निर्माण करण्याच्या योजनेचा विचार करण्यास व्हॉइसरॉयनी विधिमंडळांना वा घटना समितीला सांगितले तर ती गोष्ट आपल्या अधिकाराबाहेरची आहे, असे सांगून अशा योजनेचा विचार करण्यास एकतर त्यांनी नकार द्यावा किवा आपल्या जागांची त्यागपत्रे देऊन पुन्हा मतदारांकडे जावे. तसेच अशा योजनेवर सार्वमत घेण्याचीही मागणी त्यांना करता येईल.

पाकिस्तानचा प्रश्न हा अत्यंत मूलभूत असून हिंदू जगताला पिढ्यान्पिढ्या उपद्रवकारक ठरणार आहे म्हणून कोणत्याही सार्वजनिक संस्थेने त्या संबंधीचा निर्णय हिंदू जनतेकडून तसा निःसंदिग्ध निर्णय मिळाल्यावाचून घेऊ नये. तसा कोणालाच नैतिक अधिकारही नाही.

माझ्या ह्या म्हणण्याचा असावधपणे कोणाचा अपसमज होऊ नये वा कोणाला त्याचा विपर्यास करता येऊ नये म्हणून मी अगदी स्पष्टपणे सांगतो की नव्या निवडणुका वा सार्वमत यांची मागणी करताना हिंदू मतदारसंघाच्या सूज्ञपणावर मी मुळीच विसंबून नाही. एक हिंदुसंघटनवादी गट सोडला तर बहुसंख्य हिंदूंच्या मानगुटीस भ्रांत राष्ट्रीयत्वाचे पिशाच्च बसले असल्यामुळे सर्व आयुष्यभर हिंदुहितावर अंगार ठेवण्याचे कार्य करणाऱ्या याच लोकांवर आणि पक्षांवर आंधळा विश्वास ठेवून ते त्यांनाच निवडून देतील आणि हिंदुहिताकरिता जे झगडत, झुंजत आले आहेत त्यांच्यावर अविश्वास दाखवतील याची दुःखद जाणीव अतरांपेक्षा मला अधिक आहे. ते काही असले तरी आपल्या लोकांना जागृत करण्याचा पुनःपुन्हा प्रयत्न करणे आणि आपल्या सर्व सामर्थ्यानिशी झुंजत राहणे हे प्रत्येक हिंदुसंघटनवाद्याचे कर्तव्य आहे.

मस्लिम स्थानाकरिता मुसलमानांनी जितक्या संघटितपणे आणि जागरूकतेने प्रयत्न केला तशाच निश्चयाने अखंड हिंदुस्थानसाठी झुंजण्यास हे हिंदू-जगत सिद्ध होईल, तसा निर्धार करील तर प्रत्यक्ष लढासुद्धा न देता त्याचा हेतू साध्य होऊ शकेल आणि क्वचित लढाई घ्यावी लागली तरीही त्यात हिंदूच विजयी होतील.

पण यासाठी हिंदू जगताने अखंड हिंदुस्थानचे संरक्षण आणि सिंध, पंजाब, बंगाल यांची फाळणी यावर नेटाने भर दिला पाहिजे."

### फाळणीला विरोध करा

६,७,८ जूनला दिल्ली येथे होणाऱ्या हिंदू महासभेच्या कार्यकारी मंडळाच्या सभेला सावरकर उपस्थित राहू शकले नाहीत. पण दि. ४ जून १९४७ रोजी त्यासंबंधी त्यांनी केलेले निवेदन थोडक्यात असेः १) मध्यवर्ती भारतीय राज्यापासून वेगळे असे मुस्लिम राज्य निर्माण करण्यास आपण जोमाने विरोध केला पाहिजे. अखंड हिंदुस्थानच्या मृत्युआज्ञेवर आपण मनापासून कधीही स्वाक्षरी न

www.savarkarsmarak.com

करण्याचा निर्धार करावा. ब्रिटनने बळाने आपल्यावर पाकिस्तान लादले तर ती गोष्ट निराळी. तसे झाले तरीही बंडखोर मुस्लिम प्रांत भारताला पुन्हा जोडण्याचे प्रयत्न आपण चालूच ठेवू.

२) पाकिस्तानला आपला असलेला विरोध नोंदून ठेवण्यासाठी आपल्या सोयीने भारतभर एक सुतक दिन पाळावा.

३) पाकिस्तान मान्य न झाले तरीही अखंड हिंदुस्थानच्या हितासाठीच आपण बंगालमध्ये हिंदू बहुसंख्याक राज्य निर्मितीची मागणी करावी. आसाममधील सिल्हेटप्रमाणे सिधमधील चार हिंदू बहुमतांच्या जिल्ह्यांना तेथे मतदान घेऊन भारताला मिळण्याचे स्वातंत्र्य द्यावे.

४) काँग्रेस मंत्रिमंडळाला आवाहन करावे की ब्रिटनच्या शक्तीचा प्रतिकार करणे तुम्हाला शक्य नसेल तरीही तुम्ही त्यांनी बळाने लादलेले पाकिस्तान स्वतः मान्य करून हिंदू मतदारांचा विश्वासघात करू नये.”

**बिहारी हिंदूंनो,**
**भ्रमिष्ट गांधींचे अैकू नका !**

त्या काळात होणाऱ्या मुसलमानी अत्याचारांचा प्रतिकार करणाऱ्या हिंदूंना धीर देण्यासाठी सावरकरांनी ११ जून १९४७ रोजी काढलेले पत्रक अत्यंत महत्त्वाचे आहे त्यात सावरकर लिहितातः

“बिहारमधील वीर हिंदूंनो, अखिल हिंदू दृष्टीने आणि शौर्याने तुम्ही हिंदूविरोधी आक्रमणाचा जो प्रतिकार केला त्याविषयी मी तुम्हाला धन्यवाद देतो.

भारतातील मुसलमानांनी नि हिंदू पंचमस्तंभी यांनी तुमच्याविरुद्ध चालविलेल्या अपमानस्पद प्रचाराची मला पूर्ण जाणीव आहे. बंगालमधील हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारांची तुम्हाला चीड आली हाच त्यांच्या मताने तुमचा भयानक अपराध!! पायाला दंश करणाऱ्या सापाला काठीने ठोकणाऱ्या हाताचाही हे शहाणे निषेध करतील. हिंदू जगत हा एक राष्ट्रीय महापुरुष आहे याची अशा शहाण्यांना जाणीवच नाही. जगाच्या कोणत्याही भागात कोणाही हिंदूवर हिंदू म्हणून अत्याचार झाला तर तो संपूर्ण हिंदू जगताचा अपमान समजून आपणाला जमेल तेथे हिंदूंनी त्या अत्याचाराला प्रत्युत्तर दिले पाहिजे.

बंगाली हिंदूंसाठी बिहारी हिंदूंनी काहीही करू नये असा तुम्हाला उपदेश करणाऱ्या खान बंधू, बॅ. जीना, सिध नि बंगालचे मंत्री एवढेच काय पण गांधी नि नेहरू यांपैकी एकहीजण बिहारी नसता

बिहारमधील मुसलमानांच्या साहाय्याला मात्र ते धावत आहेत! त्यांच्यासाठी अश्रू ढाळीत आहेत. जगातील मुसलमानांनी तेवढे एकमेकांच्या साहाय्याला धावावे. परंतु बिहारी हिंदूंनी बंगाली हिंदूंविषयी दुःख करू नये असे त्यांचे म्हणणे दिसते!!

पण बिहारच्या वीर हिंदूंनो! आपल्या उत्त ीने आणि कृतीने हिंदू धर्माचे नि हिंदू स्वाभिमानाचे संरक्षण करणारे अखिल हिंदू अैक्याचा संदेश घेऊन येणारे ईश्वरी दूत म्हणून लक्षावधी हिंदू संघटकांच्या वतीने मी आपले अभिनंदन करतो.

मी असे अैकतो की पावसाळा 'सुरू' होण्यापूर्वी प्रत्येक हिंदूने आपापल्या घरातून बेघर मुसलमानांना आसरा द्यावा असा तुम्हाला गांधींचा उपदेश आहे! मातृभूमीचे तुकडे करून त्यातील एक भाग मुसलमानांना देऊनही या महात्म्याला त्याचे जीवितकार्य पूर्ण झाले असे वाटत नसावे म्हणूनच की काय तो आता प्रत्येक घरातून पाकिस्तान नि त्या पाठोपाठ नौखाली निर्माण करावी अशी मागणी जीनांच्या आधीच करीत आहे! त्याचा हा उपदेश एका भ्रमिष्टाचा उपदेश म्हणून तुम्ही अैकू नका. कोणा हिंदूच्या घरात दुसऱ्यासाठी थोडा कोपरा नि थोडे अन्न उरलेले असेल तर ते त्याने बंगाल नि पंजाबमधून येणाऱ्या हिंदू निर्वासितांना तो आसरा नि ते अन्न द्यावे. कारण तेच तुमचे खरे धर्मबंधू आहेत. तसेच बिहारमध्ये मुसलमानांना स्वतंत्र प्रदेश देण्याची मागणीही प्रथम फेटाळून लावा. कारण थोड्याच दिवसांत तेथे मुसलमानांची संख्या वाढली की तो भाग दोन पाकिस्तानांना जोडणारा मार्ग कॉरिडार म्हणून पाकिस्तानात समाविष्ट करण्याची मागणी पुढे येईल. मुसलमानांची ही मागणी काँग्रेस मंत्री मान्य करणार नाहीत यासाठी जागरूक राहून प्रयत्न करा. जे मुसलमान त्यांच्या घरी पुन्हा येऊ अच्छितात ते काही हिंदूंवर उपकार करीत नाहीत. त्यांना वाटले तर त्यांनी त्यांच्या त्यांच्या गावी जावे पण त्यांना एकत्र वस्ती करून राहू देऊ नये. ते बिहारमध्ये परत आलेच नाहीत तर अधिकच चांगले."

## हिंदूंनो ! आत्मघात केला नाहीत तर !

भारताचे विभाजन करण्याच्या निर्णयाच्या निषेधार्थ हिंदू महासभेच्या आदेशानुसार देशभर ३ जुलै १९४७ हा सुतक दिन - काळा दिन म्हणून पाळण्यात आला. हा काळा दिन कसा पाळावा या संबंधी १ जुलै १९४७ रोजी काढलेल्या एका मार्गदर्शक पत्रकांत सावरकर लिहितातः

"आपल्या अतिहासातील ह्या काळया दिवशीही हे हिंदूंनो! तुम्ही निराश होऊ नका! आणि लक्षात ठेवा जर तुम्ही स्वतःचाच विश्वासघात केला नाही तर तुमचा भविष्यकाळ उज्ज्वल होईल. माझे हे म्हणणे म्हणजे केवळ मनोराज्य नाही. अतिहास नि वर्तमानकालाच्या अभ्यासानेच निघालेला हा तर्कशुद्ध निष्कर्ष नि निश्चित नियम आहे. शतकानुशतकांचा हिंदू अतिहास लक्षपूर्वक अभ्यासला म्हणजे स्पष्ट दिसते की ह्या हिंदू जातीच्या अंगी पुनरुत्थानाची अद्‌भुत शक्ती संचारलेली असून ज्या काळ रात्री हिंदू विरोधी शक्ती पूर्ण विजयी झाल्यासारख्या भासतात, त्याच क्षणी हिंदुशक्ती दिनाचा प्रारंभ होतो. पौराणिक भाषेत सांगायचे म्हणजे याच दिवशी ईश्वर अवतार घेतो. काळयाकभिन्न रात्रीच श्रीकृष्णाचा जन्म झाला. अन्य वंश नि देश यांच्याशी तुलना करता हा हिंदुस्थान देश अद्याप अमर राहिला आहे. याचे कारण ह्या देशात असलेल्या अदम्य नि अजेय शक्तीेने प्राचीन नि अर्वाचीन काळात ह्या देशावर आक्रमण करणाऱ्या सर्व अहिंदू शक्तींना वेळोवेळी पराभूत करून नष्ट केले आहे.

ह्या देशात गंगेपर्यंतचा प्रदेश पादाक्रांत करणारे ग्रीक विजेत्या अलेक्झांडरचे ते वंशज आज कोठे आहेत? केवळ तो ग्रीकवंशच नव्हे तर त्यांच्या देवदेवतांही आज कोठेही दिसत नाहीत! त्याही गेल्या, नष्ट झाल्या. युरोप पादाक्रांत करणारे ते हूणही पूर्ण नष्ट झाले. त्यांची आठवणही उरली नाही. हिंदू खड्गाने ज्यांना रणांगणात पराभूत करून हिंदुस्थानातून हाकलून दिले आणि परवंश म्हणून ज्यांचे नावही उरले नाही असे ते ग्रीक, हूण, शक आता पौराणिक कथेतील संशोधनाचा विषय झालेले आहेत!

त्यानंतर अैतिहासिक दृष्टीने अद्याप स्मरणात राहिलेले मुसलमान येथे आले. त्यांचा अतिहास काय सांगतो? मुसलमान न थकता सतत सांगतात की ते हिंदुस्थानात विजेते म्हणून आले आणि त्यांनी सर्व हिंदुस्थान जिंकून तेथे त्यांचे साम्राज्य स्थापन केले. पण त्या साम्राज्याचे पुढे काय झाले हे ते सांगत नाहीत. त्यांच्या साम्राज्याचा झालेला तो अंत ते स्वतःपासूनही लपवून ठेवतात! मुसलमान येथे विजेते म्हणून आले हे खरे आहे. ते येथे अतका दीर्घकाळ राहिले की शेवटी हिंदू जातीच्या चिकाटीच्या विलक्षण सामर्थ्यापुढे ते टिकाव धरू शकले नाहीत! ह्या दीर्घकालीन युद्धामध्ये ते मुसलमान पराभूत झाले. अैतिहासिक सत्य पटण्यासाठी पुढील दोन मानचित्रे दृष्टीसमोर उभी करा.

प्रथम ख्रिस्ताब्द सन १६०० चे हिंदुस्थानचे मानचित्र (नकाशा) डोळयांपुढे आणा. त्यावेळी भारतभर मुसलमानी राज्य होते. तेव्हा एखाद दुसरा प्रांत नव्हे तर जवळ जवळ सर्व भारत पाकिस्तान झाले होते. हिंदुस्थान असे फारसे मोठे उरले नव्हते. त्यानंतर सन १७५० ते १७९८ चे मानचित्र उघडा नि पहा काय दिसते ते! ह्या चित्रात दिसेल की सर्व भारतभर हिंदुसेना मुसलमानांना पराभूत करीत विजयी होत आहेत. मराठ्यांचे सर सेनानी सदाशिवराव भाऊ यांनी दिल्लीचे मुसलमानी तख्त अक्षरशः फोडून टाकले आहे. आमचे शीख हिंदू बांधव पंजाब नि काश्मीर जिकून काबूल नदीपासून तिबेटपर्यंत राज्य करीत आहेत. पुढे नेपाळात गुरखे, हिंदू आणि खाली थेट रामेश्वरापर्यंत प्रत्येक मंदिरावर हिंदू मराठ्यंाचा भगवा ध्वज विजयाने फडफडत असलेला आढळेल. दिवाळीतील अग्निबाणाप्रमाणे सणसणत वर चढलेले ते इस्लामी साम्राज्य शेवटी एखाद्या विझलेल्या काडीप्रमाणे खाली कोसळले! अशा प्रकारे त्या इस्लामी साम्राज्याची राख करून हिंदू-हिंदुस्थान पुन्हा विजयी होऊन सन्मानाने उभा राहिला.

हे अैतिहासिक सत्य समजावून घेणे मुसलमानांच्याही हिताचे आहे. औरंगजेबासारख्या सामर्थ्यवान शहेनशहाने प्रत्यक्ष निर्माण केलेले पाकिस्तान ज्या हिंदुशक्तीने धुळीस मिळविले ती हिंदुशक्ती जीनांचे आजचे हे एवढेसे पाकिस्तान केव्हाच नष्ट करील. अतके असूनही त्यांना पुन्हा याचा प्रत्यय पहायचाच असेल तर त्यांनी पहावा.

तसेच हिंदूंनो, आपणही पुन्हा प्रयत्न करूया. जगात जिवंत राहण्यासाठी चाललेल्या ह्या संघर्षात अतकी सहस्रावधी वर्षे टिकून राहिलेली ही हिंदुशक्ती दुर्बल होण्यासारखे या शतकात काहीही विशेष घडलेले नाही. ह्या हिंदुवंशाच्या रक्त ात संचरत असलेले पुनरुज्जीवनाचे नि पुनरुत्थानाचे ते अमरत्व पुन्हा उफाळून उठेल आणि आपल्या अतिहासाला लागणारा हा काळा डाग साफ धुऊन टाकून सोनेरी विजयाचा नवा दिवस लवकरच उजाडेल. जर तुम्ही स्वतःचा विश्वासघात केला नाही तरच हे घडेल.

अशा ह्या विश्वासाने हिंदूंनो, पुन्हा उठा नि प्रतिज्ञा घ्या की (१) आम्ही हिंदू हे स्वयंमेव राष्ट्र आहोत (२) हा हिंदुस्थान आसिंधुसिंधुपर्यंत पसरलेली ही भारतभूमी ही आमची पितृभूमी आहे. (३) आमचा देश नि आमचे हे राज्य यांच्या फाळणीला भ्रांत राष्ट्रवादी काँग्रेसवाल्यांनी विश्वासघाताने हातभार लावलेला असला तरीही आम्ही हिंदू फुटून निघणाऱ्या पाकिस्तानला, सार्वभौम मध्यवर्ती

सत्तेला स्वसामर्थ्याने जोडून घेईपर्यंत सतत लढत राहू! (४) हे ध्येय साध्य करण्यासाठी राजनीतीचे हिंदूकरण नि हिंदूंचे सैनिकीकरण करा!"

## ध्वजासंबंधी सूचना

ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी भारताला स्वातंत्र्य देण्याचा आणि त्याची फाळणी करण्याचा निर्णय घेतला. तरीही त्यावेळी चालू झालेली भारताची नवी घटना समिती आपले काम करीतच होती. ह्या समितीत स्वतंत्र भारताचा ध्वज कोणता असावा याची चर्चा चालू होती. त्यावेळी हा ध्वज भगवा असावा अशी एक सूचना त्या समितीपुढे विचारासाठी आलेली होती. अर्थात काँग्रेसचे तेथे संपूर्ण बहुमत असल्याने भगवा ध्वज हा स्वतंत्र भारताचा ध्वज असावा ही सूचना मान्य होणे अशक्यच होते. ही परिस्थिती लक्षात घेऊन सावरकरांनी त्या ध्वज समितीला ७ जुलै १९४७ रोजी तारेने कळविलेः

"हिंदुस्थानचा राज्यध्वज भगवाच असला पाहिजे. अर्थात ज्या ध्वजावर भगवा पट्टाही असणार नाही, तो ध्वज आपला आहे असे हिंदू जगत कधीही मान्य करणार नाही. काँग्रेसच्या सध्याच्या ध्वजावर असलेला चरखा काढून टाकून तेथे चक्र किवा प्रगती नि सामर्थ्यदर्शक असे अन्य चिन्ह ठेवावे. सर्व हिंदुसंघटनी नेत्यांनी नि संघटनांनी अशी मागणी करावी."

ह्या तारेच्या प्रती डॉ. आंबेडकर, डॉ. राजेंद्रप्रसाद, सरदार पटेल नि डॉ. खरे यांनाही पाठविण्यात आल्या. हिंदुस्थानचा राज्यध्वज हा भगवाच असावा ही मागणी डॉ. आंबेडकरांनी मांडावी यासाठी मुंबईच्या 'भगवा राष्ट्रध्वज' समितीने १० जुलैला मुंबईच्या विमानतळावर डॉ. आंबेडकरांच्या हाती एक निवेदन नि भगवा ध्वज दिला. घटना समितीत ही सूचना मांडण्याचे डॉ. आंबेडकरांनी मान्य केले. पण तेथे काँग्रेसचे बहुमत असल्याने संपूर्ण भगवा ध्वज जरी मान्य झाला नाही तरी काँग्रेस ध्वजावरील चरखा जाऊन तेथे चक्र असावे ही सावरकरांची दुसरी सूचना मान्य झाली.

ही सूचना मान्य झाल्यावर त्यासबंधी २९ जुलै १९४७ रोजी एका पत्रकाद्वारे सावरकरांनी जे विचार व्यक्त केले ते असेः

"काँग्रेसचे प्रचंड बहुमत असलेल्या घटना समितीने भारतीय संघराज्यांच्या ध्वजावर चरखा न ठेवता माझ्या सूचनेत म्हटल्याप्रमाणे अधिकाधिक लोकांना मान्य होणारे सारनाथ स्तंभावरील चक्र अंकित केले. ही घटना लक्षात घेण्यासारखी आहे. काँग्रेसच्या ध्वजावर अतके दिवस तो चरखा विराजमान रहावा आणि हा चरखायुक्त ध्वज सर्वांनी राष्ट्रध्वज म्हणून मानावा ही त्यांची मागणी त्यांच्या बुद्धिवादाला अपमानास्पदच होती. त्यांची ती अंतस्थ प्रवृत्ती हिंदुसंघटनी नेतृत्वामुळे उफाळून येताच ध्वजावरील चरखा खादी भांडारात पाठविण्यात आला आणि आता तो तेथेच सूत कताई संघाचे बोधचिन्ह म्हणून शोभून दिसेल.

येथे हेही सांगितले पाहिजे की ध्वजावरील चर्चेच्या वेळी ह्या चक्राचा अशोकचक्र म्हणून करण्यात आलेला उल्लेख अैतिहासिक दृष्टीने असा आहे : हे चक्र अशोकाने निर्माण केले नाही आणि सारनाथ ही त्याची राजधानीही नव्हती. आपणाला आत्मसाक्षात्कार होऊन सत्य मार्ग सापडला असा जेव्हा भगवान बुद्धांना भास झाला तेव्हा त्यांनी त्यांच्या पूर्वी सोडून गेलेल्या शिष्यांना परत बोलविले. आपले म्हणणे पुन्हा अैकावे अशी विनंती केली. ह्या निमंत्रणाला मान देऊन थोडे शिष्य तेथे उपस्थित झाले. ह्याच शिष्यांपुढे सारनाथ येथे भगवान बुद्धांनी आपले पहिले प्रवचन केले आणि त्यातच त्यांनी 'धर्मचक्र प्रवर्तन' हे विचार सांगितले. ह्या घटनेचे स्मारक करण्यासाठी काही वर्षांनंतर सम्राट अशोकाने सारनाथ येथेच एक स्तंभ उभारून त्यावर 'धर्मचक्र प्रवर्तक' हे शब्द कोरले. म्हणून हे धर्मचक्र आहे, अशोकचक्र नव्हे.

ह्या धर्मचक्राच्या निवडीमुळे दुसरीही एक मोठी उणीव भासून आली आहे. ती म्हणजे काँग्रेसवाल्यांनी आजवर उच्च राष्ट्रीय भावनेकडे केलेले दुलर्क्ष. ह्या धर्मचक्रामुळे चंद्रगुप्त चाणक्य यांनी केलेला ग्रीकविजेते अलेक्झांडर नि सेल्युकस यांचा पराभव आणि हिंदू सम्राट अशोक याचा हिंदुकुशपर्वत ते दक्षिण समुद्र ह्या युद्धशास्त्रदृष्ट्या महत्त्वाच्या भारताच्या उत्तर दक्षिण सीमापर्यंत पसरलेला सबळ मध्यवर्ती नि एकछत्री सत्तेचा सुवर्णकाळ आपल्या दष्टीपुढे उभा राहतो.

नवीन ध्वजासंबंधीच्या काही आक्षेपांचे निरसन करणारे निःपक्षपाताचे विचार सांगितल्यानंतर पुढे निश्चितपणे सांगितले पाहिजे की, हा ध्वज हिंदुस्थानचा राष्ट्रध्वज होऊ शकत नाही. त्याची कारणे अशीः

(१) भारतीय संघराज्य आणि त्याची तथाकथित घटना समिती ह्या ब्रिटिश अच्छेने निर्माण केलेल्या संस्था आहेत. त्या काही सार्वमताने किंवा येथील जनतेच्या अच्छेने निर्माण केलेल्या नाहीत आणि आजही राष्ट्रमत किंवा राष्ट्रसामर्थ्य हा त्यांचा खरा आधार नसून ब्रिटिश बंदुका हाच त्यांचा प्रमुख आधार आहे. (२) भारतीय संघराज्य ह्या शब्दातच हिंदुस्थानच्या एकात्मतेचा अभाव प्रतीत होत असून त्यामध्ये काँग्रेसने विश्वासघात करून मान्य केलेल्या देशविभाजनी प्रवृत्तीचा प्रभाव स्पष्ट दिसतो. अशा प्रकारे राष्ट्रमत न घेता एका पक्षाने निर्माण केलेल्या ध्वजाला खरा राष्ट्रवादी राष्ट्रध्वज म्हणून कसा सन्मानू शकेल?

आसिंधुसिधू अविभाज्य नि एकसंध पितृभू नि पुण्यभू अशा हिंदुस्थानचा खरा अैतिहासिक राष्ट्रध्वज म्हणजे ह्या हिंदू जातीचे अभ्युदय निश्रेयस हे खरे मंतव्य सांगणारा कुंडलिनी-कृपाणांकित भगवा ध्वज, तो कोणाच्या आदेशाने निर्माण झालेला नसून तो आमच्या राष्ट्रीय विकासातून जन्म पावलेला आहे. ह्या ध्वजात आमच्या विस्तृत राज्याचे, जातीचे, धर्माचे, संस्कृतीचे नि अतिहासाचे मंतव्य स्पष्टपणे उमटलेले असून हिमालयापासून दक्षिण समुद्रापर्यंत अनेक हिंदू मंदिरांवर तो आजही फडकत असून लक्षावधी हिंदू त्याला वंदन करीत आहेत. अन्य पक्ष-ध्वज येथे राहू शकतील, काही ध्वज त्या त्या

प्रमाणात सन्मानिलेही जातील पण अखिल हिंदुराष्ट्रध्वज म्हणून केवळ भगवा ध्वज खरा सन्मान नि निष्ठा प्राप्त करू शकेल !”

## हिंदू सभा मंदिराची मशीद बनवू नका

१५ ऑगस्टला इस्लामी पंथावर आधारित पापस्तान नि बहुसंख्य हिंदू वस्ती असलेला भारत असे हिंदुस्थानचे दोन स्वतंत्र भाग झाल्यावर भारतातील काही डॉ. मुखर्जींसारख्या हिंदू सभावाल्यांनीच प्रचार चालू केला की निधर्मी भारतात हिंदू महासभाही सर्वांना मोकळी करावी. अन्य धर्मीयांनाही तिथे सभासद करून घ्यावे. हा प्रचार चालू झाल्यावर त्याला विरोध करणारे एक पत्रक वीर सावरकरांनी काढले त्याचा आशय असाः

“राजकीय किंवा आर्थिक आधारावर हिंदू महासभेत अहिंदूंना प्रवेश दिला तर त्याचा हिंदू अैक्यावर विपरीत परिणाम होईल. कारण सध्या भारतातील राजकीय समजला जाणारा प्रश्न हा धार्मिक किंवा सांस्कृतिकही आहे. जसा पाकिस्तान हा राजकीय प्रश्न धार्मिक आहे, तशी शुद्धी ही धार्मिक समजली गेली तरी तीही राजकीय आहे. हिंदू महासभा एक हिंदू मंदिर आहे; जेथे केवळ हिंदूंना प्रवेश असून तेथे ते राष्ट्रीय शिवाची पूजा करू शकतात. त्या मंदिराची आपण मशीद बनवू नये. ह्या चुकीमुळे काँग्रेसप्रमाणे हिंदू महासभेचीही घसरगुंडी होईल! निवडणुकीसारख्या प्रश्नासाठी एखाद्या स्वतंत्र आघाडीत हिंदुहिताला कोणताही बाध येणार नाही अशी दक्षता घेऊन हिंदू सभा सहकार्य करू शकेल. परंतु जेथे कोणीही अहिंदू अधिकाराने येऊन हिंदुसंघटनेला आणि हिंदुहिताला बाधा आणू शकणार नाही आणि जेथे केवळ हिंदूंनाच एकत्र येऊन आपल्या हिताच्या योजनेचा आणि संघटनेचा विचार करता येईल अशी एक स्वतंत्र राजकीय हिंदू संस्था असणे आवश्यक आहे. तशी ती न ठेवल्यास उद्या एखादा अहिंदूही हिंदू महासभेचा अध्यक्ष होऊ शकेल. तसेच या देशात जोवर मुसलमान, ख्रिश्चन, पारशी आदींच्या स्वतंत्र संस्था आहेत तोवर हिंदूंसाठीही एक स्वतंत्र संस्था असणे अत्यावश्यक आहे. याच दृष्टीने हिंदू महासभा स्थापन करण्यात आली आणि हिंदुसंघटन आणि हिंदुशक्ती यांचे केंद्र बनली. असे हे संस्मरणीय कार्य काही तत्कालिक अधिकारपदांच्या लालसेने आपण नष्ट करू नये. हिंदू महासभा हीच राष्ट्रीय लोकसभा करण्याची महत्त्वाकांक्षा आपण पुढील पिढीवर सोपवू या!

## सशस्त्र क्रांतीनेच स्वातंत्र्य मिळाले!

कलकत्ता येथील जतीन मुखोपाध्याय स्मारक - समितीला ९ सप्टेंबर १९४७ रोजी पाठविलेल्या पत्रात वीर सावरकरांनी लिहिलेः

“१९१५ साली बालासोर येथे ब्रिटिश सैन्याशी सशस्त्र लढाई करणाऱ्या सेनानी जतीन मुखोपाध्याय आणि त्यांच्या सैनिकांचे स्मरण करणाऱ्या आपल्या समितीच्या कार्यक्रमांत मी अंतःकरणपूर्वक सहभागी होत आहे. मीही त्यांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन करतो, म्हणजे ते अभिवादन त्यांच्याप्रमाणेच अंग्रजांशी लढताना वीरगती प्राप्त झालेल्या सर्व क्रांतिकारकांना पोचेल ! अतुल धैर्याने सतत चालविलेल्या सशस्त्र लढ्यामुळेच हा देश स्वतंत्र झाला. तरीही आपली लढाई पूर्ण झाली असे न

समजता आपणाला अजून पुढची अर्धी लढाई लढायची आहे; जिंकायची आहे लक्षात ठेवून आपण आपले शस्त्र खाली ठेवू नये. तर उलट हा उरलेला लढा पुढे चालविण्याची शक्ती आणि स्फूर्ती मिळावी यासाठी आपल्या शूर सैनिकांचे आणि हुतात्म्यांचे स्मरण सतत करीत राहिले पाहिजे.

या लढ्यात अन्य मार्गाने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना योग्य तो मान देण्यास सशस्त्र क्रांतिकारक सदा सज्ज आहेत. पण हा देश केवळ अहिसा, असहकार, तुरुंगभरती, आत्मक्लेश या नवीनतम मार्गानेच रक्त ाचा एकही थेंब न सांडता स्वतंत्र झाला अशी बडबड करणारे जे नीच वृत्तीचे लोक आहेत त्यांचा हा दावा कसा खोटा आहे तेही एक कर्तव्य म्हणूनच सांगितले गेले पाहिजे. या त्यांच्या ढोंगी निवेदनातील प्रत्येक शब्द जाणूनबुजून वापरलेला खोटा शब्द आहे. या त्यांच्या खोट्या बडबडीचा प्रतिवाद न केला तर देशात हीच आत्मघातक प्रवृत्ती वाढेल.

हा प्रतिवाद परिणामकारक पद्धतीने करण्यासाठी साधारणतः १९०१ ते १९४७ या काळात आपण सशस्त्र क्रांतिकारक आंदोलनात प्रत्यक्ष भाग घेतलेल्या आणि आज जिवंत असलेल्या क्रांतिकारकांनी या आंदोलनाचा संपूर्ण अतिहास लिहिला पाहिजे. आपली समिती हे काम हाती घेईल तर ती शूरवीर जतीनला खरी श्रद्धांजली होईल. ते त्याचे योग्य स्मारक होईल."

## सरकारच दुर्बल ठरल्यावर लोकांनी काय करावे ?

मुसलमानी दंगे बंद व्हावेत म्हणून काँग्रेसने फाळणी स्वीकारली! पण फाळणीने मुस्लिम दंगे थांबणार नाहीत, उलट पाकिस्तानच्या सैनिकी पाठिंब्यावर ते अधिक वाढतील अशी जाणीव वीर सावरकरांनी १९४२ सालीच आपल्या कानपूर भाषणात दिली होती. त्याप्रमाणेच घडले! मुसलमान दंगे करू लागले आणि निधर्मी भारत सरकार त्यांना आवर घालू शकले नाही! अशा परिस्थितीत सावरकरांनी २५ सप्टेंबर १९४७ रोजी काढलेल्या अैतिहासिक निवेदनांतील महत्त्वाचा भाग असाः

"सध्या काँग्रेसचे नेते नि मंत्री एक सुरात करीत असलेला तर्कवाद आणि उपदेश यांचा हिंदुहितार्थ तत्काळ प्रतिवाद केला पाहिजे. पंडित नेहरू सध्या जनतेला उपदेश करीत आहेत की, आक्रमकांचा प्रतिकार करणे नि त्यांना शिक्षा करणे हा केवळ सरकारचा अधिकार असल्याने जनतेने म्हणजेच हिंदूंनी स्वतः होऊन हे अधिकार आपल्या हाती घेणे न्याय्य ठरणार नाही! हा उपदेश करताना नेहरूंनी भंगड गांधी तत्त्वज्ञानाचा आधार न घेता ही गोष्ट व्यवहार्य नाही असे म्हटले आहे एवढे तरी त्यांतल्या त्यांत ठीक आहे; पण हा व्यावहारिक उपदेश करताना नेहरूंनी परिस्थितीची दुसरी बाजू मुळीच

लक्षांत घेतली नाही, ती बाजू अशीः ज्यावेळी सरकार अत्याचारी लोकांना शिक्षा देण्यास असमर्थ असेल एवढेच नव्हे तर जनतेचे अशा आक्रमकांपासून संरक्षणही करीत नसेल तेव्हा त्या जनतेने काय करावे? ज्यावेळी कोणाही व्यक्तीचे संरक्षण करण्यास आरक्षक उपस्थित नसेल, असमर्थ असेल किंवा सिद्ध नसेल, त्यावेळी त्या आक्रमणाचा स्वसंरक्षणार्थ प्रतिकार करण्याचा प्रत्येक व्यक्तीला वैध अधिकार आहे. जो अधिकार एका व्यक्तीला आहे, तो अधिकार समाजाला आहेच आहे.

प्राणघातक शस्त्रांनंी सज्ज अशा क्रूर, धर्मवेड्या संघटित वैऱ्यांनी आरंभिलेल्या भयंकर रक्त पात, लूटमार, बळाने बाटविणे, जिवंत जाळणे, सामूहिक हत्या यामुळे जातच्या जात नष्ट होण्याचे महाभयानक संकट ज्या हजारो हिंदूंवर आले असता त्या भयानक आक्रमणाचा प्रतिकार करण्यास आरक्षक किवा सैनिकही दिसत नाहीत अशा परिस्थितीत त्या हिंदूंनी करावे तरी काय? तेथील पाकिस्तानी राज्य पश्चिम पंजाबमधील मुसलमानांना उघडपणे शस्त्रे देत आहे आणि मुस्लिम लीगचे नेते त्या मुसलमानी जनतेला चिथावीत आहेत की हिंदुस्थानवर आक्रमण करण्यासाठी पाकिस्तानचा चढाईचे क्षेत्र म्हणून उपयोग करावयाचा आहे. त्याप्रमाणे तेथील सहस्रावधी मुसलमान हाती भयानक शस्त्रे पाजळीत आणि तोंडाने, ‘हस के लिया पाकिस्तान, लढ के लेंगे हिंदुस्थान’ अशा घोषणा देत मिरवणुका काढीत आहेत. अशा प्रकारे पूर्व पंजाबवर आक्रमण करण्याची आणि थेट दिल्लीपर्यंत पोचून तेथेच पाकिस्तान राज्याचे उद्घाटन करण्याची भयानक योजना ते पाकिस्तानी राज्य आखीत असताना त्याच्या प्रतिकारासाठी दिल्लीचे राज्यकर्ते काय करीत आहेत? दिल्लीच्या ह्या काँग्रेसी राज्यकर्त्यांनी प्रथम सांगितले की आम्ही रक्त ाचा एकही थेंब न सांडता भारतमातेची फाळणी करून स्वातंत्र्य मिळविले आहे. त्यामुळे आता आमच्यात वैरभाव उरलेलाच नाही! त्यामुळे आपण हा दिवस आनंदोत्सव म्हणून साजरा करू! याच विचाराने नेहरूंनी प्रत्यक्ष दिल्लीत गुप्तपणे बंदुका नि स्फोटक द्रव्ये जमविणाऱ्या ५० हजार मेवो नि खाकसारांना दिल्लीत संघटित मोर्चा काढण्याची अनुज्ञा दिली. त्यावेळी दिल्लीच्या आरक्षकांत ५० टक्के मुसलमान होते आणि त्यांचा प्रमुख आयुक्त ही मुसलमानच होता. आम्ही हिंदुसंघटनी देशभर घराघरांवर उभे राहून ओरडून सूचना देत होतो की, पहा पुढे भयंकर धोका आहे. तुम्ही भयंकर ज्वालामुखीवर बसले असल्याने आनंदोत्सवात मग्न होऊ नका. पण आम्हाला देशद्रोही नि जातीय म्हणून धिक्कारून ठिकठिकाणी बंदिगृहात डांबले. पूर्व पंजाबची सीमा पूर्णपणे असंरक्षित ठेवली गेली. त्यामुळे १३ ऑगस्टपासूनच दिवसाढवळया हिंदू शिखांवर भयानक अत्याचार करून त्यांना ठार मारले जाऊ लागले. तिकडे मुस्लिम प्रदेशांत भयंकर अत्याचार, बलात्कार नि हत्या यांच्या संकटात सापडलेले हिंदू शीख स्त्री-पुरुष-मुले दुःखाने आक्रोश करीत असता अकडे दिल्लीतील भारतीय मंत्री आपल्या रक्त हीन क्रांतीच्या आनंदांत, वाद्यांच्या निनादांत भोजनात मग्न होते.

अशा परिस्थितीत पूर्व पंजाब, भरतपूर, अलवर आणि प्रत्यक्ष दिल्लीमधील लक्षावधी हिंदू शीखांच्या स्वसंरक्षणाच्या आंतरिक भावना उफाळल्या आणि त्यांनी हातात मिळेल ते साधन घेऊन त्या आक्रमक मुसलमानांचा प्रतिकार केला तर त्यांत अनैसर्गिक असे काय झाले? त्यांच्या ह्या प्रत्याक्रमणामुळेच दिल्ली वाचली. अशा भयानक संकटाचा हिंदुसंघटनींनी वेळीच प्रतिकार केला म्हणूनच आज

दिल्लीमध्ये पंडित नेहरू आणि त्यांचे सहकारी सुरक्षित राहिले आहेत. आणि तेच नेहरू त्या प्रतिकारकांना निलर्ज्जपणे उपदेश देत आहेत की आक्रमणाचा प्रतिकार करणे हे राज्याचे काम असते. !

शिवाजी अथवा रणजितसिंग हे जर राज्यप्रमुख असते तर त्यांच्या तोंडी प्रतिकार करणे हे राज्याचे काम असते हा उपदेश शोभून दिसला असता. ही शिवाजीची भाषा जेव्हा एखादा पोकळ पंडित बोलतो तेव्हा त्याचे हसू येते. अुंच माणसाची बरोबरी करण्यासाठी टाचा अुंच करून उभे राहण्यासाठी धडपडणाऱ्या ठेंगू माणसासारखी त्याची स्थिती होते!

असे असले तरीही मी पुन्हा एकदा अत्यंत प्रामाणिकपणे काँग्रेस नि मंत्रिमंडळातील माझ्या हिंदूबंधूंना आवाहन करतो की, त्यांनी झाल्या गोष्टींपासून धडा घेऊन खोटा आदर्शवाद सोडावा आणि हिंदुसंघटनी संस्थांच्या हातात हात घालून आलेल्या खऱ्या परिस्थितीला तोंड देण्यास सिद्ध व्हावे. आजची उघड दिसणारी वस्तुस्थिती अशीः (१) राजकीय, सांस्कृतिक आणि धार्मिक क्षेत्रांत संपूर्ण भारताचे इस्लामीस्थान करण्यासाठी पाकिस्तानने भारताविरुद्ध युद्ध आरंभिले आहे. (२) पठाण, बलुची यांच्या साहाय्याने अफगाण अमीराच्या नेतृत्वाखाली शस्त्रसज्ज सैनिक आणि वायुदलाच्या बळावर काश्मीर ते जुनागड ह्या सीमेवर आक्रमण करायची एक योजना आखली गेली आहे. दुसऱ्या योजनेप्रमाणे दक्षिणेत निजामाच्या नेतृत्वाखाली गोवा ते मच्छलीपट्टम आणि वऱ्हाड नि मध्यप्रदेशावर ते आक्रमण करतील. (३) ह्या बाह्य आक्रमणाला साहाय्य करण्यासाठी स्थानिक मुसलमान ठिकठिकाणी उठाव करतील. (४) ह्या इस्लामी संकटाच्या प्रतिकारासाठी आपल्या राज्याने केवळ बलवान हिंदुशक्ती संघटित करावी आणि युद्धस्तरावर ठिकठिकाणी दारुगोळा नि शस्त्रास्त्रांचे कारखाने उघडून तेथे केवळ हिंदूंना प्रवेश असावा. (५) आपण उघडपणे सांगावे की पाकिस्तान तेथील हिंदू शीखांना प्रतिनिधित्व, चाकऱ्या आणि नागरिकत्व या क्षेत्रांत जितके अधिकार देईल, तेथे हिंदू शीखांना जशी वागणूक मिळेल अगदी तसेच अधिकार आणि तशीच चांगली वा वाईट वागणूक येथील अल्पसंख्य मुसलमानांना दिली जाईल. (६) काँग्रेसवाल्यांनीच आता मान्य केले आहे की अशा प्रत्येक क्षेत्रात त्यांचा गांधीवाद अथवा फसवा राष्ट्रवाद परिणामकारक ठरणे शक्य नसल्यामुळे आणि केवळ हिंदु-संघटनवादच इस्लामी आक्रमणाचा प्रतिकार करण्यास समर्थ असल्यामुळे येथील मंत्रिमंडळांत केवळ हिंदुसंघटनी मंत्र्यांनाच स्थान असावे. हा अपरिहार्य उपाय योजण्यास जर काँग्रेसी मंत्री सिद्ध नसतील तर त्यांनी देशभक्तीच्या भावनेला स्मरून मंत्रिपद सोडावे आणि हिंदुसंघटनी नि शिखांचे हाती राज्य द्यावे. ही योजना त्यांनी स्वतः होऊन मान्य केली तर एका आठवड्याच्या आत येथे हिंदुसंघटनी आणि शीखांचे मंत्रीमंडळ बनविता येईल आणि ते मंत्रिमंडळ वर सांगितलेला अपरिहार्य कार्यक्रम अत्यंत यशस्वीपणे आणि समर्थपणे कृतीत उतरवील."

### खरा प्रश्न अखंड हिंदुस्थान की अखंड पाकिस्तान ?

वरील पत्रकात दिलेल्या सूचनेचा नेहरू शासनाने काहीच धडा घेतला नाही उलट ते हिंदुसंघटनवादी नेत्यानांच धमक्या देऊ लागले! तेव्हा २२ ऑक्टोबर १९४७ ला नेहरूंच्या ह्या धमक्यांना वीर सावरकरांनी दिलेले प्रत्युत्तर असेः

"गांधाळ मंत्री, पुढारी आणि वृत्तपत्रे यांनी सध्या आपल्या देशबांधवांचे जीवित, मत्ता आणि सन्मान राखण्यात त्यांना आलेले अपयश झाकण्यासाठी आणि मुसलमानांची मते मिळविण्यासाठी एक नवीन नाटक चालू केले आहे. सबंध हिंदुस्थान इस्लाममय करण्याच्या पाकिस्तानी संकटापासून आपल्या देशाचे संरक्षण कसे करावे यासंबंधी एक अवाक्षरही न बोलता प्रत्येक सभेतून गांधाळ गटाचे मुखंड नेहरू केवळ हिंदू राज्याच्या मागणीवर टीकेचा भडीमार करीत आहेत. पाकिस्तानात प्रतिदिन चाललेली हिंदूंची लूटमार, जाळपोळ, हत्या आणि तेथे 'हंस के लिया पाकिस्तान, मार के लेंगे हिंदुस्थान' या घोषणा करीत निघणाऱ्या सशस्त्र नि संघटित मिरवणुका या भयानक धोक्यांपेक्षाही नेहरूंना आज हिंदू राज्याची केवळ घोषणा हाच आपला मुख्य शत्रू वाटत आहे! भारतीय संघराज्याविरुद्ध मुसलमानांनी चालविलेल्या आक्रमणाकडे भेकडपणे दुलर्क्ष करणारे नेहरू आणि त्यांचे खोटे राष्ट्रवादी कॉंग्रेसी सहकारी हिंदू राज्याविरुद्ध अटीतटीने लढण्याच्या नाटकी गर्जना करीत आहेत.

पंडित नेहरू मोठ्या ऐटीने सतत सांगत आहेत की हिंदु राज्याची घोषणा करणाऱ्यांना शेवटी हिटलर मुसलोनीप्रमाणे दुर्दैवी मरण येईल. हे वाक्य सांगताना नेहरू विसरतात की हिंदुसंघटनी पक्षातील शेकडो नेते भारतीय स्वातंत्र्ययुद्धात अंग्रजांविरुद्ध जेव्हा प्राणांची क्षीती न बाळगता हाती शस्त्र घेऊन लढत होते, तेव्हा राजकारणाच्या दृष्टीने पहायचे तर गांधीजी पाळण्यात खेळत होते आणि नेहरूंचा तर राजकीय जन्मही झालेला नव्हता. काही हिंदुसंघटनी नेते शस्त्रे नि वधस्तंभ तोडून आले असून भारतीय स्वातंत्र्यासाठी त्यापैकी एकेकाने भोगलेले कष्ट नि केलेला त्याग हा सर्व गांधीवादी नेत्यांच्या कष्ट नि त्यागाच्या बेरजेहूनही अधिक भरेल. पंडित नेहरू आणि त्यांच्या जातीच्या कागदी राज्यांच्या धमक्यांनी हे हिंदुसंघटनी नेते कधीच भिणार नाहीत, हिंदुराज्यांच्या उदात्त ध्येयासाठी लढता लढता जर त्यांना अपयश आले तर त्याचे होणारे परिणाम भोगण्यास ते सज्ज आहेत. पण जर हिंदू राज्य स्थापनेत ते यशस्वी झाले तर हिंदू राज्याशी द्रोह करणारे पंडित आणि त्यांचे मित्र यांच्या दैवात काय लिहिलेले असेल याचाही त्यांनी विचार करावा.

हे खोटे राष्ट्रवादी सांगतात की हिंदू राज्याची मागणी ही जातीय, मूर्खपणाची, मध्ययुगीन धार्मिक कल्पना असून ती मानवजातीच्या प्रगतीला मारक आहे. हिंदू राज्याची अशा प्रकारे निंदा करणारे हे पंडित हिंदू राज्य म्हणजे काय ते मात्र कधीच समजून घेत नाहीत किवा सांगतही नाहीत. असे असले तरीही वादाकरिता आपण धरून चालू की हिंदू राज्य ही मागणी वाईट आहे मग हाच निकष लावला तर मुस्लिम राज्याची मागणीही तितकीच निंदास्पद नाही का? मुसलमानांनी पाकिस्तान मागताना जेथे मुसलमान बहुसंख्य आहेत ते प्रांतच मागितले ना? मूलभूत तत्त्वांच्या गप्पा मारणाऱ्या हे पंडिता, इस्लामी राज्याची ती जातीय मागणी मातृभूमीचे तुकडे करूनही तुम्ही कशी स्वीकारलीत? ती जातीय मागणी मूर्खपणाची आहे असे म्हणून तुम्ही तिला नकार का दिला नाही? मुस्लिम राज्याची ती मागणी मानवजातीच्या प्रगतीला केवळ मध्ययुगातच नव्हे तर अंधारयुगात नेऊन टाकणारी आहे हे त्यांनी त्यांच्या प्रत्यक्ष कृतीने सिद्ध केले आहे ना? या मुस्लिम राज्याच्या मागणीविरुद्ध तुम्ही कोणतीही लढाई केली नाही. एवढेच नव्हे तर अखंड भारताचे दोन तुकडे करण्याच्या आंग्लो मुस्लिम कटाला तुम्ही हातभार लावला आणि एखाद्या अतिथीचे चहाचा कप देऊन जसे आनंदाने स्वागत करावे त्याप्रमाणे तुम्ही मोठ्या समारंभाने मुसलमानांना पाकिस्तान दिलेत. जसे तुम्ही आता म्हणता तसे दोष हिंदू राज्यात आहेत असे गृहीत धरूनही तुम्ही त्या हिंदू राज्याला कोणत्या तोंडाने विरोध करता?

अलीबंधूंच्या साहाय्याने अफगाणिस्तानच्या अमीराला भारताचे शहेनशहा बनविण्याचा कट गांधींनी केला नव्हता काय? हिंदू संस्थानिकांचा पराभव करून सीमेवरील टोळयांच्या साहाय्याने हैद्राबादचा निजाम दिल्ली जिंकून भारताचा शहेनशहा झाला तर त्याचे ते राज्य मी स्वराज्यच समजेन असे १९४० साली गांधींनी पुनःपुन्हा लिहिले नि सांगितले नाही काय? म्हणजे गांधींना पठाणी राज्य अथवा निजामी राज्य हे स्वराज्य वाटते. पण हिंदू राज्य हे मात्र तुम्हाला जातीय, एेकतंत्री, अराष्ट्रीय असा शाप वाटतो!

तुम्ही पुढे सांगता की अनेक अहिंदू अल्पसंख्य येथील नागरिक असल्याने या देशाला हिंदुस्थान आणि हिंदू राज्य म्हणता येणार नाही. मग आता सांगा की ज्या राज्यांत हिंदू, ख्रिश्चन, पारशी आदी लोक राहत आहेत त्या नव्या मुस्लिम राज्याला तुम्ही सर्वजण आणि विशेषतः गांधीजी सतत सलाम करून त्याचा पाकिस्तान म्हणजे पवित्र इस्लामी राज्य म्हणून कां गौरव करीत आहात? ज्या देशात ज्या लोकांची बहुसंख्य वस्ती असेल त्यांच्या नावाने तो देश ओळखावा, हे तत्त्व राष्ट्रसंघाने मान्य केले आहे ना? तसेच तुर्कस्तान, बलुचिस्थान, अफगाणिस्थान ही नावे उच्चारताना त्या देशांतही काही अन्य धर्मीय अल्पसंख्य आहेत याची जाणीव तुम्हाला नव्हती काय? मग हिंदुस्थान आणि हिंदू राज्य हे शब्द अैकताना वा उच्चारताना विंचू चावल्यासारखे तुम्ही का ओरडता?

असे अनेक आक्षेप असतानाही तुम्ही पाकिस्तान मान्य केले आणि त्याचे समर्थनही चालविले आहे याचे कारण रक्त पात की पाकिस्तान हा पेच जेव्हा तुमच्यापुढे पडला तेव्हा रक्त पात टाळण्यासाठी तुम्ही पाकिस्तानला मान्यता दिली. ही खरी कारणमीमांसा तुमच्या कृत्याचे समर्थन न करता उलट तुमचा निदास्पद भित्रेपणाच स्पष्ट करणारी आहे. ही सत्य स्थिती थोडी बाजूला ठेवून आम्ही तुम्हाला

विचारतो की उद्या तुमच्यापुढे रक्त पात की हिंदू राज्य असा पेचप्रसंग आला तर तुम्ही याच न्यायाने रक्त पात टाळण्यासाठी हिंदू राज्य मान्य करण्यास संमती द्याल ना?

हिंदु मतदारांना मी पुन्हा एकदा सहस्रवेळा स्पष्टपणे सूचना देतो की या खोट्या राष्ट्रवाद्यांना जर तुम्ही सत्ताभ्रष्ट केले नाही तर हा गांधाळ हिंदीवाद भारतातील मुसलमानांना सैन्य, आरक्षक आणि राज्यकारभारातील महत्त्वाच्या जागा देईल आणि ज्यावेळी चारी दिशांनी बाहेरचे मुसलमान भारतावर आक्रमण करतील तेव्हा हे मोक्याच्या स्थानी नेमलेले मुसलमान आतून अचानक उठाव करून या असावध गांधीवादी सरकारला पदच्युत करून ह्या भारताचे अखंड पाकिस्तान करतील!

हा धोका लक्षात घेऊन आता तुम्हाला दोन पक्षांतील नव्हे तर दोन विचारसरणीतील एक पसंत करायची आहे. भारतीय राज्य की हिंदू राज्य हा खरा प्रश्नच नसून मुख्य प्रश्न आहे इस्लामी राज्य की हिंदू राज्य, अखंड हिंदुस्थान की अखंड पाकिस्तान?

अशा परिस्थितीत केवळ हिंदुसंघटनी विचारधाराच या देशाचे रक्षण करून येथे सिंधुपासून सेतूबंधापर्यंत पुन्हा अखंड हिंदुस्थान निर्माण करू शकेल.”

## हिंदू सभेला मत देणे तुमच्याच लाभाचे आहे!

बीरभूममध्ये होणाऱ्या पोटनिवडणुकीच्या प्रचारार्थ वीर सावरकरांनी तिकडे यावे असे आग्रहाचे निमंत्रण बंगाल हिंदू सभेने पाठविले होते. त्या निमंत्रणाला वीर सावरकरांनी १४ नोव्हेंबर १९४७ रोजी विद्युत्संदेश पाठवून दिलेले उत्तर असेः

“माझी प्रकृत्ती ठीक नसल्याने मी तिकडे येऊ शकत नाही याचे दुःख होते. हिंदू मतदारांनी हिंदू महासभेला मत दिले तर ते त्यांनाच लाभदायक आहे. हा वाद दोन व्यक्तींमधला नाही. दोन

विचारसरणीतील आहे. काँग्रेस हिंदूंची बाजू कधीच मांडू शकत नाही; कारण ती स्वतःला हिंदूंचे प्रतिनिधी म्हणवीत नाही. ते काम करण्यास हिंदू सभा सिद्ध आहे. हिंदू सभेला मत देणे म्हणजे हिंदूविरोधी शक्तीचा प्रतिकार करण्यासाठी सत्ता हाती घेणे. अनेक नौखाली नि पाकिस्ताने यांच्या आपत्तीत हिंदू सापडले कारण त्यांनी आजवर काँग्रेसला मते दिली. तशीच मते ते पुढेही देतील तर त्यांना अखंड पाकिस्तानात रहावे लागेल. सुऱ्हावर्दी, आझाद आदी मुसलमानांना सत्ताधीश केलेच पाहिजे अशी अट काँग्रेसच्या ध्येयधोरणांतच असल्याने काँग्रेसला दिलेले मत म्हणजे अखंड पाकिस्तानला दिलेले मत समजावे! यातून काय ते हिंदूंना निवडू द्या!"

याच दिवशी पाठविलेल्या दुसऱ्या विद्युत् संदेशात वीर सावरकर लिहितातः

"माझा दुसरा संदेश असा की पूर्व बंगाली मुसलमान, पश्चिम बंगालवर चढाई करण्याच्या उद्देशाने तिकडे सामर्थ्यवान होत आहेत. त्यांच्यावर मात करायची तर पश्चिम बंगालमध्ये एक अधिक सामर्थ्यशाली हिंदू राज्य निर्माण केले पाहिजे. फसव्या राष्ट्रवादावर आधारलेली काँग्रेसी विचारसरणी सत्तेतील महत्त्वाच्या स्थानी मुसलमानांना नियुक्त करण्यास बांधलेली असल्याने ती असे हिंदू राज्य निर्माण करू अच्छित नाही आणि शकणारही नाही. हे कार्य केवळ हिंदुसंघटनी विचारसरणी करू शकेल आणि तीच पूर्व बंगालमधील हिंदूंना जशी वागणूक मिळेल तशीच वागणूक पश्चिम बंगालमधील मुसलमानांना देऊन ती केवळ पश्चिम बंगालमधीलच नव्हे तर पूर्व बंगालमधील हिंदूंचेही संरक्षण करू शकेल. तेव्हा पुन्हा दोन्ही बंगालमध्ये हिंदूंचे नौखालीसारखे भयानक हत्याकांड होऊ नये यासाठी बीरभूम आणि अन्य निवडणुकींतही हिंदूंनी हिंदू महासभेलाच मते द्यावीत."

## स्वतंत्र ज्यू राज्याला पाठिंबा

पॅलेस्टाअनमध्ये स्वतंत्र ज्यू राज्याची स्थापना झाली त्याला नेहरू शासनाने आपल्या इस्लामधार्जिण्या धोरणाला अनुसरून विरोध केला होता पण हिंदुसंघटक सावरकरांना या घटनेने खूप आनंद झाला. १९२१ साली लिहिलेल्या 'हिंदुत्व' या पुस्तकात वीर सावरकरांनी लिहिले आहे की एक दिवस ज्यू आपले राज्य त्यांच्या पुण्यभूमीत स्थापन करतील! हे राज्य प्रत्यक्ष स्थापन झाल्याचा आनंद १९ डिसेंबर १९४७ रोजी वीर सावरकरांनी खालील ऐतिहासिक निवेदनात व्यक्त केला आहे.

"जगातील बहुसंख्य प्रमुख देशांनी पॅलेस्टाअनमध्ये स्वतंत्र ज्यू राज्य स्थापण्याचा ज्यू लोकांचा अधिकार मान्य केला आणि त्यासाठी शस्त्रास्त्र साहाय्यही देण्याचे वचन दिले ही वार्ता वाचून मला आनंद झाला. शेकडो वर्षे अनेक कष्ट सोसून, त्याग करून लढे देत आलेली ज्यू जनता निःसंशय त्यांची पितृभू आणि पुण्यभू असलेल्या पॅलेस्टाअनमध्ये पुन्हा आपले राज्य स्थापन करील आणि त्यावेळी तिला पूर्वी मोझेसने त्या मरुभूमीत विजय प्रवेश केला त्या ऐतिहासिक काळाचे स्मरण होईल!

ह्या प्रश्नी आपली भारतीय वृत्तपत्रे त्यांच्या मुस्लिमधार्जिण्या धोरणाला धरून चुकीची माहिती देत आहेत. वस्तुस्थिती अशी आहे की मुसलमानी धर्माच्या स्थापनेपूर्वी निदान २००० वर्षे तरी संपूर्ण पॅलेस्टाअन ही ज्यूंची राष्ट्रीय भूमी होती. या काळात अब्राहम, मोझेस, डेव्हीड, सालोमन यांच्यासारखे अनेक राजे नि ऋषी यांनी त्या देशाला पितृभू नि पुण्यभू मानले. अरबी मुसलमानांनी सिंधवर आक्रमण करण्यापूर्वी प्राचीन अजीप्त आणि परशियावर स्वारी करून तेथील संस्कृती रानटी प्रवृत्तीने नष्ट केली त्याचप्रमाणे त्यांनी ज्यूंनाही मुळासकट नष्ट करण्याचा प्रयत्न केला. पण ही त्यांची राक्षसी महत्त्वाकांक्षा पूर्ण झाली नाही. अरबी मुसलमानांची पितृभूमी नि पुण्यभूमी आहे अरबस्थान पॅलेस्टाअन नव्हे!! हा अतिहास आमच्या वृत्तपत्रांनी नि नेत्यांनी समजून घ्यावा.

या अतिहासानुसार खरा न्याय करायचा तर संपूर्ण पॅलेस्टाअन ज्यूंचा हाती देणेच योग्य होते. परंतु संयुक्त राष्ट्रसंघातील शक्ति शाली राष्ट्रांमधील स्वार्थप्रेरित वाद लक्षांत घेता आजही ज्या प्रदेशांत ज्यू बहुसंख्य आहेत आणि जेथे त्यांची प्रमुख पवित्र क्षेत्रे आहेत त्या पॅलेस्टाअनच्या भूभागांत तरी आज ज्यू राष्ट्राला मान्यता मिळत आहे हा एक अैतिहासिक महत्त्वाचा न्याय आहे!

अशा ह्या प्रश्नी संयुक्त राष्ट्रसंघांतील भारतीय राज्यप्रतिनिधींनी ज्यू राज्य निर्मितीला केलेला विरोध दुःखदायक आहे. या संबंधीच्या भाषणात श्रीमती विजयालक्ष्मी म्हणाल्या की स्वतंत्र ज्यू राज्य निर्माण करण्यास पाठिबा देऊन आम्ही पॅलेस्टाअनच्या पाठीत सुरा खुपसण्याचे पापकरणार नाही! हे त्यांचे वाक्य अनेक राष्ट्रांच्या प्रतिनिधींना नाटकी वाटून त्यांनी त्यांची टर उडविली. कारण त्यांच्या तत्काल लक्षात आले की ह्याच भारताने स्वतःच्या अनेक वर्षे एक असलेल्या देशाच्या विभाजनाला थोड्याच दिवसांपूर्वी मान्यता देऊन तो फाळणीचा दिवस आनंदोत्सव म्हणून साजरा केला होता! आशियांतील छोट्या इस्लामी देशांची सहानुभूती मिळविण्यासाठी आपण ज्यू राज्याला विरोध करीत आहो असे यासंबंधी बोलताना पं. नेहरूंनी सांगितले तेव्हा तर त्यांची बाजू अधिकच असमर्थनीय ठरली! कारण यावेळी त्यांनी भारतातील आणि जगांतील ज्यूंना आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्या बलवान देशांना काय वाटेल याचा विचारच केला नाही! छोट्या दुर्बल देशांची सहानुभूती मिळविण्यासाठी मोठ्या सबल देशांची सहानुभूती गमावण्याचे हे त्यांचे धोरण अयोग्य आहे, हास्यास्पद आहे. याचवेळी त्यांनी हेही लक्षात ठेवायला हवे की ही छोटी इस्लामी राज्ये आणि चीनमध्येही इस्लामी राज्य निर्माण करण्याची मागणी करणारे मुसलमान हे सर्व इस्लामी गट भारतात इस्लामी राज्य स्थापन करणाऱ्या पाकिस्तानी गटालाच पाठिंबा देत आहेत!

अशा परिस्थितीत भारताने आफ्रिकेपासून मलेशियापर्यंत एक मुस्लिम आघाडी निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या या इस्लामी गटाची शक्ती खच्ची करण्याचेच आंतरराष्ट्रीय धोरण अवलंबिले पाहिजे. ह्या आक्रमक इस्लामी शक्तीचा प्रतिकार करण्याचे कार्य समर्थ नि स्वतंत्र ज्यू राज्य करू शकेल. ज्यू लोकांच्या मनात हिंदुजगतासंबंधी द्वेष नाही. भारतातील अल्पसंख्य मुसलमानांसंबंधी अविश्वास बाळगणे आपणाला भाग पडले पण भारतातील अल्पसंख्य ज्यूंविषयी तसा संशय बाळगण्याचे कोणतेही कारण दिसत नाही! आजच्या काँग्रेसी राज्यकर्त्यांचे धोरण कसेही असले तरी भारतातील

हिंदुसंघटनवादी पक्षाने नैतिक आणि राजकीय धोरण म्हणूनही स्वतंत्र ज्यू राज्याला आपला संपूर्ण पाठिंबा देऊन त्याविषयी सदिच्छा व्यक्त केली पाहिजे."

गांधीवध अभियोगातून वीर सावरकर १० फेब्रुवारी १९४९ रोजी निष्कलंक मुक्त झाले. तेव्हा त्यांचे अधिवक्ते आणि अ. भा. हिंदू सभेचे अध्यक्ष धर्मवीर भोपटकर यांनी एक पत्रक काढून वीर सावरकरांना या अभियोगात गुंतविण्याचे दायित्व कोणावर आहे याची चौकशी करावी अशी मागणी करणारे एक पत्रक काढले. त्यासंबंधी १४ फेब्रुवारी १९४९ रोजी धर्मवीर भोपटकर यांना पाठविलेल्या पत्रांत सावरकरांनी लिहिलेः

"मी मुंबईला पोचलो असून माझ्या सदनात राहत आहे. शारीरिक आणि मानसिक प्रकृतीही ठीक नसल्याने मी सार्वजनिक जीवनातून निवृत्त होण्याचे ठरविले आहे. अशा परिस्थितीत यु. प्रे. ने हिंदू महासभा अध्यक्षांच्या नावे प्रसिद्ध केलेल्या गांधीवध अभियोगात मला कोणी गुंतविले त्याची शासनाने चौकशी करावी अशी मागणी हिंदू सभांनी करावी अशा आशयाचे पत्रक वाचून तर मला आश्चर्यच वाटले!

हे वृत्त खरे असेल तर मला न कळविता किवा न विचारता असे पत्रक इतक्या घाईने काढण्यात आले याचे मला दुःख होते!

मला वाटते की कोणाच्या वैयत्ति क सुडाच्या भावनेने हा निर्णय घेण्यास शासनाला प्रवृत्त केले गेले नसावे. शासनाला दिला गेलेला समादेश, त्या भयावह परिस्थितीत, घाईचा नि चुकीचा असण्याचा संभव आहे. पण त्यामागे हेतूपूर्वक द्वेष नसावा असे मला वाटते. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने हा वाद येथेच थांबवावा. विशेषतः आपल्या प्रयत्नाने मी त्या अभियोगातून सन्माननीय सुटका मिळविली आहे. तेव्हा अशा परिस्थितीत चौकशीची मागणी करणारे ते पत्रक आपल्या हिंदू सभा सदस्यांना वैयत्ति क पत्र पाठवून ते मागे घेऊन, त्या संबंधीच्या सार्वजनिक वादाचा मी केंद्रबिंदू होऊ नये अशी दक्षता घ्याल का? ह्या विनंतीसाठी आपण मला क्षमा कराल अशी आशा आहे. प्रत्यक्ष भेटीत अधिक चर्चा करू. मुंबईच्या गृहमंत्र्यांनाही मी एक पत्र पाठवीत आहे.

## बॅ. दास यांचे आभार !

यानंतर ७ मार्च १९४९ रोजी वीर सावरकरांनी गांधीवधाच्या कठीण अभियोगांत त्यांच्या बचावाचे यशस्वी भाषण करणाऱ्या बॅ. पी. आर. दास यांचे एक वैयत्ति क पत्र पाठवून मनःपूर्वक आभार मानले.

## सरदार पटेल यांचे अभिनंदन

१ एप्रिल १९४९ रोजी वीर सावरकरांनी गृहमंत्री सरदार पटेल यांना पत्र पाठवून कळविले की जयपूर येथील विमान अपघातातून आपण सुखरूप राहिलेत हे आपले नि आपल्या देशाचे सुदैव! आपण राष्ट्राचे एक आधारस्तंभ आहात. परिस्थितीची यथायोग्य जाणीव ठेवून आपण या आताच स्वतंत्र झालेल्या भारतीय राज्याची नौका निश्चित आणि समर्थ धोरणाने हाकारून हे राज्य अनेक अडचणींतून सुरक्षित ठेवले आहे!

भारताचे गृहमंत्री सरदार पटेल यास ३० मे १९४९ रोजी वीर सावरकरांनी खालील तार पाठविली:

“जातीय आणि धार्मिक भेदावर आधारलेले स्वतंत्र मतदारसंघ, राखीव स्थाने, विशेषाधिकार नष्ट करणारा ठराव मांडणाऱ्या, संमत करून घेणाऱ्या आपल्या नेतृत्वाला नि घटना समितीला मी मनःपूर्वक धन्यवाद देतो. हा ठराव संमत करून भारतीय राज्याचे सत्य राष्ट्रीय स्वरूप निदर्शनास आले आहे. ह्या ठरावातील हेतू मोठ्या धैर्याने, निश्चयाने नि काटेकोरपणे आपली निर्वाह संस्था कार्यवाहीत आणील अशी आशा मी करतो!

## घटना समितीच्या अध्यक्षांस

वीर सावरकरांनी घटना समितीच्या अध्यक्षांना ५ ऑगस्ट १९४९ रोजी खालील तार पाठविली:

“घटना समितीने आपल्या देशाचे नांव भारत, राष्ट्रीय भाषा हिंदी आणि राष्ट्रीय लिपी म्हणून नागरी, यांस मान्यता द्यावी अशी आपणाला विनंती करताना मी माझ्या लक्षावधी देशबांधवांचे मत आणि भावना व्यक्त करीत आहे.”

## हिंदू सभा नेत्यांना पाठवलेले संदेश

वीर सावरकरांनी २२ एप्रिल १९४९ रोजी उत्तर प्रदेश हिंदुसभा संमेलनाचे कार्यवाह श्री. त्रिवेणीसहाय्य मिश्रा यांना पाठविलेल्या पत्राचा सारांश असाः

अ) कोणाशीही मनाला त्रासदायक ठरणारी चर्चा करू नये असा वैद्यकीय तज्ज्ञांचा समादेश आहे ! अशा स्थितीत आपल्या संमेलनाचे अध्यक्षपद स्वीकारणे अगदी अशक्य आहे. आपले संमेलन पूर्वीप्रमाणेच यशस्वी व्हावे हीच माझी सदिच्छा, तसेच महंत दिग्विजयनाथ, आपले अन्य मित्र नि सहकारी यांस माझे धन्यवाद सांगावेत. जर मला शक्य असले तर एक स्वयंसेवक म्हणूनही हे अधिवेशन यशस्वी व्हावे यासाठी मी काम केले असते. पण आता त्यांनी मला क्षमा करावी, कारण मी कोणतेही काम करण्यास अगदी असमर्थ आहे!

“आपल्या संकल्पित अधिवेशनाचे अध्यक्षपद मी स्वीकारावे अतका विश्वास माझ्यावर दर्शविण्याचे आपले नि आपल्या सहकाऱ्यांचे पत्र पोचले. पण माझी प्रकृती हे झेपण्याअतकी सशक्त नाही.”

आ) बंगाल प्रदेश हिंदू सभेचे मुख्य कार्यवाह श्री. देवेन्द्रनाथ मुखर्जी यांस २२ नोव्हेंबर १९४९ रोजी एक तार पाठवून कळविलेः

“आपण मला एकमताने हिंदू महासभेच्या अध्यक्षपदी निवडून जो विश्वास व्यक्त केला त्यासाठी आभार. परंतु प्रकृती सतत क्षीण होत असल्याने अध्यक्षपद स्वीकारता येत नाही! आपण मला क्षमा करावी हीच प्रार्थना!”

अ) दि. ५ डिसेंबर १९४९ रोजी सावरकरांनी अ. भा. हिंदू महासभा अधिवेशनाच्या स्वागत समितीला कळविलेः

“आपली तार मिळाली. आपल्या स्वागत समितीच्या अत्यंत प्रेमळ नि प्रभावी अत्याग्रहामुळे डॉक्टरांचा समादेश नसतानाही मी आपल्या विनंतीपुढे नमत आहे! २४ रोजी मी हिंदू महासभा अधिवेशनाचे उद्घाटन करण्यासाठी येईन - अर्थात माझी प्रकृती अगदी अैनवेळी बिघडली नाही तरच!

७ डिसेंबर १९४९ रोजी सावरकरांनी डॉ. ना. भा. खरे यांस तारेने कळविले की, हिंदू महासभेच्या अध्यक्षपदी आपली एकमताने निवड झाली यासाठी मनःपूर्वक अभिनंदन!

## सरसंघचालकांचे अभिनंदन !

रा. स्व. संघाचे सरसंघचालक श्री. गोळवळकर गुरुजी यांस १५ जुलै १९४९ रोजी वीर सावरकरांनी खालील तार केलीः

“आपली सुटका झाली यासाठी मनःपूर्वक अभिनंदन. हिंदू जगताचा पराक्रमी विजेता (चॅम्पियन) म्हणून संघ चिरायु होवो!”

## मा. तारासिंग यांचा गौरव

शीख नेते मास्टर तारासिंग यांस ५ ऑक्टोबर १९४९ रोजी वीर सावरकरांनी खालील तार पाठविली.

“आपली सुटका झालेली अैकून मला खूप आनंद झाला. आपल्या समान कार्यांत आपण खऱ्या देशभक्तीने जे महत्त्वाचे कार्य केले त्याचे खरे मूल्यमापन माझ्याप्रमाणे कोणी करू शकेल असे वाटत नाही! फाळणीच्या त्या भयानक काळात ज्या थोड्या नेत्यांनी आपल्या लोकांची पराक्रमी प्रवृत्ती जोपासली आणि निदान पूर्व पंजाब तरी वाचविला त्या नेत्यांत आपले स्थान महत्वाचे आहे!”

स्वतंत्र भारतीय गणराज्य २६ जानेवारी १९५० रोजी स्थापन होणार याचा त्यासाठी सतत प्रयत्न करणाऱ्या स्वा. सावरकर यांना जो साफल्यानंद झाला तो आजही शब्दातीत आहे! त्या स्वतंत्र भारतासंबंधी २४ जानेवारीला सावरकरांनी काढलेल्या पत्रकाचा मुख्य आशय असाः

"येत्या २६ जानेवारीला आपल्या स्वतंत्र भारतीय गणराज्याची प्रस्थापना मोठ्या समारंभाने साजरी होणार ही घटना अैतिहासिक गौरवास्पद आहे. आपल्या मातृभूमीवर संशयातीत निष्ठेने, विनाअट आणि मनःपूर्वक प्रेम करणारा प्रत्येक नागरिक, ब्रिटिशांच्या दास्यातून आपली मातृभूमी मुक्त झाली; त्या प्रीत्यर्थ होणाऱ्या ह्या सोहळयात आनंदाने सहभागी होईलच! वैयत्ति क, प्रांतिक आणि पक्षीय असलेले लहान-मोठे मतभेद विसरून आपण सर्वांनी या मातृभूमीच्या एका व्यासपीठावर एकत्र येऊन हा आपला राष्ट्रीय विजय सर्व जगाला गर्जून कळवूया!

आहे! आपला हा विजय खरोखरच महान आहे. साम्राज्यवादी अंग्रजांचा हृदयपालट होऊन मोठ्या औदार्याने ते भारत सोडून गेले असे समजणे वेडेपणा आहे. वस्तुस्थिती अशी की ते आपण होऊन गेले नसून आम्ही त्यांना भारताबाहेर हाकलेले आहे. जेव्हा रोमन राज्यकर्ते ब्रिटन सोडून जाऊ लागले होते तेव्हा त्यावेळच्या ब्रिटिश जनतेने त्यांच्या पाया पडून विनविले की आम्हाला राक्षसी सत्ता नि खोल समुद्र यांच्या संकटात सोडून तुम्ही जाऊ नका. आज आम्ही त्यांच्याप्रमाणे कोणाचेही पाय तर धरले नाहीतच पण उलट त्या राक्षसी सत्तेलाच खोल समुद्रात बुडविले आहे. ब्रिटिशांचा जर खरोखर हृदयपालट झाला असता तर आजही आफ्रिकेतील मोठमोठे प्रदेश नि इतर त्र असलेले छोटे-मोठे भूभाग त्यांच्या सत्तेखाली कां ठेवले असते ? खरी कथा अशी की १८५७ पासून चालू झालेला भारतीय स्वातंत्र्यलढा सतत निरनिराळया मार्गांनी चालूच आहे. अहिसक सत्याग्रह, असहकार हे त्याचे एक रूप होते तर सशस्त्र प्रतिकार हे त्याचे दुसरे रूप होते. हा सशस्त्र प्रतिकार गेल्या दोन महायुद्धात ब्रिटिशांनी अनुभवला आणि शेवटी जेव्हा भारतीय भूदल नि नौदलही त्यांच्या विरुद्ध उलटले, त्यांची शक्ती अधिक मारक ठरली तेव्हाच ब्रिटिश साम्राज्यवादी पांढरा ध्वज दाखवून शरण आले; हा देश सोडून गेले. केवळ आंतरराष्ट्रीय परिस्थितीनेही हे शक्य झाले नसते. पण १९१४ नि १९३९च्या महायुद्धात आपल्या सशस्त्र क्रांतिकारकांनी अंग्रजांच्या शत्रूचे साहाय्य घेऊन, देशात शस्त्रास्त्रे आणून अंतर्गत सशस्त्र उठाव केला. तसेच बाहेरूनही सशस्त्र आक्रमण करून हा स्वातंत्र्य संग्राम लढविला. अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा लाभ घेणारा तो डाव हा सुद्धा एक युद्धसंग्रामच होता.

आता सुखाने सत्तेवर बसलेले काही भोजनभाऊ ठासून सांगतात की ही क्रांती रक्त हीन क्रांती आहे! जणू काय आमचे रक्त सांडू नये म्हणूनच पापभिरू अंग्रज हा देश सोडून गेले! एवढे खरे की असे

बडबडणाऱ्या देशभक्तांनी त्यांच्या रक्त ाचा एकही बिदू ह्या स्वातंत्र्यासाठी दिला नाही! पण ह्यांना सोडून सर्व देशाचा विचार केला की काय दिसते? केवळ १८५७च्या स्वातंत्र्यसंग्रामात आपले लाखापेक्षा अधिक लोक लढता लढता मारले गेले. त्यानंतर गेल्या ५० वर्षांत पुण्यात फाशी गेलेल्या चाफेकर बंधूंपासून ते लंडनमध्ये फाशी गेलेल्या उधमसिगापर्यंतच्या अंग्रजांचेही रक्त सांडणाऱ्या सशस्त्र क्रांतिकारकांनी त्यांच्या नव्या तरुण रुधिराने ते फाशीचे स्तंभ सतत ओले ठेवले! कुका, वासुदेव बळवंत फडके, गदर, कोमागाटामारू, हाँगकाँग, सिंगापूर, ब्रह्मदेश आदी उठाव तसेच पहिले महायुद्ध आणि नंतरच्या जालियनवाला बागेतील निःशस्त्र लोकांचे सांडले गेलेले रक्त , अमर नेताजींच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र हिद सेनेने केलेला संग्राम, त्यानंतरचा नौदल नि वायुदलाचा उठाव आणि शेवटी ब्रिटिश कुटिल नीतीने देशाची फाळणी केल्यामुळे दोन्ही पक्षांच्या लक्षावधी निरपराध लोकांचे सांडलेले रक्त हे सर्व पहा नि सांगा रक्त ाच्या नद्या वाहिल्या नाहीत कां?

अशा प्रकारे एक दीर्घकालीन राष्ट्रीय युद्ध लढून हा भारतीय गणराज्याचा आनंददायी स्थापनादिन आपण साजरा करीत आहोत. अशा वेळी आपण मुळीच निराश होऊ नये. आपणा सर्वांना निषेधार्ह असलेल्या विभाजनाच्या भयानक दुःखानेही आपल्या मनात पराभूत प्रवृत्ती निर्माण होऊ देऊ नये. सर्वस्व गेलेले असताही ज्या मार्गाने आपण मातृभूमीचा तीनचतुर्थांश भाग स्वतंत्र करू शकलो तोच निर्धार ठेवून पुढे लढलो तर उरलेला एकचतुर्थांश भूभाग मुक्त करणे कठीण नाही. देशाची फाळणी ही आजची सत्य घटना आहे हे खरे. पण अलेक्झांडरने हाच भाग जिंकून ती एक सत्य घटना निर्माण केली नव्हती का? असे होते तरी अतिहासच आपणास सांगतो की त्यानंतर काही वर्षांनीच त्याचा सेनापती सेल्युकस याने त्या सर्व भागावरील त्याची सत्ता सोडून आपली नैसर्गिक सीमा असलेला हिंदुकुशपर्यंतचा सर्व प्रदेश आणि त्याची कन्याही सम्राट चंद्रगुप्ताला अर्पण करून आपली मैत्री संपादिली. अशा निश्चित झालेल्या घटना पुन्हा निश्चित करण्याचे आपले मार्ग आहेत. आता आपण प्रथम जे मिळविले आहे ते सुसंघटित करून विदेशी शक्तींशी जशास तसे ह्या धोरणाने वागू म्हणजे आपले सर्व काही ठीक होईल.

पण केवळ आनंदाने स्वातंत्र्यदिन साजरा करून ते मिळविल्याची प्रौढी मिरवीत राहून त्या स्वातंत्र्यासमवेतच बाह्य आक्रमणामुळे आणि अंतर्गत अराजकामुळे येणारे त्याच्या रक्षणाचे दायित्व आणि कर्तव्य आपण विसरता कामा नये. हे संरक्षण करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे आपले बलवान भूदल, नौदल नि वायुदल निर्माण करणे!

याच अनुषंगाने मी विशेषतः तरुणांना आवाहन करतो की या स्वातंत्र्यदिनाच्या दिवशीच त्यांनी सहस्रांच्या संख्येने या सेनादलात जाण्याचा आणि त्यांच्या मातृभूमीचे स्वातंत्र्य अबाधित नि सुरक्षित ठेवण्याचा निर्धार करावा.”

## सरदारसिह राणांना पत्र

श्री. सावरकर १९०६ साली लंडनला शिक्षणासाठी गेले. त्यावेळी त्यांना सरदारसिह राणा यांनी ठेवलेली शिष्यवृत्ती मिळाली. पुढे सरदारसिह अभिनव भारताचे सदस्य झाले. ते पॅरिसला राहत. तेथे काही दिवस सावरकरही राहत होते. त्यांनी १९१० साली पॅरिस सोडले. त्यानंतर ४० वर्षांनी ९ मार्च १९५० रोजी स्वा. वीर सावरकरांनी बॅ. राणा यांना पाठविलेल्या पत्राचा सारांश असाः

“केसरीचे श्री. कुळकर्णी यांना पाठविलेल्या पत्रात आपण माझी चौकशी केली हे वाचून मला अत्यानंद झाला. आपले आता वय झाले असताही आपली प्रकृती चांगली आहे हे वाचून तर तो आनंद द्विगुणित झाला. माझी प्रकृती बंदिगृहातील शारीरिक नि मानसिक त्रासामुळे तितकी चांगली नसली तरीही आपल्यासारख्या क्रांतीकाळाच्या वादळी दिवसांतील एका प्रियतम सहकाऱ्याला आणि मित्राला अनपेक्षित पत्र लिहिताना मी अत्यानंद अनुभवीत आहे. पॅरिस आणि लंडनमध्ये राहणाऱ्या आणि भारतीय स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या वीरांपैकी आता आपणच एकटे उरले आहात. चाळीस वर्षांनंतर आपल्या पत्रातून अैकू येणारा आपला ध्वनी आणि त्याला मी देत असलेला प्रतिसाद हा दोन मृतात्म्यांच्या संवादासारखा भासत आहे. आता ती चाळीस वर्षे संपली. तो लढा पूर्ण झाला.

ब्रिटिशांना आपल्या मातृभूमीबाहेर हाकलले गेले असून आपली भूमी स्वतंत्र झाली आहे. अभिनव भारत आता अवतरला आहे.

अर्थात प्रत्येक घटनेला मर्यादा असतेच. एका धडाक्यात कोणतेही राष्ट्र संपूर्ण स्वतंत्र झालेले नाही. छत्रपती शिवाजी, ग्यारी बाल्डी, वॉशिंग्टन अथवा डी व्हेलेरा यांपैकी कोणीही त्यांचा संपूर्ण देश स्वतंत्र करू शकले नाहीत तरीही अतिहास त्यांना त्यांची मातृभूमी मुक्त करणारे मानतो. त्याप्रमाणे अभिनव भारताचे राष्ट्रस्वतंत्रतेचे कार्य साकार झाले आहे. त्यासाठी महाराष्ट्राला अभिनव भारताच्या अनेक मित्रांचा आणि भक्त ा ंच्या ‘अभिनव भारत’ ह्या पहिल्या क्रांतिकारी संस्थेचा तसेच तिच्या आज जिवंत असलेल्या प्रतिज्ञित सभासदांचा सार्वजनिक सन्मान प्रकटपणे करण्याचा विचार आहे. १० मे हा १८५७ च्या स्वातंत्र्यसमराचा प्रारंभदिन हिंदू महासभेच्या वतीने स्वातंत्र्यदिन म्हणून अनेक वर्षे साजरा केला जात असून येत्या १० मे ह्या दिवशी हा समारंभ करावा असा विचार आहे. ‘केसरी’चे श्री. ग. वि. केतकर त्याचे संयोजक आहेत.

तरी या समारंभाला आपण उपस्थित राहिलात तर संयोजक तो आपला सन्मान समजून अतिशय आनंदित होतील. प्रकृतीमुळे आपणाला येणे अगदीच अशक्य असेल तर निदान आपला संदेश तरी यावा. ‘अभिनव भारत’ या संस्थेचे ध्येय जे स्वातंत्र्य ते आता साध्य झाले आहे म्हणून ही क्रांतिकारी संस्था विसर्जित केल्याची प्रकट घोषणा मी त्या दिवशी करणार आहे.

गेल्या डिसेंबर महिन्यात कलकत्ता येथे झालेल्या हिंदू महासभेच्या अधिवेशनाचे उद्घाटन करताना मी केलेल्या भाषणाच्या दौऱ्याचे वृत्त आपण वाचले असेल. आपण ‘केसरी’, ‘मराठा’ वाचता का? ती पत्रे आपणाला मिळत नसतील तर ती आपणाकडे भेट म्हणून पाठवावीत अशी विनंती मा. श्री. केतकर यांस करीन.

श्री. याज्ञिक यांनी लिहिलेले पं. श्यामजी कृष्णवर्मा यांचे चरित्र मी वाचले आहे. आपणही आपले आत्मचरित्र विस्तृतपणे लिहावे. कारण तिकडे झालेल्या चळवळीची प्रत्यक्ष माहिती आपणच जाणता. मी बंदिगृहात असल्याने मलाही तितकी माहिती नाही. स्वातंत्र्य चळवळीच्या अतिहासाच्या दृष्टीने हे कार्य होणे अत्यंत आवश्यक आहे.

यानंतर २२ मार्चला वीर सावरकरांनी राणाजींना दुसरे पत्र पाठविले त्याचा सारांश असाः

“आपले पत्र पोचले. त्यात आपण लिहिलेल्या काही आठवणी फार महत्त्वाच्या आहेत. मी सध्या दिल्ली नि पूर्व पंजाबच्या दौऱ्यावर जाण्याच्या घाईत असल्याने त्यातल्या त्यात वेळ काढून हे पत्र पाठवीत आहे. त्यातील विधेयांकडे पूर्ण लक्ष देऊन आम्हा सर्वांना उफत कराल अशी आशा आहे!

(१) आपण आपले चरित्र आठवेल तसे लिहावे. आपल्या आठवणी महत्त्वाच्या आहेत असे काल मला भेटून गेलेले सेनापती बापटही म्हणत होते. आपण त्या अवश्य लिहाव्या. ते आपले एक कर्तव्यच आहे. भाषेकडे पाहू नये. १९०६ पासून आजवर तिकडे प्रत्यक्ष कार्य करणारे आपण एकटेच आहात, या दृष्टीने आपल्या आठवणींना फार महत्त्व आहे.

(२) १९०६ ते १९१० या काळात तेथे झालेल्या 'अभिनव भारता'च्या सदस्यांची केवळ नावे १ मेपर्यंत अवश्य पाठवावी. १० मेच्या समारंभासाठी ती हवी आहेत.

(३) श्री. वीरेंद्र चट्टोपाध्याय यांची माहिती त्यात अवश्य असावी.

(४) १० मे च्या समारंभाला आपला संदेश अवश्य असावा.

(५) आपल्या अतरांविषयीच्या आठवणी सांगणारे आत्मचरित्र आवश्यक तर गुजरातीमध्येही लिहावेच. आपल्या ह्या आठवणींचा मला, जगलो वाचलो तर, माझे चरित्र लिहिताना पुष्कळच उपयोग होईल.

आपण आपल्या आठवणी लिहिण्यास लवकर प्रारंभ कराल अशी आशा करणारा आपला शुभचिंतक

- वि. दा. सावरकर

## पुन्हा अटक आणि राजकारणात भाग न घेण्याच्या अटीवर सुटका !

मे महिन्यात अभिनव भारताचे विसर्जन करण्याचा वीर सावरकरांचा विचार होता पण एप्रिल महिन्यात पंजाब-दिल्लीच्या दौऱ्यावर जाण्यापूर्वीच पाक पंतप्रधानांच्या दिल्ली भेटीआधी सावरकरांना अटक करण्यात येऊन दूर बेळगांवच्या कारागृहात ठेवण्यात आले ! तेथून त्यांना वर्षभर (निवडणूक अथवा युद्ध न झाल्यास) राजकारणात भाग न घेण्याच्या अटीवर सोडण्यात आले. ही सुटका होताच हिंदू महासभेचे अध्यक्ष डॉ. ना. भा. खरे यांना त्यांनी खालील तार पाठविलीः

"शासनाने मला विशिष्ट कालापुरती राजकारणात भाग घेण्यास बंदी केल्यामुळे आणि ती मी पाळणार असल्याने, हिंदू महासभेच्या प्राथमिक सभासदत्वाचेही त्यागपत्र देणे मला भाग पडत आहे."

**सरदार पटेल**

सरदार पटेलांचे निधन झाल्याचे वृत्त कळताच डिसेंबर १९५० मध्ये सावरकरांनी म्हटले:

"त्यांची अत्यंत आवश्यकता असतानाच सरदार पटेल यांस आम्हास सोडून जाणे भाग पडले ही घटना किती दुर्दैवी"!

## पाकविरुद्ध लढण्याची अच्छा

वीर सावरकरांनी ऑगस्ट १९५१ मध्ये पंतप्रधान पंडित नेहरूंना तार पाठवून कळविले:

"पाक आक्रमणापासून देशाचे संरक्षण करण्यासाठी मी माझी सेवा अर्पण करू इच्छितो पाकिस्तान भारताला सतत तापदायक होणार. ब्रिटिशांच्या कुटिल कारवाईने देशाची फाळणी स्वीकारणे भारताला भाग पडले. आपल्या मातृभूमीसाठी माझा देह अर्पण व्हावा ही माझी अंतिम अच्छा आहे."

**माझा ७१वा जन्मदिन साजरा करू नका**

१७ मे १९५३ रोजी वीर सावरकरांनी आपला वाढदिवस साजरा करू नये यासंबंधी एक पत्रक काढले. ते असेः

"सर्व भारतातून आणि विशेषतः महाराष्ट्रातून मला अनेक पत्रे येत असून त्यात माझा वाढदिवस मोठ्या प्रमाणावर साजरा करून त्या त्या नगरी माझा सत्कार करून मला निधी देण्याची योजना आखली जात आहे. परंतु वाढते वय आणि दुर्बल होत असलेली प्रकृती यामुळे मी कोणताही प्रवास करू शकणार नाही. दुसरे कारण महाराष्ट्रात आणि देशभर पडलेला दुष्काळ. त्यासाठी ठिकठिकाणी निधी उभारण्याचे कार्य महत्त्वाचे असल्याने माझ्या वाढदिवसासाठी कोणीही निधी जमवू नये. तो साजरा करण्यासाठी व्यय करू नये.

माझा वाढदिवस साजरा करण्यामागे असलेली देशभक्तीची कृतज्ञ भावना मी समजू शकतो. तरी तशा वृत्तीच्या जनतेने मी केलेली देशभक्ती आणि मानवसेवा यासाठी त्यांना वाटणारा आदर त्यांनी केवळ मनःपूर्वक सहानुभूती नि कृतज्ञता दर्शवून व्यक्त करावा, एवढीच माझी अपेक्षा नि विनंती आहे!

**डॉ. मुखर्जी यांना खरी श्रद्धांजली म्हणजे काश्मीर भारताचा अविभाज्य भाग करा!**

डॉ. शामाप्रसाद मुखोपाध्याय (मुखर्जी) यांचे काश्मीरच्या बंदिगृहात अचानक निधन झाले; हे वृत्त अैकताच सावरकरांनी खालील निवेदन प्रसिद्ध केलेः

"डॉ. शामाप्रसाद मुखोपाध्याय यांच्या निधनाचे वृत्त अतके आकस्मिक नि धक्कादायक होते की तीन वेळा त्याला दुजोरा मिळेपर्यंत त्यावर विश्वासच बसत नव्हता! त्यांच्या निधनाने भारत एक महान देशभक्त, राजकारणी नि संसदपटू गमावून बसला आहे! त्यांच्या हौतात्म्याने संपूर्ण काश्मीर भारतीय गणराज्यात पूर्णपणे विलीन व्हावे. ते एकविधान, एक प्रधान, एक निशाण या ध्येयाने लढले आणि रणक्षेत्रातच मरण पावले. तेच ध्येय धरून आपण विजयश्री मिळेतो लढूया! हेच त्या महान नेत्याचे खरे स्मारक होऊ शकेल. अखिल भारत आणि विशेषतः हिंदू जगत ह्यांच्यासाठी अतक दीर्घकालीन

कार्य करणाऱ्याला कधीही विसरू शकणार नाही! माझ्यापुरती ही केवळ राष्ट्रीय हानी नसून मी एका सन्मान्य मित्राला आणि सहकाऱ्याला मुकलो आहे.

## पराभव नव्हे तर विश्वासघात हाच खरा अपराध !

उत्तर प्रदेशचे हिंदू सभेच्या ३२ व्या अधिवेशनाच्या स्वागत समितीचे सचिव श्री. विश्वनाथ अगरवाल यांना २८ फेब्रुवारी १९५५ रोजी वीर सावरकरांनी खालील संदेश पाठविला.

“३२ वे अधिवेशन यशस्वी होवो. निवडणूक जिंकणार की हरणार याची क्षीती न बाळगता अनुकूल नि प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या शक्तीनुसार अखिल हिंदुध्वज लढवीत रहा ! पराभव नव्हे तर हिंदुहिताचा विश्वासघात हा एक महान अपराध होय!”

## सशस्त्र क्रांतिकारक खानखोजे यांचे अभिनंदन!

“आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी हातात बंदुका घेऊन ब्रिटिशांविरुद्ध लढणारे एक योद्धे श्री. खानखोजे यांच्या सत्कारात मी सहभागी आहे. अशी तार ४ फेब्रुवारी १९५६ रोजी वीर सावरकरांनी नागपूरचे अधिवक्ते श्री. मंडलेकर यांस पाठविली.

## अहमदाबादला कर्णावती म्हणा!

गुजरात राज्य निर्मितीच्या वेळी ४ फेब्रुवारी १९६० रोजी वीर सावरकरांनी खालील निवेदन प्रसिद्ध केले.

“गुजराती जनतेच्या अच्छेनुसार लवकरच गुजरातला प्रांतिक स्वतंत्र शासन मिळणार आहे; ह्या अैतिहासिक समयी मी पुन्हा एकदा माझ्या गुजराती बांधवांना आवाहन करतो की त्यांनी द्वेषपूर्ण अहमदाबाद हे नाव नष्ट करून ते नगर बसविणारा राजा कर्ण याची स्मृती जागृत करणारे कर्णावती हे नाव पुन्हा व्यवहारात आणावे.

त्या नगराचे सध्याचे अहमदाबाद हे नाव सुलतान अल्लाउद्दीन आणि त्याच्या इस्लामी सेनानींनी गुजरातवर आक्रमण करून हिंदू राजधानी कर्णावती धुळीस मिळविली, लुटली आणि नंतर गुजरातभर हिंदूंची लुटालूट केली, त्यांच्या स्त्रियांवर बलात्कार केले, बळाने बाटविले; तेव्हापासून रूढ झाले. सुलतान अहमदशहाने त्या भग्न कर्णावती नगरावरच जाणूनबुजून नवीन राजधानी बसवून तिचे नांव अहमदाबाद ठेवले. पुढे कुप्रसिद्ध महंमद बेगडा यानेही तेथेच राजधानी केली.

अशा परिस्थितीत पुन्हा अहमदाबाद हे नाव तसेच पुढे चालू ठेवले तर त्यामागे असलेल्या ह्या द्वेषमूलक आठवणीही तशाच पक्क्या राहतील. आता आपण विजयी झालो आहोत. अशा वेळी ते द्वेषमूलक नि अपमानास्पद नाव गुजरातच्या मानचित्रावरून काढून टाकणे हे आपले कर्तव्य आहे. ते नगर राजधानी म्हणून राहणार असले तरीही त्याचे कर्णावती हेच नाव पुन्हा प्रचलित केले पाहिजे.

पण जर अन्य ठिकाणीच राजधानी निर्माण करावयाची असेल तर त्या नगराचे नाव आपल्या प्रबळ अच्छाशक्तीने नि पोलादी मनगटाने नवभारतासाठी एवढे कार्य करणाऱ्या श्री. वल्लभभाई पटेल यांच्या स्मरणार्थ वल्लभनगर असे ठेवावे.

तसेच गुजरातच्या सीमेवर असलेल्या सागराचे परकीय नि अपमानास्पद असलेले अरबी समुद्र हे नावही पालटले पाहिजे. ह्या समुद्रतटावर सर्व हिंदूंना वंदनीय असणाऱ्या भगवान श्रीकृष्णाची राजधानी होती त्याचे स्मरणार्थ ह्या सागराचे 'रत्नाकर' हे पौराणिक नाव पुन्हा रूढ करावे अथवा पूर्वेकडील समुद्राला असलेल्या 'गंगासागर' या नावाला साजेसे ह्या पश्चिम समुद्राला 'सिंधुसागर' हे नाव द्यावे.

## विजयी झालो तर पेकिंगला पोचू!

कलकत्ता येथे झालेल्या अ. भा. हिंदू सभेच्या अधिवेशनाला ३० डिसेंबर १९६२ रोजी सावरकरांनी धाडलेला संदेश असाः

"ब्रिटिश राजवटीत मॅकमोहन रेषा ही जरी आमच्या देशाची सीमा मानली गेली असली तरी गेली सहस्रावधी वर्षे ब्रह्मपुत्रा हीच आमची सीमा होती हे त्या नावावरूनच स्पष्ट होत आहे. उत्तर सीमेच्या पलीकडे लडाक ते मानससरोवर या प्रदेशात असलेली आमची शे-दीडशे मंदिरे आणि तीर्थक्षेत्रे ही आमची परंपरागत सांस्कृतिक सीमा आहे. आमचे सहस्रावधी यात्रेकरू आणि व्यापारी गेली अनेक शतके कोणत्याही परसत्तेचा अडथळा न येता या मार्गाने ये-जा करीत आहेत. प्रसिद्ध चिनी प्रवासी नि यात्रेकरू याच मार्गाने भारतात आले.

याच मार्गाने कुशाणांनी चढाई करून चीनचा पराभव केला. त्याच्या पलीकडे तिबेट हे कीलक राज्य (बफर स्टेट) म्हणून राहिलेच पाहिजे. संधी करायचाच असेल तर तो वरील अटींवर व्हावा. पण लक्षात ठेवा की राज्यांच्या सीमा युद्धातील जय वा पराजय ठरवीत असतो. आपला पराभव झाला, आपले सैन्यदल दुर्बल ठरले, ते शत्रूला तोंड देण्यास असमर्थ ठरले तर तशा विपरित परिस्थितीत परवडेल तो शस्त्रसंधी करावा, पण लक्षांत ठेवावे की शस्त्रसंधी हा खरा संधी नव्हे. पण आपली सेना जर सारखे विजय मिळवीत गेली तर मॅकमोहन अथवा अन्य कोणतीही सीमा न मानता आपण सरळ पेकिंगवर चढाई करू!

औरंगजेबाच्या काळात अटकेवर हिंदुध्वज फडकविणे ही कल्पनाही थट्टेची होती. आमच्या लहानपणी संपूर्ण स्वातंत्र्याची कल्पनाही हास्यास्पद समजली जाई. पण घटना घडल्या आहेत. ही तिसरी घटनाही हिंदू कां खरी करू शकणार नाहीत?

पाकिस्तानसंबंधी सांगायचे म्हणजे ही दोन राष्ट्रे एक होऊ शकणार नाहीत, त्यांनी होऊही नये. इस्लामाधिष्ठित पाकिस्तान भारताचा खरा मित्र कधीही होणार नाही. अयुबखान तसेच सांगत आहे. शेकडो वर्षे मुसलमानी राजे हेच सांगत आले आहेत. आमचे राष्ट्र हिंदुत्वावर आधारलेले आहे. जर पंडित नेहरू त्यांच्या शत्रूचे समाधान करण्याच्या धोरणाला अनुसरून काश्मीर अथवा भारताचा अन्य भूभाग देऊन पाकिस्तानशी संधी करण्याचा प्रयत्न करतील तर त्या संधीला हिंदू महासभेने कधीही मान्यता तरी देऊ नये. तुम्ही संपूर्ण काश्मीर दिले तरीही पाकिस्तान संतुष्ट होणार नाही! 'हस के लिया पाकिस्तान, लढ के लेंगे हिंदुस्थान' अशा घोषणा देत ते त्यांच्या मागण्या वाढवीतच राहतील. माझा तुम्हाला संदेश 'राजनीतीचे हिंदू करण'. तात्पुरते अथवा नित्याचे सर्व राजकीय प्रश्न, आपल्या देशाचे अधिकात अधिक हित लक्षात घेऊनच सोडविले पाहिजेत."

## बॅ. निर्मलचंद चट्टोपाध्याय यांस संदेश

वीर सावरकर यांनी २८ डिसेंबर १९६३ रोजी खालील आशयाचे पत्र लोकसभेवर निवडून आलेले विगत हिंदू महासभाध्यक्ष बॅ. निर्मलचंद्र चट्टोपाध्याय (चटर्जी) यांस पाठवून त्यांचे अभिनंदन केले. ते पत्र असे:

"गेल्या अनेक दिवसांपासून वाढत जाणाऱ्या आजाराने आणि वयाने मला सार्वजनिक चळवळीत भाग घेणे अशक्य झाले असले आणि मला अंथरूण धरून रहावे लागत असले तरीही आपण विरोधी काँग्रेस स्पर्धकाचा पराभव करून लोकसभेवर निवडून आलात यासाठी आपले अभिनंदन करणे मी आपले कर्तव्य मानतो.

आपल्या विजयाने आता तरी विशेषतः बंगाली हिंदूंना तसेच इतर सर्व हिंदूंनाही त्यांच्या हितरक्षणासाठी लोकसभेत लढणारा एक सबळ प्रतिनिधी मिळेल अशी मला दृढ आशा आहे. सर्वप्रथम खालील तीन मागण्यांवर भर द्यावा.

(१) पूर्व बंगालमधील सर्व हिंदूंना पश्चिम बंगालमध्ये येण्याची अनुज्ञा असावी आणि निदान तितके तरी पश्चिम बंगालमधील मुसलमान आवश्यक तर बळानेही पूर्व बंगालमध्ये पाठविले जावेत.

(२) पाकिस्तानने केलेल्या प्रत्येक आक्रमणाला, मग ते सैनिकी असो किवा अन्य प्रकारचे असो, जशास तसे या न्यायाने हिंदुस्थान सरकारने प्रत्याक्रमणाने प्रत्युत्तर दिले पाहिजे.

(३) पूर्व वा पश्चिम सीमेवरील एक तसूभर भूमीही तेथील हिंदूंच्या संमतीवाचून पापस्तानला दिली जाऊ नये.

## आता माघार नको

भारत-पाक युद्धाच्यावेळी आपली सेना लाहोरवर चढाई करीत आहे हे वृत्त अैकून आनंदित झालेल्या वीर सावरकरांनी ६ सप्टेंबर १९६५ रोजी खालील सूचना दिली!

“आता आपल्या सेनेची चालू असलेली चढाई कशानेही थांबू नये. दुसरे काय म्हणतील या भीतीने आपण माघार घेऊ नये. नेहरू शासनाच्या गुढघेटेकू धोरणाचे दुष्परिणाम देशाला भोगावे लागले आहेत.”

लढाई थांबल्यावर पाकिस्तानी नेत्यांशी बोलणी करण्यासाठी ताश्कंद येथे जाण्याचे पंतप्रधान शास्त्री यांनी मान्य केले. ते दुर्दैवी वृत्त अैकून वीर सावरकर म्हणाले,

“भारतीय सैन्याने जिंकलेली तसूतसू भूमी, शांततेसाठी सोडावी असे सांगून शास्त्रींना त्यांची फसवणूक करून मान्य करणे भाग पाडले जाईल! जशास तसे या प्रत्याक्रमक धोरणानेच पाक आक्रमण थांबविता येईल. केवळ रशिया नि अमेरिकेची मैत्री पुरी पडणार नाही. भारत अणू नि क्षेपणास्त्रांनी सज्ज करण्याची योजना तत्काल आखली पाहिजे. जर चीन सिकियांगमध्ये अण्वस्त्रनिर्मितीचे भव्य प्रकल्प उभारू शकतो तर भारतीय शास्त्रज्ञही दोन वर्षांच्या आत तशी शस्त्रे निर्माण करू शकतील. ते दुसरी अस्त्रेही शोधून काढतील. पण जोवर सरकार या दिशेने पावले उचलीत नाही तोवर आपली सदिच्छेची नि मैत्रीची बोलणी निरर्थक आहेत. केंद्रशासनाने आपले सैनिकी नि शस्त्रास्त्र सामर्थ्य वाढविणे अत्यावश्यक आहे!”